**Marathi/मराठी**

सत्यमेव जयते

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020

## शिक्षण मंत्रालय

## भारत सरकार

| प्रकरण | घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रस्तावना | 3 |
| **भाग I. शालेय शिक्षण** | | |
| 1. | प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण : अध्ययनाचा पाया | 8 |
| 2. | पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान: अध्ययनासाठी एक तातडीची आणि आवश्यक पूर्वअट | 10 |
| 3. | शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षण सर्वत्र आणि सगळया स्तरांवर पोहोचेल, हे सुनिश्चित करणे | 12 |
| 4. | शाळांमधील अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र : शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायक आणि रंजक असले पाहिजे | 14 |
| 5. | शिक्षक | 25 |
| 6. | यथायोग्य आणि सर्वसमावेशक शिक्षण: सर्वांसाठी शिक्षण | 32 |
| 7. | शाळा संकुल/क्लस्टरच्या माध्यामातून कार्यक्षम संसाधन आणि प्रभावी व्यवस्थापन | 37 |
| 8. | शालेय शिक्षणासाठी मानक ठरवणे आणि अधिस्वीकृती | 40 |
| **भाग II. उच्च शिक्षण** | | |
| 9. | दर्जेदार विद्यापीठे आणि महाविद्यालये: भारतातील उच्च शिक्षणव्यवस्थेसाठी नवीन आणि भविष्योन्मुखी दृष्टिकोन | 43 |
| 10. | संस्थांची पुनर्रचना आणि बळकटीकरण | 45 |
| 11. | अधिक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाच्या दिशेने | 48 |
| 12. | शिक्षणासाठी अनुकूल) वातावरण आणि विद्यार्थ्यांना सहयोग | 51 |
| 13. | प्रेरित, उत्साहीआणि सक्षम शिक्षक | 53 |
| 14. | उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकता | 55 |
| 15. | शिक्षकांचे शिक्षण | 56 |
| 16. | व्यावसायिक शिक्षणाची पुनर्कल्पना | 58 |
| 17. | नवीन राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशनच्या माध्यमातून दर्जेदार शैक्षणिक संशोधनाला चालना देणे | 60 |
| 18. | उच्च शिक्षणाच्या नियामक प्रणालीचा कायापालट करणे | 62 |
| 19. | उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रभावी व्यवस्थापन आणि नेतृत्व | 66 |

| | | |
|---|---|---|
| **भाग III. विचार करण्याचे इतर महत्वाचे केंद्रीय मुद्दे** | | |
| 20. | व्यावसायिक शिक्षण | 67 |
| 21. | प्रौढ शिक्षण आणि निरंतर अध्ययन | 68 |
| 22. | भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन | 71 |
| 23. | तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मीकरण | 76 |
| 24. | ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण: तंत्रज्ञानाचा समान वापर सुनिश्चित करणे | 79 |
| **भाग IV. अंमलबजावणी** | | |
| 25. | केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळाचे सक्षमीकरण | 81 |
| 26. | अर्थ पुरवठा: सर्वांसाठी परवडण्याजोगे आणि दर्जेदार शिक्षण | 82 |
| 27. | अंमलबजावणी | 83 |
| | **संक्षेपाक्षरांची यादी** | 85 |

## प्रस्तावना

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, शास्त्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रांमध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वांत चांगला मार्ग आहे. पुढच्या दशकात जगातील सर्वांत मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल.

भारताने 2015 मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या 2030 च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट 4 (SDG4) मध्ये 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम' समाविष्ट असून हे उद्दिष्ट 2030 पर्यंत "सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे" यासाठी प्रयत्न करण्याविषयी आहे. या उत्तुंग उद्दिष्टाकरता अध्ययनाला पाठिंबा देण्यासाठी आणि चालना देण्यासाठी संपूर्ण शिक्षण प्रणालीची नव्याने रचना करणे आवश्यक आहे म्हणजे शाश्वत विकास कृती कार्यक्रम 2030 ची सर्व महत्त्वाची लक्ष्ये आणि उद्दिष्टे साध्य करता येतील.

ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत. बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमधील वेगाने होत असलेल्या विकासामुळे जगभरातील अकुशल कामे आता माणसांऐवजी यंत्रे करू शकतील. त्याच वेळी, विशेषत: गणित, संगणक विज्ञान, आणि डेटा विज्ञान यातील कुशल कर्मचाऱ्यांना तसेच विज्ञान, समाजशास्त्र आणि मानव्यशास्त्रे यांच्यातील बहुशाखीय क्षमता असलेल्या कुशल कर्मचाऱ्यांना वाढती मागणी असेल. हवामान बदलाबरोबर, वाढते प्रदूषण आणि कमी होणारे नैसर्गिक स्रोत या परिणामांमुळे जगाची ऊर्जेची मागणी भागवण्यासाठी आता वेगळा दृष्टिकोन अंगीकारावा लागेल. वाढत्या साथी आणि महामारी यांच्या मुळे संसर्गजन्य रोगांच्या व्यवस्थापनात सहयोगाने संशोधन आणि लसींचा विकास करण्याची गरज निर्माण होईल. या साथींचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या बहुशाखीय शिक्षणाची गरज अधोरेखित करतात. भारत विकसित देश होण्याकडे वाटचाल करत असताना, तसेच जगातील सर्वांत मोठ्या तीन अर्थव्यवस्थांपैकी एक होत असताना मानव्यशास्त्रे आणि कलेची मागणी वाढत जाईल.

खरोखर, रोजगाराची परिस्थिती आणि वैश्विक परिसंस्था वेगाने बदलत असताना, मुलांनी केवळ शिकणेच महत्त्वाचे ठरणार नाही तर कसे शिकायचे हे शिकणे जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे मजकूर कमी करून शिक्षण तार्किक विचार कसा करायचा आणि समस्या कशा सोडवायच्या, कल्पक आणि बहुशाखीय कसे व्हायचे, नाविन्यपूर्णता कशी आणायची, जुळवून कसे घ्यायचे आणि नवनवीन आणि बदलणाऱ्या क्षेत्रातील नवीन सामग्री कशाप्रकारे आत्मसात करायची, या दिशेला वळले पाहिजे. शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधन-केंद्रित, लवचिक आणि अर्थातच आनंददायक होण्यासाठी अध्यापनशास्त्र उत्क्रांत होण्याची गरज आहे. शिकणाऱ्यांचे सर्व पैलू आणि क्षमता विकसित होण्यासाठी; आणि शिक्षण, सर्व दिशांनी विकसित होण्यासाठी उपयुक्त आणि शिकणाऱ्यासाठी अधिक समाधानकारक होण्यासाठी, अभ्यासक्रमात विज्ञान आणि गणिताच्या बरोबरीनेच मूलभूत कला, हस्तकला, मानव्यशास्त्रे, खेळ, क्रीडा आणि स्वास्थ्य, भाषा, साहित्य, संस्कृती, आणि मूल्ये यांचा समावेश असणे अत्यावश्यक आहे. शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे आणि ज्यायोगे शिकणारे नीतिवान, तर्कशुध्द, सहानुभूतीशील आणि सहृदय बनतील आणि त्याच वेळी ते विद्यार्थी लाभदायी आणि समाधानकारक रोजगार मिळवण्यासाठीही तयार होतील.

सद्यकालीन अध्ययनातून होणारी निष्पत्ती आणि काय करणे आवश्यक आहे यांच्यामधील दरी अगदी बालपणातील संगोपन आणि शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या शिक्षणव्यवस्थेत, सर्वोच्च दर्जा, समानता आणि एकात्मता आणणाऱ्या मोठ्या सुधारणा करून भरून काढणे अनिवार्य आहे.

2040 पर्यंत कोणत्याही शैक्षणिक व्यवस्थेपेक्षा दुय्यम नसलेली शिक्षणव्यवस्था असणे हे भारताचे ध्येय असले पाहिजे आणि या सर्वोच्च दर्जा असलेल्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या सामाजिक किंवा आर्थिक पार्श्वभूमीचा विचार न करता सर्वांना प्रवेश असायला हवा.

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे 21 व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे आणि या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे, हे आहे. या धोरणामध्ये SDG4 सह 21 च्या शतकातील शिक्षणाच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांशी सुसंगत अशी नवीन प्रणाली तयार करण्यासाठी, भारताच्या परंपरा आणि मूल्ये यांवर भर देऊन शैक्षणिक रचनेचे नियमन आणि व्यवस्थापन यासह या रचनेच्या सर्व पैलूंमध्ये बदल आणि सुधारणा प्रस्तावित आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण विशेषतः, प्रत्येक व्यक्तीच्या सृजन क्षमतेच्या विकासावर जास्त भर देते. शिक्षणाने केवळ आकलन क्षमता विकसित केल्या पाहिजेत असे नाही तर साक्षरता आणि संख्याज्ञान या 'मूलभूत क्षमता' आणि उच्च-दर्जाच्या तार्किक आणि समस्या निराकारण क्षमताच नव्हे तर सामाजिक, नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकाससुद्धा केला पाहिजे.

प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले आहे. भारतीय विचार आणि तत्त्वज्ञानात; ज्ञान, प्रज्ञा आणि सत्याचा शोध ही नेहमीच मानवाची सर्वोच्च उद्दिष्टे मानली जातात. प्राचीन भारतात शिक्षणाचे लक्ष्य या सांसारिक जीवनाची तयारी किंवा शाळेनंतरच्या जीवनाची तयारी म्हणून ज्ञान मिळवणे एवढेच नव्हते तर पूर्ण आत्म-ज्ञान किंवा मोक्ष होते. प्राचीन भारतातील तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी अशा जागतिक दर्जाच्या संस्थांनी बहुशाखीय शिक्षण आणि संशोधनाची उच्च मानके तयार केली होती आणि वेगवेगळी पार्श्वभूमी असलेले आणि वेगवेगळ्या देशातील विद्वान आणि विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत. भारतीय शिक्षण व्यवस्थेने चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहीर, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, चाणक्य, चक्रपाणी दत्त, माधव, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, गौतम, पिंगल, शंकरदेव, मैत्रेयी, गार्गी आणि थिरूवल्लुवर असे अनेक विद्वान निर्माण केले; ज्यांनी गणित, खगोलशास्त्र, धातुशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि शल्यचिकित्सा, स्थापत्य अभियांत्रिकी, स्थापत्यविद्या, जहाजबांधणी आणि नौकानयन, योग, ललित कला, बुद्धीबळ आणि इतर अनेक क्षेत्रातील जागतिक ज्ञानात मोलाची भर घातली. भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांचा जगावर खूप मोठा प्रभाव आहे. पुढील पिढ्यांसाठी जागतिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या या वारशाचे केवळ संवर्धन आणि जतनच नव्हे तर त्यावर संशोधन करणे, त्यात वाढ करणे, आणि आपल्या नवीन शिक्षणव्यवस्थेत त्यांचा नव्याने उपयोग करणे महत्त्वाचे आहे.

शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असला पाहिजे. नवीन शिक्षण धोरणाने शिक्षकाला सर्व पातळ्यांवर आपल्या समाजातील सर्वांत आदरणीय आणि आवश्यक सदस्य म्हणून पुनर्स्थापित करण्यासाठी मदत करणे अत्यावश्यक आहे. कारण तो खरोखर आपल्या नागरिकांच्या पुढील पिढीला आकार देतो. शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांनी आपले काम शक्य तितक्या प्रभावीपणे करावे म्हणून या धोरणाने शक्य त्या सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. तसेच सर्वोत्तम आणि बुद्धिमान व्यक्तींना सर्व पातळीवर शिक्षकी पेशात सामावून घेण्यासाठी नवीन शिक्षण धोरणाने मदत केली पाहिजे. त्यासाठी त्यांची उपजीविका, आदर, सन्मान आणि स्वायत्तता या गोष्टी सुनिश्चित केल्या पाहिजेत तसेच शिक्षण व्यवस्थेमध्ये गुणवत्ता नियंत्रणाच्या मूलभूत पद्धती आणि दायित्व या गोष्टी स्थापित केल्या पाहिजेत.

नवीन शिक्षण धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना, ते कुठेही रहात असले तरीही, चांगल्या गुणवत्तेची शिक्षण व्यवस्था पुरवली पाहिजे आणि उपेक्षित, वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे. शिक्षण हे समानता सुनिश्चित करण्याचे मोठे माध्यम आहे आणि याद्वारे समाजात समानता, सर्व समावेशकता आणि सामाजिक-आर्थिक गतिशीलता साध्य करता येते. वरील गटातील विद्यार्थ्यांना, काही अडथळे असले तरीही, शिक्षण व्यवस्थेत प्रवेश घेण्यासाठी आणि त्यात त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत.

भारताच्या समृद्ध विविधतेचा आणि संस्कृतीचा मान ठेवत आणि त्याचवेळी देशाच्या स्थानिक आणि वैश्विक संदर्भातील गरजा लक्षात घेऊन या सगळया गोष्टींचा धोरणात समावेश केला पाहिजे. भारतातील युवकांना भारत देशाविषयी आणि इथल्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजांबरोबरच येथील अद्वितीय कला, भाषा आणि ज्ञानाच्या परंपरांविषयी राष्ट्रीय अभिमान, आत्मविश्वास, आत्मज्ञान, परस्पर सहयोग व एकतेसाठी आणि भारताने सतत विकासाच्या पायऱ्या चढण्यासाठी ज्ञान होणे अतिशय आवश्यक आहे.

## आधीची धोरणे

शिक्षणाच्या जुन्या धोरणांच्या अंमलबजावणीने, मुख्यत: प्रवेश आणि समानतेवर भर दिला होता. राष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 चा कृती कार्यक्रम 1992 मध्ये सुधारण्यात आला (NPE 1986/92) आधीच्या धोरणातील पूर्ण न झालेले काम या धोरणाद्वारे पूर्ण करण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात आला आहे. 1986/92 च्या मागील धोरणानंतरचे एक मोठे पाऊल म्हणजे नि:शुल्क आणि अनिवार्य शिक्षण अधिनियम 2009 हे होते. याद्वारे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण साध्य करण्यासाठी कायदेशीर आधार उपलब्ध करण्यात आला.

## या धोरणाची तत्त्वे

या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि (सहृदयता) करुणा, सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्टीत कल व रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे. याचा उद्देश आपल्या घटनेद्वारे परिकल्पित न्याय्य, सर्वसमावेशक आणि बहुलतावादी समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे, कार्यक्षम, आणि चांगल्याप्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे, असा आहे.

ज्या संस्थेत प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्याला इथे आपुलकीने वागवले आपले स्वागत केले जाते असे वाटते आणि त्याची जिथे काळजी वाहिली जाते, जिथे एक सुरक्षित आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण असते, जिथे सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध अनुभव प्रकार उपलब्ध करून दिले जातात आणि जिथे शिकण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधा आणि उपयोगी संसाधने उपलब्ध असतात, ती खरी चांगली शिक्षण संस्था असते. या सर्व गोष्टी साध्य करणे हे प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे ध्येय असले पाहिजे. मात्र, त्याचवेळी विविध संस्था आणि शिक्षणाच्या विविध टप्प्यांमध्ये सुलभ सहयोग आणि समन्वय असणे आवश्यक आहे.

सर्वसाधारणपणे शिक्षण व्यवस्था आणि त्याबरोबरच स्वतंत्र संस्था, या दोन्हींना मार्गदर्शन करणारे मूलभूत सिद्धांत असे आहेत :

- **प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे** – शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि अभ्यासेतर दोन्ही क्षेत्रांमध्ये चालना देणे;


- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी **मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान** या गोष्टींना इयत्ता 3 री पर्यंत सर्वोच्च प्राधान्य देणे;
- **लवचिकता** असावी; म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनाचा मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची मुभा असेल आणि ते आपली प्रतिभा आणि आवड यानुसार आयुष्यात आपला मार्ग निवडू शकतील;
- कला आणि विज्ञान, अभ्यास आणि अभ्यासेतर उपक्रम, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह यांच्यामध्ये **कोणतेही स्पष्ट विभाजन नसले पाहिजे**; म्हणजे ज्ञानाच्या क्षेत्रांमधील हानिकारक उच्च-नीचता आणि त्यांच्यात पडलेले अंतर दूर होईल;
- सगळ्या ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका बहुआयामी जगासाठी विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानव्यशास्त्रे आणि खेळ यांच्यामध्ये **बहु-शाखीय** (multi-disciplinary) आणि **समग्र शिक्षणाचा** विकास;
- घोकंपट्टीऐवजी किंवा परीक्षेसाठी शिकण्याऐवजी **संकल्पना समजून घेण्यावर भर;**
- तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देण्यासाठी **कल्पकता आणि तार्किक विचार;**
- **नैतिकता आणि मानवी आणि घटनात्मक मूल्ये** उदा. सहृदयता, इतरांबद्दल आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाहीची भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेबद्दल आदर, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्वातंत्र्य, जबाबदारी, बहुलतावाद, समता आणि न्याय;
- **अध्यापनात आणि अध्ययनात बहु-भाषिकत्व आणि** भाषा शक्ती यांना प्रोत्साहन;
- संवाद, सहकार्य, सामूहिक कार्य, आणि लवचिकता अशी **जीवन मूल्ये;**
- वर्षाच्या शेवटी परीक्षेला केंद्रस्थानी ठेवून होणाऱ्या मूल्यांकनामुळे 'सध्याच्या कोचिंग संस्कृती' ला महत्त्व आले आहे, त्याऐवजी **शिकण्यासाठी सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर;**
- अध्यापनात आणि अध्ययनात **तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर**, भाषेचे अडथळे काढून टाकणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ बनवण्यासाठी शैक्षणिक नियोजन आणि व्यवस्थापन;
- शिक्षण हा समवर्ती विषय आहे हे लक्षात घेऊन सर्व अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि धोरण यात **विविधतेबद्दल आणि स्थानिक संदर्भांबद्दल आदर**;
- शिक्षण व्यवस्थेत सर्व विद्यार्थ्यांना प्रगती करता येईल हे सुनिश्चित करण्यासाठी **सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशकता ही पायाभूत गोष्ट**;
- प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षणापासून ते शालेय शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत **सर्व पातळ्यांवरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता**;
- **शिक्षक आणि** प्राध्यापक **हे शिक्षण प्रक्रियेचे केंद्र मानणे** – त्यांची भरती आणि तयारीची उत्कृष्ट व्यवस्था, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, आणि कामकाजाचे वातावरण व सेवेची स्थिती सकारात्मक असणे;
- **शिक्षण प्रणालीची** अखंडता**, पारदर्शकता आणि** संसाधनांची कार्यक्षमता ऑडीट आणि सार्वजनिक प्रकटीकरणाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यासाठी एक 'सुलभ पण परिणामकारक' नियमांची चौकट देणे. त्याबरोबरच स्वायत्तता, सुशासन आणि सशक्तीकरणाच्या माध्यमातून नाविन्यपूर्णता आणि चौकटीबाहेरच्या विचारांना प्रोत्साहित करणे;
- गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विकासासाठी सहआवश्यकता म्हणून **उत्कृष्ट दर्जाचे संशोधन**;
- शिक्षण तज्ज्ञांद्वारे सातत्यपूर्ण संशोधन आणि नियमित मूल्यांकनाद्वारे प्रगतीचा **सातत्यपूर्ण आढावा;**
- **आपल्या भारतीय मुळांचा, भारताचा आणि** आणि **भारताच्या** समृद्ध, वैविध्यपूर्ण, प्राचीन आणि आधुनिक संस्कृती, ज्ञान व्यवस्था आणि परंपरा यांचा **अभिमान असणे**;
- **शिक्षण ही एक सार्वजनिक सेवा आहे**; गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असणे हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क समजला पाहिजे;
- **सशक्त, जिवंत सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेत लक्षणीय गुंतवणूक** तसेच देणगीदार खाजगी आणि सामुदायिक संस्थांच्या भागीदारीला प्रोत्साहन आणि सुविधा,

## या धोरणाची दूरदृष्टी

या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टी, ईप्सित भारतीय मूल्यांपासून विकसित केलेली, सर्वांना उच्च-गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देऊन, त्याद्वारे भारताला एक जागतिक ज्ञान-महासत्ता बनवून भारताचे एका न्याय्य आणि चैतन्यमय ज्ञान-समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात प्रत्यक्षपणे योगदान देणारी अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे हे आहे. धोरणात असे संकल्पित आहे की, आपल्या शिक्षणसंस्थांचा अभ्यासक्रम आणि शिक्षणपद्धत विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कर्तव्ये आणि घटनात्मक मूल्यांविषयी तीव्र आदर, स्वतःच्या देशाशी दृढ नाते आणि बदलत्या जगातील स्वतःच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांविषयी जाणीवपूर्ण जागरूकता निर्माण करणारे असायला हवेत. या धोरणाची दूरदृष्टी अशी आहे की, भारतीय असल्याचा सखोल अभिमान विद्यार्थ्यांच्या केवळ विचारांमध्येच नव्हे तर त्यांच्या व्यवहारात, बुद्धीमध्ये आणि कृतीमध्येदेखील रुजवणे, तसेच मानवी हक्क, शाश्वत विकास आणि जीवनमान यांच्याशी जबाबदारीपूर्ण बांधिलकीचे समर्थन करणारे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि स्वभाव विकसित करणे, जेणेकरून ते खऱ्या अर्थाने एक वैश्विक नागरिक बनतील.

# भाग 1. शालेय शिक्षण

शालेय शिक्षणाच्या सध्याच्या 10+2 संरचनेत प्रातिनिधिक आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे आणि पुढे प्रकरण 4 मध्ये तपशीलवार वर्णन केल्यानुसार बदल करून 3-18 वयोगटाला समाविष्ट करणारी 5+3+3+4 अशी नवीन अध्यापनशास्त्राची आणि अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे हा या धोरणाचा उद्देश आहे.



सध्या, 3-6 वयोगटातील मुले 10+2 संरचनेमध्ये समाविष्ट केली जात नाहीत कारण इयत्ता 1 वय वर्ष 6 पासून सुरू होते. नवीन 5+3+3+4 संरचनेत, वय वर्ष 3 पासून प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचा (ECCE) मजबूत पायादेखील समाविष्ट केला आहे, ज्याचा उद्देश अधिक चांगले सर्वांगीण शिक्षण, विकास आणि हित यांना चालना देणे हा आहे.

## 1. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण : अध्ययनाचा पाया

1.1. लहान मुलाच्या मेंदूच्या एकंदर विकासापैकी 85% हून अधिक विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो, यावरून मेंदूचा निकोप विकास आणि वाढ सुनिश्चित करण्यासाठी सुरुवातीच्या काही वर्षांत मेंदूची योग्य काळजी घेतली जाण्याचे आणि उत्तेजनाचे निर्णायक महत्त्व लक्षात येते. सध्या कोट्यावधी लहान मुलांना, विशेषत: सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमी असलेल्या मुलांना दर्जेदार ECCE उपलब्ध नाही. ECCE मध्ये भरीव गुंतवणुकीमुळे सर्व लहान मुलांना ते उपलब्ध करून देणे शक्य आहे, त्यामुळे ही मुले आयुष्यभर शैक्षणिक व्यवस्थेत सहभाग घेण्यास आणि उत्कर्ष साधण्यास सक्षम बनतील. अशा रीतीने, गुणवत्तापूर्ण बाल्यावस्था पूर्व विकास, संगोपन आणि शिक्षणाची सार्वत्रिक तरतूद शक्य तितक्या लवकर आणि 2030च्या आत होणे आवश्यक आहे, म्हणजे इयत्ता 1 मध्ये प्रवेश करणारे सर्व विद्यार्थी शालेय शिक्षणासाठी सज्ज झालेले असतील.

1.2. ECCEमध्ये प्राधान्याने लवचिक, बहुपैलू, बहुस्तरीय, खेळांवर-आधारित, कृती-आधारित आणि जिज्ञासा-आधारित शिक्षणाचा समावेश असतो, ज्यामध्ये अक्षरे, भाषा, संख्या, मोजणे, रंग, आकार, घरातील आणि मैदानी खेळ, कोडी आणि तार्किक विचार, समस्या सोडवणे, चित्रकला, रंगवणे आणि इतर दृश्य कला, हस्तकला, नाटक आणि बोलक्या बाहुल्या, संगीत आणि हालचाली यांचा समावेश होतो. यात सामाजिक क्षमता, संवेदनशीलता, चांगली वर्तणूक, सौजन्य, नैतिकता, वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता, सांघिक कार्य आणि सहकार्य यांचा विकास करण्यावरदेखील लक्ष केंद्रित केले आहे. ECCEचे एकंदर उद्दिष्ट पुढे उल्लेखलेल्या क्षेत्रांत चांगले परिणाम साध्य करणे असे आहे: शारीरिक विकास, कृतीकौशल्यांचा विकास, आकलन विकास, सामाजिक-भावनिक-नैतिक विकास, सांस्कृतिक / कलात्मक विकास आणि संवाद व प्रारंभिक भाषा, साक्षरता आणि संख्याज्ञान यांचा विकास करणे.

1.3. NCERTने 8 वर्षांपर्यंतच्या मुलांच्या प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आणि शैक्षणिक आराखडा (NCPFECCE) दोन भागांमध्ये तयार केला आहे. हे भाग म्हणजे 0-3 वर्षांच्या बालकांसाठीचा उप-आराखडा आणि 3-8 वर्षांच्या मुलांसाठीचा उप-आराखडा, आणि तो वरील मार्गदर्शक तत्त्वे, ECCEवरील नवीनतम संशोधन आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींशी अनुरूप आहे. विशेषतः, ECCEच्या बाबतीत भारतात हजारो वर्षांपासून विकसित झालेल्या अनेक समृद्ध स्थानिक परंपरांचादेखील यात योग्य प्रकारे समावेश केला जाईल, ज्यामध्ये कला, कथा, कविता, खेळ, गाणी आणि ईतर बऱ्याच गोष्टींचा समावेश होतो. हा आराखडा पालक आणि बाल्यावस्था पूर्व संगोपन शिक्षण संस्था या दोहोंसाठी मार्गदर्शक म्हणून काम करेल.

1.4. टप्प्याटप्प्याने देशभरात उच्च-गुणवत्तापूर्ण ECCE ची (अर्ली चाईल्डहूड केअर अँड एज्युकेशन : प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण) सार्वत्रिक उपलब्धता सुनिश्चित करणे हे व्यापक उद्दिष्ट असेल. विशेषतः सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या जिल्ह्यांकडे आणि ठिकाणांकडे विशेष लक्ष आणि प्राधान्य दिले जाईल. प्रारंभिक बाल्यावस्था शैक्षणिक संस्थांचा लक्षणीयरित्या विस्तार आणि त्यांचे बळकटीकरण केलेल्या यंत्रणेद्वारे ECCE प्रदान केले जाईल, ज्यामध्ये (a) स्वतंत्र अंगणवाड्या; (b) प्राथमिक शाळांसोबत असलेल्या अंगणवाड्या; (c) विद्यमान प्राथमिक शाळांसोबत असलेल्या पूर्व प्राथमिक शाळा/विभाग ज्यामध्ये किमान 5-6 वर्षे हा वयोगट

समाविष्ट असेल; आणि (d) स्वतंत्र पूर्व प्राथमिक शाळा, यांचा समावेश असेल - या सर्वांमध्ये ECCEचा अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र यांचे विशेष प्रशिक्षण दिलेले कर्मचारी/शिक्षक भरती केले जातील.

1.5. ECCEच्या सार्वत्रिक उपलब्धतेसाठी, अंगणवाडी केंद्रांचे उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा, खेळाचे साहित्य आणि प्रशिक्षित अंगणवाडी कर्मचारी/शिक्षक यांद्वारे सशक्तीकरण केले जाईल. प्रत्येक अंगणवाडीची इमारत हवेशीर, सुसज्ज, मुलांसाठी अनुकूल, योग्य बांधकाम असलेली आणि समृद्ध अध्ययन वातावरण असलेली असेल. अंगणवाडी केंद्रांतील मुले क्रियाशीलता समाविष्ट असेलेले दौरे करतील आणि अंगणवाडी केंद्र ते प्राथमिक शाळा हे संक्रमण सुरळीत व्हावे यासाठी त्यांच्या स्थानिक प्राथमिक शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांना भेटतील. शाळा संकुल/समूहांमध्ये अंगणवाडीचे पूर्णपणे एकात्मीकरण केले जाईल आणि अंगणवाडीतील मुले, पालक व शिक्षकांना शाळेच्या/शाळा संकुलाच्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहण्यासाठी आणि सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाईल आणि त्याचप्रमाणे शाळा संकुलेही अंगणवाडीकडे जातील.

1.6. असे संकल्पित आहे की, वय वर्ष 5 च्या अगोदर प्रत्येक मूल "पूर्वाध्ययन वर्ग" (प्रिपरेटरी वर्ग) किंवा "बालवाडी" (म्हणजे इयत्ता 1च्या आधी) येथे जाईल, ज्यात ECCE अर्हतापात्र शिक्षक असेल. पूर्वाध्ययन वर्गातील शिकणे हे प्रामुख्याने खेळांवर आधारित असेल, ज्यामध्ये आकलनात्मक, भावनात्मक आणि सायकोमोटर क्षमता आणि पूर्व साक्षरता आणि संख्याज्ञान  विकसित करणे यावर लक्ष केंद्रित केले जाईल. प्राथमिक शाळांमधील पूर्वाध्ययन वर्गांना माध्यान्ह भोजन कार्यक्रमदेखील लागू केला जाईल. अंगणवाडी व्यवस्थेत उपलब्ध असणारी आरोग्य तपासणी व वाढ यांची देखरेख अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील पूर्वाध्ययन वर्गांच्या विद्यार्थ्यांनाही उपलब्ध केली जाईल.

1.7. अंगणवाड्यांमध्ये उच्च दर्जाचा प्रारंभिक ECCE शिक्षकवर्ग तयार करण्यासाठी NCERTने विकसित केलेल्या अभ्यासक्रम / शैक्षणिक आराखड्यानुसार पद्धतशीर प्रयत्नांतून सध्याच्या अंगणवाडी सेविका / शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल. 10+2 आणि त्यापेक्षा जास्त पात्रता असलेल्या अंगणवाडी सेविका / शिक्षकांना ECCEमध्ये 6 महिन्यांचा प्रमाणपत्र कार्यक्रम देण्यात येईल; आणि त्याहून कमी शैक्षणिक पात्रता असणाऱ्यांना प्रारंभिक साक्षरता, संख्या, आणि ECCEच्या इतर संबंधित पैलूंचा एक वर्षाचा डिप्लोमा कार्यक्रम देण्यात येईल. हे कार्यक्रम DTH चॅनल तसेच स्मार्टफोनद्वारे डिजिटल/दूरस्थ पद्धतीने चालवले जाऊ शकतात, त्यामुळे शिक्षकांना त्यांच्या सध्याच्या कामात कमीतकमी व्यत्यय येऊन ECCE पात्रता मिळवता येईल. अंगणवाडी सेविकांच्या / शिक्षकांच्या ECCE प्रशिक्षणास शालेय शिक्षण विभागाच्या क्लस्टर रिसोर्स सेंटरद्वारे मार्गदर्शन केले जाईल, जे सातत्याने मूल्यांकन करण्यासाठी महिन्यातून किमान एक संपर्क वर्ग घेतील. दीर्घ मुदतीमध्ये राज्य सरकार, विशिष्ट टप्प्यांचे व्यावसायिक प्रशिक्षण, मार्गदर्शन यंत्रणा आणि करियर मॅपिंगद्वारे, ECCEसाठी व्यावसायिक पात्रता असलेल्या शिक्षकांची फळी तयार करेल. या शिक्षकांच्या सुरुवातीच्या व्यावसायिक पूर्वतयारीसाठी आणि त्यांच्या अविरत व्यावसायिक विकासासाठी (CPD) आवश्यक सुविधादेखील तयार केल्या जातील.

1.8 आदिवासीबहुल भागांतील आश्रमशाळांमध्ये आणि टप्प्याटप्प्याने पर्यायी शिक्षणाच्या सर्व स्वरूपांमध्येदेखील ECCEची सुरुवात केली जाईल. आश्रमशाळांमध्ये आणि पर्यायी शिक्षणव्यवस्थेमध्ये ECCEची एकात्मीकरण आणि अंमलबजावणी प्रक्रिया वर तपशीलवार नमूद केल्याप्रमाणेच असेल.

1.9 पूर्वप्राथमिक शाळेतून प्राथमिक शाळेत अभ्यासक्रमाचे सातत्य सुरक्षित करण्यासाठी आणि शिक्षणाच्या मूलभूत पैलूंकडे योग्य लक्ष दिले जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी, ECCE अभ्यासक्रम आणि शैक्षणिक जबाबदारी MHRDकडे असेल. ECCEचे नियोजन व अंमलबजावणी मानव संसाधन विकास, महिला व बाल विकास (WCD), आरोग्य व कुटुंब कल्याण (HFW) आणि आदिवासी व्यवहार या मंत्रालयांद्वारे संयुक्तपणे केली जाईल. प्रारंभिक

बाल्यावस्था संगोपन व शिक्षणाचे शालेय शिक्षणात सुरळीतपणे एकात्मीकरण करण्यात सतत मार्गदर्शन करण्यासाठी विशेष संयुक्त कृती गटाची स्थापना केली जाईल.

## 2. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान: अध्ययनासाठी एक तातडीची आणि आवश्यक पूर्वअट

2.1 वाचण्याची आणि लिहिण्याची आणि संख्यांच्या मूलभूत क्रिया करण्याची क्षमता हा एक आवश्यक पाया आणि भविष्यातील सर्व शालेय शिक्षणासाठी आणि निरंतर अध्ययनासाठी एक अनिवार्य पूर्वअट आहे. मात्र, विविध शासकीय तसेच बिगर-शासकीय सर्वेक्षणे हे दर्शवत आहेत की सध्या आपण एका अध्ययन संकटात सापडलो आहोत: सध्या प्राथमिक शाळेत असलेल्या मोठ्या प्रमाणातील विद्यार्थ्यांनी - अंदाजे संख्या 5 कोटींपेक्षा जास्त - मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, म्हणजे मूलभूत मजकुराचे वाचन आणि आकलन करण्याची क्षमता आणि भारतीय अंकांची मूलभूत बेरीज आणि वजाबाकी करण्याची क्षमता, प्राप्त केलेली नाही.

2.2 सर्व मुलांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करणे हे त्यामुळे एक तातडीचे राष्ट्रीय अभियान बनेल, ज्यामध्ये अनेक आघाड्यांवर आणि (इयत्ता 3 पर्यंत, प्रत्येक विद्यार्थी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त करेल यासह) अल्पावधीत साध्य करावयाची स्पष्ट उद्दिष्टे असलेल्या, तातडीच्या उपाययोजना राबवल्या जातील. 2025 पर्यंत सर्व प्राथमिक शाळांमध्ये मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करणे ही शिक्षणव्यवस्थेची सर्वोच्च प्राथमिकता असेल. ही अगदी प्राथमिक अध्ययन आवश्यकता (म्हणजे, मूलभूत पातळीवरील वाचन, लेखन आणि अंकगणित) आधीच साध्य केली तरच, हे उर्वरित धोरण आपल्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल. यादृष्टीने, मनुष्य बळ विकास मंत्रालय (MHRD), राष्ट्रीय मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मिशनची प्राधान्याने स्थापना करेल. त्यानुसार सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेशांची सरकारे सर्व प्राथमिक शाळांमध्ये सार्वत्रिक मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करण्यासाठी तातडीने एक अंमलबजावणी योजना तयार करतील, ज्यात 2025 पर्यंत टप्प्याटप्प्याने साध्य करावयाची उद्दिष्टे आणि लक्ष्ये निश्चित करणे आणि त्यांची प्रगती बारकाईने मोजणे आणि लक्ष ठेवणे यांचा समावेश असेल.

2.3 प्रथम, शिक्षकांच्या रिक्त जागा लवकरात लवकर कालबद्ध पद्धतीने भरल्या जातील - विशेषत: वंचित भागांमध्ये आणि विद्यार्थी-शिक्षक प्रमाण किंवा अशिक्षिततेचे प्रमाण जास्त असलेल्या भागांमध्ये. स्थानिक शिक्षकांची किंवा स्थानिक भाषा अवगत असलेल्या शिक्षकांची भरती करण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल. प्रत्येक शाळा स्तरावर विद्यार्थी-शिक्षक प्रमाण (PTR) 30:1 पेक्षा कमी असेल हे सुनिश्चित केले जाईल; मोठ्या संख्येने सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थी असलेल्या भागांमध्ये PTR 25:1 पेक्षा कमी राखण्याचे उद्दिष्ट ठेवले जाईल. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान शिकवण्यासाठी शिक्षकांना सातत्याने व्यावसायिक विकासासह, प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि साहाय्य केले जाईल.

2.4 अभ्यासक्रमाच्या बाबतीत, मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञानावर, म्हणजे सामान्यपणे प्रिपरेटरी (पूर्वाध्ययन) आणि पूर्वमाध्यमिक शाळेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंतच्या अभ्यासक्रमात; वाचणे, लिहिणे, बोलणे, मोजणे, अंकगणित आणि गणितीय विचार यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. यात प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिक्षणावर लक्ष ठेवण्यासाठी व त्यायोगे त्याचे शिक्षण व्यक्तिप्रधान आणि खात्रीशीरपणे होईल हे सुनिश्चित करण्यासाठी सतत रचनात्मक / परिवर्तनशील मूल्यांकनाच्या एका मजबूत व्यवस्थेचा समावेश असेल. विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आवड निर्माण करण्यासाठी, या विषयांचा समावेश असलेल्या उपक्रमांसाठी दिवसातील विशिष्ट तास आणि वर्षभर नियमित कार्यक्रम समर्पित केले जातील. मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञानावर नव्याने भर देण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची आणि सुरुवातीच्या वर्गांच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली जाईल.

2.5 सध्या, ECCEची सार्वत्रिक उपलब्धता नसल्याने, इयत्ता 1 च्या पहिल्या काही आठवड्यांमध्येच मोठ्या प्रमाणावर मुले मागे पडतात. त्यामुळे, सर्व मुले शाळेसाठी तयार असतील हे सुनिश्चित करण्यासाठी, मधल्या काळात इयत्ता 1 च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी, अक्षरे, ध्वनी, शब्द, रंग, आकार आणि संख्या शिकण्याशी संबंधित उपक्रम आणि कार्यपुस्तिकांचा समावेश असलेले आणि सहाध्यायी व पालकांच्या सहकार्याचा सहभाग असलेले, खेळांवर आधारित 3 महिन्यांचे एक 'शाळा तयारी मोड्युल', NCERT आणि SCERT विकसित करतील.

2.6 मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञानावरील उच्च-गुणवत्तेच्या संसाधनांचे एक राष्ट्रीय भांडार डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर नॉलेज शेअरिंग (DIKSHA) वर उपलब्ध केले जाईल. शिक्षकांच्या मदतीसाठी आणि शिक्षक व विद्यार्थ्यांमधील कोणतेही भाषिक अडथळे दूर करण्यात मदत करण्यासाठी, तांत्रिक साहाय्य पथदर्शी पातळीवर सुरू करून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

2.7 सध्याच्या शैक्षणिक पेचप्रसंगाच्या मोठ्या आवाक्यामुळे, सार्वत्रिक पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करण्याच्या कामगिरीत शिक्षकांना साहाय्य करण्यासाठी सर्व व्यवहार्य पद्धतींचा शोध घेतला जाईल. सहाध्यायींकडून समोरासमोर बसून शिकणे (पीअर ट्यूटरिंग) हे शिकणाऱ्यासाठीच नव्हे तर शिकवणाऱ्यासाठीदेखील अत्यंत प्रभावी असल्याचे जगभरातील अभ्यासांमध्ये आढळून आले आहे. अशाप्रकारे, प्रशिक्षित शिक्षकांच्या देखरेखीखाली आणि सुरक्षेच्या पैलूंची काळजी घेऊन, सहाध्यायींकडून समोरासमोर बसून शिकणे हे ऐच्छिक आणि मजेदार उपक्रमाच्या स्वरूपात केले जाऊ शकते. शिवाय, स्थानिक आणि बाहेरच्या प्रशिक्षित स्वयंसेवकांनादेखील मोठ्या प्रमाणावरील या मिशनमध्ये सहभाग घेणे सोपे होईल. समुदायातील प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने जर एका विद्यार्थ्याला/व्यक्तीला वाचायला शिकवण्याची जबाबदारी घेतली तर देशातील परिस्थिती झपाट्याने बदलेल. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान वाढवण्यासाठीच्या या देशव्यापी मिशनमध्ये, अशा सहाध्यायींकडून समोरासमोर बसून शिकण्याला आणि स्वयंसेवकांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्ये नाविन्यपूर्ण मॉडेल्सची स्थापना करण्याचा विचार करू शकतात, तसेच विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी इतर नवीन कार्यक्रम सुरू करू शकतात.

2.8 सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक आणि प्रेरणादायक पुस्तके विकसित केली जातील आणि त्यांचा सर्व स्थानिक व भारतीय भाषांमध्ये (आवश्यकतेनुसार तांत्रिक साहाय्य घेऊन) उच्च-गुणवत्ता असणारा अनुवाद केला जाईल. ही पुस्तके शालेय आणि स्थानिक सार्वजनिक वाचनालयांमध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येतील. देशभरात वाचन संस्कृती निर्माण करण्यासाठी सार्वजनिक आणि शालेय वाचनालयांचा लक्षणीयरित्या विस्तार केला जाईल. डिजिटल वाचनालयेदेखील स्थापन केली जातील. शालेय वाचनालये स्थापन केली जातील, विशेषतः गावांमध्ये, ज्यांचा उपयोग शाळेनंतरच्या वेळेत आसपासचे लोकदेखील घेऊ शकतील. वाचन मोठ्या प्रमाणावर सुलभ करण्यासाठी आणि त्याला चालना देण्यासाठी सार्वजनिक वा शालेय वाचनालयांमध्ये 'बुक क्लब' बैठकी घेऊ शकतात. एक राष्ट्रीय पुस्तक प्रोत्साहन धोरण तयार केले जाईल, आणि सर्व ठिकाणी, सर्व भाषांची, सर्व स्तरावरील आणि सर्व शैलींच्या पुस्तकांची उपलब्धता, गुणवत्ता आणि त्यांचा वाचक सुनिश्चित करण्यासाठी व्यापक उपक्रम हाती घेण्यात येतील.

2.9 कुपोषित किंवा आजारी असताना मुले योग्य प्रकारे शिकू शकत नाहीत. म्हणूनच, पौष्टिक जेवण आणि प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते, समुपदेशक आणि समुदायाचा सहभाग यांचा शालेय व्यवस्थेमध्ये समावेश करून मुलांची पोषण आणि आरोग्यविषयक (मानसिक आरोग्यासह) समस्या सोडवली जाईल. शिवाय, संशोधनात असे आढळून आले आहे की, पौष्टिक नाष्ट्यानंतरचे सकाळचे काही तास अधिक आकलनक्षमतेची गरज असलेल्या अवघड विषयांच्या अभ्यासासाठी उत्तम असतात आणि म्हणूनच दुपारच्या जेवणाव्यतिरिक्त एक साधा पण पौष्टिक नाष्टा देऊन या

तासांचा फायदा करून घेता येऊ शकतो. ज्या ठिकाणी शिजवलेले गरम अन्न देणे शक्य नसेल, तेथे साधा पण पौष्टिक आहार देता येईल उदा. शेंगदाणे किंवा चणे गुळात मिसळून आणि/किंवा स्थानिक फळे देता येतील. सर्व शालेय विद्यार्थ्यांची, विशेषतः 100% लसीकरणासाठी, शाळेत नियमित आरोग्य तपासणी केली जाईल आणि त्यावर लक्ष ठेवण्यासाठी आरोग्य कार्डे दिली जातील.

## 3. शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षण सर्वत्र आणि सगळ्या स्तरांवर पोहोचेल, हे सुनिश्चित करणे

3.1 मुलांनी शाळेत प्रवेश घेतला आहे आणि ती शाळेत उपस्थित राहत आहेत हे सुनिश्चित करणे हे शालेय व्यवस्थेचे एक उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. सर्व शिक्षा अभियान (आता समग्र शिक्षा) आणि शिक्षण हक्क कायदा यासारख्या प्रयत्नांच्या माध्यमातून भारताने अलिकडच्या काही वर्षांत प्राथमिक शिक्षणात जवळपास पूर्णपणे म्हणता येईल अशी शाळा नोंदणी साध्य करण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय प्रगती केली आहे. नंतरच्या इयत्तांचा डेटा मात्र मुलांना शालेय शिक्षण व्यवस्थेत (सांभाळून ठेवण्यात) काही गंभीर समस्या असल्याचे दर्शवतो. इयत्ता 6-8 साठी Gross Enrollment Rario (GER) 90.9% होता, तर इयत्ता 9-10 आणि 11-12 साठी तो अनुक्रमे फक्त 79.3% आणि 56.5% होता - यावरून हे दिसून येते की शाळेत प्रवेश घेतलेल्यांपैकी मोठ्या प्रमाणावर मुले इयत्ता 5 वी नंतर आणि विशेषतः इयत्ता 8 वी नंतर शाळा सोडतात. NSSOने 2017-18 मध्ये केलेल्या 75 व्या फेरीतील घरगुती सर्वेक्षणानुसार, 6 ते 17 वर्षे वयोगटातील शालाबाह्य मुलांची संख्या 3.22 कोटी आहे. या मुलांना लवकरात लवकर शिक्षणप्रवाहात परत आणणे आणि 2030 पर्यंत शालापूर्व ते माध्यमिक स्तरापर्यंत 100% एकूण शाळानोंदणी गुणोत्तराचे (ग्रॉस एनरोलमेंट रेशो) उद्दिष्ट ठेवून आणखीन मुलांची शाळागळती थांबवणे यांना सर्वोच्च प्राधान्य असेल. देशातील सर्व मुलांना शालापूर्व ते इयत्ता 12 वी पर्यंतच्या, व्यावसायिक शिक्षणासह गुणवत्तापूर्ण सर्वांगीण शिक्षणाची सार्वत्रिक उपलब्धतता सुनिश्चित करण्यासाठी आणि तशी संधी देण्यासाठी सर्वसमावेशक देशव्यापी प्रयत्न केले जातील.

3.2 शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत आणण्यासाठी व आणखी विद्यार्थ्यांना शाळा सोडण्यापासून रोखण्यासाठी, एकूण दोन उपक्रम हाती घेण्यात येतील. पहिला म्हणजे, प्रभावी आणि पुरेशा पायाभूत सुविधा पुरवणे जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना पूर्व-प्राथमिक शाळा ते इयत्ता 12 वी पर्यंतच्या सर्व स्तरांवर सुरक्षित आणि रंजकपणे शालेय शिक्षण मिळू शकेल. प्रत्येक टप्प्यावर नियमित प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देण्याबरोबरच कोणत्याही शाळेत पायाभूत सुविधांची कमतरता राहणार नाही याची विशेष काळजी घेतली जाईल. सरकारी शाळांची विश्वासार्हता पुनर्प्रस्थापित केली जाईल आणि आधीपासून अस्तित्वात असलेल्या शाळांची गुणवत्ता वाढ आणि विस्तार करून, जिथे शाळा अस्तित्वात नाहीत अशा ठिकाणी अतिरिक्त दर्जेदार शाळा बांधून आणि सुरक्षित व व्यवहार्य वाहतूक सुविधा आणि/किंवा वसतिगृहे पुरवून, विशेषतः मुलींसाठी, हे साध्य केले जाईल, जेणेकरून सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शाळेत जाण्याची आणि योग्य स्तरावर शिकण्याची संधी मिळेल. स्थलांतरित मजुरांची मुले आणि विविध परिस्थितींमुळे शाळा सोडणाऱ्या इतर मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात परत आणण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याने पर्यायी आणि नाविन्यपूर्ण शिक्षणाची केंद्रे स्थापन केली जातील.

3.3 दुसरा उपक्रम म्हणजे, विद्यार्थ्यांवर तसेच त्यांच्या शिक्षण पातळीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवून, शाळेत सार्वत्रिक सहभाग साध्य करणे, जेणेकरून (a) त्यांनी शाळेत प्रवेश घेतला आहे व उपस्थित आहेत आणि (b) ते मागे पडले असल्यास किंवा त्यांनी शाळा सोडली असल्यास पुन्हा अभ्यास भरून काढण्यासाठी आणि शाळेत पुन्हा प्रवेश घेण्यासाठी त्यांना योग्य संधी मिळतील, हे सुनिश्चित केले जाईल. 18 वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना पायाभूत स्तर ते

इयत्ता 12 वी पर्यंतचे यथायोग्य व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी योग्य सुविधा यंत्रणा स्थापन केल्या जातील. शाळा/शालेय संकुल आणि शिक्षकांशी जोडलेले समुपदेशक किंवा सुयोग्य प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसोबत सतत कार्य करतील आणि सर्व शाळावयीन मुले शाळेत जात आहेत आणि शिकत आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी समुदायांमध्ये फिरून त्यांच्याशी संवाद साधतील. नागरी समाजातील संस्थांचे / सामाजिक न्याय व सक्षमीकरण विभागाचे प्रशिक्षित व पात्र सामाजिक कार्यकर्ते आणि अपंग व्यक्तींच्या सशक्तीकरणाशी संबंधित राज्य व जिल्हा पातळीवरील सरकारी अधिकारी यांना, या महत्त्वाच्या कार्यात त्यांची मदत घेण्यासाठी राज्य / केंद्रशासित प्रदेशांच्या सरकारांनी अवलंबलेल्या विविध नाविन्यपूर्ण यंत्रणांद्वारे शाळांशी जोडले जाऊ शकते.

3.4 एकदा पायाभूत सुविधा आणि सहभाग प्रस्थापित झाल्यावर विद्यार्थ्यांना शाळेत राखण्यासाठी दर्जा सुनिश्चित करणे महत्त्वाचे असणार आहे, जेणेकरून त्यांचा (विशेषतः मुली आणि इतर सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांमधील विद्यार्थी) शाळेत जाण्यातील रस कमी होणार नाही. यासाठी, स्थानिक भाषेचे ज्ञान असणाऱ्या शिक्षकांना शाळा सोडण्याचे उच्च प्रमाण असलेल्या भागात नियुक्त करण्यासाठी प्रोत्साहनपर यंत्रणेची तसेच अभ्यासक्रम अधिक रंजक आणि उपयुक्त बनवण्यासाठी तो संपूर्णपणे सुधारण्याची आवश्यकता असेल.

3.5 सर्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय करण्यासाठी, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांवर (SEDG) विशेष भर देऊन, शालेय शिक्षणाची व्याप्ती विस्तृत केली जाईल, ज्यामध्ये औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही शैक्षणिक पद्धतींचा समावेश असलेल्या शिक्षणाच्या अनेक मार्गांची सोय असेल. शाळेत प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या भारतीय मुलांच्या शिक्षणविषयक गरजा भागवण्यासाठी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग (NIOS) आणि स्टेट ओपन स्कूल यांनी देऊ केलेले मुक्त आणि दूरस्थ शिक्षण कार्यक्रम (ओपन अँड डिस्टन्स लर्निंग- ODL) विस्तारित आणि बळकट केले जातील. NIOS आणि राज्य मुक्त शाळा सध्याच्या कार्यक्रमांव्यतिरिक्त पुढील कार्यक्रम देतील: A, B आणि C स्तर जे औपचारिक शाळा प्रणालीच्या इयत्ता 3, 5 आणि 8 च्या समकक्ष आहेत; इयत्ता 10वी आणि 12 वीच्या समकक्ष असलेले माध्यमिक शिक्षण कार्यक्रम; व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रम / कार्यक्रम; आणि प्रौढ साक्षरता व जीवन-समृद्धी कार्यक्रम. राज्य मुक्त शाळा संस्था (SIOS) नव्याने स्थापन करून / सध्या अस्तित्वात असलेल्या संस्था बळकट करून राज्यांना वरील कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

3.6 शासनाला तसेच अशासकीय असलेल्या देणगीदार संस्थांना नवीन शाळा काढणे सोपे करण्यासाठी, सांस्कृतिक, भौगोलिक आणि लोकसंख्येच्या कारणास्तव स्थानिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि शिक्षणाच्या पर्यायी मॉडेल्सना परवानगी देण्यासाठी, शाळांसाठीच्या आवश्यकता शिथिल करण्यात येतील. आदानावर (इनपुट) कमी भर देण्यावर आणि शिकण्याच्या इच्छित निकालांविषयीच्या इच्छित प्रदानावर (आउटपुट) अधिक भर देण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. प्रकरण 8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे काही विशिष्ट क्षेत्रांपुरते आदानांवरील वरील नियम मर्यादित असतील. शाळेसाठीची इतर मॉडेल्सदेखील प्रायोगिक तत्त्वावर राबवली जातील, उदा. सरकारी - देणगीदार संस्था (पब्लिक-फिलँथ्रॉपिक) यांच्या भागीदाऱ्या.

3.7 अध्ययन अधिक सुधारण्यासाठी समुदायाच्या आणि माजी विद्यार्थ्यांच्या ऐच्छिक सहभागाचा प्रयत्न केला जाईल आणि त्यासाठी पुढील गोष्टी प्रदान केल्या जातील: एकास-एक शिकवणे; साक्षरता शिक्षण आणि अतिरिक्त मदत सत्रांचे आयोजन; शिक्षकांना शिकवण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन; विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि सल्ला; इ. या संदर्भात, सक्रिय आणि निरोगी ज्येष्ठ नागरिक, शाळेचे माजी विद्यार्थी आणि स्थानिक समुदाय सदस्यांचे योग्य प्रकारे साहाय्य मिळविले जाईल. यासाठी साक्षर स्वयंसेवक, सेवानिवृत्त शास्त्रज्ञ / शासकीय / निमसरकारी कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांचे डेटाबेस तयार केले जातील.

## 4. शाळांमधील अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र : शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायक आणि रंजक असले पाहिजे .

### शालेय अभ्यासक्रम आणि अध्यापनाची 5+3+3+4 या नवीन मांडणीत पुनर्रचना करणे

4.1 शालेय शिक्षणाची अभ्यासक्रम व अध्यापन रचना, अनुक्रमे 3-8, 8-11, 11-14, आणि 14-18 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या विकासाच्या वेगवेगळया टप्प्यावरील विकासात्मक गरजा आणि आवडीनिवडींबाबत प्रतिसादक्षम आणि सुसंगत बनवण्यासाठी, तिची पुनर्रचना केली जाईल. म्हणूनच, अभ्यासक्रम व अध्यापन रचना आणि शालेय शिक्षणासाठीचा अभ्यासक्रम आराखडा हे 5+3+3+4 रचनेनुसार असतील, ज्यामध्ये पायाभूत स्तर (दोन भागांमध्ये, म्हणजे अंगणवाडी/पूर्वप्राथमिक शाळेची 3 वर्षे + प्राथमिक शाळेतील इयत्ता 1-2 ची 2 वर्षे; एकत्रितपणे दोन्हीमध्ये 3-8 वयोगट समाविष्ट), पूर्वाध्ययन (प्रिपरेटरी) स्तर (इयत्ता 3-5, 8-11 वयोगट समाविष्ट), पूर्वमाध्यमिक स्तर (इयत्ता 6-8, 11-14 वयोगट समाविष्ट) आणि माध्यमिक स्तर (इयत्ता 9-12, दोन टप्प्यांत म्हणजे 9वी आणि 10वी पहिल्या आणि 11वी आणि 12वी दुसऱ्या, 14-18 वयोगट समाविष्ट), यांचा समावेश असेल.

4.2 पायाभूत स्तरामध्ये पाच वर्षांचे लवचिक, बहुस्तरीय, खेळ/उपक्रम-आधारित शिक्षण आणि परिच्छेद 1.2 मध्ये दिलेला ECCE चा अभ्यासक्रम व अध्यापन समाविष्ट असेल. पूर्वाध्ययन स्तरामध्ये पायाभूत स्तरातील खेळ, शोध आणि उपक्रमावर आधारित अध्ययन आणि अभ्यासक्रमाच्या शैलीवर विकसित तीन वर्षांचे शिक्षण असेल. काही सोपा मजकूर असलेल्या पुस्तकांचा तसेच अधिक औपचारिक परंतु संवादात्मक पद्धतीने वर्गात शिकण्याच्या बाबींचादेखील समावेश करण्यास सुरूवात केली जाईल, जेणेकरून वाचन, लेखन, बोलणे, शारीरिक शिक्षण, कला, भाषा, विज्ञान आणि गणित यासारख्या विषयांचा भक्कम पाया तयार होईल. पूर्वमाध्यमिक स्तरामध्ये, पूर्वाध्ययन स्तराच्या अध्ययन आणि अभ्यासक्रमाच्या शैलीवर पुढे विकसित केलेले तीन वर्षांचे शिक्षण असेल, मात्र प्रत्येक विषयातील अधिक अमूर्त संकल्पना शिकण्यासाठी आणि त्याविषयी चर्चेसाठी विषय शिक्षकांची सुरुवात झाल्यावर विद्यार्थी या टप्प्यावर विज्ञान, गणित, कला, सामाजिक शास्त्रे आणि मानव्यशास्त्रांसाठी सज्ज असतील. अधिक विशिष्ट विषयांची आणि विषय शिक्षकांची ओळख करून दिली असली तरीही प्रत्येक विषयामधील कार्यात्मक शिक्षणास आणि वेगवेगळया विषयांमधील संबंध शोधण्यास प्रोत्साहन आणि विशेष महत्त्व दिले जाईल. माध्यमिक स्तरामध्ये चार वर्षांचा बहुशाखीय अभ्यास समाविष्ट असेल, जो पूर्वमाध्यमिक स्तरातील विषयाभिमुख अध्ययन आणि अभ्यासक्रम शैलीवर पुढे विकसित केला असेल परंतु त्यात अधिक सखोलता, अधिक चिकित्सक विचार, आयुष्यातील इच्छा-आकांक्षांकडे अधिक लक्ष देणे आणि अधिक लवचिकता व विद्यार्थ्यांना विषयांची निवड करता येणे, या बाबी समाविष्ट असतील. विशेषत: विद्यार्थ्यांना इयत्ता 10 वी नंतर शिक्षण सोडण्याचा आणि इयत्ता 11-12 वी मधील व्यावसायिक किंवा इतर कोणतेही अभ्यासक्रम करण्यासाठी पुढच्या स्तरामध्ये पुन्हा प्रवेश करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. इच्छा असल्यास अधिक विशेषीकृत शाळेतदेखील प्रवेश घेता येईल.

4.3 वर वर्णन केलेले स्तर हे पूर्णपणे अभ्यासक्रम आणि अध्ययन विषयक आहेत, ज्यांची रचना मुलांच्या आकलनात्मक विकासाच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण जास्तीत जास्त परिणामकारक बनवण्यासाठी केलेली आहे; ते प्रत्येक स्तरावर राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम आणि अध्यापन-अध्ययन धोरणांच्या विकासाची माहिती देतील, मात्र भौतिक पायाभूत सुविधांमध्ये समांतर बदल करण्याची आवश्यकता नाही.

### विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

4.4. सर्व स्तरांवरील अभ्यासक्रम आणि अध्यापनातील सुधारणांचा एकंदर मुख्य भर असेल तो म्हणजे खरोखर समज वाढवण्याच्या आणि कसे शिकायचे ते शिकण्याच्या दिशेने व सध्या मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या पाठांतर

संस्कृतीच्या (घोकंपट्टीच्या) शिक्षणापासून शिक्षण व्यवस्थेला दूर नेणे यांवर असेल. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ आकलनात्मक विकास करणे एवढेच नसून, चांगले व्यक्तिमत्त्व घडवणे आणि 21 व्या शतकातील प्रमुख कौशल्ये आत्मसात केलेल्या अशा समग्र व अष्टपैलू व्यक्ती निर्माण करणे हेदेखील असेल. अखेरीस, ज्ञान हा एक गहिरा खजिना आहे आणि शिक्षण हे एखाद्या व्यक्तीमध्ये आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या परिपूर्णतेच्या रूपात ज्ञानाची अभिव्यक्ती होण्यास मदत करते. ही महत्त्वाची उद्दिष्टे गाठण्यासाठी अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्राचे सर्व पैलू पुनर्दिशाभिमुख आणि सुधारित केले जातील. पूर्वप्राथमिक शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंत, शिकण्याच्या प्रत्येक टप्प्यावर एकात्मीकरण आणि समावेशन करण्यासाठी विविध क्षेत्रांमधील विशिष्ट कौशल्ये आणि मूल्ये निश्चित केली जातील. शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या रंजक प्रक्रियांद्वारे ही कौशल्ये आणि मूल्ये आत्मसात केली जातील, हे सुनिश्चित करण्यासाठी अभ्यासक्रम आराखडा आणि व्यवहार पद्धती विकसित केल्या जातील. NCERT ही संस्था आवश्यक कौशल्ये निश्चित करेल आणि त्यांच्या व्यवहार पद्धती बालपणीच्या व शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्यामध्ये समाविष्ट करेल.

## आवश्यक शिक्षण आणि तार्किक विचारशक्ती वाढविण्यासाठी अभ्यासक्रमाचा मजकूर कमी करणे

4.5 अभ्यासक्रमातील मजकूर कमी करून प्रत्येक विषयातील अत्यावश्यक घटक राखले जातील, जेणेकरून चिकित्सक विचार आणि अधिक समग्र, प्रश्नाधारित, संवाद आधारित आणि विश्लेषण आधारित शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जाईल. अनिवार्य मजकूर हा प्रमुख संकल्पना, कल्पनाशक्ती, उपयोजन आणि समस्या सोडवणे यावर लक्ष केंद्रित करेल. शिकवणे आणि शिकणे अधिक परस्परसंवादी पद्धतीने केले जाईल; प्रश्न विचारण्याला प्रोत्साहन दिले जाईल आणि अधिक सखोल आणि अनुभवात्मक शिक्षणासाठी, वर्गातील सत्रांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अधिक मजेदार, सर्जनशील, सहयोगात्मक आणि शोधक उपक्रमांचा नियमितपणे समावेश असेल.

## अनुभवात्मक शिक्षण

4.6. सर्व स्तरांवर, अनुभवात्मक शिक्षणाचा अवलंब केला जाईल, ज्यात प्रत्येक विषयामध्ये मानक अध्यापन म्हणून प्रात्यक्षिक शिक्षण, कला आणि खेळ यांचा समावेश असलेले शिक्षण, कथाकथन आधारित अध्यापन, इत्यादींसह वेगवेगळया विषयांमधील संबंध शोधण्याचाही समावेश असेल. शैक्षणिक निष्पत्तीमध्ये आढळून येणारी तफावत दूर करण्यासाठी, वर्गातील व्यवहार, कार्यक्षमतेवर आधारित अध्ययन आणि शिक्षणानुसार चालतील. मूल्यांकन साधनेदेखील (शिकण्या "च्या रुपात", "चे", "साठी" मूल्यांकन यासह) वर्गातील प्रत्येक विषयासाठी निर्दिष्ट केलेल्या शिक्षण निकाल, क्षमता आणि कल यांच्याशी संरेखित केली जातील.

4.7. कला-एकात्मीकरण हा एक बहु-अभ्यासक्रमीय अध्यापन दृष्टिकोन आहे ज्यामध्ये विविध विषयांच्या संकल्पना शिकण्यासाठी आधार म्हणून कला आणि संस्कृतीच्या विविध पैलूंचा आणि प्रकारांचा उपयोग केला जातो. अनुभवात्मक शिक्षणावर भर देण्याचा एक भाग म्हणून, केवळ वर्गात आनंदी वातावरण निर्मितीसाठीच नव्हे तर प्रत्येक स्तरावर अध्यापन व शिक्षण प्रक्रियेत भारतीय कला आणि संस्कृती एकत्रित करून भारतीय संस्कार बिंबवण्यासाठी, कलासक्त (कला अंतर्भूत केलेले) शिक्षण वर्गातील व्यवहारांमध्ये समाविष्ट केले जाईल.

4.8. क्रीडा-एकात्मीकरण हा आणखी एक बहु-अभ्यासक्रमीय अध्यापन दृष्टिकोन आहे, जो स्थानिक खेळांसह शारीरिक उपक्रमांचा वापर अध्यापन पद्धतीमध्ये करून, सहकार्य, स्वयं-पुढाकार, स्वतःची दिशा, स्वयं-शिस्त, सांघिक कार्य, जबाबदारी, नागरिकत्व इत्यादि कौशल्ये विकसित करण्यात मदत करतो. विद्यार्थ्यांनी तंदुरुस्ती/फिटनेस हा आयुष्यभराचा दृष्टिकोन म्हणून अंगीकारण्यासाठी आणि फिट इंडिया चळवळीत अभिप्रेत

असलेल्या फिटनेसच्या पातळीसह, फिटनेसशी संबंधित जीवन कौशल्ये साध्य करण्यासाठी क्रीडा-एकात्मिक शिक्षण वर्गातील व्यवहारांमध्ये समाविष्ट केले जाईल. शिक्षणामध्ये खेळांचे एकात्मीकरण करण्याची गरज सगळयांना माहितीच आहे कारण यामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुधारून सर्वंकष विकासाला चालना मिळते, तसेच आकलनक्षमता वाढते.

## अभ्यासक्रम निवडीमध्ये लवचिकता देऊन विद्यार्थ्यांना सक्षम करा

4.9 विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठीचे विषय निवडण्यासाठी जास्त लवचिकता आणि निवडीला वाव दिला जाईल, विशेषत: माध्यमिक शाळेत – यामध्ये शारीरिक शिक्षण, कला आणि हस्तकला आणि व्यावसायिक कौशल्यांचासुद्धा अंतर्भाव असेल, त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या अभ्यासाच्या आणि जीवनाच्या योजनेचे मार्ग स्वत: ठरवू शकतील. एकात्मिक विकास आणि विषयांच्या तसेच अभ्यासक्रमाच्या निवडीला दरवर्षी मोठा वाव देणे, हे माध्यमिक शालेय शिक्षणाचे नवीन खास वैशिष्ट्य असेल. 'अभ्यासक्रम', 'अभ्यासक्रमेतर' किंवा 'सह-अभ्यासक्रम' यामध्ये, 'कला', 'मानव्यशास्त्रे' आणि 'विज्ञान' यामध्ये, किंवा 'व्यावसायिक' किंवा 'शैक्षणिक' शाखांमध्ये कोणतेही स्पष्ट विभाजन नसेल. विज्ञान, मानव्यशास्त्रे आणि गणित यांच्याबरोबरीने शारीरिक शिक्षण, कला आणि हस्तकला आणि व्यावसायिक कौशल्ये असे विषय शाळेच्या अभ्यासक्रमात सर्व वर्षांमध्ये समाविष्ट केलेले असतील, यामध्ये प्रत्येक वयोगटासाठी काय रंजक आणि सुरक्षित आहे याचा विचार केलेला असेल.

4.10 शालेय शिक्षणाच्या चार स्तरांपैकी प्रत्येक स्तरावर, प्रत्येक विभागात जे शक्य असेल त्यानुसार, जास्त विषयांची ओळख करून देण्याकरता आणि जास्त लवचिकता प्रदान करण्याकरता, एक आड एक दिवस शिकवली जाणारी अधिक लहान मोड्युल किंवा अभ्यासक्रम समाविष्ट करणे शक्य असलेली, सेमिस्टर किंवा इतर कोणतीही पद्धत वापरण्याचा विचार केला जाऊ शकतो. कला, विज्ञान, मानव्यशास्त्रे, भाषा, खेळ, आणि व्यावसायिक विषय अशा विविध विषयांमध्ये अधिक लवचिकता आणि त्यांची ओळख आणि ते शिकताना मजा आणणे, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्यांनी नाविन्यपूर्ण पद्धती शोधून काढल्या पाहिजेत.

## बहुभाषावाद आणि भाषेची शक्ती

**4.11** आपल्याला माहिती आहेच की लहान मुलांना आपल्या घरातील भाषेत / मातृभाषेत अवघड संकल्पना अधिक लवकर समजतात. घरातील भाषा आणि मातृभाषा बऱ्याचदा एकच असते किंवा ती स्थानिक समुदायात बोलली जाणारी भाषा असते. पण कधीकधी अनेक भाषा बोलणाऱ्या घरांमध्ये, कुटुंबातील इतर सदस्यांकडून बोलली जाणारी भाषा मातृभाषा किंवा स्थानिक भाषेपेक्षा वेगळी असू शकते. जिथे शक्य आहे तिथे, किमान 5 व्या इयत्तेपर्यंत आणि शक्यतोवर 8 व्या इयत्तेपर्यंत शिक्षणाचे माध्यम घरातील भाषा / मातृभाषा/ स्थानिक भाषा/ प्रादेशिक भाषा असले पाहिजे. त्यानंतर जिथे शक्य आहे तिथे घरातील / स्थानिक भाषा एक भाषा म्हणून शिकवली जाणे सुरू राहील. या गोष्टीचे पालन सरकारी आणि खाजगी दोन्ही प्रकारच्या शाळा करतील. विज्ञानासहित सर्व विषयांची उच्च-दर्जाची पाठ्यपुस्तके घरातील भाषेत / मातृभाषेत उपलब्ध करून दिली जातील. बालकाकडून बोलली जाणारी भाषा आणि शिकवण्याचे माध्यम यात काही तफावत असेल तर ती लवकरात लवकर भरून काढली जाईल, हे सुनिश्चित करण्यासाठी सुरुवातीलाच सर्व प्रयत्न केले जातील. घरातील भाषेत / मातृभाषेत पाठ्यपुस्तके उपलब्ध नसतील तरीसुद्धा शिक्षक /विद्यार्थी यांच्यातील संवादाची भाषा जिथे शक्य आहे तिथे घरातील भाषा / मातृभाषाच असेल. ज्या मुलांची घरातील भाषा आणि शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे आहे, त्यांच्यासाठी द्विभाषीय अध्यापन-अध्ययन सामग्रीसह शिक्षकांना द्विभाषा पद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. सर्व विद्यार्थ्यांना सर्व भाषा उत्तम प्रतीने शिकवल्या जातील; एखादी भाषा शिकवण्यासाठी आणि शिकण्यासाठी ती शिक्षणाचे माध्यम असणे आवश्यक नाही.

4.12 संशोधनाने स्पष्टपणे दर्शवले आहे त्याप्रमाणे 2 ते 8 वर्षे या वयात मुले भाषा अतिशय लवकर शिकतात आणि या बहुभाषिकत्वाचा लहान मुलांना आकलनासाठी खूपच फायदा होतो. पायाभूत पायरीपासूनच मुलांना सुरुवातीलाच विविध भाषांची ओळख करून दिली जाईल (पण मातृभाषेवर विशिष्ट भर असेल). सर्व भाषा आनंददायक आणि परस्परसंवादी पद्धतीने शिकवल्या जातील आणि सुरुवातीच्या वर्षात मातृभाषेचे वाचन आणि पुढे लेखन शिकवले जाईल आणि वाचन तसेच लेखन कौशल्य विकसित झाल्यावर इयत्ता 3 री पासून पुढे इतर भाषांचे लेखन आणि वाचन शिकवले जाईल. केंद्र सरकार आणि राज्य सरकार दोघांच्या वतीने संपूर्ण देशभरात, सर्व प्रादेशिक भाषांमधील आणि विशेषत: भारतीय राज्यघटनेच्या अनुसूची आठमध्ये नमूद केलेल्या सर्व भाषांच्या शिक्षकांची मोठ्या संख्येने तरतूद करण्याचा मोठा प्रयत्न करेल. सर्व राज्ये, विशेषत: भारताच्या विविध भागातील राज्ये, संबंधित राज्यात, त्रिभाषा सूत्र लागू करण्यासाठी एकमेकांच्या राज्यातून मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची भरती करण्यासाठी तसेच देशभरात भारतीय भाषांच्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्यासाठी द्विपक्षीय करार करतील. विविध भाषा शिकवण्यासाठी आणि शिकण्यासाठी तसेच भाषा शिक्षण लोकप्रिय करण्यासाठी तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाईल.

4.13 घटनेतील तरतुदी, लोकांच्या, प्रदेशांच्या आणि केंद्र सरकारच्या आकांक्षा, आणि बहुभाषावाद तसेच राष्ट्रीय एकात्मकतेला प्रोत्साहन देण्याची गरज या गोष्टी लक्षात घेऊन त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करणे सुरूच राहील. मात्र, त्रिभाषा सूत्रात जास्त लवचिकता असेल आणि कोणत्याही राज्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही. मुले ज्या तीन भाषा शिकणार आहेत त्यापैकी किमान दोन भाषा भारतीय असतील तर या भाषांची निवड राज्ये, प्रदेश आणि अर्थातच विद्यार्थी स्वत: करू शकतील. विशेषत:, ज्या विद्यार्थ्यांना ते शिकत असलेल्या तीन भाषांपैकी एक किंवा अधिक भाषा बदलायच्या असतील तर तसे इयत्ता 6 वी किंवा 7 वी मध्ये करता येईल. मात्र त्यासाठी त्यांना माध्यमिक शाळेच्या शेवटी या तीन भाषांमध्ये (एका भारतीय भाषेत साहित्यिक पातळीच्या प्राविण्यासह) मूलभूत प्राविण्य दाखवावे लागेल.

4.14 विज्ञान आणि गणितासाठी उच्च-दर्जाची द्विभाषिक क्रमिक पुस्तके आणि अध्यापन-अध्ययन सामग्री तयार करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. म्हणजे विद्यार्थी त्यांच्या घरातील भाषा/ मातृभाषा आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये या दोन्ही विषयांवर विचार करण्यासाठी आणि बोलण्यासाठी सक्षम बनतील.

4.15 जगभरातील अनेक विकसित देशांनी दाखवून दिल्याप्रमाणे आपली भाषा, संस्कृती आणि परंपरा यांच्याबद्दल शिक्षित असणे हा अडथळा नाही तर शैक्षणिक, सामाजिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी एक खूप मोठा फायदा आहे. भारतीय भाषा जगातील सर्वांत समृद्ध, सर्वांत शास्त्रीय, सर्वांत सुंदर, आणि सर्वांत अभिव्यक्तिक्षम भाषांमध्ये गणल्या जातात. या भाषांमध्ये प्राचीन आणि आधुनिक साहित्य (गद्य आणि पद्य दोन्ही), चित्रपट, संगीत यांचे भांडार आहे. यामुळे हीच भारताची राष्ट्रीय ओळख आणि संपत्ती आहे. सांस्कृतिक समृद्धीच्या हेतूने आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्व युवा भारतीय आपल्या देशाच्या समृद्ध आणि संख्येनेही भरपूर असलेल्या भाषांबद्दल आणि त्यांच्यामध्ये तसेच त्यांच्यातील साहित्यामध्ये असलेल्या खजिन्याबद्दल जागरूक असले पाहिजेत.

4.16 अशाप्रकारे, इयत्ता 6-8 मध्ये कधीतरी देशातील प्रत्येक विद्यार्थी, 'भारतातील भाषा' या मजेदार प्रकल्पात/उपक्रमात 'एक भारत श्रेष्ठ भारत' या पुढाकारांतर्गत सहभागी होईल. विद्यार्थी महत्त्वाच्या भारतीय भाषांपैकी बहुतेक सर्व भाषांमध्ये असलेल्या एकतेबद्दल समजून घेतील, त्यामध्ये उच्चारानुसार आणि शास्त्रीय पद्धतीने तयार करण्यात आलेल्या वर्णमाला आणि लिपी, त्यांची सामान्य व्याकरण रचना, संस्कृत आणि इतर शास्त्रीय भाषांमध्ये असलेला या भाषांच्या शब्दसंग्रहाचा स्रोत आणि उद्भव शोधण्यापासून ते या भाषांचा एकमेकींवर

असलेला प्रभाव, आणि फरक समजून घेणे समाविष्ट असेल. विद्यार्थी हे सुद्धा समजून घेतील की, कोणत्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये कोणती भाषा बोलली जाते; तसेच ते आदिवासी भाषांचे स्वरूप आणि रचना समजून घेतील, आणि भारतातील प्रत्येक प्रमुख भाषेत सामान्यपणे बोलल्या जाणाऱ्या काही ओळी आणि वाक्प्रचार म्हणायला शिकतील. तसेच प्रत्येक भाषेतील समृद्ध आणि समकालीन साहित्यसुद्धा समजून घेतील (आवश्यकतेनुसार योग्य भाषांतरांद्वारे). अशा उपक्रमामुळे त्यांच्यात एकतेची भावना वाढीला लागेल. तसेच भारताचा सुंदर सांस्कृतिक वारसा आणि विविधता त्यांच्या लक्षात येईल आणि भावी आयुष्यात जेंव्हा ते भारताच्या विविध भागातील लोकांना ते भेटतील तेव्हा तिथे संवाद सुरू करण्यासाठी त्यांना विषय मिळेल. हा प्रकल्प / उपक्रम आनंददायक असला पाहिजे आणि त्याचे कोणत्याही प्रकारे मूल्यांकन केले जाणार नाही.

4.17 भारतातील अभिजात भाषांचे महत्त्व, सुसंगतता, सौंदर्य आणि भारतीय साहित्य यांच्याकडेसुद्धा दुर्लक्ष करता येणार नाही. संस्कृत भाषा भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीत एक महत्त्वाची आधुनिक भाषा म्हणून नमूद करण्यात आलेली असून या भाषेत लॅटीन आणि ग्रीक भाषांतील साहित्य एकत्र केल्यावर होईल त्यापेक्षासुद्धा जास्त अभिजात साहित्य आहे. यामध्ये विविध धर्माच्या तसेच निधर्मी लोकांनी, समाजातील सर्व स्तरातील आणि विविध सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांनी हजारो वर्षांच्या काळात लिहिलेल्या गणित, तत्त्वज्ञान, व्याकरण, संगीत, राजकारण, वैद्यकशास्त्र, वास्तुकला, धातुकाम, नाटक, काव्य, कथाकथन, आणि इतर गोष्टींच्या (ज्याला 'संस्कृत ज्ञान प्रणाली' म्हणतात) खजिन्याचा समावेश आहे. त्यामुळे संस्कृत भाषा शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये तसेच उच्च शिक्षणात एक महत्त्वाचा, समृद्ध पर्याय तसेच त्रिभाषा सूत्रातील एक पर्याय म्हणून उपलब्ध असेल. ती रंजक, अनुभवात्मक तसेच काळानुसार सुसंगत पद्धतीने, संस्कृत ज्ञान प्रणाली'च्या वापराद्वारे आणि विशेषत: उच्चारशास्त्र आणि उच्चारण यांच्या द्वारे ध्वनी आणि उच्चाराद्वारे शिकवली जाईल. संस्कृतमधून संस्कृत शिकवण्यासाठी (STS) पायाभूत आणि पूर्व माध्यमिक स्तरावरील संस्कृत पाठ्यपुस्तके सोप्या प्रमाणित संस्कृत (SSS) भाषेत लिहिली जातील आणि त्यामुळे तिचा अभ्यास खरोखरच आनंददायी होईल.

4.18 भारतात इतर अभिजात भाषांमध्ये म्हणजे अभिजात तमिळ, तेलुगु, कन्नड, मल्याळम आणि ओडिया या भाषांसह इतर अभिजात भाषांमध्ये अतिशय समृद्ध साहित्य आहे. याशिवाय, भावी पिढ्यांच्या सुख आणि समृद्धीसाठी पाली, पर्शियन आणि प्राकृत भाषा; आणि त्याच्यातील साहित्याचेही संवर्धन करणे आवश्यक आहे. भारत संपूर्ण विकसित देश बनेल तेव्हा, पुढील पिढीला भारताच्या व्यापक आणि सुंदर अभिजात साहित्याच्या अभ्यासात सहभागी आणि समृद्ध व्हायचे असेल. संस्कृत बरोबरच तमिळ, तेलुगु, कन्नड, मल्याळम, ओडिया, पाली, पर्शियन, आणि प्राकृत या इतर अभिजात भारतीय भाषा आणि साहित्यसुद्धा विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी शाळांमध्ये पर्याय म्हणून शक्यतो ऑनलाईन मोड्युल्सच्या माध्यमातून अनुभवात्मक आणि नाविन्यपूर्ण मार्गांनी उपलब्ध असतील. त्यामुळे या भाषा आणि त्यांच्यातील साहित्य जिवंत आणि चैतन्यपूर्ण राहील, हे सुनिश्चित केले जाईल. अशाच प्रकारचे प्रयत्न समृद्ध मौखिक आणि लिखित साहित्य, सांस्कृतिक परंपरा आणि ज्ञान असलेल्या सर्व भारतीय भाषांसाठी केले जातील.

4.19 मुलांचे बौद्धिक संपन्नीकरण आणि या समृध्द भाषा आणि त्यांच्या कलेच्या खजिन्याचे जतन यांसाठी सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही शाळांमधील इयत्ता 6-12 मधील सर्व विद्यार्थ्यांकडे, किमान दोन वर्षांकरता भारतातील एखादी पारंपरिक भाषा आणि तिच्याशी संबंधित साहित्य यांचा अनुभवात्मक आणि नाविन्यपूर्ण पध्दतीने अभ्यास करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. यामध्ये तंत्रज्ञानाशी सांगडदेखील घालता येईल तसेच विद्यार्थ्यांकडे पूर्वमाध्यमिक स्तरापासून सुरुवात करून माध्यमिक स्तरापर्यंत आणि त्याच्याही पुढे हे शिकण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

4.20 भारतीय भाषा आणि इंग्रजी भाषेतील उच्च गुणवत्तेच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याव्यतिरिक्त, माध्यमिक स्तरावर परदेशी भाषा उदा. कोरियन, जपानी, थाई, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज आणि रशियन यांच्यादेखील संधी उपलब्ध करून दिल्या जातील, जेणेकरून जगातील विविध संस्कृतींविषयी विद्यार्थ्यांना जाणून घेता येईल. तसेच, त्यांची स्वत:ची आवड व आकांक्षा यांच्यानुसार त्यांचे जागतिक ज्ञान आणि भ्रमण वैश्विक ज्ञान आणि गतिशीलता वृद्धिंगत करता येईल.

4.21 नाविन्यपूर्ण आणि अनुभवात्मक पध्दती वापरून भाषा शिकवण्याची प्रक्रिया समृध्द केली जाईल, यामध्ये विविध खेळांचे उपक्रम आणि ॲप्सचा वापर करणे, भाषांच्या सांस्कृतिक पैलूंबरोबर सांगड घालणे – उदा. चित्रपट, नाटक, कथाकथन, काव्य आणि संगीत – आणि विविध प्रसंगोचित विषयांची आणि वास्तविक जीवनाशी संबंधित अनुभवांचा संबंध जोडणे, यांचा समावेश असेल. अशा प्रकारे, भाषेचे शिक्षण अनुभवात्मक-अध्ययन अध्यापनशास्त्रावरदेखील आधारित असेल.

4.22 भारतीय सांकेतिक भाषा (इंडियन साईन लँग्वेज (ISL)) देशभर प्रमाणित केली जाईल आणि, श्रवण दुर्बलता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील अभ्यासक्रम साहित्य विकसित केले जाईल. स्थानिक साईन लँग्वेजेसचा आदर केला जाईल तसेच, शक्य आणि प्रसंगोचित असेल तेव्हा ती भाषा शिकवली देखील जाईल.

## आवश्यक विषय, कौशल्ये आणि क्षमतेचे अभ्यासक्रमिक एकात्मीकरण

4.23 विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तिक अभ्यासक्रमाची निवड करताना त्यात वेगवेगळे पर्याय निवडण्याची मुभा असणे गरजेचे असले तरी, आजकालच्या वेगाने बदलणाऱ्या जगात एक चांगली, यशस्वी, नाविन्यपूर्ण, बदलांशी जुळवून घेणारी आणि निर्माणक्षम व्यक्ती होण्यासाठी, सर्व विद्यार्थ्यांनी काही विशिष्ट विषय, कौशल्ये, आणि क्षमता शिकणे आवश्यक आहे. भाषेवरील प्रभुत्वाखेरीज यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे: वैज्ञानिक वृत्ती आणि पुरावाधीष्टीत विचारसरणी; कल्पकता आणि नाविन्यपूर्णता; सौंदर्यशास्त्र आणि कलेची समज; मौखिक आणि लेखी संवाद साधण्याची कला, स्वास्थ्य आणि पोषण; शारीरिक शिक्षण, तंदुरुस्ती, आरोग्य आणि क्रीडा; सहयोग आणि सांघिक भावना; समस्या सोडवणे आणि तार्किक विचार करणे; व्यावसायिक अनुभव आणि कौशल्ये; डिजिटल ज्ञान, कोडिंग, आणि संगणकीय विचार; नैतिकता आणि नैतिक विचार, मनुष्य आणि घटनात्मक मूल्यांचे ज्ञान आणि अभ्यास; लैंगिक संवेदनशीलता; मूलभूत कर्तव्ये; नागरिकत्वविषयक कौशल्ये आणि मूल्ये; भारताविषयी ज्ञान; पाणी आणि साधन-संपत्तीच्या संरक्षणासह पर्यावरणाविषयी जागरूकता; स्वच्छता आणि साफ-सफाई; आणि चालू घडामोडी व स्थानिक समुदाय, राज्य, देश आणि जगाला भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांचे ज्ञान.

4.24 एकमताने ठरवलेला अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रीय उपक्रम हाती घेतले जातील. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये सर्व स्तरांवर विविध महत्त्वपूर्ण कौशल्ये विकसित व्हावी यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), डिझाइन थिंकिंग, सर्वांगीण आरोग्य (होलिस्टिक हेल्थ), ऑरगॅनिक लिविंग, पर्यावरण शिक्षण, जागतिक नागरिकत्व शिक्षण (GCED) यासारख्या समकालीन विषयांची प्रसंगोचित टप्प्यांवर ओळख करून दिली जाईल.

4.25 भारताचे भविष्य तसेच अनेक उभरती क्षेत्रे आणि व्यवसायांमध्ये भारताची नेतृत्वाची भूमिका यादृष्टीने, गणित आणि गणितीय विचार अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे मानले गेले आहे. या आगामी क्षेत्रांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, आणि डेटा शास्त्र इत्यादींचा समावेश आहे. म्हणूनच, शाळेच्या संपूर्ण कालावधीमध्ये गणित आणि संगणकीय विचार यांच्यावर जोर दिला जाईल. याची सुरुवात पायाभूत स्तरावर, कोडी आणि खेळ यांचा नियमित वापर तसेच इतर विविध नाविन्यपूर्ण पध्दती वापरून केली जाईल, जेणेकरून गणितीय विचार

अधिक मजेदार आणि गुंतवून ठेवणारा होईल. कोडिंगशी संबंधित उपक्रमांची सुरुवात पूर्वमाध्यमिक स्तरावर केली जाईल.

4.26 इयत्ता 6 ते 8 दरम्यान प्रत्येक विद्यार्थ्याने, राज्य आणि स्थानिक समुदायाने ठरवलेला आणि स्थानिक कौशल्य गरजांवर आधारित, एक मजेदार अभ्यासक्रम निवडायचा आहे, ज्यामुळे त्यांना सुतारकाम, इलेक्ट्रिकचे काम, धातूकाम, बागकाम, कुंभारकाम यासारख्या महत्त्वपूर्ण व्यावसायिक कलांचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल आणि कामाची पाहणी करता येईल. NCFSE 2020-21 ची निर्मिती करताना NCERT कडून इयत्ता 6-8 साठी सरावावर आधारित अभ्यासक्रमाची योग्य अशी रचना केली जाईल. इयत्ता 6 ते 8 दरम्यान कधीतरी सर्व विद्यार्थी एका दप्तर-विरहित दहा दिवसांच्या उपक्रमामध्ये सहभागी होतील, जिथे ते स्थानिक व्यावसायिक तज्ज्ञ उदा. सुतार, माळी, कुंभार, कलाकार इ. यांच्या मार्गदर्शनाखीली शिकाऊ (इंटर्न) म्हणून काम करतील. व्यावसायिक विषय शिकण्याकरता अशा प्रकारच्या इंटर्नशिपच्या संधी इयत्ता 6-12 दरम्यान विद्यार्थ्यांना सुट्ट्यांच्या कालावधीमध्येदेखील उपलब्ध करून देता येतील. ऑनलाईन पध्दतीने व्यावसायिक अभ्यासक्रम शिकण्याचा पर्यायदेखील उपलब्ध करून दिला जाईल. कला, प्रश्नमंजुषा, क्रीडा, आणि व्यावसायिक हस्तकला यांचा समावेश असलेल्या आणि विविध प्रकारे समृध्द करणाऱ्या उपक्रमांसाठी, वर्षभर दप्तर-विरहित दिवसांना प्रोत्साहन दिले जाईल. ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या जागा/स्मारके, स्थानिक कलाकार व कारागीर आणि गाव/तालुका/जिल्हा/राज्य येथील उच्च शैक्षणिक संस्था यांना भेट देऊन विद्यार्थ्यांना शाळेबाहेरील उपक्रमांची नियमितपणे ओळख करून दिली जाईल.

4.27 "भारत विषयक ज्ञान" या विषयामध्ये प्राचीन भारताची माहिती आणि आधुनिक भारत उभारण्यात प्राचीन भारताचे योगदान, त्याचे यश आणि त्याच्यासमोरील आव्हाने याबरोबरच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण इत्यादींशी संबंधित भारताच्या भविष्यातील अपेक्षांची स्पष्ट जाण हे समाविष्ट असेल. या घटकांचा शाळेच्या संपूर्ण अभ्यासक्रमात प्रसंगोचित ठिकाणी, अचूक आणि वैज्ञानिक पध्दतीने समावेश केला जाईल; विशेषत: आदिवासींची माहिती आणि स्थानिक व पारंपरिक शिकवण्याच्या पध्दतींसह भारतीय ज्ञान प्रणालीचे शिक्षण दिले जाईल, आणि त्याचा समावेश गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, योग, वास्तुशास्त्र, वैद्यकशास्त्र, शेती, इंजिनिअरिंग, भाषाशास्त्र, साहित्य, क्रीडा, खेळ याबरोबरच शासन, राज्यव्यवस्था, संवर्धन यासारख्या विषयांमध्ये केला जाईल. आदिवासींच्या वांशिक-वैद्यकीय प्रथा (ट्रायबल एथनो-मेडिसिन), वन व्यवस्थापन, पारंपरिक (सेंद्रिय) शेती, नैसर्गिक शेती इ. साठी विशेष अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातील. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी, भारतीय ज्ञान प्रणालीवरील एक गुंतवून ठेवणारा अभ्यासक्रमदेखील ऐच्छिक विषय म्हणून उपलब्ध करून दिला जाईल. स्थानिक खेळ आणि मौजमजेच्या माध्यमातून विविध विषय शिकण्याकरता शाळांमधून स्पर्धा घेतल्या जाऊ शकतात. शाळेच्या संपूर्ण अभ्यासक्रमाच्या विविध टप्प्यांवर, प्राचीन आणि आधुनिक भारतातील, विज्ञानाच्या क्षेत्रातील किंवा अन्य क्षेत्रातील, प्रेरणादायी व्यक्तींविषयी व्हिडिओ माहितीपट दाखवले जातील. सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमांतर्गत विविध राज्यांना भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

4.28 "जे योग्य आहे ते करण्याचे" महत्त्व विद्यार्थ्यांना लहानपणीच शिकवले जाईल आणि नैतिक निर्णय घेण्यासाठी त्यांना एक तार्किक चौकट/साचा उपलब्ध करून दिला जाईल. पुढील वर्षांमध्ये, या चौकटीचा विस्तार करून त्यामध्ये फसवणूक, हिंसाचार, वाङ्मयचौर्य, कचरा करणे, सहिष्णुता, समानता, सहानुभूती यासारख्या विषयांचा समावेश केला जाईल. आपले आयुष्य जगताना नैतिक मूल्यांचा स्वीकार करणे तसेच एखाद्या नैतिक मुद्द्यावर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार करून आपली भूमिका/युक्तिवाद तयार करणे आणि सर्व कामांमध्ये नैतिक पध्दतींचा अवलंब करणे, या सर्वांसाठी मुलांना सक्षम बनवणे हा यामागचा उद्देश आहे. अशा प्रकारच्या मूलभूत नैतिक युक्तिवादाचा परिणाम म्हणजे सर्व विद्यार्थ्यांमध्ये भारतीय पारंपरिक मूल्ये आणि सर्व मूलभूत मानवीय व घटनात्मक मूल्ये (उदा.

*सेवा, अहिंसा, स्वच्छता, सत्य, निष्काम कर्म, शांती,* त्याग, सहिष्णुता, विविधता, बहुसत्तावाद, नैतिक आचरण, लैंगिक संवेदनशीलता, वडीलधाऱ्यांचा आदर करणे, लोकांची पार्श्वभूमी कोणतीही असली तरीही त्यांचा आणि त्यांच्यातील अंगभूत क्षमतेचा आदर करणे, पर्यावरणाचा आदर करणे, मदत करणे, शिष्टाचार, सहनशीलता, क्षमाशीलता, सहानुभूती, करूणा, देशभक्ती, लोकतांत्रिक दृष्टिकोन, अखंडता, जबाबदारी, न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व) विकसित केली जातील. पंचतंत्र, जातककथा, हितोपदेश यामधील मूळ गोष्टी, इतर मजेदार दंतकथा तसेच भारतीय परंपरेतील प्रेरणादायी गोष्टी वाचण्याची आणि त्यातून शिकण्याची संधी मुलांना मिळेल आणि जागतिक साहित्यावर या गोष्टींचा पडलेला प्रभावदेखील मुलांना जाणून घेता येईल. भारतीय संविधानातील काही उतारे सर्व विद्यार्थ्यांनी वाचणे अनिवार्य असल्याचे मानले जाईल. आरोग्याच्या मूलभूत प्रशिक्षणासोबतच प्रतिबंधात्मक आरोग्य, मानसिक आरोग्य, चांगले पोषण, वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता, आपत्ती प्रतिसाद आणि प्रथमोपचार यांचा समावेशदेखील अभ्यासक्रमात केला जाईल तसेच दारू, तंबाखू आणि इतर अमली पदार्थांच्या घातक आणि हानिकारक परिणामांचे वैज्ञानिक स्पष्टीकरणदेखील समाविष्ट केले जाईल.

4.29 पायाभूत स्तरापासून सुरुवात करून सर्व अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्राची पुनर्निर्मिती अशा प्रकारे केली जाईल की भारतीय व स्थानिक संदर्भ आणि प्रकृतीधर्म यांच्याशी त्याचा घट्ट संबंध जोडला जाईल. यामध्ये संस्कृती, परंपरा, वारसा, प्रथा, भाषा, तत्त्वज्ञान, भूगोल, प्राचीन आणि समकालीन ज्ञान, सामाजिक आणि वैज्ञानिक गरजा, शिकण्याच्या स्थानिक आणि पारंपरिक पध्दती इत्यादींचा समावेश असेल जेणेकरून आपल्या मुलांना शिक्षण जास्तीत जास्त आपलेसे, प्रसंगोचित, मनोरंजक आणि प्रभावी वाटेल. शक्यतो, भारतीय आणि स्थानिक भौगोलिक संदर्भांशी जोडलेल्या गोष्टी, कला, खेळ, क्रीडा, उदाहरणे, समस्या इ. निवडल्या जातील. अशा प्रकारच्या विचारांवर आधारलेल्या शिक्षणामुळे कल्पना, (तर्काधीष्ट्ता) अमूर्तता आणि कल्पकतेला चांगलाच बहर येईल.

4.30 NCERT द्वारे शालेय शिक्षणासाठी एक नवीन आणि व्यापक राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा , NCFSE 2020-21, तयार करण्याचे काम हाती घेण्यात येईल, जे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या तत्त्वांवर आणि अभ्यासक्रमाच्या प्रमुख गरजांवर आधारित असेल, तसेच राज्य सरकार, मंत्रालये, केंद्रिय सरकारचे संबंधित विभाग, आणि इतर तज्ज्ञ संस्था यांच्यासह सर्व हितसंबंधींशी चर्चा केल्यानंतर तयार करण्यात येईल, आणि प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून दिले जाईल. यापुढे, दर 5 ते 10 वर्षांनी अभ्यासक्रमाच्या प्रमुख गरजा लक्षात घेऊन, NCFSE च्या दस्तऐवजावर पुनर्विचार करून त्यात सुधारणा करण्यात येतील.

## स्थानिक आशय आणि वैशिष्ट्यपूर्णता असलेली राष्ट्रीय पाठ्यपुस्तके

4.31 आशय कमी करून शालेय अभ्यासक्रमात अधिक लवचिकता आणणे, तसेच घोकंपट्टी करून शिकण्यापेक्षा रचनात्मक पध्दतीने शिकण्यावर नव्याने दिला जाणारा भर, याच्या जोडीने शालेय पाठ्यपुस्तकातदेखील बदल झाले पाहिजेत. राष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण मानल्या गेलेल्या आवश्यक मूलभूत साहित्याचा (चर्चा, विश्लेषण, उदाहरणे आणि उपयोग यांच्यासह) समावेश सर्व पाठ्यपुस्तकांमध्ये करण्याचे उद्दिष्ट असेल पण त्याबरोबरच, स्थानिक संदर्भ आणि आवश्यकतेनुसार काही इच्छित बारकावे आणि पूरक साहित्याचादेखील समावेश केला जाईल. जिथे शक्य असेल तिथे, शिकवण्याकरता कोणती पाठ्यपुस्तके वापरायची हे निवडण्याचा पर्यायदेखील शाळा आणि शिक्षकांकडे असेल. अपेक्षित राष्ट्रीय आणि स्थानिक साहित्याचा समावेश असलेल्या पाठ्यपुस्तकांच्या संचामधून त्यांना पाठ्यपुस्तके निवडता येतील. यामुळे त्यांना त्यांच्या अध्यापन शैलीनुसार आणि विद्यार्थी व तेथील सामाजिक आवश्यकतांना अनुकूल असलेल्या रीतीने शिकवता येईल.

4.32 विद्यार्थी आणि शैक्षणिक व्यवस्थेवर असलेले पाठ्यापुस्तकांच्या किमतीचे ओझे कमी करण्यासाठी अशा प्रकारची दर्जेदार पाठ्यपुस्तके शक्य तेवढ्या कमी किमतीत - म्हणजे, उत्पादन/मुद्रणाच्या किमतीमध्ये - उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असेल. NCERT ने SCERT च्या बरोबरीने विकसित केलेले उच्च-दर्जाचे पाठ्यपुस्तक साहित्य वापरून, हे साध्य करता येईल; अतिरिक्त पाठ्यपुस्तक साहित्य निर्माणासाठी लागणारा निधी, सरकार व देणगीदार संस्था यांच्या भागीदारीतून आणि क्राऊडसोर्सिंगची मदत घेउन मिळवता येऊ शकतो  ज्यामुळे उच्च-दर्जाचे साहित्य केवळ निर्मितीमूल्यांत लिहिण्यासाठी तज्ज्ञांना प्रोत्साहन मिळेल. राज्य आपले स्वत:चे अभ्यासक्रम (जे शक्य तेवढे NCERT ने तयार केलेल्या NCFSE वर आधारित असतील) आणि पाठ्यपुस्तके (जी शक्य तेवढी NCERT च्या पाठ्यपुस्तक साहित्यावर आधारित असतील) तयार करतील, ज्यामध्ये आवश्यकतेनुसार राज्याची वैशिष्ट्यपूर्णता आणि साहित्याचा समावेश केला जाईल. असे करत असताना एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की NCERT ला राष्ट्रीय स्तरावरील स्वीकारार्ह निकष मानले जाईल. ही पाठ्यपुस्तके सर्व प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याला प्रथम प्राधान्य दिले जाईल, जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना उच्च-दर्जाचे शिक्षण मिळेल. शाळांमध्ये पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध होतील याची निश्चिती करण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील. पर्यावरणाचे संरक्षण आणि वितरणचा भार कमी करण्यासाठी, सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेश आणि NCERT कडून सर्व पाठ्यपुस्तकांच्या, डाऊनलोड करता येतील आणि छापता येतील, अशा आवृत्त्या उपलब्ध करून दिल्या जातील.

4.33 अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्रामध्ये योग्य ते बदल करून, दप्तराचे आणि पाठ्यपुस्तकांचे वजन लक्षणीय प्रमाणात कमी करण्यासाठी NCERT, SCERT, शाळा, आणि शिक्षक सहकाराने प्रयत्न करतील.

## विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मूल्यमापनात परिवर्तन

4.34 आपल्या शालेय व्यवस्थेच्या संस्कृतीमधील मूल्यमापन, सारांश (समेटीव्ह) पध्दतीचे आहे – जे मुख्यत्वे घोकंपट्टी करून लक्षात ठेवण्याच्या कौशल्याची पारख करते. या मूल्यमापनाच्या उद्दिष्टात बदल करून ते अधिक नियमित आणि रचनात्मक (फॉर्मेटीव) केले जाईल, क्षमतेवर आधारित असेल, विद्यार्थ्यांसाठी अध्ययन आणि विकासाला प्रोत्साहन देणारे आणि उच्च-स्तरावरील कौशल्ये उदा. विश्लेषण, तार्किक विचार आणि संकल्पनात्मक सुस्पष्टता, यांची पारख करणारे असेल. मूल्यमापनाचा प्रमुख उद्देश खरोखरीच अध्यापनासाठी असेल; याची शिक्षक, विद्यार्थी आणि संपूर्ण शालेय व्यवस्थेला अध्यापन-अध्ययन प्रक्रियेमध्ये सतत बदल करायला मदत होईल जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांकरता शिक्षण आणि विकास यांना चालना मिळेल. सर्व शैक्षणिक स्तरावरील मूल्यमापनाचे हे मूलभूत तत्त्व असेल.

4.35 शाळेकडून पालकांना कळवल्या जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या शाळा-आधारित मूल्यमापनाच्या प्रगती पुस्तकाची संपूर्ण पुनर्रचना राज्ये/केंद्रशासित प्रदेशांतर्फे, प्रस्तावित राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र, NCERT आणि SCERT यांच्या मार्गदर्शनाखाली केली जाईल. हे प्रगती पुस्तक एक सर्वांगीण, व्यापक (360-अंश), बहुआयामी अहवाल असेल व या अहवालामध्ये, शिकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आकलनीय (कॉग्निटिव), भावात्मक (अफेक्टिव) आणि सायकोमोटर क्षेत्रातील प्रगती तसेच विशेषता अतिशय तपशीलवारपणे दर्शवली जाईल. यामध्ये शिक्षकाच्या मूल्यमापनासह स्व-मूल्यमापन, सहाध्यायी-मूल्यमापन तसेच प्रकल्प आणि अन्वेषणावर आधारित अध्ययन, प्रश्नमंजुषा, नाट्यीकरण, सांघिक कार्य, पोर्टफोलिओज इ. मध्ये विद्यार्थ्याने केलेली प्रगती या सर्वांचा समावेश असेल. सर्वांगीण प्रगती पुस्तक हे घर आणि शाळा यातील महत्त्वाचा दुवा असेल आणि त्याच्या जोडीने पालक-शिक्षक बैठकादेखील घेतल्या जातील जेणेकरून पालकांना आपल्या मुलांच्या सर्वांगीण शिक्षणामध्ये आणि विकासामध्ये सक्रियपणे सहभागी करून घेता येईल. प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गात आणि वर्गाच्या बाहेर कशा प्रकारे मदत करावी याविषयीची महत्त्वपूर्ण माहिती

पालक आणि शिक्षकांना देण्याचे काम प्रगती पुस्तकाच्या माध्यमातून साध्य होईल. AI तंत्रज्ञानावर आधारित सॉफ्टवेअर विकसित करता येईल जे अध्यापनाचा डेटा/माहिती आणि पालक, विद्यार्थी व शिक्षकांसाठी असलेल्या परस्परसंवादी प्रश्नावलींवर आधारित असेल आणि, त्याचा वापर करून शालेय वर्षांमध्ये होणाऱ्या स्वत:च्या विकासावर विद्यार्थ्यांना लक्ष ठेवता येईल. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची कुवत, आवडीची क्षेत्रे आणि लक्ष केंद्रित करायची गरज असलेली क्षेत्रे याविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळेल. या माहितीचा वापर करून त्यांना स्वत:साठी करिअरचे सर्वोत्कृष्ट पर्याय निवडायला मदत होईल.

4.36 बोर्डाची परीक्षा आणि प्रवेश परीक्षांसह माध्यमिक शाळेच्या परीक्षांचे विद्यमान स्वरूप - आणि परिणामी बोकाळलेली आजची कोचिंग संस्कृती – याने बरीच हानी होत आहे, विशेषत: माध्यमिक शाळेच्या स्तरावर. यामुळे विद्यार्थ्यांचा यथायोग्य अध्ययनासाठी असलेला वेळ, परीक्षांसाठी लागणारे अतिरिक्त कोचिंग आणि तयारी यामध्ये खर्ची होतो. विद्यार्थ्यांना वेगवेगळे पर्याय आणि त्यात निवड करण्याची लवचिकता – जी भविष्यातील शिक्षण व्यवस्थेसाठीअतिशय महत्त्वपूर्ण आहे - देण्याऐवजी या परीक्षांमुळे मुलांना एकाच शाखेतील अतिशय मर्यादित साहित्याचा अभ्यास करायला भाग पाडले जाते.

4.37 इयत्ता 10 आणि 12 साठी असणाऱ्या बोर्ड परीक्षा तशाच चालू राहणार असल्या तरी, विद्यमान बोर्ड आणि प्रवेश परीक्षांच्या व्यवस्थेत अशा प्रकारे बदल करण्यात येईल की कोचिंग क्लासला जाण्याची गरज भासणार नाही. विद्यमान मूल्यमापन प्रणालीमुळे झालेले हे हानिकारक परिणाम उलट करण्यासाठी, बोर्ड परीक्षांची पुनर्रचना केली जाईल, जेणेकरून सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन मिळेल; आपल्या वैयक्तिक आवडीनुसार विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी बोर्डाची परीक्षा द्यायची आहे, त्यातील बरेचसे विषय त्यांना निवडता येतील. बोर्ड परीक्षा 'अधिक सोप्या' देखील केल्या जातील, म्हणजे महिनोन् महिने केलेले कोचिंग आणि घोकंपट्टीच्याऐवजी प्रामुख्याने मुख्य क्षमता/योग्यतेची पारख केली जाईल; शाळेच्या वर्गात बसणाऱ्या आणि प्राथमिक प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला कोणतेही अतिरिक्त कष्ट न घेता बोर्ड परीक्षेच्या तत्सम विषयात उत्तीर्ण होता येईल आणि चांगली कामगिरी करता येईल. बोर्ड परीक्षेशी संबंधित 'उच्च-जोखीम' पैलू दूर करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना, त्यांची इच्छा असल्यास, कोणत्याही एका शालेय वर्षामध्ये दोनदा बोर्ड परीक्षेला बसता येईल, एक मुख्य परीक्षा आणि एक सुधारणा करण्यासाठी परीक्षा.

4.38 अधिक लवचिकता, विद्यार्थ्यांना निवड करण्याचा पर्याय, आणि दोन-प्रयत्नांमधील-सर्वोत्तम या बदलांव्यतिरिक्त, प्रामुख्याने मुख्य क्षमतेची पारख करणारे मूल्यमापन, या बोर्ड परीक्षेतील महत्त्वाच्या प्रमुख सुधारणा असतील. कालांतराने बोर्डातर्फे बोर्ड परीक्षांचे व्यवहार्य नमुने/मॉडेल्स विकसित केले जातील, जे बोर्ड परीक्षांचा तणाव कमी करतील आणि कोचिंग संस्कृती कमी करतील. यामध्ये पुढील शक्यतांचा समावेश असू शकतो: वार्षिक/सहामाही/मोड्युलर बोर्ड परीक्षांची प्रणाली विकसित करता येईल – अशी प्रणाली ज्यामध्ये परीक्षा बऱ्यापैकी कमी साहित्यावर आधारित असतील आणि शाळेमध्ये संबंधित अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर लगेच घेतल्या जातील – जेणेकरून माध्यमिक स्तरावर परीक्षांचा तणाव योग्यपणे विभागला जाईल, तीव्रता कमी असेल आणि मोठ्या जोखमीचे प्रमाण कमी असेल; गणितापासून सुरू करून सर्व विषय आणि त्यांचे मूल्यमापन दोन स्तरांवर उपलब्ध करून देता येईल, ज्यामध्ये विद्यार्थी काही विषय सामान्य स्तरावर शिकतील आणि काही विषय उच्च स्तरावर; आणि काही विषयांच्या बोर्ड परीक्षांची पुनर्रचना करून त्यांचे दोन भाग करता येतील – एक भाग असेल वस्तुनिष्ठ ज्यामध्ये बहुपर्यायी प्रश्न असतील आणि दुसऱ्या भागात वर्णनात्मक प्रश्न असतील.

4.39 वरील सर्व बाबींच्या संदर्भात, NCERT सर्व प्रमुख हितसंबंधी, उदा. SCERT, मूल्यमापनाचे संचालक मंडळ (BoAs), प्रस्तावित नवीन राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र इ. आणि शिक्षक, यांच्याशी सल्लामसलत करून मार्गदर्शक तत्त्वे

तयार करेल, जेणेकरून 2022-23 च्या शैक्षणिक सत्रापर्यंत मूल्यमापन प्रणालीमध्ये बदल होऊन ती NCFSE 2020-21 शी सुसंगत असेल.

4.40 फक्त इयत्ता 10 आणि 12 च्या शेवटीच नाही तर संपूर्ण शालेय शिक्षणादरम्यान प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी इयत्ता 3, 5 आणि 8 तील सर्व विद्यार्थ्यांना, योग्य प्राधिकरणातर्फे घेतली जाणारी, शाळेची परीक्षा द्यावी लागेल. यामुळे, शाळा आणि अध्यापन-अध्ययन प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याकरता विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक आणि संपूर्ण शालेय यंत्रणेला फायदा होईल. या परीक्षा, घोकंपट्टीवर भर न देता, मूलभूत अध्ययन निष्पत्ती झाली की नाही याची पारख करतील. प्रमुख संकल्पनांचे मूल्यमापन आणि राष्ट्रीय व स्थानिक अभ्यासक्रमाचे ज्ञान तसेच प्रसंगोचित उच्च-स्तरीय कौशल्ये आणि प्रत्यक्ष जीवनात ज्ञानाचा केलेला वापर, यावरून ही पारख केली जाईल. विशेषत: इयत्ता 3 च्या परीक्षा प्राथमिक साक्षरता, संख्याज्ञान आणि पायाभूत कौशल्यांची पारख करतील. शालेय परीक्षांच्या निकालाचा वापर फक्त शालेय शिक्षण व्यवस्थेच्या विकासासाठी केला जाईल, तसेच शाळेतर्फे विद्यार्थ्यांच्या एकूण निकालाचे (विद्यार्थ्यांचे नाव गुपित ठेवून) जाहीर प्रकटीकरण करण्याकरता आणि शालेय व्यवस्थेवर सतत देखरेख ठेवण्याकरता आणि त्यात सुधारणा करण्याकरतादेखील केला जाईल.

4.41. MHRD अंतर्गत एक मानक-निश्चिती संस्था म्हणून राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र, PARAKH (परफॉर्मन्स असेसमेंट, रिव्ह्यू अँड अॅनालिसिस ऑफ नॉलेज फॉर होलिस्टिक डेव्हलपमेंट म्हणजेच सर्वांगीण विकासासाठी कामगिरीचे मूल्यांकन, समीक्षा आणि ज्ञानाचे विश्लेषण) स्थापन करणे प्रस्तावित आहे. भारतातील सर्व मान्यताप्राप्त शाळा मंडळांसाठी, विद्यार्थ्यांचे मूल्यांकन व मूल्यमापन करण्यासाठीचे निकष, मानके आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे, राज्य निष्पत्ती सर्वेक्षण (स्टेट अचिव्हमेंट सर्व्हे -SAS) करण्यास मार्गदर्शन करणे आणि राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षण (नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे - NAS) करणे, देशातील अध्ययन निष्पत्तीच्या कामगिरीवर देखरेख करणे आणि या धोरणात नमूद उद्दिष्टांच्या अनुरूप 21व्या शतकात आवश्यक असलेल्या कौशल्यांची पूर्तता करण्याच्या हेतूने शाळा मंडळांना त्यांचे मूल्यांकन नमुने स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित व मदत करणे, ही मूलभूत उद्दिष्टे हे केंद्र पूर्ण करेल. हे केंद्र नवीन मूल्यांकन नमुन्यांविषयी आणि ताज्या संशोधनांबाबत शाळा मंडळांना सल्ला देईल, शाळा मंडळांमधील सहयोगांना प्रोत्साहन देईल. शाळा मंडळांमधील सर्वोत्कृष्ट पद्धती शेअर करण्यासाठी आणि सर्व शाळा मंडळांमधील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक मानकांची समानता सुनिश्चित करण्यासाठीदेखील हे केंद्र एक साधन बनेल.

4.42. विद्यापीठ प्रवेश परीक्षांची तत्त्वे एकसारखी असतील. राष्ट्रीय चाचणी संस्था/नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) उच्च-गुणवत्तेची सामान्य योग्यता चाचणी तसेच विज्ञान, मानव्यशास्त्रे, भाषा, कला आणि व्यावसायिक विषयांमधील विशेषीकृत सामान्य विषय परीक्षा घेण्याचे काम करेल. या परीक्षांमध्ये संकल्पनांची समज आणि ज्ञानाचा वापर करण्याची क्षमता तपासली जाईल आणि या परीक्षांसाठी कोचिंग घेण्याची गरज दूर करणे हे उद्दिष्ट असेल. विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी विषयांची निवड करू शकतील आणि प्रत्येक विद्यापीठ प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक विषयांचा पोर्टफोलिओ पाहू शकेल आणि वैयक्तिक आवडी व प्रतिभा यांच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश देऊ शकेल. उच्च शिक्षण संस्थांमध्ये पदवीपूर्व व पदवी अभ्यासक्रमांसाठी आणि फेलोशिपसाठी प्रवेश परीक्षा घेण्यासाठी NTA एक सर्वोच्च, तज्ज्ञ, स्वायत्त चाचणी संस्था म्हणून काम करेल. NTA चाचणी सेवांची उच्च गुणवत्ता, श्रेणी आणि लवचिकता बऱ्याच विद्यापीठांना या सामान्य प्रवेश परीक्षा वापरण्यास सक्षम करेल. शेकडो विद्यापीठांनी स्वतःच्या वेगवेगळया प्रवेश परीक्षा घेण्याऐवजी, या एका परीक्षेमुळे विद्यार्थी, विद्यापीठे आणि महाविद्यालयांवरचा तसेच संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरचा भार मोठ्या प्रमाणात कमी होईल. त्यांच्या प्रवेशासाठी NTA मूल्यांकन वापरण्याबाबतचा निर्णय विद्यापीठे आणि महाविद्यालयांवर सोडला जाईल.

## कुशाग्र बुद्धीच्या/विशेष प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांसाठी सहाय्य

4.43. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही अंगभूत प्रतिभा असतात, त्या शोधल्या पाहिजेत, त्यांचे संगोपन केले पाहिजे, त्यांना उत्तेजन दिले पाहिजे आणि त्या विकसित केल्या पाहिजेत. विविध रुची, कल किंवा क्षमतांच्या रुपात या प्रतिभांची अभिव्यक्ती होऊ शकते. जे विद्यार्थी एखाद्या क्षेत्रात विशेष रुची आणि क्षमता दर्शवतात, त्यांना सामान्य शालेय अभ्यासक्रमाच्या पलीकडेदेखील त्या क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. शिक्षकांच्या शिक्षणामध्ये अशा विद्यार्थ्यांच्या प्रतिभा आणि आवडी ओळखण्याच्या आणि त्यांना उत्तेजन देण्याच्या पद्धतींचा समावेश असेल. NCERT आणि NCTE कुशाग्र बुद्धीच्या मुलांच्या शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करेल. B.Ed. कार्यक्रमदेखील विशेष प्रतिभासंपन्न मुलांच्या शिक्षणात विशेषज्ञता प्राप्त करण्याची परवानगी देऊ शकतात.

4.44. वर्गातील एकाच विषयात विशेष रुची आणि / किंवा प्रतिभा असलेल्या विद्यार्थ्यांना पूरक संवर्धन साहित्य आणि मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन प्रोत्साहित करणे हे शिक्षकांचे लक्ष्य असेल. विषय-केंद्रित आणि प्रकल्प-आधारित क्लब आणि मंडळांना शाळा, शाळा संकुल, जिल्हा पातळीवर आणि त्याही पलिकडे प्रोत्साहन आणि साहाय्य केले जाईल. उदाहरणार्थ, विज्ञान मंडळे, गणित मंडळे, संगीत आणि नृत्य कलामंडळे, बुद्धीबळ मंडळे, कविता मंडळे, भाषा मंडळे, नाटक मंडळे, वादविवाद मंडळे, क्रीडा मंडळे, इको-क्लब, आरोग्य व स्वास्थ्य क्लब / योगा क्लब इत्यादी अनेक. या धर्तीवर, माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या उच्च-गुणवत्तेच्या राष्ट्रीय निवासी उन्हाळी कार्यक्रमांनाही प्रोत्साहन दिले जाईल, ज्यात सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांसह देशातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना आकर्षित करण्यासाठी कठोर गुणवत्ता-आधारित परंतु न्याय्य प्रवेश प्रक्रिया असेल.

4.45. देशभरात विविध विषयांमधील ऑलिम्पियाड आणि स्पर्धा घेण्यात येतील, ज्यामध्ये व्यवस्थित समन्वयाने शाळा ते स्थानिक ते राज्य ते देश पातळी अशी प्रगती होईल, जेणेकरून सर्व विद्यार्थी ते ज्या स्तरासाठी पात्र ठरतील त्यानुसार सहभाग घेऊ शकतील. मोठ्या प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करण्यासाठी या स्पर्धा ग्रामीण भागांत आणि प्रादेशिक भाषांमध्ये घेण्याचे प्रयत्न केले जातील. IIT आणि NIT सारख्या प्रमुख संस्थांसह, सार्वजनिक आणि खाजगी विद्यापीठांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमधील गुणवत्ता-आधारित निकाल आणि इतर संबंधित राष्ट्रीय कार्यक्रमांचे निकाल, त्यांच्या पदवीपूर्व कार्यक्रमांमध्ये प्रवेशाच्या निकषाचा भाग म्हणून वापरण्यास प्रोत्साहित केले जाईल.

4.46. एकदा का सर्व घरे आणि / किंवा शाळांमध्ये इंटरनेट-कनेक्शनयुक्त स्मार्टफोन किंवा टॅब्लेट उपलब्ध झाले की, पालक आणि शिक्षकांच्या योग्य देखरेखीखाली विद्यार्थ्यांसाठी गटांचे उपक्रम म्हणून प्रश्नमंजुषा, स्पर्धा, मूल्यांकन, समृद्धी साहित्य असलेली ऑनलाईन ॲप आणि समान आवडी असलेल्यांसाठी ऑनलाईन कम्युनिटीज विकसित केल्या जातील आणि उपरोक्त सर्व उपक्रम अधिक चांगले बनवण्यासाठी प्रयत्न केले जातील करतील. डिजिटल अध्यापनशास्त्र वापरण्यासाठी आणि त्याद्वारे ऑनलाईन संसाधने आणि सहयोगाद्वारे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक समृद्ध करण्यासाठी शाळा टप्प्याटप्प्याने स्मार्ट क्लासरूम्स विकसित करतील.

## 5. शिक्षक

5.1 शिक्षक खऱ्या अर्थाने आपल्या मुलांचे भवितव्य घडवतात आणि म्हणून आपल्या राष्ट्राचेही भवितव्य घडवतात.शिक्षकांच्या उदात्त योगदानामुळेच भारतीय समाजात शिक्षक हे सर्वाधिक आदरास पात्र होते. सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक शिकलेल्या व्यक्तीच केवळ शिक्षक बनत असत. शिक्षक किंवा गुरूंना त्यांचे ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिकवण्यासाठी जे काही आवश्यक असेल ते समाज त्यांना पुरवत असे. शिक्षकांच्या

प्रशिक्षणाची गुणवत्ता, भरती, नेमणूक, सेवेच्या अटी आणि शिक्षकांचे सक्षमीकरण या बाबी जशा असायला हव्यात तशा नाहीत आणि यामुळे शिक्षकांची गुणवत्ता व प्रेरणा अपेक्षित निकषांपर्यंत पोहोचत नाही. शिक्षकांबद्दलचा उच्च आदर आणि शिक्षकी पेशाचा उच्च दर्जा पूर्ववत व्हायला हवा जेणेकरून सर्वोत्कृष्ट व्यक्तींना शिक्षक बनण्याची प्रेरणा मिळेल. आपल्या मुलांचे आणि आपल्या देशाचे सर्वोत्तम भविष्य सुनिश्चित करण्यासाठी शिक्षकांना प्रेरित करणे आणि त्यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

## भरती आणि नेमणूक

5.2. उत्कृष्ट विद्यार्थी, विशेषतः ग्रामीण भागातील, शिक्षकी व्यवसायात प्रवेश घेतील हे सुनिश्चित करण्यासाठी, 4 वर्षांच्या दर्जेदार एकात्मिक B.Ed. कार्यक्रमांचा अभ्यास करण्यासाठी देशभरात मोठ्या प्रमाणात गुणवत्ता-आधारित शिष्यवृत्त्या सुरू केल्या जातील. ग्रामीण भागात खास गुणवत्ता-आधारित शिष्यवृत्त्यांची स्थापना केली जाईल, ज्यामध्ये B.Ed. कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक क्षेत्रात प्राधान्याने नोकरी देण्याचादेखील समावेश असेल. अशा शिष्यवृत्त्या स्थानिक विद्यार्थ्यांना स्थानिक नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देतील, विशेषतः महिला विद्यार्थ्यांना, जेणेकरून हे विद्यार्थी स्थानिक भागातील रोल मॉडेल म्हणून आणि स्थानिक भाषा बोलणारे उच्च पात्रताधारक शिक्षक म्हणून काम करतील. ग्रामीण भागांमध्ये, विशेषतः गुणवत्तापूर्ण शिक्षकांची तीव्र कमतरता असलेल्या भागांमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन (इन्सेंटिव्ह) दिले जाईल. ग्रामीण शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम करण्यासाठीचे प्रमुख प्रोत्साहन म्हणजे शाळेच्या जवळपास किंवा शाळेच्या आवारात स्थानिक निवासाची सोय करणे किंवा वाढीव घर भत्ता देणे.

5.3. शिक्षकांच्या वारंवार बदल्या करण्याची हानिकारक प्रथा थांबवली जाईल, जेणेकरून विद्यार्थ्यांचे रोल मॉडेल आणि शैक्षणिक वातावरण यात सातत्य राहील. शिक्षकांच्या बदल्या अगदी विशेष परिस्थितीत आणि राज्य / केंद्रशासित प्रदेशाच्या सरकारने योग्यपणे निर्धारित केलेल्या रचनात्मक पद्धतीनुसारच होतील. शिवाय, ऑनलाईन संगणकीय प्रणालीने बदल्या करण्यात येतील, ज्यामुळे पारदर्शकता सुनिश्चित होईल.

5.4. मजकूर आणि अध्यापनाच्या दृष्टीने अधिक चांगले चाचणी साहित्य बिंबवण्यासाठी शिक्षक पात्रता चाचण्या (टीचर्स एलिजीबिलिटी टेस्ट – TET) सशक्त केल्या जातील. शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील (मूलभूत, पूर्वाध्ययन, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक) शिक्षकांनाही TET मध्ये समाविष्ट करण्यात येईल. विषय शिक्षकांसाठी, संबंधित विषयांमधील योग्य TET किंवा NTA चाचणी गुणदेखील भरतीसाठी विचारात घेतले जातील. अध्यापनाची आवड आणि प्रेरणेचे मोजमाप करण्यासाठी, वर्गात एखादे प्रात्यक्षिक किंवा मुलाखत हा शाळा आणि शाळा संकुलामध्ये शिक्षकभरती करण्याचा एक अविभाज्य भाग बनेल. या मुलाखतींचा उपयोग स्थानिक भाषेतून अध्यापन करण्यातील सहजता आणि प्राविण्य यांचे मूल्यांकन करण्यासाठीदेखील केला जाईल, जेणेकरून प्रत्येक शाळा / शाळा संकुलात विद्यार्थ्यांशी स्थानिक भाषेतून आणि त्यांच्या घरच्या प्रचलित भाषेतून संवाद साधू शकणारे निदान काही शिक्षक असतील. खासगी शाळांमधील शिक्षकदेखील याच प्रकारे TET, प्रात्यक्षिक / मुलाखत आणि स्थानिक भाषेचे (भाषांचे) ज्ञान याद्वारे अर्हताप्राप्त असले पाहिजेत.

5.5. सर्व विषयांसाठी, विशेषतः कला, शारिरीक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि भाषा या विषयांसाठी पुरेसे शिक्षक असतील हे सुनिश्चित करण्यासाठी शाळा किंवा शाळा संकुलात शिक्षकांची भरती केली जाऊ शकेल आणि राज्य / केंद्रशासित प्रदेश सरकारांनी स्वीकारलेल्या शाळा-गटांच्या अनुसार शाळांदरम्यान शिक्षकांचे शेअरिंग करण्याचा विचार केला जाऊ शकतो.

5.6. विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी आणि स्थानिक ज्ञान व व्यवसायांचे संरक्षण आणि प्रसार यात मदतीसाठी, पारंपरिक स्थानिक कला, व्यावसायिक हस्तकला, उद्योजकता, शेती किंवा असा इतर कोणताही विषय ज्यात स्थानिक नैपुण्य उपलब्ध आहे अशा विविध विषयांचे 'मास्टर प्रशिक्षक' म्हणून स्थानिक प्रतिष्ठित व्यक्ती किंवा तज्ज्ञांची भरती करण्यास शाळा / शाळा संकुलांना प्रोत्साहन दिले जाईल.

5.7. पुढील दोन दशकांमध्ये अपेक्षित असलेल्या विषयवार शिक्षकांच्या रिक्त जागांचे अनुमान लावण्यासाठी, तंत्रज्ञान-आधारित व्यापक शिक्षक-आवश्यकता नियोजन व अंदाज प्रत्येक राज्याद्वारे आयोजित केले जाईल. भरती आणि नेमणुकीच्या बाबतीत उपरोक्त सर्व उपक्रम आवश्यकतेनुसार कालांतराने विस्तारीत करण्यात येतील, ज्याचा उद्देश खाली वर्णन केल्याप्रमाणे करियर व्यवस्थापन आणि प्रगतीसाठी योग्य प्रोत्साहने देऊन स्थानिक शिक्षकांसह पात्र शिक्षकांची सर्व रिक्त जागी भरती करणे हा असेल. शिक्षकांचे शिक्षण कार्यक्रम आणि ऑफरिंगदेखील अशा प्रकारे अंदाज वर्तवलेल्या रिक्त जागांशी सुसंगत असतील.

## सेवेतील वातावरण आणि कार्यसंस्कृती

5.8. सेवेच्या वातावरणाची आणि शाळांच्या संस्कृतीची पुनर्रचना करण्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शिक्षकांनी त्यांचे कार्य प्रभावीपणे करण्याची क्षमता वाढवणे आणि शिक्षक, विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक आणि इतर सहाय्यक कर्मचारी यांच्या अत्यंत उत्साही, काळजी घेणाऱ्या आणि सर्वसमावेशक समुदायांचा ते एक भाग बनतील याची खात्री करणे, आणि या सर्वांचे एकच समान लक्ष्य असते: आपली मुले शिकत आहेत हे सुनिश्चित करणे.

5.9. या दिशेने पहिली आवश्यकता म्हणजे शाळांमध्ये काम करण्यासाठी चांगली आणि सुखकर स्थिती निर्माण करणे. सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांना, सर्व लिंगांची मुले व अपंग मुले यांच्यासह, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि प्रभावी अध्ययन वातावरण मिळू शकेल आणि त्यांना त्यांच्या शाळेत शिकवण्यास व शिकण्यास आरामदायी आणि प्रेरित वाटेल हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व शाळांमध्ये पुरेशा व सुरक्षित पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील, ज्यामध्ये वापरात असलेली शौचालये, पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छ व आकर्षक जागा, वीज, संगणकीय उपकरणे, इंटरनेट, ग्रंथालये आणि खेळांची व करमणुकीची साधने यांचा समावेश असेल. सेवेदरम्यानच्या प्रशिक्षणामध्ये शाळांमध्ये कामाच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य आणि वातावरण याविषयी माहिती दिली जाईल, जेणेकरून सर्व शिक्षक या आवश्यकतांबद्दल संवेदनशील असतील, हे सुनिश्चित होईल.

5.10. राज्य / केंद्रशासित प्रदेश सरकार शाळेचे प्रभावी प्रशासन, संसाधनांचे सामायिकरण आणि समुदाय निर्मितीसाठी आणि शिक्षणाची उपलब्धता कोणत्याही प्रकारे कमी न करता, शाळा संकुल, शाळांचे सुसुत्रीकरण यांसारख्या अभिनव स्वरूपांचा अवलंब करू शकतात. शाळा संकुलांच्या निर्मितीमुळे उत्साही शिक्षक समुदाय तयार करण्यात यश येऊ शकते. शिक्षकांची शाळा संकुलात भरती केल्याने आपोआपच शाळा संकुलातील शाळांमध्ये संबंध निर्माण होऊ शकतील; शिक्षकांचे विषयनिहाय अत्युत्तम वाटप सुनिश्चित करण्यास मदत होईल, ज्यामुळे शिक्षकी ज्ञानाचे भांडार तयार होईल. खूप लहान शाळांमधील शिक्षक यापुढे वेगळे पडणार नाहीत आणि मोठ्या शाळा संकुल समुदायांचा भाग बनू शकतील आणि सोबत काम करू शकतील, एकमेकांशी उत्तमोत्तम अशा पद्धतींचे आदानप्रदान करू शकतील आणि सर्व मुले शिकत आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी सहकार्याने काम करू शकतील. शिक्षकांना अधिक साहाय्य करण्यासाठी आणि शिक्षणाचे प्रभावी वातावरण तयार करण्यात मदत करण्यासाठी शाळा संकुले समुपदेशक, प्रशिक्षित समाजसेवक, तांत्रिक आणि देखभाल कर्मचारी इत्यादी देखील शेअर करू शकतात.

5.11. पालक आणि इतर प्रमुख स्थानिक हितसंबंधींच्या सहयोगाने शिक्षकदेखील, शाळा व्यवस्थापन समित्यांचे / शाळा संकुल व्यवस्थापन समित्यांचे सदस्य म्हणून शाळांच्या / शाळा संकुलांच्या प्रशासनामध्ये अधिक सहभाग घेतील.

5.12. शिक्षकांना सध्या शिक्षणेतर उपक्रमांवर मोठ्या प्रमाणावर वेळ घालवावा लागतो, हे थांबवण्यासाठी शिक्षकांना यापुढे शिक्षणाशी संबंधित नसलेली कामे करायला सांगितले जाणार नाही; विशेषतः, शिक्षक खडतर प्रशासकीय कामांमध्ये आणि तर्कसंगत किमान वेळेपेक्षा अधिक वेळ माध्यान्ह भोजनाशी संबंधित कामात गुंतवले जाणार नाहीत, जेणेकरून ते त्यांच्या शिकण्या-शिकवण्याच्या कर्तव्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकतील.

5.13. शाळांमध्ये शिक्षणाचे सकारात्मक वातावरण असेल हे सुनिश्चित करण्यासाठी, प्रभावीपणे शिकण्यासाठी आणि सर्व हितसंबंधींच्या फायद्यासाठी, प्राचार्यांनी आणि शिक्षकांनी त्यांच्या शाळांमध्ये काळजी घेणारी आणि सर्वसमावेशक संस्कृती विकसित करणे, हे त्यांच्या भूमिकेत स्पष्टपणे समाविष्ट असेल.

5.14. शिक्षकांना अध्यापनशास्त्राचे पैलू निवडण्यात अधिक स्वायत्तता देण्यात येईल, जेणेकरून ते त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी त्यांना सर्वांत प्रभावी वाटेल अशा पद्धतीने शिकवतील. कोणत्याही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वपूर्ण पैलू असलेल्या सामाजिक-भावनिक शिक्षणावरदेखील शिक्षक लक्ष केंद्रित करतील. अध्ययन निष्पत्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी वर्गात नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान केला जाईल.

## अखंड व्यावसायिक विकास (CPD)

5.15 स्वत:मध्ये सुधारणा करण्यासाठी आणि आपल्या व्यवसायाशी निगडित नवीनतम उपक्रम आणि प्रगती याविषयी जाणून घेण्यासाठी, शिक्षकांना सतत संधी दिल्या जातील. या संधी विविध माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील, यामध्ये स्थानिक, प्रादेशिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यशाळा तसेच ऑनलाईन शिक्षक विकास मोड्युल्सचा समावेश असेल. शिक्षकांना आपल्या कल्पना आणि चांगल्या प्रथा/पध्दती याविषयी माहिती देता यावी याकरता एका व्यासपीठाची (विशेषत: ऑनलाईन व्यासपीठाची) निर्मिती केली जाईल. प्रत्येक शिक्षकाने आपल्या व्यावसायिक विकासासाठी दर वर्षी किमान 50 तासांसाठी CPD च्या संधींमध्ये स्वेच्छेने सहभागी होणे अपेक्षित आहे. CPD च्या संधींमध्ये विशेषत: पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, अध्ययनाच्या निष्पत्तीचे रचनात्मक आणि अनुकूली (अडॅप्टीव) मूल्यांकन, क्षमतेवर आधारित अध्ययन यांच्याशी निगडित नवीनतम अध्यापनशास्त्र तसेच, इतर संबंधित अध्यापनशास्त्र, उदा. अनुभवात्मक अध्ययन, कला-एकात्मीकरण, क्रीडा-एकात्मीकरण आणि कथाकथनावर आधारित दृष्टिकोन इ., यांचा पद्धतशीरपणे समावेश केला जाईल.

5.16 शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळेच्या संकुलाचे प्रमुख यांना आपले नेतृत्वगुण व व्यवस्थापन कौशल्य यामध्ये सतत सुधारणा करण्यासाठी समान मोड्युलर नेतृत्व/व्यवस्थापन कार्यशाळा, ऑनलाईन विकासाच्या संधी आणि व्यासपीठ उपलब्ध असेल, जेणेकरून त्यांनादेखील आपल्या चांगल्या प्रथा/पध्दतींविषयी एकमेकांना सांगता येईल. अशा प्रमुखांनी दर वर्षी CPD मोड्युल्समध्ये 50 किंवा त्याहून अधिक तास सहभागी होणे अपेक्षित आहे. यामध्ये, नेतृत्वगुण आणि व्यवस्थापनाबरोबरच आशय आणि अध्यापनशास्त्राशी संबंधित कार्यक्रमांचादेखील समावेश असेल तसेच क्षमतेवर आधारित शिक्षण या विचाराचा आधार घेऊन अध्यापनशास्त्रीय योजना तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यावर भर दिला जाईल.,.

## करिअर व्यवस्थापन आणि प्रगती (CMP)

5.17 उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले पाहिजे आणि त्यांना पदोन्नती दिली पाहिजे. तसेच, उत्तम कामगिरी करण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना पगार वाढ दिली पाहिजे. म्हणूनच, कार्यकाळ, पदोन्नती, आणि वेतनमान यांचा समावेश असलेली, शिक्षकांच्या प्रत्येक टप्प्यावर एकाहून अधिक स्तर असलेली आणि, उत्कृष्ट शिक्षकांना प्रोत्साहित आणि सन्मानित करणारी गुणवत्तेवर आधारित सशक्त व्यवस्था विकसित केली पाहिजे. याकरता कामगिरीचे योग्य मूल्यांकन करण्यासाठी अनेक मापदंडांची/पॅरामीटर्सची यंत्रणा राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या शासनांद्वारे विकसित केली जाईल, जी सहकाऱ्यांद्वारे केलेले परीक्षण, उपस्थिती, वचनबध्दता, CPDचे तास, आणि शाळा व समाजासाठी केलेली इतर प्रकारची सेवा यावर आधारित असेल, किंवा परिच्छेद 5.20 मध्ये दिलेल्या NPST वर आधारित असेल. या धोरणामध्ये, करिअरच्या संदर्भात 'कार्यकाळ' किंवा 'टेन्युर' म्हणजे कामगिरी आणि योगदानाच्या योग्य मूल्यांकनानंतर कायमस्वरूपी रोजगाराची निश्चिती, आणि 'टेन्युर ट्रॅक' म्हणजे कार्यकाळाच्या आधीचा परिवीक्षेचा काळ (प्रोबेशन पिरियड).

5.18 याव्यतिरिक्त, शिक्षकांना करिअर विकासाची संधी (कार्यकाळ, पदोन्नती, वेतनवाढ इ. च्या दृष्टीने) शाळेच्या एकाच स्तरावर असताना (म्हणजेच पायाभूत, पूर्वाध्ययन, पूर्वमाध्यमिक किंवा माध्यमिक) उपलब्ध असेल याची सुनिश्चिती केली जाईल. तसेच, शिक्षकांना प्रारंभिक स्तरावरून वरच्या स्तरावर जाण्यासाठी किंवा याच्या उलट करण्यासाठी करिअरशी संबंधित कोणतेही प्रोत्साहन नसेल, याचीदेखील सुनिश्चिती केली जाईल (पण शिक्षकाची इच्छा आणि पात्रता असल्यास अशा प्रकारे करिअरसाठी एका स्तरावरून दुसऱ्या स्तरावर जायची परवानगी आहे). असे करण्याचे कारण म्हणजे, शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर उच्च-गुणवत्ता असलेल्या शिक्षकांची गरज असते आणि, कोणताही स्तर इतर कुठल्याही स्तरापेक्षा महत्त्वाचा समजला जाणार नाही, या वस्तुस्थितीला पाठिंबा देणे हे आहे.

5.19 शिक्षकांची गुणवत्तेवर आधारित वरच्या स्तरावर बढती होणे (व्हर्टिकल मोबिलिटी) अतिशय महत्त्वाचे आहे; नेतृत्वगुण आणि व्यवस्थापन कौशल्य दाखवणाऱ्या उत्कृष्ट शिक्षकांना कालांतराने प्रशिक्षण दिले जाईल, म्हणजे त्यांना शाळा, शाळेचे संकुल, BRC, CRC, BITE, DIET तसेच, संबंधित सरकारी विभागांमध्ये शिक्षणक्षेत्रात नेतृत्व करता येईल.

## शिक्षकांसाठी व्यावसायिक मानके

5.20 NCERT, SCERT, विविध स्तर आणि प्रदेशातील शिक्षक, शिक्षक तयारी आणि विकासात गुंतलेल्या तज्ज्ञ संस्था, व्यावसायिक शिक्षणातील तज्ज्ञ संस्था, आणि उच्च-शैक्षणिक संस्था यांच्याशी सल्लामसलत करून, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेद्वारा (नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन), सामान्य शिक्षण परिषदेअंतर्गत (जनरल एज्युकेशन कौन्सिल-GEC) असलेल्या व्यावसायिक मानक स्थापना संस्था (प्रोफेशनल स्टँडर्ड सेटिंग बॉडी-PSSB) या आपल्या पुनर्रचित नवीन स्वरूपात, 2022 पर्यंत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा (नॅशनल प्रोफेशनल स्टँडर्ड फॉर टीचर्स - NPST) सर्वसामान्य मार्गदर्शक संच तयार करण्यात येईल. नैपुण्य/स्तर याच्या विविध टप्प्यांवर शिक्षकाची भूमिका आणि त्या स्तरावर आवश्यक असणाऱ्या क्षमता, याविषयी असलेल्या अपेक्षांचा समावेश मानकामध्ये केला जाईल. यामध्ये कामगिरीच्या मूल्यांकनासाठी, प्रत्येक स्तराकरता ठरवलेल्या मानकांचा समावेश असेल आणि हे मूल्यांकन वेळोवेळी केले जाईल. NPST द्वारे सेवापूर्व शिक्षक-शिक्षण कार्यक्रमांच्या रचनेविषयीदेखील माहिती दिली जाईल. यानंतर राज्यांकडून याचा अवलंब केला जाईल आणि त्याच्या आधारावर शिक्षक करिअर व्यवस्थापनाचे सर्व पैलू ठरवले जातील ज्यामध्ये कार्यकाळ, व्यावसायिक विकासाचे प्रयत्न, वेतनवाढ, पदोन्नती आणि इतर मान्यता यांचादेखील समावेश असेल. कार्यकाळ किंवा वरिष्ठता याच्या आधारावर पदोन्नती किंवा पगारवाढ

होणार नाही, तर ती फक्त अशा प्रकारच्या मूल्यांकनाच्या आधारावर केली जाईल. यंत्रणेच्या परिणामकारतेचे काटेकोरपणे अनुभवजन्य विश्लेषण करून, त्याच्या आधारावर 2030 मध्ये व्यावसायिक मानकांचे परीक्षण आणि सुधारणा केल्या जातील, आणि त्यानंतर दर दहा वर्षांनी असे केले जाईल.

## विशिष्ट कौशल्ये असलेले शिक्षक

5.21 शालेय शिक्षणातील काही क्षेत्रांमध्ये विशिष्ट कौशल्ये असलेल्या अतिरिक्त शिक्षकांची नितांत गरज आहे. अशा प्रकारच्या खास आवश्यकतांची उदाहरणे म्हणजे, पूर्वमाध्यमिक आणि माध्यमिक शाळेच्या स्तरावर दिव्यांग मुलांना विषय शिकवणे तसेच विशिष्ट अध्ययन विकलांगता असलेल्यांना शिकवणे. अशा शिक्षकांना फक्त विषय शिकवण्याचे ज्ञान आणि शिक्षणातील विषयाशी-संबंधित उद्दिष्टांची समज असून चालत नाही, तर त्यांच्याकडे मुलांच्या विशेष गरजा समजून घेण्यासाठी योग्य कौशल्ये असण्याचीदेखील गरज आहे. म्हणूनच, पूर्व-सेवा शिक्षक तयारी दरम्यान किंवा त्यानंतर, विषयाचे शिक्षक किंवा सामान्य शिक्षक यांच्यासाठी अशी क्षेत्रे द्वितीय विशेषता म्हणून विकसित करता येतील. अशा प्रकारचे अभ्यासक्रम सर्टिफिकेट कोर्स म्हणून उपलब्ध करून दिले जातील, जे पूर्वसेवा किंवा सेवेत असताना घेता येतील, पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ/मिश्र असतील आणि बहुशाखीय महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असतील. NCTE आणि RCI कोर्सच्या अभ्यासक्रमांमध्ये अधिक सहकार्य असण्यावर भर दिला जाईल जेणेकरून अध्यापन चांगल्या प्रकारे हाताळू शकणारे विशिष्ट कौशल्ये असलेले पात्र शिक्षक पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील.

## शिक्षक शिक्षणाचा दृष्टिकोन

5.22 उच्च-गुणवत्ता असलेले आशय तसेच अध्यापनशास्त्र यामध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचे लक्षात घेऊन, 2030 पर्यंत शिक्षकांचे शिक्षण हळूहळू बहुशाखीय महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये हलवण्यात येईल. सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे बहुशाखीय होण्याच्या दिशेने वाटचाल करणार असल्याने, शिक्षण क्षेत्रातील B.Ed., M.Ed., आणि Ph.D. पदवी देणारे चांगल्या दर्जाचे शिक्षण विभाग सुरू करण्याचा उद्देशदेखील त्यांच्यापुढे असेल.

5.23 2030 पर्यंत, अध्यापनासाठी लागणारी किमान पात्रता असेल 4 वर्षांची एकात्मीकृत B.Ed. ची पदवी, ज्यामध्ये ज्ञान सामग्री आणि अध्यापनशास्त्राविषयी विस्ताराने शिकवले जाईल आणि, स्थानिक शाळेत विद्यार्थी-अध्यापनाच्या रूपात ठोस असे व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल. 4 वर्षांची एकात्मीकृत B.Ed. ची पदवी उपलब्ध करून देणाऱ्या बहुशाखीय संस्थांतर्फेच 2 वर्षांचा B.Ed. चा कार्यक्रम उपलब्ध करून दिला जाईल, आणि तो फक्त अशा व्यक्तींसाठी असेल ज्यांनी आधीच विशेष विषयांमध्ये बॅचलरची पदवी मिळवली आहे. या B.Ed. कार्यक्रमांमध्ये योग्य ते बदल करून त्यांचे 1 वर्षाच्या B.Ed. कार्यक्रमांमध्ये रुपांतर करता येईल आणि ते फक्त अशा व्यक्तींसाठी उपलब्ध असेल ज्यांनी 4 वर्षांच्या बहुशाखीय बॅचलर पदवी समान असणारी पदवी मिळवली आहे किंवा, एखाद्या विशिष्ट क्षेत्रामध्ये मास्टरची पदवी मिळवली आहे आणि त्यांना त्या विशिष्ट क्षेत्रामध्ये विषय शिक्षक व्हायचे आहे. 4 वर्षांचे एकात्मिक B.Ed. कार्यक्रम उपलब्ध करून देणाऱ्या मान्यताप्राप्त बहुशाखीय उच्च शिक्षण संस्थांतर्फेच अशा प्रकारच्या B.Ed. च्या पदव्या उपलब्ध करून दिल्या जातील. 4 वर्षांचे वर्गात घेतले जाणारे एकात्मिक B.Ed. कार्यक्रम उपलब्ध करून देणाऱ्या आणि ODL साठी अधिस्वीकृती मिळवलेल्या बहुशाखीय उच्च शिक्षण संस्थांना, उच्च-दर्जाचे B.Ed. कार्यक्रम मिश्र किंवा ODL स्वरूपातदेखील उपलब्ध करून देता येतील. हे कार्यक्रम दूर किंवा दुर्गम ठिकाणी राहणारे विद्यार्थी तसेच, सेवेमध्ये असलेले, आपली पात्रता वाढवायची इच्छा असलेले शिक्षक यांच्यासाठी उपलब्ध असतील. या कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन (मेंटरिंग) व कार्यक्रमाचे व्यावहारिक प्रशिक्षण आणि विद्यार्थी-अध्यापन घटक यांच्यासाठी योग्य मजबूत व्यवस्था केली असेल.

5.24 B.Ed. च्या सर्व कार्यक्रमांमध्ये, अध्यापनशास्त्रातील काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेली तंत्रे तसेच नवीन तंत्रे यांच्या प्रशिक्षणाचा समावेश असेल, याबरोबरच पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, बहुस्तरीय अध्यापन आणि मूल्यांकन, दिव्यांग मुलांना शिकवणे, विशेष आवड आणि प्रतिभा असलेल्या मुलांना शिकवणे, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर, आणि विद्यार्थी-केंद्रित व सहयोगी-शिक्षण याच्याशी संबंधित अध्यापनशास्त्राचादेखील समावेश असेल. B.Ed. च्या सर्व कार्यक्रमांमध्ये प्रभावी व्यावहारिक प्रशिक्षणाचा समावेश असेल, जो स्थानिक शाळांमध्ये वर्गातील अध्यापनाच्या रूपात उपलब्ध करून दिला जाईल. कोणताही विषय शिकवताना किंवा कोणतीही कामगिरी करताना, भारतीय घटनेतील मूलभूत कर्तव्ये (कलम 51A) तसेच इतर घटनात्मक तरतुदींचे पालन करण्यावर B.Ed. च्या सर्व कार्यक्रमांमध्ये भर दिला जाईल. पर्यावरणाविषयी जागरूकता आणि त्याचे संरक्षण करण्याची संवेदनशीलता आणि शाश्वत विकास या सर्वांची सांगड या सर्व कार्यक्रमांमधून योग्यप्रकारे घातली जाईल त्यामुळे पर्यावरणाचे शिक्षण हे शाळेच्या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनेल.

5.25. स्थानिक कला, संगीत, शेती, व्यवसाय, खेळ, सुतारकाम आणि इतर व्यावसायिक हस्तकला यांसारख्या स्थानिक व्यवसाय, ज्ञान आणि कौशल्यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने ज्या प्रतिष्ठित स्थानिक व्यक्तींना शाळा किंवा शाळा संकुलांमध्ये ‘मास्टर प्रशिक्षक’ म्हणून शिकविण्यासाठी नियुक्त केले जाऊ शकते त्यांच्यासाठी कमी कालावधीचे विशेष स्थानिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम BITE, DIET किंवा त्याच शाळा संकुलांमध्येदेखील उपलब्ध असतील.

5.26. बहुशाखीय महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये, B.Ed. नंतरचे कमी कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम अशा शिक्षकांसाठी व्यापकपणे उपलब्ध करुन दिले जातील, ज्यांना शिक्षणाच्या अधिक विशिष्ट क्षेत्रांमध्ये जाण्याची इच्छा आहे, जसे की, अपंग विद्यार्थ्यांना शिकवणे, शालेय शिक्षण प्रणालीत नेतृत्व किंवा व्यवस्थापनाच्या पदावर जाणे किंवा मूलभूत, पूर्वाध्ययन, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक या स्तरांपैकी एका स्तरातून दुसऱ्या स्तरात जाणे.

5.27. हे मान्य आहे की, विशिष्ट विषय शिकवण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक अध्यापनशास्त्रीय पद्धती असू शकतात; NCERT विविध विषय शिकवण्याच्या विविध आंतरराष्ट्रीय अध्यापनशास्त्रीय पद्धतींचा अभ्यास करेल, संशोधन करेल, दस्तावेज बनवेल व त्यांचे संकलन करेल आणि या पद्धतींमधून काय शिकता येईल आणि भारतातील विद्यमान शिक्षण पद्धतींमध्ये समाविष्ट करता येईल यासंबंधी शिफारसी करेल.

5.28. सन 2021 पर्यंत, या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील तत्त्वांच्या आधारे, NCERTशी सल्लामसलत करून NCTE, शिक्षक शिक्षणासाठी एक नवीन आणि सर्वसमावेशक असा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा म्हणजे NCFTE 2021 तयार करेल. राज्य सरकारे, संबंधित मंत्रालये / केंद्र सरकारचे विभाग आणि विविध तज्ज्ञ संस्था यांच्यासह सर्व हितसंबंधींशी चर्चा केल्यानंतर हा आराखडा विकसित केला जाईल आणि सर्व प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करुन दिला जाईल. NCFTE 2021 मध्ये व्यावसायिक शिक्षणासाठी शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रमाच्या आवश्यकतादेखील विचारात घेतल्या जातील. त्यानंतर प्रत्येक 5-10 वर्षांनी एकदा सुधारित NCF मधील बदल तसेच शिक्षकांच्या शिक्षणाच्या उदयोन्मुख गरजा प्रतिबिंबित करून NCFTE मध्ये सुधारणा केली जाईल.

5.29. अखेरीस, शिक्षक-शिक्षण व्यवस्थेची एकात्मता पुनर्स्थापित करण्यासाठी, देशात कार्यरत असलेल्या सुमार दर्जाच्या स्वतंत्र शिक्षक-शिक्षण संस्थांवर (TEI) कडक कारवाई केली जाईल आणि गरज भासल्यास त्या बंदही केल्या जातील.

## 6. यथायोग्य आणि सर्वसमावेशक शिक्षण: सर्वांसाठी शिक्षण

6.1. सामाजिक न्याय आणि समानता साध्य करण्यासाठीचे एकमेव सर्वोत्तम साधन म्हणजे शिक्षण होय. सर्वसमावेशक आणि यथायोग्य शिक्षण, हे स्वतःच एक अत्यावश्यक उद्दिष्ट तर आहेच, शिवाय अशा एका सर्वसमावेशक आणि न्याय्य समाजाची स्थापना करण्यासाठीदेखील ते आवश्यक आहे, ज्यात प्रत्येक नागरिकाला स्वप्ने पाहण्याची, प्रगती करण्याची आणि राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावण्याची संधी मिळेल. भारतीय मुलांना लाभ होणे हे शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट असणे आवश्यक आहे, म्हणजे कोणत्याही मुलास जन्म किंवा परिस्थितीमुळे शिकण्याची आणि चमक दाखविण्याची संधी गमवावी लागणार नाही. हे धोरण या गोष्टीची पुन्हा एकदा पुष्टी करते की, शालेय शिक्षणामध्ये प्रवेश, सहभाग आणि अध्ययन निष्पत्तीमधील सामाजिक श्रेणीची दरी कमी करणे हे शिक्षण क्षेत्रातील सर्व विकास कार्यक्रमांचे एक प्रमुख लक्ष्य असेल. हे प्रकरण या सारख्याच असलेल्या प्रकरण-14 सोबत वाचायला हवे, ज्यामध्ये उच्च शिक्षणातील समानता आणि सर्वसमावेशकता या मुद्द्यांवर चर्चा केली आहे.

6.2. भारतीय शिक्षण व्यवस्था आणि लागोपाठच्या सरकारी धोरणांनी शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांमधील लिंग आधारित आणि सामाजिक श्रेणीतील अंतर दूर करण्याच्या दृष्टीने स्थिर प्रगती केली असली तरीही, शिक्षणाच्या बाबतीत ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांमध्ये अजूनही मोठी असमानता कायम आहे, विशेषतः माध्यमिक स्तरावर. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांचे (SEDG), लैंगिक ओळखीनुसार (विशेषतः महिला आणि ट्रान्सजेंडर व्यक्ती), सामाजिक-सांस्कृतिक ओळखीनुसार (उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि अल्पसंख्याक), भौगोलिक ओळखीनुसार (उदा. खेडी, छोटी शहरे आणि महत्वाकांक्षी जिल्ह्यांतील विद्यार्थी), अपंगत्वानुसार (अध्ययन अक्षमतेसह) आणि सामाजिक-आर्थिक परिस्थितींनुसार (उदा. स्थलांतरित समुदाय, कमी उत्पन्न असणारी घरे, असुरक्षित परिस्थितीतील मुले, तस्करीला बळी पडलेली किंवा पडलेल्यांची मुले, शहरी भागातील भिकारी मुलांसह अनाथ मुले, आणि शहरी गरीब), असे ढोबळमानाने वर्गीकरण केले जाऊ शकते. एकंदरच, शाळांमधील प्रवेशाचे प्रमाण इयत्ता 1 ते इयत्ता 12 पर्यंत सातत्याने घसरत असले तरी, शाळा प्रवेशात घट होण्याचे हे प्रमाण यापैकी अनेक SEDG मध्ये लक्षणीयरित्या अधिक ठळक आहे. तसेच, यातील प्रत्येक SEDG मध्ये विद्यार्थिनींच्या बाबतीत ही घट अजूनच जास्त आहे आणि उच्च शिक्षणामध्ये तर अत्यंत तीव्र आहे. सामाजिक-सांस्कृतिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या SEDG चा संक्षिप्त स्थिती आढावा पुढील उप-विभागांमध्ये देण्यात आला आहे.

6.2.1 U-DISE 2016-17 च्या डेटानुसार प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपैकी सुमारे 19.6% विद्यार्थी अनुसूचित जातीतील असतात, पण ही संख्या उच्च माध्यमिक स्तरावर 17.3% इतकी घसरते. शाळेतील ही गळती, अनुसूचित जमातींमध्ये (10.6% वरून 6.8%) आणि दिव्यांग मुलांमध्ये (1.1% वरून ते 0.25%) जास्त गंभीर आहे, तर यापैकी प्रत्येक गटात विद्यार्थिनींची गळती याहून जास्त आहे. उच्च शिक्षणातील नोंदणीमधील घट याहीपेक्षा जास्त आहे.

6.2.2 दर्जेदार शाळांची अनुपलब्धता, गरीबी, सामाजिक नियम आणि चालीरीती, आणि भाषा यांच्यासह अनेक घटक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांमधील नोंदणीचे आणि ते शाळेत टिकण्याचे प्रमाण यावर परिणाम करतात. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश, सहभाग आणि अध्ययनातील निष्पत्ती यातील दरी दूर करणे हे महत्त्वाच्या उद्दिष्टांपैकी एक असणे सुरू राहील. तसेच इतर मागास वर्ग (OBC), जे ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असल्याचे लक्षात आले आहे, त्यांच्याकडेसुद्धा खास लक्ष देणे आवश्यक आहे.

6.2.3 आदिवासी समुदाय आणि अनुसूचित जमातीतील मुलांचा अनेक ऐतिहासिक आणि भौगोलिक घटकांमुळे विविध पातळ्यांवर तोटा होतो. आदिवासी समुदायातील मुलांना सांस्कृतिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या अनेक

वेळा त्यांचे शालेय शिक्षण असमर्पक आणि त्यांच्या जीवनाला परके वाटते. सध्या आदिवासी समुदायातील मुलांच्या प्रगतीसाठी अनेक कार्यक्रमांमार्फत हस्तक्षेप करण्यात येतो, आणि ते करणे पुढेही सुरूच राहील, तरीही अशा हस्तक्षेपांचा लाभ आदिवासी समुदायातील मुलांना मिळेल, हे सुनिश्चित करण्यासाठी खास यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे.

6.2.4 शालेय आणि उच्च शिक्षणात अल्पसंख्यांक समुदायाचेसुद्धा तुलनेने अल्प प्रतिनिधित्व आहे. हे धोरण सर्व अल्पसंख्यांक समुदायांमधील आणि विशेषत: शैक्षणिकदृष्ट्या अल्प प्रतिनिधित्व असलेल्या समुदायांमधील मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठीच्या हस्तक्षेपाचे महत्त्व जाणते.

6.2.5 खास गरजा असलेल्या (CWSN) किंवा दिव्यांग मुलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना इतर कोणत्याही मुलांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळवण्यासाठी समान संधी पुरवणारी यंत्रणा तयार करण्याचे महत्त्वसुद्धा हे धोरण मान्य करते.

6.2.6 खालील उप-विभागांमध्ये नमूद केल्याप्रमाणे शालेय शिक्षणातील सामाजिक श्रेणीची दरी कमी करण्यासाठी लक्ष केंद्रित करण्याकरता स्वतंत्र रणनीती तयार करण्यात येईल.

6.3 प्रकरण 1-3 मध्ये चर्चा केलेल्या महत्त्वाच्या समस्या आणि ECCE, मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, प्रवेश, नोंदणी आणि उपस्थिती यांच्याशी संबंधित शिफारसी अल्प प्रतिनिधित्व असलेल्या आणि वंचित गटांसाठी विशेषत: सुसंगत आणि महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे, SEDG साठी प्रकरण 1-3 मधील उपाययोजना एकत्रितपणे राबवल्या जातील.

6.4 याशिवाय, लक्ष्यित शिष्यवृत्त्या, पालकांनी मुलांना शाळेत पाठवण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरता काही अटींसह रोख रक्कम हस्तांतरण, वाहतुकीसाठी सायकल पुरवणे इ. अनेक यशस्वी धोरणे आणि योजनांमुळे विशिष्ट भागातील शिक्षण प्रणालीत SEDG चा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. ही यशस्वी धोरणे आणि योजना संपूर्ण देशभरात लक्षणीयरीत्या मजबूत केल्या पाहिजेत.

6.5 विशिष्ट SEDG साठी कोणत्या उपाययोजना विशेषत: परिणामकारक आहेत, हे निश्चित करणारे संशोधनसुद्धा विचारात घेणे आवश्यक आहे. उदा. सायकली पुरवणे आणि मुलांनी शाळेत यावे म्हणून सायकल चालवणाऱ्यांचे आणि चालत येणाऱ्यांचे गट तयार करणे या गोष्टी विशेषत: विद्यार्थिनींचा – अगदी कमी अंतर असले तरीसुद्धा - सहभाग वाढवण्यासाठी परिणामकारक पद्धती असल्याचे दिसून आले आहे, कारण त्यातून मिळणारा सुरक्षेचा फायदा आणि पालकांना मिळणारा दिलासा. अपंगत्व असलेल्या विशिष्ट मुलांना शिक्षण उपलब्ध होण्यासाठी एकास-एक शिक्षक आणि प्रशिक्षक, सहाध्यायींनी शिकवणे, ओपन स्कूलिंग, योग्य पायाभूत सुविधा, आणि सुयोग्य तांत्रिक हस्तक्षेप या गोष्टी विशेष परिणामकारक ठरू शकतात. आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांमधील मुलांसाठी चांगल्या दर्जाचे ECCE पुरवणाऱ्या शाळा खूप उपयोगी पडू शकतात. दरम्यान, विद्यार्थी, पालक, शाळा आणि शिक्षक यांच्याबरोबर उपस्थिती आणि अध्ययनातील निष्पत्ती सुधारण्यासाठी काम करणारे समुपदेशक आणि/किंवा चांगल्या प्रकारे प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते विशेषत: शहरी गरीब भागात परिणामकारक असल्याचे दिसून आले आहे.

6.6 डेटा असे दर्शवतो की विशिष्ट भौगोलिक भागांमध्ये SEDG लक्षणीयरित्या मोठ्या प्रमाणावर आहेत. ही भौगोलिक ठिकाणे महत्वाकांक्षित जिल्हे म्हणून ओळखण्यात आले आहेत. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी खास हस्तक्षेपाची गरज आहे. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या वंचित SEDG ची मोठी लोकसंख्या असलेल्या देशातील भागांना खास शैक्षणिक विभाग (स्पेशल एज्युकेशन झोन्स – SEZ) जाहीर करण्याची शिफारस करण्यात

आलेली आहे. त्यानुसार या भागाचे शैक्षणिक चित्र बदलण्यासाठी तिथे सर्व योजना आणि धोरणे अतिरिक्त एकत्रित प्रयत्नांच्या माध्यमातून राबवल्या जातील.

6.7 अल्प प्रतिनिधित्व असलेल्या सर्व गटातील महिलांची संख्या SEDG च्या निम्म्याइतकी आहे, याची नोंद घेतली पाहिजे. दुर्दैवाने, SEDG ना ज्या वगळले जाण्याचा आणि असमानतेचा सामना करावा लागतो, त्याचे प्रमाण या SEDG मधल्या महिलांसाठी अधिकच वाढलेले असते. शिवाय महिला समाजात आणि समाजातील चालीरीती प्रस्थापित करण्यात बजावत असलेल्या खास आणि महत्त्वाच्या भूमिकेची जाण या धोरणाला आहे. त्यामुळे केवळ सध्याच नव्हे तर भविष्यातील पिढ्यांसाठी, मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हा या SEDG मधील शैक्षणिक गुणवत्ता पातळी वाढवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. हे धोरण SEDGs मधील विद्यार्थ्यांच्या समावेशासाठी आखलेल्या धोरणांमध्ये आणि योजनांमध्ये विशेषत: या SEDGs मधील मुलींना लक्ष्य करण्याची शिफारस करत आहे.

6.8 याशिवाय, सर्व मुलींना आणि ट्रान्स-जेंडर विद्यार्थ्यांना न्याय्य गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवण्याची देशाची क्षमता तयार करण्यासाठी भारत सरकार 'लिंग-समावेश निधी' तयार करेल. मुलींना आणि ट्रान्स-जेंडर विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्यासाठी मदत करण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाच्या म्हणून निश्चित केलेल्या प्राधान्यांची अंमलबजावणी करण्यासाठी (उदा. स्वच्छता आणि शौचालयांची सुविधा, सायकली, रोख रक्कम हस्तांतरण इ.); राज्यांना हा निधी उपलब्ध असेल. मुलींना आणि ट्रान्स-जेंडर विद्यार्थ्यांना शिक्षणाला प्रवेश मिळण्यासाठी आणि शिक्षणात सहभागी होण्यासाठी स्थानिक संदर्भातील विशिष्ट अडथळे दूर करण्यासाठी समुदाय-आधारित हस्तक्षेपांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचे प्रमाण वाढवण्यासाठीसुद्धा हा निधी राज्यांना सक्षम करेल. याच प्रकारच्या 'समावेश निधी' योजना इतर SEDGs मधील प्रवेशाच्या समस्यांवर उपाययोजना म्हणून विकसित करण्यात येतील. थोडक्यात, कोणत्याही लिंगाच्या किंवा इतर सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटातील मुलांना शिक्षण (व्यावसायिक शिक्षणासह) उपलब्ध होण्यामध्ये शिल्लक असलेली असमानता दूर करण्याचे या धोरणाचे ध्येय आहे.

6.9 ज्या शाळांच्या ठिकाणी मुलांना फार दुरून यावे लागते त्यांच्यासाठी, आणि विशेषत: सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीमधून आलेल्या मुलांसाठी जवाहर नवोदय विद्यालयांच्या दर्जाच्या - सर्व विद्यार्थ्यांच्या विशेषत: मुलींच्या सुरक्षिततेची योग्य व्यवस्था असलेल्या मोफत वसतिगृह सुविधा बांधल्या जातील. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये मजबूत केली जातील आणि चांगल्या दर्जाच्या शाळांमधील (इयत्ता 12 वी पर्यंत) सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीमधून आलेल्या मुलींचा सहभाग वाढवण्यासाठी या विद्यालयांचा विस्तार केला जाईल. उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी वाढवण्यासाठी देशभर – विशेषत: महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये, खास शैक्षणिक विभागांमध्ये, आणि इतर वंचित भागांमध्ये अतिरिक्त जवाहर नवोदय विद्यालये आणि केंद्रिय विद्यालये बांधली जातील. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाचे किमान एक वर्ष पूर्ण करणारा शाळा-पूर्व विभाग देशभरातील विशेषत: वंचित भागातील केंद्रिय विद्यालयांना आणि इतर प्राथमिक शाळांना जोडला जाईल.

6.10 ECCE आणि शालेय प्रणालीत दिव्यांग मुलांचा समावेश आणि समान सहभाग सुनिश्चित करण्यालासुद्धा सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. दिव्यांग विद्यार्थ्यांना पायाभूत स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत सामान्य शालेय प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होता येईल, यासाठी त्यांना सक्षम केले जाईल. अपंग व्यक्ती अधिकार (RPWD) कायदा 2016 मध्ये समावेशक शिक्षणाची व्याख्या 'शिक्षणाची अशी प्रणाली की जिथे अपंगत्व असलेले आणि नसलेले एकत्रितपणे शिकतात आणि अध्यापन आणि अध्ययनाची पद्धत वेगवेगळया प्रकारच्या अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गरजांचा विचार करून योग्यरीत्या बदललेली असते.' अशी करण्यात आलेली आहे. हे धोरण RPWD कायदा 2016 शी पूर्णपणे सुसंगत आहे आणि शाळेसंबंधी या कायद्याच्या सर्व शिफारसींना पूर्णपणे पाठिंबा देते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा

तयार करताना NCERT DEPwD च्या राष्ट्रीय संस्थांसारख्या तज्ज्ञ संस्थांशी सल्लामसलत केली जाईल, हे सुनिश्चित करेल.

6.11 हे साध्य करण्यासाठी, शाळा/शालेय संकुलांमध्ये अपंग विद्यार्थ्यांचे एकात्मीकरण करण्यासाठी संसाधने पुरवली जातील, आवश्यकता असेल तिथे, विशेषत: गंभीर किंवा अनेक अपंगत्वे असलेल्या मुलांसाठी विविध-अपंगत्वांशी संबंधित प्रशिक्षण घेतलेल्या खास शिक्षकांची भरती केली जाईल. RPWD कायद्यानुसार अपंगत्व असलेल्या सर्व मुलांना कोणत्याही अडथळयाविना शाळेत प्रवेश करता येईल, अशी व्यवस्था केली जाईल. अपंगत्व असलेल्या वेगवेगळया श्रेणीतील सर्व मुलांच्या गरजा वेगवेगळया असतात. अपंगत्व असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना रहिवासी सुविधा आणि त्यांच्या गरजा पुरवण्यासाठी आणि वर्गात त्यांचा संपूर्ण सहभाग आणि समावेश सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक यंत्रणा तयार करण्यासाठी शाळा आणि शालेय संकुले काम करतील आणि त्यासाठी त्यांना मदत केली जाईल. अपंगत्व असलेली मुले वर्गांमध्ये जास्त सहजतेने सामावली जाण्यासाठी आणि शिक्षक तसेच सहाध्यायांच्या बरोबर ती सहभागी होण्यासाठी त्यांना विशेषत: साहाय्यक डिव्हायसेस आणि तंत्रज्ञानावर आधारित योग्य टूल्स तसेच पुरेशी आणि भाषिकदृष्ट्या योग्य अध्यापन-अध्ययन सामग्री (उदा. मोठ्या अक्षरातील आणि ब्रेलमधील पाठ्यपुस्तके) उपलब्ध करून दिली जातील. हे शाळेतील कला, क्रीडा आणि व्यावसायिक शिक्षणासह सर्व उपक्रमांना लागू होईल. भारतीय साईन लँग्वेज शिकवण्यासाठी तसेच भारतीय साईन लँग्वेज वापरून इतर मूलभूत विषय शिकवण्यासाठी NIOS चांगल्या दर्जाची मोड्युल्स विकसित करेल. अपंगत्व असलेल्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे लक्ष दिले जाईल.

6.12 RPWD कायदा 2016 नुसार, मापदंड असलेले अपंगत्व असलेल्या मुलांना नियमित किंवा खास शाळेचा पर्याय उपलब्ध असेल. खास शिक्षणतज्ज्ञांच्या मदतीने संसाधन केंद्रे गंभीर किंवा अनेक प्रकारचे अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी आणि शैक्षणिक गरजांसाठी मदत करतील आणि आवश्यकता असेल त्यानुसार अशा विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाचे होम स्कूलिंग साध्य करण्यासाठी आईवडीलांना/पालकांना साह्य करतील. शाळेत जाऊ न शकणाऱ्या गंभीर आणि अनेक अपंगत्वे असलेल्या मुलांसाठी घरबसल्या शिक्षणाचा पर्याय उपलब्ध असणे सुरूच राहील. घरीच शिक्षण घेणाऱ्या मुलांना सामान्य शाळेत शिक्षण घेणाऱ्या इतर कोणत्याही मुलाप्रमाणेच वागवले गेले पाहिजे. समता आणि संधीची समानता हे तत्त्व वापरून घरातील शिक्षणाची कार्यक्षमता आणि परिणामकारकता यांचे ऑडीट केले जाईल. या ऑडीटनुसार आणि RPWD कायदा 2016वर आधारित घरातील शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि मानके विकसित केली जातील. अपंगत्व असलेल्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे, हे स्पष्ट असले तरीही पालकांच्या/काळजी घेणाऱ्यांच्या अभिमुखतेसाठी तंत्रज्ञानावर आधारित उपाय वापरले जातील आणि पालकांना/काळजी घेणाऱ्यांना त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक गरजांना सक्रियपणे पाठिंबा देण्यासाठी सक्षम करण्याकरता शिकण्याच्या साहित्याचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याला प्राधान्य दिले जाईल.

6.13 बहुतेक सर्व वर्गांमध्ये विशिष्ट शैक्षणिक अक्षमता असलेली मुले असतात आणि त्यांना सातत्याने मदतीची गरज असते. संशोधनाने हे स्पष्ट केलेले आहे की जितक्या लवकर अशी मदत केली जाईल तितकी प्रगतीची शक्यता जास्त असते. शिक्षणातील अशा अक्षमता लवकर शोधण्यासाठी आणि त्यांच्या निराकरणासाठी विशेष योजना आखण्यासाठी शिक्षकांना मदत केली पाहिजे. विशिष्ट कृतींमध्ये मुलांना आपल्या गतीने काम करण्याची परवानगी देण्यासाठी आणि त्यासाठी सक्षम करण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर, प्रत्येक मुलाच्या चांगल्या गोष्टींचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी लवचिक अभ्यासक्रम आणि योग्य मूल्यांकन तसेच प्रमाणीकरणासाठी योग्य प्रणाली तयार करणे यांचा समावेश आहे. प्रस्तावित नवीन राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र , 'परख'सह इतर मूल्यांकन आणि प्रमाणन संस्था शैक्षणिक अक्षमता असलेल्या सर्व मुलांना न्याय्य प्रवेश आणि संधी मिळेल, हे सुनिश्चित करण्यासाठी पायाभूत

स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत (प्रवेश परीक्षांसह) असे मूल्यांकन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून देतील आणि योग्य साधनांची (टूल्सची) शिफारस करतील.

6.14 विशिष्ट अक्षमता (शैक्षणिक अक्षमतेसह) असलेल्या मुलांना कसे शिकवायचे याबद्दलची जागृती आणि ज्ञान सर्व शिक्षक-शिक्षण कार्यक्रमांचा अविभाज्य भाग असेल. त्या बरोबरच लैंगिक संवेदनशीलता आणि अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटांबद्दलची संवेदनशीलता वाढवली जाईल., त्यामुळे त्यांचे अल्प प्रतिनिधित्व असण्याची स्थिती सुधारता येईल.

6.15 पर्यायी शाळांना त्यांच्या परंपरागत किंवा पर्यायी अध्यापनशास्त्र पद्धती जतन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. त्याचवेळी, NCFSE ने निश्चित केलेले विषय आणि शिक्षणाचे भाग त्यांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करून घेण्यासाठी त्यांना मदत केली जाईल. त्यामुळे या शाळांमधील मुलांचे उच्च शिक्षणातील प्रतिनिधित्व अल्प असण्याची स्थिती हळूहळू कमी होईल आणि शेवटी नष्ट होईल. विशेषत: या शाळांची इच्छा असेल त्यानुसार, विज्ञान, गणित, समाज शास्त्रे, हिंदी, इंग्रजी, राज्यातील भाषा किंवा इतर सुसंगत विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी आर्थिक मदत पुरवली जाईल. त्यामुळे या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना इयत्ता 1-12 साठी निश्चित केलेली अध्ययन निष्पत्ती गाठता येईल. या व्यतिरिक्त, अशा शाळांमधील मुलांना, राज्य किंवा इतर बोर्डांच्या परीक्षांना आणि NTA च्या मूल्यांकनासाठी बसण्यासाठी आणि त्याद्वारे उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. विज्ञान, गणित, भाषा आणि समाजशास्त्रे शिकवणाऱ्या शिक्षकांच्या क्षमता शिक्षणाच्या नव्या पद्धतींची ओळख करून देण्यासह विकसित केल्या जातील. वाचनालये आणि प्रयोगशाळा मजबूत केल्या जातील आणि पुस्तके, जर्नल्स इ. सारखी वाचनासाठीची पुरेशी सामग्री आणि अध्यापन-अध्ययनाची इतर सामग्री उपलब्ध करून दिली जातील.

6.16 SEDG मध्ये, आणि धोरणातील वरील सर्व मुद्द्यांच्या अनुषंगाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक विकासातील तफावत कमी करण्यासाठी खास लक्ष दिले जाईल. शालेय शिक्षणातील सहभाग वाढवण्याचा भाग म्हणून समर्पित भागांमध्ये खास वसतिगृहे, सांधणारे (ब्रिज) अभ्यासक्रम आणि सर्व SEDG मधील प्रतिभावान आणि गुणवान विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर, विशेषत: माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर शुल्कमाफी आणि शिष्यवृत्ती रूपात आर्थिक मदत केली जाईल, म्हणजे या विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणातील प्रवेश सुनिश्चित होईल.

6.17 राज्य सरकारने संरक्षण मंत्रालयाच्या देखरेखीखाली माध्यमिक आणि उच्च-माध्यमिक शाळांमध्ये NCCची शाखा सुरू करायला प्रोत्साहन दयावे. यामध्ये आदिवासी भागातील माध्यमिक आणि उच्च-माध्यमिक शाळांचादेखील समावेश असावा. यामुळे विद्यार्थ्यांची नैसर्गिक प्रतिभा आणि विशेष सुप्त गुणांचा उपयोग करता होईल, ज्यामुळे त्यांना संरक्षण दलात यशस्वी करिअर करायची प्रेरणा मिळेल.

6.18 SEDGच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सर्व शिष्यवृत्त्या आणि इतर संधी यांच्याविषयी एकाच एजन्सी आणि वेबसाईटद्वारे नियमन आणि घोषणा केली जाईल, जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना याविषयी माहिती मिळेल आणि, पात्रतेनुसार, अशा 'एक खिडकी व्यवस्थेमार्फत त्यांना सहजसोप्या पध्दतीने अर्ज करता येईल.

6.19 सर्व SEDGसाठी संपूर्ण समावेश आणि समानता साध्य करण्यासाठी वरील सर्व धोरणे आणि उपाय अतिशय महत्त्वाचे आहेत – पण पुरेसे नाहीत. यासाठी शाळा संस्कृतीत बदल होणेदेखील आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या गरजा, समावेश आणि समानता या संकल्पना, आणि सर्व व्यक्तींचा आदर, मान आणि खाजगीपणा याविषयी शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशासक, समुपदेशक, आणि विद्यार्थी यांसहित शालेय शिक्षण यंत्रणेतील सर्व सहभागींच्या मनात संवेदनशीलता जागृत करण्यात येईल. अशा प्रकारच्या शिक्षण संस्कृतीमुळे विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यक्ती व्हायचा

मार्ग उपलब्ध होईल, आणि त्या बदल्यात आपल्या सर्वात दुर्बल नागरिकांशी जबाबदारीने वागणाऱ्या समाजाची उभारणी करायला ते सक्षम बनतील. समावेश आणि समानता हे शिक्षकांच्या शिक्षणातील (आणि शाळेतील सर्व प्रकारचे नेतृत्व, प्रशासन आणि इतर जागांकरता प्रशिक्षण) महत्त्वाचे पैलू ठरतील. उत्कृष्ट आदर्श व्यक्तींची उदाहरणे सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर असावीत याकरता SEDGमधून अधिक उच्च-दर्जाचे शिक्षक आणि प्रमुख भरती करण्याचे प्रयत्न केले जातील.

6.20 शिक्षक, प्रशिक्षित समाजसेवक आणि समुपदेशक, तसेच सर्वसमावेशक शालेय अभ्यासक्रमासाठी केलेले संबंधित बदल या सर्वांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या या नवीन शिक्षण संस्कृतीद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण केली जाईल. शाळेच्या अभ्यासक्रमामध्ये सुरुवातीपासूनच मानवीय मूल्यांवरील साहित्याचा समावेश करण्यात येईल उदा. सर्व व्यक्तींचा आदर करणे, सहानुभूती, सहनशीलता, मानवी अधिकार, लैंगिक समानता, अहिंसा, जागतिक नागरिकत्व, सर्वसमावेशकता आणि समन्याय. विविधतेप्रती संवेदनशीलता आणि आदर निर्माण करण्यासाठी, विविध संस्कृती, धर्म, भाषा, लिंगावर आधारित ओळख इत्यादींबद्दलच्या तपशीलवार ज्ञानाचा समावेशदेखील करण्यात येईल. शालेय अभ्यासक्रमातील कोणतेही पूर्वग्रह आणि साचेबंद धारणा काढून टाकण्यात येतील, आणि सर्व समुदायांना सुसंबध्द आणि आपलेसे वाटेल असे साहित्य अधिक प्रमाणात समाविष्ट करण्यात येईल.

## 7. शाळा संकुल/क्लस्टरच्या माध्यामातून कार्यक्षम संसाधन आणि प्रभावी व्यवस्थापन

7.1 आता समग्र शिक्षा योजनेमध्ये विलीन झालेल्या सर्व शिक्षण अभियानामुळे (SSA) आणि राज्यभरातून झालेल्या महत्त्वपूर्ण प्रयत्नांमुळे, देशभरातील प्रत्येक वस्तीमध्ये प्राथमिक शाळांची स्थापना होऊन, जवळ-जवळ सर्वांना प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध झाली असली तरी, यामुळे अनेक अतिशय छोट्या शाळांची निर्मिती झाली आहे. U-DISE 2016-2017 च्या डेटानुसार, भारतातील जवळजवळ 28% सार्वजनिक प्राथमिक शाळांमध्ये आणि 14.8% उच्च-प्राथमिक शाळांमध्ये, 30 हून कमी विद्यार्थी आहेत. प्राथमिक शालेय व्यवस्थेमध्ये (प्राथमिक आणि उच्च-प्राथमिक, म्हणजेच इयत्ता 1-8) प्रत्येक इयत्तेमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांची साधारण सरासरी 14 आहे, बऱ्याच शाळांमध्ये ही सरासरी 6 च्या खाली आहे; वर्ष 2016-17 मध्ये एकच शिक्षक असलेल्या 1,08,017 शाळा होत्या आणि यामध्ये 1 ते 5 इयत्तेला शिकवणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण सर्वाधिक (85743) होते.

7.2 या शाळांच्या छोट्या आकारामुळे त्या आर्थिकदृष्ट्या कमी दर्जाच्या ठरत आहेत, तसेच शिक्षकांची नियुक्ती आणि महत्त्वपूर्ण भौतिक साधनांच्या तरतुदींच्यादृष्टीने एक चांगली शाळा चालवणे गुंतागुंतीचे झाले आहे. अनेकदा शिक्षकांना एकाचवेळी एकाहून अधिक इयत्ता आणि विषय शिकवावे लागतात आणि, यामध्ये असे विषयदेखील समाविष्ट असतात ज्याची कोणतीही पार्श्वभूमी त्यांच्याकडे नाही; संगीत, कला आणि क्रीडा यासारखी मुख्य क्षेत्रे बऱ्याचदा शिकवलीच जात नाहीत; आणि प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य आणि ग्रंथालय यासारखी भौतिक साधने तर उपलब्धच नसतात.

7.3 छोट्या शाळांच्या विलगीकरणामुळे शिक्षण आणि अध्यापन-अध्ययन प्रक्रियेवरदेखील नकारात्मक परिणाम होतो. शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही समुदायांमध्ये आणि विविध गटांबरोबर उत्कृष्ट काम करू शकतात. छोट्या शाळा या शासन आणि व्यवस्थापनासाठी व्यवस्थात्मक आव्हानदेखील आहेत. भौगोलिकदृष्ट्या विखुरलेल्या, त्यांच्यापर्यंत पोहोचायची आव्हानात्मक परिस्थिती आणि या शाळांची अतिशय मोठी संख्या यामुळे सर्व शाळांपर्यंत समानरितीने पोचणे अवघड झाले आहे. प्रशासकीय रचना आणि शाळांची वाढती संख्या किंवा समग्र शिक्षा योजनेचे एकत्रित स्वरूप, यांची सांगड घालण्यात आलेली नाही.

7.4 शाळांचे एकत्रीकरण या पर्यायाविषयी नेहमी चर्चा केली जात असली तरी, हे काम अतिशय विचारपूर्वक केले पाहिजे आणि, शाळेची सुविधा उपलब्ध असण्यावर कोणताही परिणाम होणार नाही, याची सुनिश्चिती झाल्यावरच केले पाहिजे. तथापि, अशा प्रकारच्या उपायांमुळे फक्त मर्यादित एकत्रीकरण साध्य होण्याची शक्यता आहे, आणि मोठ्या संख्येने असलेल्या छोट्या शाळांमुळे निर्माण झालेल्या एकूण रचनात्मक समस्या आणि आव्हानांचे, निराकरण होणार नाही.

7.5 शाळांचे गट तयार करण्यासाठी किंवा त्यांना तर्कसंगत स्वरूप देण्यासाठी, राज्य/केंद्रशासित प्रदेशांकडून नाविन्यपूर्ण यंत्रणेचा अवलंब करून साल 2025 पर्यंत या आव्हानांचे निराकरण केले जाईल. प्रत्येक शाळेला पुढील गोष्टी उपलब्ध असतील याची सुनिश्चिती करणे हा या हस्तक्षेपामागचा उद्देश असेल: (a) पुरेशा प्रमाणात समुपदेशक, प्रशिक्षित समाजसेवक तसेच कला, संगीत शास्त्र, क्रीडा, भाषा, व्यावसायिक विषय इत्यादींसह सर्व विषय शिकवण्यासाठी शिक्षक (सामायिक किंवा अन्यथा) (b) पुरेशा प्रमाणात साधने (सामायिक किंवा अन्यथा) उदा. ग्रंथालय, शास्त्र प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, कौशल्यांसाठी प्रयोगशाळा, खेळाचे मैदान, क्रीडा साहित्य आणि सुविधा इ. (c) शिक्षक, विद्यार्थी आणि शाळा यांच्यात असलेल्या विभक्तपणाच्या समस्येवर मात करण्यासाठी, एकत्रित व्यावसायिक विकास कार्यक्रम, अध्यापन-अध्ययन आशयाची देवाणघेवाण, एकत्रितपणे आशय निर्मिती, कला आणि शास्त्र प्रदर्शने, क्रीडा स्पर्धा, प्रश्नमंजुषा, वादविवाद आणि मेळावे यासारखे एकत्रित उपक्रम भरवून, समुदायाचा भाग असल्याची भावना निर्माण करणे (d) दिव्यांग मुलांच्या शिक्षणासाठी सर्व शाळांकडून सहयोग आणि सहाय्य (e) सर्व बारीक-सारीक निर्णय प्रत्येक शाळेच्या गटामधील मुख्याध्यापक, शिक्षक आणि इतर हितसंबंधींकडे सुपूर्द करून आणि, पायाभूत स्तर ते माध्यमिक स्तर यामधील अशा सर्व गटांना एकात्मिक अर्ध-स्वायत्त संस्था/युनिटचा दर्जा देऊन, शालेय प्रणालीच्या शासनामध्ये सुधारणा करणे.

7.6 वरील गोष्ट साध्य करण्यासाठी एक संभाव्य यंत्रणा म्हणजे शाळा संकुल नावाच्या गट तयार करणाऱ्या रचनेची स्थापना करणे, ज्यामध्ये एक माध्यमिक शाळा असेल, आणि त्याबरोबर पाच ते दहा किलोमीटर परिघातील अंगणवाडयांसहित आजूबाजूच्या परिसरातील खालच्या इयत्तांना शिकवणाऱ्या इतर सर्व शाळा असतील. ही सूचना पहिल्यांदा शिक्षण आयोगातर्फे (1964-66) करण्यात आली पण तिची अंमलबजावणी झाली नाही. हे धोरण, जिथे शक्य असेल तिथे शाळा संकुल/क्लस्टर या कल्पनेचे जोरदार समर्थन करते. शाळा संकुल/क्लस्टरचा उद्देश असेल साधनांची अधिक कार्यक्षमता आणि, क्लस्टरमध्ये शाळांचे अधिक प्रभावी कामकाज, समन्वय, नेतृत्व, शासन, आणि व्यवस्थापन साध्य करणे.

7.7 शाळा संकुल/क्लस्टर्सची स्थापना आणि संकुलांमधून साधनांची देवाणघेवाण यामुळे इतर अनेक फायदे मिळणार आहेत, उदा. दिव्यांग मुलांना मिळणाऱ्या साहाय्यामध्ये सुधारणा, शाळा संकुलांमधून अधिक विषय-केंद्रित मंडळे/क्लब्ज आणि शैक्षणिक/क्रीडा/कला/हस्तकलेचे उपक्रम, सामायिक शिक्षकांच्या माध्यमातून वर्गामध्ये कला, संगीत, भाषा, व्यावसायिक विषय, शारीरिक शिक्षण आणि इतर विषयांचा अधिक चांगला समावेश तसेच व्हर्च्युअल वर्ग घेण्यासाठी ICT साधनांचा वापर, समाजसेवक आणि समुपदेशकांच्या देवाणघेवाणीमार्फत विद्यार्थ्यांना अधिक चांगले सहाय्य, अधिक चांगली नावनोंदणी, उपस्थिती, आणि कामगिरी आणि, अधिक मजबूत आणि सुधारित शासनाकरता (फक्त शाळा व्यवस्थापन समित्यांच्याऐवजी) शाळा संकुल व्यवस्थापन समित्या, स्थानिक हितसंबंधींकडून देखरेख, पर्यवेक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि पुढाकार. शाळा, शाळांचे प्रमुख, शिक्षक, मदत करणारे कर्मचारी, पालक आणि स्थानिक नागिरकांचा अशा प्रकारचा मोठा समुदाय तयार केल्याने शालेय व्यवस्थेला ऊर्जा मिळेल आणि सामर्थ्य प्राप्त होईल, आणि तेही साधने कार्यक्षमतेने वापरून.

7.8 शाळा संकुल/क्लस्टर्समुळे शाळांच्या शासनातदेखील सुधारणा होईल आणि त्या अधिक कार्यक्षम बनतील. पहिल्यांदा, DSE शाळा संकुल/क्लस्टर्सकडे अधिकार सुपूर्त करेल आणि हे संकुल/क्लस्टर्स अर्ध-स्वायत्ता संस्था/युनिट म्हणून काम करतील. जिल्हा शिक्षण अधिकारी (DEO) आणि ब्लॉक शिक्षण अधिकारी (BEO) प्रत्येक शाळा संकुल/क्लस्टरला एक युनिट मानून त्याच्याबरोबर संवाद साधतील आणि त्याचे काम सुलभ करायला मदत करतील. संकुल स्वत: DSE ने नेमून दिलेली काही कामे करतील तसेच संकुलामधील प्रत्येक शाळेला हाताळायचे काम करतील. शाळा संकुल/क्लस्टर्सना DSEतर्फे लक्षणीय स्वायत्तता दिली जाईल जेणेकरून संकुल/क्लस्टर्सना, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (नॅशनल करिक्युलर फ्रेमवर्क - NCF) आणि राज्य अभ्यासक्रम आराखड्याचे (स्टेट करिक्युलर फ्रेमवर्क - SCF) पालन करत, एकात्मीकृत शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने नाविन्यपूर्ण असे काहीतरी करता येईल आणि अध्यापनशास्त्र, अभ्यासक्रम इ. विषयी प्रयोग करता येतील. या संस्थेतर्गत शाळांना बळकटी मिळेल, त्यांना अधिक स्वातंत्र्य उपभोगता येईल आणि संकुल अधिक नाविन्यपूर्ण आणि प्रतिसादात्मक करण्यात त्यांचे योगदान असेल. दरम्यान, DSEला उच्च पातळीवरील उद्दिष्टे साध्य करण्यावर लक्ष केंद्रित करता येईल ज्यामुळे एकंदरीतच व्यवस्थेची परिणामकारकता सुधारेल.

7.9 अशा संकुल/क्लस्टर्सच्या माध्यमातून, योजनेनुसार काम करायची संस्कृती विकसित केली जाईल; यामध्ये अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या योजनांचा समावेश असेल. SMC च्या सहभागाने शाळा आपल्या योजना (SDP) विकसित करतील. नंतर या योजना शाळा संकुल/क्लस्टर्स विकास योजना (स्कूल कॉम्प्लेक्स/क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅन - SCDP) तयार करण्याचा आधार बनतील. शाळा संकुलशी संबंधित इतर संस्था, उदा. व्यावसायिक शैक्षणिक संस्थांच्या योजनादेखील SCDP मध्ये समाविष्ट असतील, आणि SCMCच्या सहभागाने शाळा संकुलाचे मुख्याध्यापक आणि शिक्षक या योजना तयार करतील आणि, त्या सार्वजनिकरित्या उपलब्ध करून दिल्या जातील. या योजनांमध्ये मानवी संसाधन, अध्ययन साधने, भौतिक साधने आणि पायाभूत सुविधा, सुधारणा करण्यासाठी नवीन उपक्रम, आर्थिक साधने, शाळा संस्कृतीसंबंधित नवीन उपक्रम, शिक्षक विकास योजना आणि शैक्षणिक परिणामांसंबंधित उद्दिष्टे यांचा समावेश असेल. चैतन्यशील अध्ययन समुदाय विकसित करण्याकरता, शाळा संकुलामधील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा योग्य उपयोग करून घेण्याच्यादृष्टीने कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांविषयी तपशीलवारपणे योजनांमध्ये सांगितले जाईल. SDP आणि SCDP या योजना, DSE सहित शाळेच्या सर्व हितसंबंधींमध्ये समन्वय साधणाऱ्या मुख्य यंत्रणेचे काम करतील. SMC आणि SCMC, शाळेचे कामकाज आणि दिशा यावर देखरेख ठेवण्यासाठी SDP आणि SCDP योजनांचा वापर करतील आणि या योजनांची अंमलबजावणी करायला मदत करतील. BEOसारख्या संबंधित अधिकाऱ्यांमार्फत DSE प्रत्येक शाळा संकुलाच्या SCDP ला पाठिंबा आणि स्वीकृती देईल. यानंतर DSE द्वारे, अल्पकालीन (1 वर्ष) आणि दीर्घकालीन (3-5 वर्षे) अशा दोन्हीही SCDP साध्य करण्यासाठी लागणारी साधने (आर्थिक, मानवी, भौतिक इ.) उपलब्ध करून दिली जातील. अध्ययन निष्पत्तीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शाळा संकुलांना लागणारे सर्व प्रकारचे संबंधित सहाय्य DSE द्वारे पुरवले जाईल. SDP आणि SCDP तयार करण्यासाठी, DSE आणि SCERT द्वारे सर्व शाळांना काही विशिष्ट नियम (उदा. आर्थिक, कर्मचारी भरती, प्रक्रिया) आणि आराखडे सांगितले जातील, ज्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केली जाईल.

7.10 सार्वजनिक आणि खाजगी शाळांसहित इतर सर्व शाळांमधील सहयोग आणि सकारात्मक ताळमेळ वाढवण्यासाठी, देशभरातील एक सार्वजनिक शाळा आणि एक खाजगी शाळा यांची जोडी तयार केली जाईल, जेणेकरून अशा जोड शाळा एकमेकांना भेटू किंवा एकमेकांशी संवाद साधू शकतील, एकमेकांकडून शिकू शकतील, आणि शक्य असेल तर साधनांची देवाणघेवाण करू शकतील. जिथे शक्य असेल तिथे, दोन्ही प्रकारच्या शाळांच्या

सर्वोत्कृष्ट प्रथा/पध्दती लिहून काढल्या जातील, त्यांच्याविषयी माहिती दिली जाईल, आणि इतर शाळांमध्ये त्यांचा अवलंब केला जाईल.

7.11 डे-टाईम बोर्डिंग शाळेच्या स्वरुपात, विद्यमान "बाल भवनांना" बळकटी देण्यासाठी किंवा नवीन "बाल भवन" स्थापित करण्यासाठी राज्यांना प्रोत्साहन दिले जाईल, जिथे सर्व वयोगटातील मुले आठवड्यातून एकदा (उदा. आठवडाअखेर) किंवा अनेकदा येऊन कला, करिअर आणि खेळांशी संबंधित उपक्रमांमध्ये भाग घेतील. शक्य असल्यास, अशा प्रकारची बाल भवने शाळा संकुलाचा एक भाग म्हणून सुरू करता येतील.

7.12 शाळा ही सर्व समुदायासाठी एक उत्साहभारीत आणि सन्मानाची जागा असावी. एक संस्था म्हणून शाळेची प्रतिष्ठा पुनर्स्थापित करावी आणि, शाळा स्थापना दिवस यासारखे महत्त्वाचे दिवस समुदायासह साजरे करावेत आणि, महत्त्वाच्या माजी विद्यार्थ्यांची यादी प्रदर्शित करून त्यांचा सत्कार करावा. तसेच, शाळेच्या वापरात नसलेल्या पायाभूत सुविधा, समुदायासाठी सामाजिक, बौद्धिक आणि ऐच्छिक उपक्रम घेण्याकरता आणि शाळेची वेळ / अध्यापनाची वेळ नसताना सामाजिक सामंजस्याला प्रोत्साहन देण्याकरता वापरता येतील, जेणेकरून शाळेला 'सामाजिक चेतना केंद्राचे' स्वरूप प्राप्त होईल.

## 8. शालेय शिक्षणासाठी मानक ठरवणे आणि अधिस्वीकृती

8.1 शैक्षणिक निष्पत्तीमध्ये सातत्याने सुधारणा करणे हे शालेय शिक्षण नियामक व्यवस्थेचे उद्दिष्ट असायला हवे; या व्यवस्थेमुळे शाळांवर अतिरिक्त बंधने लादली जाऊ नयेत, नाविन्यपूर्ण शोध लावण्यावर प्रतिबंध घातला जाऊ नये, किंवा शिक्षक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या मनोबलाचे खच्चीकरण केले जाऊ नये. सर्व गोष्टींचा विचार करता, शाळा आणि शिक्षकांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करता यावा आणि आपले सर्वोत्कृष्ट काम करता यावे, यासाठी त्यांना विश्वासपूर्ण पध्दतीने सशक्त बनवणे, याबरोबरच पूर्ण पारदर्शकतेची अंमलबजावणी करणे आणि सर्व आर्थिक व्यवहार, प्रक्रिया आणि शैक्षणिक निष्पत्तीचे सार्वजनिक प्रकटीकरण करून व्यवस्थेची एकात्मता अबाधित राखणे, हे नियमनासमोरील उद्दिष्ट असावे.

8.2 सध्या, शालेय शिक्षण प्रणालीतील शासनाचे आणि नियमनाचे सर्व मुख्य कामकाज – उदा. सार्वजनिक शिक्षणाची तरतूद, शैक्षणिक संस्थांचे नियमन, आणि धोरण आखणी - एकाच संस्थेतर्फे, म्हणजेच शालेय शिक्षण विभाग किंवा त्याच्या शाखांतर्फे हाताळले जाते. यामुळे हितसंबंधातील संघर्ष निर्माण होतो आणि अधिकारांचे अतिरेकी केंद्रीकरण होते; यामुळे शालेय प्रणालीचे व्यवस्थापनदेखील परिणामकारक रीतीने होत नाही. कारण, दर्जेदार शैक्षणिक तरतुदीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा जोर अनेकदा कमी होऊन इतर गोष्टींवर केंद्रित होतो, विशेषत: नियमन, जे शालेय शिक्षण विभागांतर्फेसुद्धा हाताळले जाते.

8.3 नफ्यासाठी चालवल्या जाणाऱ्या अनेक खाजगी शाळांकडून केले जाणारे व्यापारीकरण आणि पालकांचे आर्थिक शोषण कमी करायला विद्यमान नियामक शासनाला यश आले असले, तरी दुसरीकडे नकळतपणे त्यांनी सार्वजनिक हितासाठी असलेल्या खाजगी/देणगी आधारित शाळांसाठी फारसा उत्साह दाखवलेला नाही. सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही प्रकारच्या शाळांची उद्दिष्टे एकच असायला हवीत: दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे; तरीसुद्धा या दोन्ही प्रकारच्या शाळांसाठी असणाऱ्या नियमनाच्या दृष्टिकोनात खूपच असमानता आहे.

8.4. सार्वजनिक शिक्षण व्यवस्था हा एका सक्रिय लोकशाही समाजाचा पाया आहे आणि राष्ट्रासाठी सर्वोत्तम शैक्षणिक निष्पत्ती मिळविण्यासाठी तिच्या कार्यपद्धतीचे परिवर्तन आणि सशक्तीकरण करणे आवश्यक आहे. त्याच वेळी,

खाजगी/देणगी आधारित शाळा क्षेत्रालादेखील, महत्त्वपूर्ण आणि लाभदायक भूमिका निभावण्यासाठी प्रोत्साहित आणि सक्षम करणे आवश्यक आहे.

8.5. राज्य शालेय शिक्षण व्यवस्थेसंदर्भात या धोरणाची मुख्य तत्त्वे आणि शिफारसी, या व्यवस्थेतील स्वतंत्र जबाबदाऱ्या आणि त्याच्या नियमनाबाबतचा दृष्टिकोन खालीलप्रमाणे आहेत:

(a) शालेय शिक्षण विभाग, ही शालेय शिक्षणातील सर्वोच्च राज्यस्तरीय संस्था, सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या सतत सुधारणेसाठी, सर्वांगीण देखरेखीसाठी आणि धोरण निर्मितीसाठी जबाबदार असेल; सार्वजनिक शाळांच्या सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि हितसंबंधांचा संघर्ष दूर करण्यासाठी, हा विभाग शाळांच्या पुरवठा आणि कारभारामध्ये किंवा शाळांच्या नियमनात सहभागी होणार नाही.

(b) शालेय शिक्षण संचालनालय (DEO आणि BEO कार्यालये इत्यादींसह) संपूर्ण राज्यातील सार्वजनिक शालेय प्रणालीसाठी शैक्षणिक कामकाज आणि सेवा पुरवठा हाताळेल; शैक्षणिक कामकाज व पुरवठ्यासंबंधित धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी ते स्वतंत्रपणे काम करेल.

(c) आवश्यक गुणवत्तेच्या मानकांचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी, पूर्वप्राथमिक शाळांसह शिक्षणाच्या सर्व स्तरांसाठी व खाजगी, सरकारी आणि देणगी आधारित शाळांसाठी एक प्रभावी गुणवत्ता स्वयं-नियमन किंवा अधिस्वीकृती प्रणाली स्थापन केली जाईल. सर्व शाळा काही किमान व्यावसायिक आणि गुणवत्तेच्या मानकांचे पालन करतील हे सुनिश्चित करण्यासाठी, राज्ये / केंद्रशासित प्रदेश राज्य शाळा मानक प्राधिकरण (SSSA) ही एक स्वतंत्र, राज्य-व्यापी संस्था स्थापन करतील. SSSA मूलभूत निकषांच्या आधारे किमान मानकांचा संच (म्हणजेच, सुरक्षा, सुरक्षितता, मूलभूत पायाभूत सुविधा, विषयांसाठी आणि इयत्तांमधील शिक्षकांची संख्या, आर्थिक विश्वसनीयता आणि प्रशासनाच्या उत्तम प्रक्रिया) स्थापित करेल, ज्याचे पालन सर्व शाळा करतील. या निकषांसाठीचा आराखडा SCERT सर्व हितसंबंधींशी, विशेषतः शिक्षकांशी आणि शाळांशी सल्लामसलत करून बनवेल.

SSSA ने ठरवलेल्या सर्व मूलभूत नियामक माहितीच्या पारदर्शक,जाहीर सार्वजनिक स्वयं-प्रकटीकरणाचा सार्वजनिक देखरेखीसाठी आणि उत्तरदायित्वासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जाईल. माहितीचे स्वयं-प्रकटीकरण किती प्रमाणात आणि कोणत्या स्वरूपात केले जाईल, हे शाळांसाठी मानक-निश्चिती करण्याच्या जागतिक सर्वोत्तम पद्धतींच्या आधारे SSSA ठरवेल. SSSA द्वारा चालवल्या जाणाऱ्या उपरोक्त सार्वजनिक वेबसाईटवर आणि शाळांच्या वेबसाईटवर, ही माहिती सर्व शाळांना उपलब्ध करून द्यावी लागेल आणि ती अद्ययावत व अचूक स्वरूपात ठेवावी लागेल. सार्वजनिकपणे खुल्या केलेल्या या माहितीच्या आधारे, हितसंबंधींनी किंवा इतरांनी केलेल्या कोणत्याही तक्रारी किंवा गाऱ्हाणी यांबाबत SSSA द्वारे निर्णय घेतला जाईल. अत्यंत उपयुक्त सूचना मिळवण्यासाठी नियमित कालांतराने, स्वैरपणे निवडलेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अभिप्राय मागवला जाईल. SSSA च्या संपूर्ण कामकाजामध्ये कार्यक्षमता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला जाईल. यामुळे सध्या शाळांद्वारे सहन केल्या जात असलेल्या नियामक आदेशांचा भार लक्षणीयरीत्या कमी होईल.

(d) राज्यातील शैक्षणिक मानके आणि अभ्यासक्रमांसह शैक्षणिक बाबींचे संचालन SCERT (NCERT च्या सल्ल्याने आणि सहकार्याने) करेल. SCERT ला एक संस्था म्हणून पुनरुज्जीवित केले जाईल. SCERT सर्व हितसंबंधींशी विस्तृत सल्लामसलत करून शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि अधिस्वीकृती फ्रेमवर्क (SQAAF) विकसित करेल. CRC, BRC आणि DIET यांच्या पुनरुज्जीवनासाठी “परिवर्तन व्यवस्थापन

प्रक्रिया" देखील SCERT राबवेल, ज्याद्वारे या संस्थांची क्षमता आणि कार्यसंस्कृती 3 वर्षात बदलून, त्या उत्कृष्ट कार्यक्षम संस्था म्हणून विकसित होतील. दरम्यान, शाळा सोडण्याच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांना सक्षमता प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया प्रत्येक राज्यातील मूल्यांकन / परीक्षा मंडळांद्वारे हाताळली जाईल.

8.6. शाळा, संस्था, शिक्षक, अधिकारी, समुदाय आणि इतर हितसंबंधींना सक्षम करणाऱ्या आणि पुरेशी संसाधने पुरवणाऱ्या संस्कृती, व्यवस्था आणि यंत्रणादेखील आनुषांगिक उत्तरदायित्व विकसित करतील. शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक हितसंबंधी आणि सहभागी घटक त्याची भूमिका सर्वोच्च सचोटीने, संपूर्ण बांधिलकीने आणि आदर्श कार्यपद्धतीने पार पाडण्यासाठी जबाबदार असेल. व्यवस्थेतील प्रत्येक भूमिकेच्या अपेक्षा स्पष्टपणे मांडलेल्या असतील आणि या अपेक्षांनुसार त्यांच्या कामगिरीचे कठोर मूल्यांकन केले जाईल. मूल्यांकन प्रणाली उत्तरदायित्व सुनिश्चित करणारी तसेच वस्तुनिष्ठ आणि विकासाभिमुख असेल. संपूर्ण कामगिरी विचारात घेतली जाणे सुनिश्चित करण्यासाठी, अभिप्राय आणि मूल्यांकनाचे अनेक स्रोत तिच्यात असतील (आणि ती फक्त सुलभरीतीने जोडली जाणार नाही, उदा. विद्यार्थ्यांच्या 'गुणां'शी). मूल्यांकनात हे मान्य केले जाईल की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसारख्या निष्कर्षांवर अनेक मध्यस्थ घटक आणि बाह्य प्रभाव परिणाम करतात. शिक्षणासाठी विशेषतः शाळेच्या पातळीवर सांघिक कामगिरीची आवश्यकता असते, हे देखील मान्य केले जाईल. सर्व व्यक्तींची पदोन्नती, मान्यता आणि जबाबदारी या कामगिरी मूल्यांकनावर आधारित असेल. विकास, कामगिरी आणि जबाबदारीची ही व्यवस्था त्यांच्या नियंत्रणातील कार्यकक्षेत सर्वोच्च सचोटीने आणि पद्धतशीरपणे चालवली जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व कार्यकारी व्यक्ती जबाबदार असतील.

8.7. सरकारी आणि खाजगी शाळांचे (केंद्र सरकारद्वारा प्रशासित / सहाय्यित / नियंत्रित शाळा वगळता) याच निकष, कसोट्या आणि प्रक्रियांच्या आधारे मूल्यमापन केले जाईल आणि त्यांना मान्यता देण्यात येईल, ज्यात ऑनलाईन आणि ऑफलाईन सार्वजनिक प्रकटीकरण आणि पारदर्शकतेवर भर दिला जाईल, जेणेकरून समाजसेवी खासगी शाळांना प्रोत्साहन दिले जाईल आणि कोणत्याही प्रकारे त्यांची कोंडी केली जाणार नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठीच्या खाजगी धर्मादाय प्रयत्नांना प्रोत्साहन दिले जाईल ज्याद्वारे शिक्षणाच्या लोकहितकारी स्वरूपाची पुष्टी होईल आणि पालकांचे व समुदायांचे शैक्षणिक शुल्कात मनमानीपणे वाढ होण्यापासून संरक्षण होईल. शाळेच्या आणि SSSAच्या वेबसाईटवर सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही शाळांनी जाहीर केलेल्या प्रकटीकरणामध्ये, (किमान) पुढील गोष्टींचा समावेश असेल, वर्गखोल्यांची संख्या, विद्यार्थ्यांची व शिक्षकांची संख्या, शिकवले जाणारे विषय, कोणतीही फी असल्यास आणि NAS आणि SAS सारख्या प्रमाणित मूल्यांकनांवर आधारित एकंदर विद्यार्थी निकाल. केंद्र सरकारद्वारा प्रशासित / साहाय्यित / नियंत्रित शाळांसाठी, MHRDशी सल्लामसलत करून CBSE एक आराखडा तयार करेल. सर्व शैक्षणिक संस्थांसाठी 'नफ्यासाठी नसलेली' संस्था म्हणून ऑडीट आणि प्रकटीकरणाची समान मानके लागू असतील. काही नफा झाल्यास, तो पुन्हा शैक्षणिक क्षेत्रात गुंतवला जाईल.

8.8. गेल्या दशकात शिकलेल्या अनुभवांच्या आधारे सुधारणा करण्याच्या दृष्टीने, शाळा नियमन, अधिस्वीकृती व प्रशासनासाठी मानक-निश्चिती / नियामक आराखड्याचे आणि सुविधा प्रणालींचे पुनरावलोकन केले जाईल. या पुनरावलोकनाचे उद्दिष्ट हे सुनिश्चित करणे असेल की, सर्व विद्यार्थ्यांना, विशेषतः उपेक्षित आणि वंचित घटकांमधील विद्यार्थ्यांना, बाल्यावस्था पूर्व संगोपन व शिक्षणापासून (वय 3 पासून पुढे) ते उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत (म्हणजे इयत्ता 12 वी पर्यंत) उच्च गुणवत्तेचे आणि न्याय्य शालेय शिक्षण सार्वत्रिकपणे, विनामूल्य आणि सक्तीने उपलब्ध असेल. इनपुट्सवर अतिरेकी भर आणि भौतिक व पायाभूत सुविधांबाबतच्या निर्देशांच्या यंत्रवत स्वरूपामध्ये बदल केले जातील आणि या आवश्यकता वस्तुस्थितीला अधिक प्रतिसादक्षम बनवल्या जातील उदा. जमिनीचे क्षेत्रफळ आणि वर्गखोल्यांच्या आकार, शहरी भागातील क्रीडांगणाच्या व्यवहार्यता इत्यादी. हे आदेश समायोजित आणि

शिथिल केले जातील, जेणेकरून सुरक्षा, सुरक्षितता असलेली एक सुखकर आणि उत्पादनक्षम शिक्षणाची जागा सुनिश्चित करताना प्रत्येक शाळेला स्थानिक गरजा आणि मर्यादांवर आधारित स्वतःचे निर्णय घेण्यासाठी योग्य लवचिकता दिली जाईल. शैक्षणिक परिणाम आणि सर्व आर्थिक, शैक्षणिक आणि कामकाजाबाबत पारदर्शक प्रकटीकरण यांना उचित महत्त्व दिले जाईल आणि शाळांच्या मूल्यांकनात योग्यरित्या समाविष्ट केले जाईल. यामुळे सर्व मुलांसाठी विनामूल्य, न्याय्य आणि गुणवत्तापूर्ण प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सुनिश्चित करण्याचे शाश्वत विकास लक्ष्य 4 (SDG4) साध्य करण्याच्या दिशेने भारत आणखी प्रगती करेल.

8.9. उच्च गुणवत्तेचे शिक्षण देणे, हे सार्वजनिक शाळा शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट असेल, जेणेकरून स्वतःच्या मुलांना शिकवणे हा सर्व स्तरातील पालकांसाठी सर्वात आकर्षित करणारा पर्याय बनेल.

8.10. नियमित कालावधीने संपूर्ण व्यवस्थेची 'स्वास्थ्य तपासणी' करण्यासाठी, प्रस्तावित नवीन राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र, PARAKH मार्फत, विद्यार्थ्यांच्या अध्ययन पातळीचे एक नमुना-आधारित राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षण (NAS) केले जाईल. यासाठी NCERT सारख्या अन्य शासकीय संस्थांचे योग्य सहकार्य घेतले जाईल. या मूल्यांकन प्रक्रियेस तसेच डेटा विश्लेषण करण्यात सहाय्य करू शकतील. या मूल्यांकनात सरकारी तसेच खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांचा समावेश असेल. राज्यांना त्यांचे स्वतःचे, जनगणना-आधारित राज्य निष्पत्ती सर्वेक्षण (SAS) करण्यास प्रोत्साहित केले जाईल, ज्याचे निष्कर्ष केवळ विकासात्मक हेतूंसाठी, शाळांद्वारे त्यांच्या विद्यार्थ्यांचे सर्वंकष आणि निनावी निकाल जाहीर करण्यासाठी आणि शालेय शिक्षण व्यवस्थेच्या निरंतर सुधारणेसाठी वापरले जातील. प्रस्तावित नवीन राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र, PARAKH स्थापित होईपर्यंत, NAS करण्याचे कार्य NCERT चालू ठेवेल.

8.11 आणि शेवटी, या सर्व प्रक्रियेमध्ये शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांना आणि किशोरांना विसरून चालणार नाही, कारण अखेर शाळेची व्यवस्था त्यांच्यासाठीच तर निर्माण करण्यात आली आहे. त्यांची सुरक्षा आणि अधिकार – विशेषत: मुलींची – तसेच, किशोरवयीन मुलांच्या समोरील विविध कठीण समस्या, उदा. अमली पदार्थांचे सेवन, हिंसाचारासहित इतर स्वरूपातील भेदभाव आणि अत्याचार, यावर विशेष लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अशा घटनांची माहिती देण्यासाठी तसेच मुले/किशोर यांच्या अधिकारांचे किंवा सुरक्षेचे उल्लंघन झाल्यास योग्य प्रक्रियेसाठी, एक सुस्पष्ट, सुरक्षित आणि कार्यक्षम यंत्रणा उपलब्ध असायला हवी. अशा प्रकारची प्रभावी, समयोचित, आणि सर्व मुलांना परिचित अशी यंत्रणा निर्माण करण्याला उच्च प्राधान्य दिले जाईल.

# भाग II. उच्च शिक्षण

## 9. दर्जेदार विद्यापीठे आणि महाविद्यालये: भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेसाठी नवीन आणि भविष्योन्मुखी दृष्टिकोन

9.1 मनुष्य आणि समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने तसेच, भारताच्या घटनेमध्ये कल्पिलेला भारत – एक लोकतांत्रिक, न्याय्य, सामाजिकरित्या-जागृत, सुसंस्कृत आणि माणुसकी असलेले राष्ट्र जिथे स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, आणि सर्वांना न्यायाचा अधिकार असेल – विकसित करण्यामध्ये उच्च शिक्षणाची खूप महत्त्वाची भूमिका आहे. शाश्वत उपजीविका आणि राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये उच्च शिक्षणाचे लक्षणीय योगदान असते. जसजसा भारत एक ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था आणि समाज बनायच्या दिशेने पुढे जाईल, तसतसे अधिकाधिक भारतीय तरूण उच्च शिक्षण घेण्याच्या दिशेने आगेकूच करतील.

9.1.1. एकविसाव्या शतकाच्या गरजा लक्षात घेता, चांगल्या, विचारवंत, अष्टपैलू, आणि कल्पक व्यक्ती विकसित करणे, हे दर्जेदार उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. यात एखाद्या व्यक्तीला एक किंवा अनेक विशिष्ट आवडीच्या क्षेत्रांमध्ये सखोल अभ्यास करणे शक्य झाले पाहिजे. तसेच, चारित्र्यविषयक, नैतिक आणि घटनात्मक मूल्ये, बौध्दिक कुतूहल, वैज्ञानिक स्वभावधर्म, कल्पकता आणि सेवाभाव याशिवाय शास्त्र, सामाजिक शास्त्र, कला, मानव्यशास्त्रे, भाषा याबरोबरच व्यावसायिक, तांत्रिक आणि व्यावसायाशी संबंधित विषय यांसह एकविसाव्या शतकातील क्षमता विकसित करणे शक्य झाले पाहिजे. उच्च शिक्षणामुळे वैयक्तिक यश आणि आत्मज्ञान, निर्माणकारी सार्वजनिक सहभाग आणि समाजासाठी उत्पादनशील योगदान साध्य करता यायला हवे. अधिक अर्थपूर्ण आणि समाधानकारक जीवन व कामाचे स्वरूप यासाठी विद्यार्थ्यांना तयार केले पाहिजे आणि आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सक्षम केले पाहिजे.

9.1.2. व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी, अध्ययनाच्या शाळा-पूर्व स्तरापासून उच्च शिक्षण स्तरापर्यंत, प्रत्येक स्तरावर विशिष्ट निर्धारित कौशल्ये आणि मूल्यांची ओळख करून देणे गरजेचे आहे.

9.1.3. सामाजिक स्तरावर, एक ज्ञानी, सामाजिकदृष्ट्या जागृत, विद्वान, आणि कुशल राष्ट्र निर्माण करण्याची क्षमता उच्च शिक्षणामध्ये आहे, असे राष्ट्र जे स्वत:च्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सशक्त उपाय शोधून त्यांची अंमलबजावणी करू शकेल. उच्च शिक्षणाच्या आधारावर ज्ञान निर्माण करून आणि नाविन्यपूर्ण गोष्टींचा शोध लावून, वाढत्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला हातभार लावता येतो. म्हणूनच, दर्जेदार उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट फक्त वैयक्तिक रोजगाराच्या अधिक चांगल्या संधी तयार करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. चैतन्यपूर्ण, सामाजिकदृष्ट्या सहभागी, सहयोगी समुदाय आणि, अधिक आनंदी, सामंजस्यपूर्ण, सुसंस्कृत, उत्पादनशील, नाविन्यपूर्ण, पुरोगामी, आणि समृध्द राष्ट्र तयार करण्याची उच्च शिक्षण ही गुरुकिल्ली आहे.

9.2 भारतातील उच्च शिक्षण प्रणाली सध्या ज्या प्रमुख समस्यांचा सामना करत आहे त्यात खालील समस्यांचा समावेश आहे:

a) अतिशय विखुरलेली उच्च शैक्षणिक परिसंस्था;
b) आकलन कौशल्याचा विकास आणि अध्ययनाच्या निष्पत्तीवर कमी भर;
c) शैक्षणिक शाखांची साचेबंद पध्दतीने विभागणी, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना खूप लवकर एका विशिष्ट विषयाची/शाखेची निवड करायला लागते आणि अध्ययनाच्या संकुचित क्षेत्राकडे वळवले जाते;
d) मर्यादित उपलब्धता विशेषत: सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित क्षेत्रांमध्ये, जिथे स्थानिक भाषेत शिकवणारे अतिशय कमी HEIs उपलब्ध आहेत;
e) मर्यादित शिक्षक आणि संस्थात्मक स्वायत्तता;
f) गुणवत्तेवर आधारित करिअर व्यवस्थापन आणि शिक्षक व संस्थेच्या प्रमुखांची प्रगती, यासाठी अपुरी यंत्रणा;
g) बहुतांश विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये संशोधनावर कमी भर, आणि शाखांमध्ये स्पर्धात्मक सहाध्यायी-परीक्षण संशोधन निधीचा अभाव;
h) HEIs मध्ये शासन आणि नेतृत्वाचा अभाव;
i) अपरिणामकारक नियामक व्यवस्था;
j) अनेक संलग्न विद्यापीठे अस्तित्वात असल्यामुळे पदवीपूर्व शिक्षणाचा खालावलेला दर्जा.

9.3. या आव्हानांवर मात करण्यासाठी, उच्च शिक्षण व्यवस्थेचे नूतनीकरण करून तिला नवी ऊर्जा प्रदान करणे आणि त्याद्वारे समता आणि सर्वसमावेशक असे उच्च-गुणवत्तेचे उच्च शिक्षण प्रदान करणे, या धोरणात संकल्पित आहे. धोरणाच्या दूरदृष्टीमध्ये सध्याच्या व्यवस्थेमध्ये खालील मुख्य बदलांचा समावेश आहे:

a) अशा उच्च शैक्षणिक व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करणे, ज्यात प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास किमान एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ आणि महाविद्यालयाचा समावेश असेल आणि संपूर्ण भारतभरात अशा अनेक HEI असतील ज्यांचे शिकवण्याचे किंवा कार्यक्रमांचे माध्यम स्थानिक/भारतीय भाषा असेल;

b) अधिक बहुशाखीय पदवीपूर्व शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे;

c) अध्यापकीय आणि संस्थात्मक स्वायत्ततेच्या दिशेने वाटचाल करणे;

d) विद्यार्थ्यांना अधिक चांगला अनुभव मिळण्यासाठी अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र, मूल्यांकन आणि विद्यार्थी साहाय्य यांमध्ये सुधारणा करणे;

e) अध्यापन, संशोधन आणि सेवा यांवर आधारित नेमणूक आणि करिअर प्रगतीद्वारे शिक्षकांच्या आणि संस्थात्मक नेतृत्वाच्या सचोटीची पुष्टी करणे;

f) सहाध्यायींनी पुनरावलोकन केलेल्या संशोधनाला अर्थसहाय्य करण्यासाठी आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये सक्रियपणे संशोधन रुजवण्यासाठी राष्ट्रीय संशोधन संस्थेची (नॅशनल रिसर्च फाऊंडेशन) स्थापना करणे;

g) शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता असलेल्या उच्च पात्रताधारक स्वतंत्र मंडळांमार्फत HEI चे शासन;

h) उच्च शिक्षणासाठी एकाच नियामकाद्वारे "सुलभ पण परिणामकारक" नियमन;

i) उत्कृष्ट सार्वजनिक शिक्षणाच्या मोठ्या संधींसारख्या अनेक उपायांद्वारे अधिक उपलब्धता, समानता आणि सर्वसमावेशकता; उपेक्षित व वंचितांसाठी खासगी / धर्मादाय विद्यापीठांद्वारे शिष्यवृत्त्या; ऑनलाईन शिक्षण व मुक्त दूरस्थ शिक्षण (ODL); आणि सर्व पायाभूत सुविधा व शिक्षण साहित्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सहज वापरता येण्याजोगे आणि उपलब्ध.

## 10. संस्थांची पुनर्रचना आणि बळकटीकरण

10.1. उच्च शिक्षणासंदर्भात या धोरणाचा मुख्य भर उच्च शिक्षणाचे तुकडे होणे समाप्त करून उच्च शिक्षण संस्थांचे प्रत्येकामध्ये 3,000 किंवा त्यापेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या मोठ्या बहुशाखीय विद्यापीठांमध्ये, महाविद्यालयांमध्ये, आणि HEI क्लस्टर्स / नॉलेज हबमध्ये रूपांतर करणे, हे एक लक्ष्य असेल. यामुळे विद्वान आणि सहाध्यायींचा एक उत्साही समुदाय तयार होण्यास आणि हानीकारक गटबाजी संपुष्टात आणण्यास मदत होईल, विद्यार्थी कलात्मक, सर्जनशील आणि विश्लेषक विषयांसह खेळांमध्येदेखील अष्टपैलू होण्यास सक्षम बनतील, आंतरशाखीय संशोधनासह विविध विषयांमधील संशोधनाचे सक्रिय समुदाय विकसित होतील, आणि संपूर्ण उच्च शिक्षणामध्ये भौतिक संसाधने आणि मनुष्यबळ अशा दोन्हींची कार्यक्षमता वाढेल.

10.2. मोठी बहुशाखीय विद्यापीठे आणि HEI क्लस्टर्स स्थापन केली जावीत ही उच्च शिक्षणाच्या संरचनेसंबंधी या धोरणाची सर्वोच्च शिफारस आहे. देशभरातील आणि जगातील हजारो विद्यार्थी उत्साही बहुशाखीय वातावरणात शिक्षण घेत असलेल्या तक्षशिला, नालंदा, वल्लभी आणि विक्रमशीला ह्या प्राचीन भारतीय विद्यापीठांनी, मोठी बहुशाखीय संशोधन आणि अध्यापन विद्यापीठे कोणत्या प्रकारचे यश मिळवू शकतात हे स्पष्टपणे दाखवून दिले होते.

अष्टपैलू आणि सर्जनशील व्यक्ती निर्माण करण्यासाठी भारताने या महान भारतीय परंपरेचे तातडीने पुनरुज्जीवन केले पाहिजे, जी याआधीच इतर देशांचे शैक्षणिक व आर्थिक परिवर्तन घडवत आहे.

10.3. विशेषतः, उच्च शिक्षणाच्या ह्या दूरदृष्टीमध्ये, एक उच्च शिक्षण संस्था (HEI) म्हणजेच विद्यापीठ किंवा महाविद्यालय, ज्यामुळे नावारूपास येते, याबाबत एक नवीन संकल्पनात्मक आकलन / समज आवश्यक आहे. विद्यापीठाचा अर्थ असेल, उच्च शिक्षणाची अशी एक बहुशाखीय संस्था, जी उच्च दर्जेदार शिक्षण, संशोधन आणि सामुदायिक सहभाग असलेले पदवीपूर्व आणि पदवी शिक्षण प्रदान करेल. याप्रमाणे, विद्यापीठाच्या व्याख्येमध्ये अशा अनेक संस्थांची व्याप्ती समाविष्ट असेल, त्या म्हणजे अध्यापन आणि संशोधनाला समान महत्त्व देणाऱ्या संस्था म्हणजेच संशोधन-केंद्रित विद्यापीठे, तर अशा संस्था ज्या अध्यापनावर अधिक भर देतात मात्र तरीही महत्त्वपूर्ण संशोधन करतात म्हणजेच अध्यापन-केंद्रित विद्यापीठे. दरम्यान, एका स्वायत्त पदवी महाविद्यालयाचा (AC) अर्थ असेल, उच्च शिक्षणाची मोठी बहुशाखीय संस्था जी पदवी प्रदान करते आणि प्रामुख्याने पदवीपूर्व शिक्षणावर लक्ष केंद्रीत करते, मात्र ते त्यापुरते मर्यादित असणार नाही, ते त्यापुरतेच मर्यादित असण्याची गरज नाही आणि ती सामान्यपणे नेहमीच्या विद्यापीठापेक्षा लहान असेल.

10.4. श्रेणीबद्ध अधिस्वीकृती देण्याच्या पारदर्शक प्रणालीद्वारे महाविद्यालयांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची एक टप्पावार यंत्रणा स्थापन केली जाईल. प्रत्येक टप्प्यावरील मान्यतेसाठी आवश्यक असलेले किमान निकष हळूहळू संपादन करण्यासाठी महाविद्यालयांना उत्तेजन दिले जाईल, मार्गदर्शन केले जाईल, साहाय्य केले जाईल आणि प्रोत्साहन दिले जाईल. असे संकल्पित आहे की, कालांतराने प्रत्येक महाविद्यालय एकतर स्वायत्त पदवी महाविद्यालय किंवा एखाद्या विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून विकसित होईल, दुसऱ्या बाबतीत ते विद्यापीठाचा संपूर्ण भाग असेल. योग्य मान्यता मिळाल्यानंतर स्वायत्त पदवी महाविद्यालये, तशी इच्छा असल्यास, संशोधन-केंद्रित किंवा शिक्षण-केंद्रित विद्यापीठांमध्ये विकसित होऊ शकतात.

10.5. हे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे की, संस्थांचे हे तीन ढोबळ प्रकार म्हणजे एक ताठर आणि वेगवेगळे वर्गीकरण नसून त्यामध्ये एक प्रकारचे सातत्य आहे. HEI ना त्यांच्या योजना, कामगिरी आणि प्रभावीपणाच्या आधारे टप्प्याटप्प्याने एका श्रेणीतून दुसऱ्या श्रेणीमध्ये जाण्याची स्वायत्तता आणि स्वातंत्र्य असेल. त्यांचे लक्ष्य आणि कार्य हे या श्रेणींच्या संस्थांमधील सर्वात ठळक वैशिष्ट्य असेल. मान्यता प्रणाली या विविध प्रकारच्या HEI साठी योग्यरित्या भिन्न व संबंधित निकष विकसित करेल आणि वापरेल. मात्र, सर्व प्रकारच्या HEI कडून उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या आणि अध्यापन-अध्ययनाच्या अपेक्षा सारख्याच असतील.

10.6. अध्यापन आणि संशोधनाव्यतिरिक्त, HEI वर इतरही काही महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या असतील, ज्या त्या योग्य संसाधने, प्रोत्साहने आणि व्यवस्था वापरून पार पाडतील. या जबाबदाऱ्यांमध्ये, इतर HEI ना त्यांच्या विकासासाठी मदत करणे, समुदाय सहभाग व सेवा, अभ्यासाच्या विविध क्षेत्रांमध्ये योगदान, उच्च शिक्षण प्रणालीसाठी शिक्षक विकास आणि शालेय शिक्षणास सहाय्य करणे, यांचा समावेश होतो.

10.7. 2040 पर्यंत बहुशाखीय संस्था बनण्याचे सर्व उच्च शिक्षण संस्थांचे (HEI) उद्दिष्ट असेल आणि पायाभूत सुविधा व संसाधनांचा इष्टतम उपयोग होण्यासाठी आणि उत्साही बहुशाखीय समुदाय निर्मितीसाठी मोठ्या संख्येने, शक्यतो हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांची नावनोंदणी करण्याचे उद्दिष्ट असेल. ही प्रक्रिया घडण्यास वेळ लागणार असल्याने सर्व HEI प्रथम 2030 पर्यंत बहुशाखीय बनण्याचे नियोजन करतील होण्याची आणि नंतर हळूहळू विद्यार्थ्यांची संख्या इच्छित पातळीपर्यंत वाढवतील.

10.8. शिक्षणाची संपूर्ण उपलब्धता, समानता आणि सर्वसमावेशकता सुनिश्चित करण्यासाठी कमी शैक्षणिक सुविधा असलेल्या प्रदेशात अधिक HEI स्थापित आणि विकसित केल्या जातील. 2030 पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास, कमीतकमी एक मोठी बहुशाखीय HEI असेल. स्थानिक / भारतीय भाषांमध्ये किंवा द्विभाषिक शिक्षणाचे माध्यम असलेल्या, सरकारी किंवा खासगी अशा दोन्ही क्षेत्रातल्या उच्च-गुणवत्तेच्या उच्च शिक्षण संस्था विकसित करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील. व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणामधील निव्वळ नोंदणी गुणोत्तर 2035 पर्यंत, 26.3% (2018) वरून 50% पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट असेल. ही उद्दिष्टे गाठण्यासाठी अनेक नवीन संस्था विकसित केल्या जातीलच, पण विद्यमान संस्थांचे एकत्रीकरण, त्यांचा लक्षणीय विस्तार तसेच सुधारणा करूनदेखील क्षमता निर्मितीचा एक मोठा भाग साध्य केला जाईल.

10.9. सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही संस्थांमध्ये वाढ होईल, सोबतच मोठ्या संख्येने उत्कृष्ट सरकारी संस्था विकसित करण्यावर भर धरला जाईल. सरकारी HEI ना सरकारी अर्थसहाय्य पुरवण्याचे प्रमाण वाढवण्यासाठी एक निष्पक्ष व पारदर्शक प्रणाली असेल. ही प्रणाली सर्व सरकारी संस्थांना वाढीची आणि विकसित होण्याची समान संधी देईल आणि ती मान्यता प्रणालीच्या मान्यता मानकांमधील पारदर्शक, पूर्व-घोषित निकषांवर आधारित असेल. या धोरणामध्ये निर्धारित केल्यानुसार सर्वोच्च गुणवत्तेचे शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना त्यांची क्षमता वाढवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

10.10. संस्थांना, त्यांच्याकडे मान्यता असल्यास, त्यांच्या योगदानात वाढ करण्यासाठी, उपलब्धता सुधारण्यासाठी, GER मध्ये वाढ करण्यासाठी आणि निरंतर अध्ययनाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी (SDG 4) मुक्त दूरस्थ शिक्षण (ODL) आणि ऑनलाईन कार्यक्रम चालवण्याचा पर्याय असेल. सर्व ODL कार्यक्रम आणि कोणत्याही डिप्लोमा किंवा पदवीपर्यंत जाणारे त्यांचे घटक हे, HEI द्वारा त्यांच्या कॅम्पसमध्ये चालवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांच्या सर्वोच्च गुणवत्तेच्या तुलनेचे असतील. ODL साठी मान्यताप्राप्त अग्रगण्य संस्थांना उच्च-गुणवत्तेचे ऑनलाईन अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी प्रोत्साहन आणि साहाय्य दिले जाईल. अशा गुणवत्तापूर्ण ऑनलाईन अभ्यासक्रमांना HEI च्या अभ्यासक्रमात योग्य प्रकारे समाविष्ट केले जाईल आणि संमिश्र पद्धतीला प्राधान्य दिले जाईल.

10.11. विविध क्षेत्रांमध्ये उच्च-गुणवत्तेच्या बहुशाखीय आणि आंतर-शाखीय अध्यापन आणि संशोधनाला सक्षम करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी, कालांतराने एकशाखीय HEI हळूहळू बंद केल्या जातील आणि त्या सर्व, सक्रिय बहुशाखीय संस्था किंवा सक्रिय बहुशाखीय HEI क्लस्टर्सचा भाग बनतील. एकशाखीय HEI, विविध क्षेत्रांचे विभाग नव्याने स्थापन करतील, विशेषतः त्यांच्या सध्याच्या एका शाखेला अधिक बळकट करू शकतील असे विभाग. योग्य मान्यता प्राप्त झाल्यानंतर, या उत्साही संस्कृतीला सक्षम करण्यासाठी, सर्व HEI हळूहळू संपूर्ण शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वायत्तता मिळवण्याचा प्रयत्न करतील. सरकारी संस्थांच्या स्वायत्ततेस पुरेसे सरकारी अर्थसहाय्य आणि स्थैर्य प्रदान करून मदत केली जाईल. सामाजिक हितासाठी उच्च-गुणवत्तेच्या न्याय्य शिक्षणाबद्दल वचनबद्ध असणाऱ्या खासगी संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल.

10.12. या धोरणाद्वारे परिकल्पित असलेली नवीन नियामक यंत्रणा नाविन्यपूर्णतेसाठी सक्षमीकरण आणि स्वायत्ततेच्या या एकंदर संस्कृतीला चालना देईल, यात पंधरा वर्षांच्या कालावधीत श्रेणीबद्ध स्वायत्ततेच्या प्रणालीद्वारे हळूहळू 'संलग्न महाविद्यालये' हा प्रकार बंद करण्याचा समावेश असेल आणि हे एक आव्हान म्हणून पार पाडले जाईल. प्रत्येक विद्यमान संलग्न विद्यापीठ त्याच्याशी संलग्न महाविद्यालयांना मार्गदर्शन करण्यास जबाबदार असेल, जेणेकरुन ही महाविद्यालये त्यांच्या क्षमता विकसित करू शकतील आणि शैक्षणिक आणि अभ्यासक्रमविषयक

बाबी; शिक्षण आणि मूल्यांकन; प्रशासन सुधारणा; आर्थिक मजबुती; आणि प्रशासकीय कार्यक्षमता यांबाबतचे किमान निकष साध्य करू शकतील. एखाद्या विद्यापीठाशी सध्या संलग्न असलेली सर्व महाविद्यालये विहित अधिस्वीकृती साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले निकष कालांतराने साध्य करतील आणि अखेरीस ती पदवी देणारी स्वायत्त महाविद्यालये बनतील. हे एकत्रित राष्ट्रीय प्रयत्नांनी साध्य होईल, ज्यात यासाठी योग्य मार्गदर्शन आणि शासकीय सहकार्यदेखील समाविष्ट असेल.

10.13. व्यवसाय आणि व्यावसायिक शिक्षणासह एकात्मिक उच्च शिक्षण प्रणाली हे एकूणच उच्च शिक्षण क्षेत्राचे लक्ष्य असेल. हे धोरण आणि त्याचा दृष्टिकोन सर्व विद्यमान शाखांच्या सर्व HEI ना सारखाच लागू होईल, ज्या अखेरीस उच्च शिक्षणाच्या एका सुसंगत परिसंस्थेत विलीन होतील.

10.14. जगभरात, विद्यापीठ म्हणजे पदवीपूर्व, पदवी आणि पीएच.डी. कार्यक्रम प्रदान करणारी आणि जिथे उच्च-गुणवत्तेचे अध्यापन आणि संशोधन केले जाते अशी उच्च शिक्षणाची बहुशाखीय संस्था. 'अभिमत विद्यापीठ', 'संलग्न विद्यापीठ', 'संलग्न तंत्रज्ञान विद्यापीठ', 'एकात्मिक विद्यापीठ' यांसारख्या देशातील HEIच्या सध्याच्या क्लिष्ट नावांच्याऐवजी, केवळ 'विद्यापीठ' हा शब्दच मानकांनुसार निकष पूर्ण केल्यावर वापरण्यात येईल.

## 11. अधिक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाच्या दिशेने

11.1. तक्षशीला आणि नालंदासारख्या विद्यापीठांपासून ते विविध क्षेत्रातील विषय एकत्रपणे मांडलेल्या भारतातील विस्तृत साहित्यापर्यंत, भारताला सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. बाणभट्टाच्या *कादंबरी*सारख्या प्राचीन भारतीय साहित्यामध्ये चांगल्या शिक्षणाचे वर्णन म्हणजे 64 कलांचे ज्ञान असणे असे केले आहे; आणि या 64 'कलां'मध्ये केवळ गायन व चित्रकला असे विषय नव्हते, तर रसायनशास्त्र आणि गणित यांसारखी वैज्ञानिक क्षेत्रे, सुतारकाम आणि वस्त्रनिर्मिती यांसारखी 'व्यवसाय' क्षेत्रे, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी यांसारखी 'व्यावसायिक' क्षेत्रे, तसेच संवाद, चर्चा आणि वादविवाद यांसारखी 'व्यवहार कौशल्ये' (सॉफ्ट स्किल्स) असेही विषय होते.

गणित, विज्ञान, व्यवसाय विषय, व्यावसायिक विषय आणि व्यवहार कौशल्ये यांसह कल्पक मानवी प्रयत्नांच्या सर्व शाखांना 'कला' मानले पाहिजे, या कल्पनेचा उदयच मुळात निःसंदिग्धपणे भारतीय आहे. 'अनेक कलांचे ज्ञान' किंवा आधुनिक काळात ज्याला सामान्यपणे 'लिबरल आर्ट्स' असे म्हटले जाते (म्हणजेच कलांची उदारमतवादी कल्पना) ही कल्पना भारतीय शिक्षणामध्ये परत आणलीच पाहिजे, कारण 21व्या शतकामध्ये नेमके याच प्रकारचे शिक्षण आवश्यक असणार आहे.

11.2. पदवीपूर्व शिक्षणात, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (STEM) या विषयांमध्ये मानव्यशास्त्रे आणि कला यांचे एकात्मीकरण करण्याच्या शैक्षणिक दृष्टिकोनांच्या मूल्यांकनात सातत्याने अध्ययनातील निष्पत्ती सकारात्मक असल्याचे आढळून आले आहे, या निष्पत्तीत अधिक कल्पकता आणि नाविन्यपूर्णता, तार्किक विचार आणि उच्च-आकलनात्मक विचार करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता, सांघिक कार्य, संवाद कौशल्य, अधिक सखोल शिक्षण आणि विविध क्षेत्रांच्या अभ्यासक्रमावर प्रभुत्व, सामाजिक आणि नैतिक जागरूकतेत वाढ इत्यादी, याशिवाय अध्ययनातील सहभाग आणि आनंद, यांचा समावेश आहे. सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाच्या दृष्टिकोनामुळे संशोधनामध्येही सुधारणा आणि वाढ झाली आहे.

11.3. बौद्धिक, सौंदर्यविषयक, सामाजिक, शारीरिक, भावनिक आणि नैतिक या सर्व मानवी क्षमता एकात्मिकपणे विकसित करणे हे सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाचे उद्दिष्ट असेल. असे शिक्षण, कला, मानव्यशास्त्रे, भाषा,

विज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि व्यावसायिक, तांत्रिक व व्यवसाय क्षेत्र अशा 21व्या शतकात आवश्यक असलेल्या विविध क्षेत्रांमधील क्षमता; सामाजिक सहभागाचे नीतीनियम; संवाद, चर्चा आणि वादविवाद यांसारखी व्यावहारिक कौशल्ये; आणि निवडलेल्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये सखोल विशेषज्ञता, असलेल्या अष्टपैलू व्यक्ती विकसित करण्यास मदत करेल. दीर्घकालीन विचार करता, असे सर्वांगीण शिक्षण हा व्यावसायिक, तांत्रिक आणि व्यवसाय शाखांमधील विषयांच्या सर्व पदवीपूर्व शिक्षणाचा दृष्टिकोन असेल.

11.4 भारताला 21 व्या शतकात आणि चौथ्या औद्योगिक क्रांतीकडे नेण्यासाठी भारताच्या इतिहासात सुंदररीत्या वर्णन केल्याप्रमाणे, एक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षण, भारतातील शिक्षणासाठी खरोखरच आवश्यक आहे. अगदी IIT सारख्या अभियांत्रिकी संस्थासुद्धा कला, मानव्यशास्त्रे यांचा अधिक समावेश करून अधिक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाकडे वळतील. कला, मानव्यशास्त्राचे विद्यार्थी जास्त प्रमाणात विज्ञान शिकायचे ध्येय ठेवतील आणि सर्वजण अधिक व्यावसायिक विषय आणि व्यावहारिक कौशल्ये समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करतील.

11.5 कल्पक आणि लवचिक अभ्यासक्रम रचनांमुळे अभ्यासासाठी विविध शाखांचे कल्पक संयोग (कॉम्बिनेशन्स) करणे शक्य होईल आणि प्रवेशाचे आणि बाहेर पडण्याचे अनेक मार्ग उपलब्ध करून दिले जातील. त्यामुळे सध्या असलेली काटेकोर विभागणी काढून टाकली जाईल आणि निरंतर शिक्षण घेण्यासाठी नवीन शक्यता तयार होतील. मोठ्या बहुशाखीय विद्यापीठांमधील पदवी-स्तर, मास्टर्स आणि डॉक्टरल शिक्षण आणि त्याचवेळी सखोल संशोधनावर आधारित स्पेशलायझेशन यामुळे शिक्षणक्षेत्र, सरकार, आणि उद्योगांसह इतर बहुशाखीय कामासाठी संधी उपलब्ध होतील.

11.6 मोठी बहुशाखीय विद्यापीठे आणि महाविद्यालये उच्च-दर्जाच्या सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाकडे जाण्याची सुविधा उपलब्ध करतील. एका विषयातील किंवा अनेक विषयातील संशोधनावर आधारित स्पेशलायझेशनच्या बरोबरीनेच अभ्यासक्रमातील लवचिकता आणि नाविन्यपूर्ण आणि आकर्षक अभ्यासक्रमाचे पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जातील. अभ्यासक्रम निश्चित करताना जास्त शिक्षकगण आणि संस्थात्मक स्वायत्तता देऊन यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. अध्यापनशास्त्रात संवाद, वाद-विवाद, संशोधन, आणि दुसऱ्या शाखेतील आणि आंतरशाखीय विचार करण्यासाठी संधी यावर भर दिला जाईल.

11.7 बहुशाखीय, चालना देणाऱ्या भारतीय शिक्षणासाठी आणि वातावरणासाठी आवश्यक असलेले भाषा, वाङ्मय, संगीत, तत्त्वज्ञान, भारतविद्या, कला, नृत्य, नाट्य, शिक्षण, गणित, संख्याशास्त्र, शुद्ध आणि उपयोजित विज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, क्रीडा, भाषांतर आणि दुभाषीकाम, आणि अशा इतर विषयांचे विभाग सर्व HEI मध्ये स्थापन केले जातील आणि मजबूत केले जातील. जर हे विषय अशा विभागात किंवा HEI मध्ये वर्गात शिकण्यासाठी उपलब्ध नसतील तर ODL पद्धतीने अभ्यासल्यास सर्व पदवी अभ्यासक्रमांमध्ये या विषयांसाठी क्रेडीट्स दिली जातील.

11.8 असे सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षण साध्य करण्यासाठी सर्व HEIच्या लवचिक आणि नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांमध्ये क्रेडीटवर आधारित कोर्सेस आणि समुदायाचा सहभाग आणि सेवा, पर्यावरण शिक्षण, आणि मूल्याधारित शिक्षण या क्षेत्रातील प्रकल्प समाविष्ट असतील. पर्यावरण शिक्षणात हवामान बदल, प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, जैव विविधतेचे जतन, जैविक स्रोतांचे आणि जैवविविधतेचे जतन, जंगल आणि वन्यजीव संवर्धन, शाश्वत विकास आणि जीवन पद्धती असे विषय समाविष्ट असतील. मूल्याधारित शिक्षणामध्ये सत्य, धर्म, शांती, प्रेम, अहिंसा, शास्त्रीय दृष्टिकोन, नागरिकत्व मूल्ये यासारखी मानवी, नैतिक, घटनात्मक आणि वैश्विक मानवी मूल्ये आणि जीवन-कौशल्येसुद्धा समाविष्ट असतील; तसेच सेवेचे धडे आणि समाज सेवा कार्यक्रमात सहभाग हेसुद्धा सर्वांगीण शिक्षणाचा अविभाज्य भाग मानले जातील. जग अधिकाधिक जोडले जात असताना वैश्विक आव्हानांना एक

प्रतिसाद म्हणून वैश्विक नागरिकत्व शिक्षण (GCED) उपलब्ध करून दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैश्विक समस्यांबद्दल जागृती निर्माण होईल. त्यांना या समस्या समजतील आणि ते अधिक शांत, सहिष्णू, समावेशक, सुरक्षित आणि शाश्वत समाजाचे प्रचारक होतील. शेवटी, सर्वांगीण शिक्षणासाठी, सर्व HIE मधील विद्यार्थ्यांना स्थानिक उद्योग, व्यवसाय, कलाकार, हस्तकलाकार इ. कडे इंटर्नशिप करण्याची संधी मिळेल तसेच शिक्षक आणि संशोधकांच्या स्वत:च्या किंवा इतर HEI/संशोधन संस्थांमध्ये संशोधन इंटर्नशिप करण्याची संधी मिळेल. त्यामुळे विद्यार्थी आपल्या शिक्षणाच्या व्यावहारिक बाजूमध्ये सक्रियपणे सहभागी होऊ शकतील आणि त्याचे उप-उत्पादन म्हणून त्यांची रोजगार मिळवण्याची क्षमतासुद्धा अधिक वाढेल.

11.9 पदवी अभ्यासक्रमांची रचना आणि लांबी त्यानुसार समायोजित केली जाईल. पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण 3 किंवा 4 वर्ष कालावधीचे असेल. या काळात अनेकवेळा योग्य प्रमाणपत्रासह बाहेर पडण्याचा पर्याय उपलब्ध असेल. उदा. व्यवसाय आणि व्यावसायिक क्षेत्रासह एखाद्या शाखेत किंवा क्षेत्रात 1 वर्ष पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र, 2 वर्षे अभ्यास पूर्ण केल्यावर डिप्लोमा, किंवा 3 वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पदवी. 4 वर्षांचा बहुशाखीय पदवी अभ्यासक्रम मात्र प्राधान्याचा पर्याय असेल कारण निवडलेल्या मेजर विषयावर आणि विद्यार्थ्याच्या आवडीनुसार निवडलेल्या मायनर विषयावर लक्ष केंद्रित करण्यासह सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाची संधी यात मिळेल. अ‍ॅकेडेमिक क्रेडीट बँक (ABC) स्थापन केली जाईल. यामध्ये विविध मान्यताप्राप्त HEI मधून मिळालेली शैक्षणिक क्रेडीट्स डिजिटल पद्धतीने साठवलेली जातील. त्यानुसार मिळालेली क्रेडीट्स विचारात घेऊन HEI कडून पदव्या देण्यात येतील. HEI ने निश्चित केल्यानुसार एखाद्या विद्यार्थ्याने त्याच्या अभ्यासाच्या प्रमुख क्षेत्रात (क्षेत्रांमध्ये) सखोल संशोधन प्रकल्प केल्यास या 4 वर्षांच्या अभ्यासक्रमात 'संशोधनासह' पदवीसुद्धा मिळू शकेल.

11.10 मास्टर्स कार्यक्रमाच्या विविध रचना उपलब्ध करून देण्याची लवचिकता HEIs कडे असेल: (a) 3 वर्षांचा पदवी कार्यक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 2 वर्षांचा मास्टर्सचा कार्यक्रम असेल आणि या कार्यक्रमातील दुसरे वर्ष पूर्णपणे संशोधनाकरता समर्पित असेल (b) 4 वर्षांचा संशोधनासहित पदवी कार्यक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, 1 वर्षाचा मास्टर कार्यक्रम असेल (c) 5 वर्षांचा एकात्मिक पदवी/मास्टर्स कार्यक्रमदेखील उपलब्ध असेल. Ph.D. करण्याकरता मास्टर्स पदवी किंवा संशोधनासहित 4 वर्षांच्या पदवीची गरज असेल. M.Phil. कार्यक्रम थांबवण्यात येईल.

11.11 सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणासाठी IIT, IIM इ. संस्थांच्या दर्जाची, आदर्श सरकारी विद्यापीठे MERU (मल्टीडिसिप्लिनरी एज्युकेशन अ‍ॅन्ड रीसर्च युनिव्हर्सिटीज / बहुशाखीय शैक्षणिक आणि संशोधन विद्यापीठे) या नावाने स्थापित केली जातील आणि दर्जेदार शिक्षणामध्ये उच्चतम जागतिक पातळी साध्य करण्याचे उद्दिष्ट या विद्यापीठांसमोर असेल. भारतभरातील बहुशाखीय शिक्षणासाठी उच्च मानके प्रस्थापित करण्यातदेखील ही विद्यापीठे मदत करतील.

11.12 स्टार्टअप इन्क्युबेशन (अंतःपोषण) केंद्रे, तंत्रज्ञान विकास केंद्रे, संशोधनातील प्रमुख क्षेत्रांची केंद्रे यांची स्थापना, उद्योग आणि शिक्षणामध्ये अधिक संबंध तसेच मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्रासहित आंतरशाखीय संशोधन यासारख्या उपक्रमांमधून HEIs कडून संशोधन आणि नाविन्यपूर्ण शोधांवर भर दिला जाईल. साथीचे रोग आणि महासाथीची परिस्थिती लक्षात घेता, संसर्गजन्य रोग, साथरोगशास्त्र, विषाणूशास्त्र, निदानशास्त्र, उपकरणशास्त्र, लसीकरण आणि इतर संबंधित विषयांमध्ये संशोधन करण्यात HEIs ने पुढाकार घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. विद्यार्थी समुदायांना नाविन्यपूर्ण शोध लावण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरता विशिष्ट सहाय्य व मार्गदर्शक यंत्रणा आणि स्पर्धा HEIs कडून विकसित केल्या जातील. HEIs, संशोधन प्रयोगशाळा, आणि इतर संशोधन संस्थांमधून

अशा प्रकारचे चैतन्यपूर्ण संशोधन आणि नाविन्यपूर्ण शोध शक्य करण्यासाठी आणि त्यांना सहाय्य करण्यासाठी NRF काम करेल.

## 12. शिक्षणासाठी अनुकूल वातावरण आणि विद्यार्थ्यांना सहयोग

12.1 प्रभावी अध्ययनासाठी योग्य अभ्यासक्रम, गुंतवून ठेवणारे अध्यापनशास्त्र, सातत्यपूर्ण रचनात्मक मूल्यांकन आणि विद्यार्थ्यांना पुरेसा पाठिंबा याची गरज असते. अभ्यासक्रम खिळवून ठेवणारा आणि प्रसंगोचित असावा तसेच, आधुनिक ज्ञानाच्या गरजांबरोबर त्याची सांगड घालण्यासाठी आणि नमूद केलेली अध्ययनाची निष्पत्ती साध्य करण्यासाठी अभ्यासक्रमात नियमितपणे बदल केला पाहिजे. मग विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम यशस्वीपणे शिकवण्यासाठी उच्च-दर्जाच्या अध्यापनशास्त्राची गरज भासते; अध्यापनशास्त्रीय पध्दती मुलांना दिल्या जाणाऱ्या अध्ययनाचा अनुभव निश्चित करतात व त्याचा थेट परिणाम अध्ययन निष्पत्तीवर होतो. मूल्यांकन पध्दतीची रचना शास्त्रावर आधारित असावी तसेच तिच्यात, अध्ययनामध्ये सातत्याने सुधारणा करण्याची आणि ज्ञानाच्या वापराची चाचणी घेण्याची क्षमता असावी. आणि सर्वांत शेवटी, स्वास्थ्य, चांगले आरोग्य, मानसिक-सामाजिक स्वास्थ्य यासारख्या विद्यार्थ्यांच्या हिताच्या गोष्टींना प्रोत्साहन देणाऱ्या क्षमतांचा विकास आणि चांगला नैतिक पाया, हे उच्च दर्जाच्या अध्ययनासाठी अतिशय महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे, अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र, सातत्यपूर्ण मूल्यांकन, आणि विद्यार्थ्यांना सहाय्य हे गुणवत्तापूर्ण अध्ययनाचे आधारस्तंभ आहेत. सुयोग्य साधने आणि दर्जेदार ग्रंथालये, वर्ग, प्रयोगशाळा, तंत्रज्ञान, खेळ/मनोरंजनाच्या जागा, विद्यार्थ्यांकरता चर्चा करायला जागा, आणि भोजनालये यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच, गुंतवून ठेवणारे आणि पाठिंबा देणारे अध्ययनाचे वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी तसेच सर्व विद्यार्थ्यांना यश मिळवता येण्यासाठी अनेक नवीन उपक्रमांची गरज भासणार आहे.

12.2 पहिला उपक्रम, कल्पकतेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने, उच्च शैक्षणिक पात्रतेच्या विस्तृत चौकटीत राहून अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि मूल्यांकनामध्ये नाविन्यपूर्ण शोध लावण्याकरता, संस्था आणि शिक्षकांकडे स्वायत्तता असेल. अशा नाविन्यपूर्ण शोधांचे उद्दिष्ट संस्था व कार्यक्रमांमध्ये तसेच ODL, ऑनलाईन आणि पारंपरिक ‘वर्ग’ या माध्यमांमध्ये सुसंगती असल्याचे सुनिश्चित करणे हे असेल. तसेच, सर्व विद्यार्थ्यांना एक चालना देणारा आणि गुंतवून ठेवणारा अध्ययन अनुभव देण्यासाठी, संस्था आणि प्रेरित शिक्षकांद्वारे अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्राची रचना केली जाईल आणि प्रत्येक कार्यक्रमाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रचनात्मक मूल्यांकनाचा सातत्याने वापर केला जाईल. अंतिम प्रमाणपत्राशी (सर्टिफिकेशन) संबंधित प्रणालींसह सर्व मूल्यांकन प्रणाली HEI कडून निश्चित केल्या जातील. नाविन्यपूर्ण शोध आणि लवचिकता विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टिममध्ये (CBCS) सुधारणा केली जाईल. प्रत्येक कार्यक्रमाच्या उद्दिष्टांच्या आधारावर विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करणाऱ्या निकष-आधारित श्रेणीकरण पध्दतीचा, HEI कडून अवलंब केला जाईल. यामुळे प्रणाली अधिक न्याय्य आणि निष्पत्ती अधिक तुलनात्मक होईल. तसेच, HEI उच्च-जोखमीच्या परीक्षांपेक्षा अखंड आणि व्यापक मूल्यांकनाचा स्वीकार करेल.

12.3 दुसरा उपक्रम, प्रत्येक संस्थेने, अभ्यासक्रम सुधारणांपासून वर्गातील व्यवहाराच्या दर्जापर्यंतच्या, आपल्या सर्व शैक्षणिक योजनांचे एका मोठ्या इन्स्टिट्युशनल डेव्हलेपमेंट प्लॅनमध्ये (IDP) किंवा संस्थात्मक विकास योजनेमध्ये एकात्मीकरण करावे. प्रत्येक संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबध्द असेल आणि शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण गटाला पाठिंबा देण्यासाठी, वर्गात व वर्गाबाहेर होणाऱ्या औपचारिक शैक्षणिक देवाघेवाणीसाठी, एक मजबूत अंतर्गत व्यवस्था तयार करेल. उदाहरणार्थ, विषय-केंद्रित क्लब तसेच शिक्षक

व तज्ज्ञांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी आयोजित केलेले उपक्रम, उदा. क्लब्ज, विज्ञान, गणित, कविता, भाषा, साहित्य, वादविवाद, संगीत, क्रीडा इत्यादींशी संबंधित कार्यक्रम, यासाठी लागणारा निधी पुरवण्याची यंत्रणा आणि कारणे सर्व HEIs कडे असेल. अशा उपक्रमांमध्ये शिक्षकांनी योग्य प्राविण्य मिळवल्यावर आणि कॅम्पसमधील विद्यार्थ्यांकडून या उपक्रमांची मागणी आल्यावर, कालांतराने ते अभ्यासक्रमात समाविष्ट करून घेता येतील. फक्त शिक्षक म्हणून नव्हे तर एक सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची क्षमता आणि प्रशिक्षण अध्यापकांकडे असेल.

12.4 तिसरा उपक्रम, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना यशस्वीपणे उच्च शिक्षणापर्यंत पोचण्यासाठी प्रोत्साहन आणि पाठिंबा लागतो. यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी उच्च-दर्जाची मदत केंद्रे स्थापित करणे गरजेचे होईल आणि हे प्रभावीपणे करण्यासाठी त्यांना पुरेसा निधी आणि शैक्षणिक साधने उपलब्ध करून दिली जातील. सर्व विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक स्वरूपाचे शैक्षणिक आणि करिअर समुपदेशन उपलब्ध असेल तसेच, विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्याची सुनिश्चिती करण्यासाठी समुपदेशक उपलब्ध असतील.

12.5 चौथा उपक्रम, दर्जेदार उच्च शिक्षण सहजपणे उपलब्ध होण्यासाठी, ODL आणि ऑनलाईन शिक्षणाने एक नैसर्गिक मार्ग उपलब्ध करून दिला आहे. त्याच्या क्षमतेचा पूर्ण वापर करण्यासाठी, स्पष्टपणे मांडलेल्या गुणवत्तेच्या मानकांचे पालन करत, विस्ताराच्या दिशेने केलेल्या एकत्रित, पुराव्यावर आधारित प्रयत्नांच्या माध्यमातून ODL चे नूतनीकरण करण्यात येईल. वर्गात घेतल्या जाणाऱ्या सर्वांत उच्च दर्जाच्या कार्यक्रमांची बरोबरी करणे हे ODL कार्यक्रमांचे उद्दिष्ट असेल. ODL चा प्रणाली-स्तरीय विकास, नियमन, आणि अधिस्वीकृती यासाठी नियम, मानके, आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येतील, आणि सर्व HEIs साठी शिफारस करता येईल असा ODL च्या गुणवत्तेचा आराखडा विकसित करण्यात येईल.

12.6 शेवटचा उपक्रम असेल प्रत्यक्ष वर्ग, ऑनलाईन आणि ODL माध्यम यांसहित इतर सर्व कार्यक्रम, कोर्सेस, अभ्यासक्रम, विविध विषयातील अध्यापनशास्त्र आणि विद्यार्थी पाठिंबा या सर्वांचे उद्दिष्ट असेल, गुणवत्तेची जागतिक पातळी साध्य करणे.

## आंतरराष्ट्रीयीकरण

12.7 वर नमूद केलेल्या विविध उपक्रमांमुळे, भारतात शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढण्यास मदत होईल आणि, परदेशी संस्थांना भेट देण्याची, तिथे शिकण्याची, आपले क्रेडिट्स त्या संस्थांमध्ये हस्तांतरित करण्याची, किंवा तिथे संशोधन करण्याची इच्छा बाळगणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील. तसेच, या संधी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनादेखील भारतामध्ये उपलब्ध असतील. गुणवत्तेची जागतिक पातळी आणि 'घरात आंतरराष्ट्रीयीकरण' ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तसेच मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी, भारतीय विद्या (इंडोलॉजी), भारतीय भाषा, वैद्यकशास्त्रातील आयुष प्रणाली, योग, कला, संगीत, इतिहास, संस्कृती, आणि आधुनिक भारत यासारख्या विषयांमध्ये अभ्यासक्रम आणि कार्यक्रम, शास्त्र, सामाजिक शास्त्र आणि त्याही पलीकडच्या विषयांमधील आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रसंगोचित अभ्यासक्रम, सामाजिक सहभागासाठी अर्थपूर्ण संधी, राहायची चांगली सुविधा आणि कॅम्पसमध्येच उपलब्ध असलेल्या मदतीच्या सोयी यासारख्या सुविधांचा विकास केला जाईल.

12.8 भारताला विश्व गुरू या भूमिकेत पुनर्स्थापित करण्यासाठी, परवडणाऱ्या शुल्कात उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणारे जागतिक अध्ययनाचे ठिकाण या दृष्टीने भारताचा विकास करण्यात येईल. बाहेरच्या देशातून येणाऱ्या

विद्यार्थ्यांचे स्वागत करणे आणि त्यांना सहाय्य करणे याच्याशी संबंधित सर्व बाबींमध्ये समन्वय साधण्यासाठी, परदेशी विद्यार्थी असलेल्या प्रत्येक HEI मध्ये एक आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कार्यालय स्थापित करण्यात येईल. उच्च दर्जाच्या परदेशी संस्थांबरोबर संशोधन/अध्यापन, सहयोग आणि अध्यापक/विद्यार्थी देवाणघेवाण याला प्रोत्साहन दिले जाईल, आणि इतर देशांबरोबर एकमेकांना फायदेशीर ठरतील अशा योग्य MOUs वर स्वाक्षरी करण्यात येईल. (उत्कृष्ट) अतिशय चांगली कामगिरी करीत असलेल्या भारतीय विद्यापीठांना इतर देशांमध्ये कॅम्पस स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल, आणि त्याचप्रमाणे, काही निवडक विद्यापीठांना - उदा. जगातील सर्वांत चांगल्या 100 विद्यापीठांपैकी काही विद्यापीठांना - भारतात कार्यरत होण्यासाठी मदत केली जाईल. अशा विद्यापीठांचा भारतातील प्रवेश सुकर करण्यासाठी, कायदेशीर आराखडा तयार करण्यात येईल आणि अशा विद्यापीठांना, भारतातील स्वायत्तता असलेल्या इतर संस्थांप्रमाणेच नियमन, शासन आणि आशय यांच्याशी संबंधित नियमांमध्ये विशेष सवलती दिल्या जातील. याशिवाय, भारतीय आणि जागतिक संस्थांमधील संशोधन सहयोग आणि विद्यार्थी देवाणघेवाणीला विशेष प्रयत्नांद्वारे प्रोत्साहन दिले जाईल. पदवी प्रदान करण्याच्यादृष्टीने, प्रत्येक HEI च्या अपेक्षा लक्षात घेऊन, जिथे योग्य असेल तिथे, परदेशी विद्यापीठांमध्ये मिळवलेली क्रेडिट्स विचारात घ्यायला मान्यता दिली जाईल.

### विद्यार्थी उपक्रम आणि सहभाग

12.9. विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेतील प्रमुख हितसंबंधी घटक आहे. उच्च-गुणवत्तेच्या अध्यापन-अध्ययन प्रक्रियेसाठी उत्साही कॅम्पस असणे आवश्यक आहे. याबाबतीत, विद्यार्थ्यांना क्रीडा, सांस्कृतिक/कला क्लब, पर्यावरण-क्लब, ॲक्टिव्हिटी क्लब, समाज सेवा प्रकल्प इ.मध्ये सहभागी होण्याच्या भरपूर संधी दिल्या जातील. ताणतणाव आणि भावनिक मुद्दे हाताळण्यासाठी प्रत्येक शिक्षण संस्थेत समुपदेशन यंत्रणा असतील. याव्यतिरिक्त, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वसतिगृहांसारख्या आवश्यक त्या सुविधा पुरवण्याकरता एक पद्धतशीर व्यवस्था निर्माण केली जाईल. सर्व HEI त्यांच्या संस्थांमधील सर्व विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार वैद्यकीय सुविधा सुनिश्चित करतील.

### विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य

12.10. विविध उपाययोजनांद्वारे विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. SC, ST, OBC आणि इतर SEDG मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस आर्थिक प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जातील. शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणे, आधार देणे आणि त्यांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार करण्यात येईल. खासगी उच्च शिक्षण संस्थांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने शुल्कमाफी आणि शिष्यवृत्ती द्यावी यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

## 13. प्रेरित, उत्साही आणि सक्षम शिक्षक

13.1. कोणत्याही उच्च शिक्षण संस्थेच्या यशाचा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षकांची गुणवत्ता आणि त्यांचा सहभाग. उच्च शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यात शिक्षकांची निर्णायक भूमिका असल्याची दखल घेऊन, त्यांच्या भरतीची आणि करिअर प्रगतीची व्यवस्था लावण्यासाठी आणि शिक्षकांच्या नियुक्तीमध्ये विविध गटांना योग्य प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी गेल्या काही वर्षांत विविध उपक्रम राबवले गेले आहेत. सार्वजनिक संस्थांमधील कायमस्वरुपी शिक्षकांच्या मानधनाची पातळीही मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. शिक्षकांना व्यावसायिक विकासाच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दिशेनेही विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत. मात्र शैक्षणिक व्यवसायाच्या दर्जात अशा प्रकारच्या अनेक सुधारणा करूनदेखील, HEI मध्ये शिक्षण, संशोधन आणि कामाच्या

बाबतीत शिक्षकांची प्रेरणा इच्छित स्तरापेक्षा खूपच कमी आहे. प्रत्येक शिक्षक सदस्य तिचे/त्याचे विद्यार्थी, संस्था आणि व्यवसायाच्या प्रगतीसाठी आनंदी, उत्साही, सहभागी आणि प्रेरित असेल हे सुनिश्चित करण्यासाठी, अध्यापकांच्या प्रेरणेची पातळी कमी असण्याच्या विविध कारणांचे निराकरण केले पाहिजे. यादृष्टीने, HEI मध्ये सर्वोत्कृष्ट, प्रेरित आणि सक्षम अध्यापक असावेत हे लक्ष्य साध्य करण्यासाठी या धोरणात पुढील उपक्रमांची शिफारस केली आहे.

13.2. सर्वांत मूलभूत उपाय म्हणजे, सर्व HEI पायाभूत सोयीसुविधांसह सुसज्ज ठेवल्या जातील ज्यात, पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छ आणि वापरात असलेली शौचालये, भित्ती फळे, कार्यालये, अध्यापन साहित्य पुरवठा, ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि सुखदायी वर्गखोल्या आणि कॅम्पस यांचा समावेश असेल. प्रत्येक वर्गखोलीत अद्ययावत शैक्षणिक तंत्रज्ञान उपलब्ध असेल. त्यामुळे अधिक चांगला अध्ययन अनुभव मिळू शकेल.

13.3. अध्यापन कर्तव्यांच्या बाबतीत अतिरेकदेखील केला जाणार नाही आणि विद्यार्थी-शिक्षकांचे गुणोत्तर खूप जास्त असणार नाही, जेणेकरून अध्यापनाची प्रक्रिया आनंददायी राहील आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी, संशोधन करण्यासाठी आणि विद्यापीठाच्या इतर उपक्रमांसाठी त्यांना पुरेसा वेळ मिळेल. शिक्षकांची नियुक्ती स्वतंत्र संस्थांमध्ये केली जाईल आणि सामान्यपणे या संस्थेतून त्या संस्थेत त्यांची बदली होऊ शकणार नाही जेणेकरुन त्यांच्यात त्यांच्या संस्थेबद्दल आणि समुदायाबद्दल खऱ्या अर्थाने आपलेपणाची भावना निर्माण होईल, त्यांच्याशी ते जोडले जातील आणि त्यांच्याप्रती वचनबद्ध बनतील.

13.4. शिक्षकांना, पाठ्यपुस्तक व वाचन सामग्री निवडण्याचे, असाइनमेंट व मूल्यांकन यांसह, मंजूर चौकटीत राहून त्यांच्या स्वतःच्या अभ्यासक्रमाच्या आणि अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोनांची रचना करण्याचे स्वातंत्र्य देण्यात येईल. शिक्षकांना, स्वत:ला योग्य वाटेल अशा नाविन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन, संशोधन आणि सेवा करण्याचे अधिकार देणे, ही खऱ्या अर्थाने उत्कृष्ट आणि कल्पक काम करण्यासाठी प्रेरक व सक्षम करणारी बाब ठरेल.

13.5. योग्य पुरस्कार, पदोन्नती, सन्मान आणि संस्थेच्या नेतृत्वात सहभाग याद्वारे उत्कृष्टतेस प्रोत्साहित केले जाईल. दरम्यान, मूलभूत निकषांनुसार कामगिरी न करणाऱ्या शिक्षकांना जबाबदार धरले जाईल.

13.6. उत्कृष्टतेस चालना देण्याचा अधिकार असलेल्या स्वायत्त संस्थांच्या दूरदृष्टीनुसार, HEI मध्ये शिक्षकांच्या भरतीसाठी स्पष्टपणे परिभाषित, स्वतंत्र आणि पारदर्शक निकष असतील. सध्याची भरती प्रक्रिया सुरू ठेवली जाणार असली तरीदेखील भावी काळातील उत्कृष्टता सुनिश्चित करण्यासाठी एक 'टेन्युअर-ट्रॅक' म्हणजेच योग्य प्रोबेशन (परिवीक्षा) कालावधी ठरवण्यात येईल. जास्त परिणामकारक संशोधन आणि योगदानाची दखल घेण्यासाठी एक जलद गतीने काम करणारी पदोन्नतीची प्रणाली असेल. प्रत्येक HEI कडून कामगिरीच्या योग्य मूल्यांकनासाठी अनेक निकष असलेली प्रणाली कार्यकाळ (म्हणजे उमेदवारी संपवून नोकरीवर कायम  झाल्यानंतरचा काळ) ठरवणे, पदोन्नती, पगारवाढ, कामाची दखल इ. तसेच सहकाऱ्यांचे आणि विद्यार्थ्यांचे अभिप्राय, शिकवण्यात आणि अध्यापनशास्त्रात नाविन्यपूर्णता, संशोधनाची गुणवत्ता आणि परिणाम, व्यावसायिक विकासासाठीचे उपक्रम, आणि संस्थेच्या आणि समाजाच्या सेवेचे इतर प्रकार यांचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी विकसित केली जाईल आणि त्यांच्या संस्थात्मक विकास योजनेत (IDP) ती स्पष्टपणे नमूद केली जाईल.

13.7 उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणारे उत्कृष्ट आणि उत्साही संस्थात्मक नेते असणे, ही काळाची गरज आहे. उत्कृष्ट आणि उत्साही प्रभावी संस्थात्मक नेतृत्व संस्थेच्या आणि शिक्षकांच्या यशासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. उच्च शैक्षणिक आणि सेवाकाल पात्रता यांच्या बरोबरच सिद्ध झालेली नेतृत्व तसेच व्यवस्थापन कौशल्ये

असलेल्या शिक्षकांना लवकरच शोधले जाईल आणि त्यांना नेतृत्व पदक्रमांसाठी प्रशिक्षित केले जाईल. नेतेपद कधीही रिकामे राहणार नाही तर संस्थेचे काम सुरळीतपणे चालणे सुनिश्चित करण्यासाठी नेतृत्वातील बदलाच्या काळात ओव्हरलॅपिंग कालावधीची तरतूद असेल. संस्थात्मक नेते उत्कृष्टतेची संस्कृती तयार करण्याचे ध्येय ठेवतील. अशा संस्कृतीत शिक्षक सदस्यांना आणि सर्व HEI नेत्यांना उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण अध्यापन, संशोधन, संस्थेतील सेवा, आणि समाजात प्रसार या गोष्टींसाठी प्रोत्साहित करणे, इन्सेन्टीव्ह देणे शक्य होईल.

## 14. उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकता

14.1 चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यावर अनेक शक्यतांचे भांडार खुले होते, त्यामुळे व्यक्ती आणि समुदाय हे दोन्हीही वंचिततेच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडू शकतात. याच कारणासाठी, चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या संधी सर्व व्यक्तींना उपलब्ध करून देणे, हे सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक असले पाहिजे. हे धोरण SEDG वर विशेष भर देतानाच, सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाला समान प्रवेश मिळेल, हे सुनिश्चित करते.

14.2 शिक्षण व्यवस्थेतून SEDG वगळले जाण्याची अनेक कारणे शाळा आणि उच्च शिक्षण क्षेत्रात समानच आहेत. त्यामुळे समानतेचा दृष्टिकोन शाळा आणि उच्च शिक्षण क्षेत्रात सारखाच असला पाहिजे. त्याशिवाय शाश्वत सुधारणा सुनिश्चित करण्यासाठी विविध स्तरांमध्ये सातत्य असले पाहिजे. त्यामुळे उच्च शिक्षणात समानता आणि समावेशकतेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेली धोरणे शालेय शिक्षणासाठीसुद्धा वापरली पाहिजेत.

14.3 वगळले जाण्याचे काही घटक विशेषत: किंवा लक्षणीयरीत्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत जास्त तीव्र आहेत. त्यांच्यावर विशिष्ट उपाय काढले पाहिजेत; या घटकांमध्ये उच्च शिक्षणातील संधींच्या माहितीचा अभाव, उच्च शिक्षण घेण्याच्या आर्थिक अपॉरच्युनिटी कॉस्ट, आर्थिक मर्यादा, प्रवेश प्रक्रिया, भौगोलिक आणि भाषिक अडथळे, अनेक उच्च शिक्षण कार्यक्रमांची रोजगार मिळवून देण्याची कमी क्षमता आणि विद्यार्थी सहाय्याच्या योग्य प्रणालींचा अभाव यांचा समावेश आहे.

14.4 या हेतूसाठी, उच्च शिक्षणाशी संबंधित विशिष्ट कृती सर्व सरकारे आणि HEI करतील:

14.4.1 सरकारांनी उचलायची पावले

a) SEDG च्या शिक्षणासाठी योग्य सरकारी निधी बाजूला काढणे.
b) SEDG च्या जास्त GER साठी स्पष्ट उद्दिष्टे निश्चित करणे.
c) HEI च्या प्रवेशांमध्ये लिंग अधिष्ठित संतुलन (Gender Balance) आणणे
d) महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये आणि जास्त संख्येने SEDG असलेल्या खास शैक्षणिक विभागांमध्ये उच्च दर्जाच्या अधिक HEI स्थापन करून प्रवेश संख्या सुधारणे.
e) स्थानिक/भारतीय भाषांमध्ये किंवा दोन भाषांमध्ये शिकवणाऱ्या HEIs ना अधिक आर्थिक मदत आणि शिष्यवृत्त्या देणे.
f) सरकारी आणि खाजगी दोन्ही HEIs मधील SEDG ना अधिक आर्थिक मदत आणि शिष्यवृत्त्या देणे
g) उच्च शिक्षणातील संधीविषयी आणि SEDG साठीच्या शिष्यवृत्त्यांविषयी प्रसार कार्यक्रम तयार करणे
h) अधिक सहभागासाठी आणि अध्ययन निष्पत्तींसाठी तंत्रज्ञान साधने विकसित करणे आणि त्यांना सहाय्य करणे.

14.4.2 सर्व HEI नी उचलायची पावले

a) उच्च शिक्षण घेण्यासाठी असणाऱ्या संधीचा खर्च आणि शुल्क यासाठी होणारी आर्थिक हानी कमी करणे.
b) सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी अधिक आर्थिक मदत पुरवणे.
c) उच्च शिक्षणाच्या संधी आणि शिष्यवृत्त्यांचा प्रसार करण्यासाठी कार्यक्रम करणे.
d) प्रवेश प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक करणे.
e) अभ्यासक्रम अधिक सर्वसमावेशक करणे.
f) उच्च शिक्षण कार्यक्रमांची रोजगार क्षमता वाढवणे.
g) भारतीय भाषांमध्ये आणि दोन भाषांमध्ये शिकवले जाणारे अधिक पदवी अभ्यासक्रम विकसित करणे.
h) सर्व इमारती आणि सुविधा व्हील-चेअरवरून प्रवेश करण्यासाठी आणि दिव्यांग लोकांसाठी सुलभ असतील, हे सुनिश्चित करणे.
i) वंचित शैक्षणिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सांधणारे (ब्रिज) अभ्यासक्रम विकसित करणे.
j) सुयोग्य समुपदेशन आणि मार्गदर्शन कार्यक्रमांद्वारे अशा सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक-भावनिक आणि शैक्षणिक आधार देणे तसेच मार्गदर्शन करणे.
k) लिंग-ओळख समस्या आणि अभ्यासक्रमासह HEI च्या सर्व पैलूंमध्ये तिच्या समावेशाबद्दल सर्व शिक्षक, समुपदेशक, आणि विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे.
l) भेदभाव-विरोधी आणि छळवणूक-विरोधी सर्व नियम काटेकोरपणे लागू करणे.
m) SEDG चा सहभाग वाढवण्यासाठी कृती करण्याकरता विशिष्ट योजना असलेल्या संस्थात्मक विकास योजना बनवणे. यामध्ये वरील सर्व मुद्दे समाविष्ट असतील, पण योजना या मुद्द्यांपुरतीच मर्यादित नसेल.

## 15. शिक्षकांचे शिक्षण

15.1 पुढच्या पिढीला आकार देणाऱ्या शालेय शिक्षकांचा संघ तयार करण्याकरता शिक्षकांचे शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षक तयार करण्याच्या कामासाठी बहुशाखीय दृष्टिकोन आणि ज्ञान, प्रवृत्ती आणि मूल्ये तयार होणे आणि सर्वोत्तम मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली सराव विकसित करणे आवश्यक असते. शिक्षकांमध्ये शिक्षण आणि अध्यापनशास्त्रातील सर्वांत नवीन प्रगतीबरोबरच भारतीय मूल्ये, भाषा, ज्ञान, लोकस्वभाव, आणि आदिवासी परंपरांसह परंपरा रुजलेल्या असणे आवश्यक आहे.

15.2 सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या न्यायाधीश जे.एस.वर्मा आयोगाच्या (2012) मते, 10000 पेक्षा जास्त संख्या असलेल्या स्वतंत्र TEIs पैकी बहुतेक सर्व गंभीरपणे शिक्षकांच्या शिक्षणाचा प्रयत्नसुद्धा करत नाही आहेत, तर पैसे घेऊन पदव्या विकत आहेत. आत्तापर्यंतचे नियामक प्रयत्न या व्यवस्थेतील गैरव्यवहार बंद करण्यासाठी तोकडे पडले आहेत तसेच गुणवत्तेची मूलभूत मानकेसुद्धा लागू करू शकलेले नाहीत आणि वास्तविक या क्षेत्रातील उत्तमता आणि नाविन्यपूर्णतेची वाढ कमी करण्याचा नकारात्मक परिणाम यामुळे झालेला आहे. त्यामुळे या क्षेत्राचे मानदंड उंचावण्यासाठी आणि सचोटी, विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि उच्च दर्जा पुनर्स्थापित करण्यासाठी शिक्षक शिक्षणाचे क्षेत्र आणि त्याची नियामक प्रणाली या दोन्हींमध्ये तातडीने कृती करून मूलभूत बदल करण्याची गरज आहे.

15.3 अध्यापनाच्या व्यवसायाबद्दलचा आदर पुनर्स्थापित करण्यासाठी आवश्यक असलेली सचोटीची आणि विश्वासार्हतेची पातळी सुधारण्यासाठी आणि गाठण्यासाठी मूलभूत शैक्षणिक निकषात न बसणाऱ्या सुमार दर्जाच्या

आणि अकार्यरत शिक्षण संस्थांना (TEIs) त्यांनी केलेल्या नियमांच्या उल्लंघनाबाबत सुधारणेसाठी एक वर्ष दिल्यावर, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी नियामक प्रणाली सक्षम केली जाईल. 2030 पर्यंत, फक्त शैक्षणिकदृष्ट्या मजबूत, बहुशाखीय आणि एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रमच सुरू असतील.

15.4 शिक्षक शिक्षणासाठी, बहुशाखीय इनपुट्स आवश्यक असल्यामुळे, आणि उच्च दर्जा असलेली अध्यापनाची सामग्री तसेच अध्यापनशास्त्राचे शिक्षण देणे आवश्यक असल्यामुळे, सर्व शिक्षक शिक्षण कार्यक्रम संयुक्त बहुशाखीय संस्थांमध्येच राबवले जावेत. त्यासाठी सर्व बहुशाखीय विद्यापीठे आणि महाविद्यालये- शिक्षण विभाग स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवतील. हे विभाग शिक्षणाच्या विविध पैलूंबद्दल आधुनिक संशोधन करण्याबरोबरच, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, न्युरोसायन्स, भारतीय भाषा अशा इतर विभागांच्या सहयोगाने B.Ed. कार्यक्रमसुद्धा राबवतील. त्याशिवाय, स्वतंत्र TEIs ना 2030 पर्यंत बहुशाखीय संस्थामध्ये रुपांतरीत व्हावे लागेल, कारण त्यांनासुद्धा 4 वर्षांचा एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा लागेल.

15.5 अशा बहुशाखीय HEI कडून चालवण्यात येणारा 4 वर्षांचा एकात्मिक B.Ed. अभ्यासक्रम ही 2030 पर्यंत शालेय शिक्षकांसाठी किमान पदवी पात्रता असेल. 4 वर्षांचा एकात्मिक B.Ed. अभ्यासक्रम म्हणजे शिक्षण तसेच भाषा, इतिहास, संगीत, गणित, संगणक शास्त्र, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, कला, शारीरिक शिक्षण इ. अशा एका विषयात स्पेशलायझेशन असलेली ड्यूएल मेजर सर्वांगीण पदवी असेल. शिक्षकांच्या शिक्षणामध्ये अत्याधुनिक अध्यापनशास्त्र शिकवण्याव्यतिरिक्त, समाजशास्त्र, इतिहास, विज्ञान, मानसशास्त्र, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण, पायाभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र, भारत आणि त्याची मूल्ये/संस्कृती/कला/परंपरा याविषयीचे ज्ञान, या आणि अशा इतर विषयांचे मूलभूत प्रशिक्षण समाविष्ट असेल. 4 वर्षांचा एकात्मिक B.Ed. अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या HEI द्वारे, एखाद्या विशिष्ट विषयात बॅचलरची पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांकरता, 2 वर्षांचा B.Ed. अभ्यासक्रमदेखील उपलब्ध करून देता येईल. विशिष्ट विषयात 4 वर्षांचे पदवीपूर्व शिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांकरता 1 वर्षाचा B.Ed. अभ्यासक्रम उपलब्ध करून देता येईल. असामान्य विद्यार्थ्यांना 4 वर्षे, 2 वर्षे आणि 1 वर्षाच्या B.Ed. कार्यक्रमांकडे आकर्षित करण्याच्या दृष्टीने, गुणवान विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या जाहीर करण्यात येतील.

15.6. शिक्षणाचे आणि त्याच्याशी संबंधित शाखांचे तसेच विशिष्ट विषयांचे अनेक तज्ज्ञ उपलब्ध असल्याची सुनिश्चिती, शिक्षकांसाठी शिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणाऱ्या HEI कडून केली जाईल. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेला अनेक सरकारी आणि खाजगी शाळांबरोबर सहयोगाने काम करता येईल. संभाव्य शिक्षक अशा शाळांमध्ये समाजसेवा, प्रौढ आणि व्यावसायिक शिक्षण यासारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याबरोबर विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कामदेखील करतील.

15.7. शिक्षकांच्या शिक्षणाची मानके एकसमान राखण्यासाठी, पूर्व-सेवा शिक्षक तयारी कार्यक्रमासाठी दिला जाणारा प्रवेश, राष्ट्रीय चाचणी एजन्सी/नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतल्या जाणाऱ्या योग्य विषयांच्या आणि योग्यता चाचण्यांच्या माध्यमातून दिला जाईल, आणि देशाची भाषिक आणि सांस्कृतिक विविधता लक्षात घेता ही प्रवेश प्रक्रिया प्रमाणीकृत केली जाईल.

15.8 शिक्षण विभागातील अध्यापकांच्या प्रोफाईलमध्ये वैविध्य असणे आवश्यक मानले जाईल आणि अध्यापन/क्षेत्र/संशोधनातील अनुभवाला अतिशय महत्त्व दिले जाईल. शालेय शिक्षणाशी निगडीत सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रांमध्ये (उदा. मानसशास्त्र, बाल विकास, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र) प्रशिक्षण घेतलेले अध्यापक तसेच, विज्ञान शिक्षण, गणित शिक्षण, सामाजिक शास्त्राचे शिक्षण, आणि

भाषाशास्त्राचे शिक्षण या कार्यक्रमांमधील अध्यापक यांना आकर्षित करून त्यांना शिक्षक-शिक्षण संस्थांमध्ये कायम राखण्यासाठी प्रयत्न केला जाईल. यामुळे शिक्षकांच्या बहुशाखीय शिक्षणाला आणि संकल्पनात्मक विकासाला बळकटी मिळेल.

15.9 Ph.D. च्या सर्व शाखांमधील सर्व नवीन प्रवेशार्थींना, त्यांनी निवडलेल्या Ph.D. विषयाशी संबंधित अध्यापन/शिक्षण/अध्यापनशास्त्र/लेखन यातील क्रेडिट-आधारित अभ्यासक्रमासाठी, डॉक्टरेट प्रशिक्षण कालावधीदरम्यान, प्रवेश घेणे आवश्यक आहे. संशोधन करणाऱ्या अनेक विद्वानांना पुढे जाऊन त्यांनी निवडलेल्या शाखेमध्ये अध्यापक किंवा सार्वजनिक प्रतिनिधी/संवादकाची भूमिका करायची असल्याने, त्यांना अध्यापनशास्त्रातील प्रथा/पध्दती, अभ्यासक्रमाची रचना करणे, विश्वासार्ह मूल्यांकन प्रणाली, संवाद साधणे आणि अशाच प्रकारच्या इतर गोष्टींचा अनुभव मिळेल याची सुनिश्चिती केली जाईल. Ph.D. च्या विद्यार्थ्यांना, अध्यापन सहाय्यकाच्या भूमिकेतून किंवा इतर साधनांच्या माध्यमातून, प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव घेऊन त्याचे किमान तास पूर्ण करावे लागतील. यासाठी देशभरातील विद्यापीठांमधील Ph.D. कार्यक्रमाची पुनर्रचना केली जाईल.

15.10 विद्यमान संस्थात्मक व्यवस्था आणि चालू उपक्रमांच्या माध्यमातून, महाविद्यालय आणि विद्यापीठातील शिक्षकांसाठी सेवांतर्गत सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाचे प्रशिक्षण, तसेच सुरू राहील; दर्जेदार शिक्षणासाठी समृद्ध अध्यापन-अध्ययन प्रक्रियेची गरज पूर्ण करण्यासाठी, या व्यवस्था आणि उपक्रमांना बळकटी देऊन त्यांचा विस्तार केला जाईल. शिक्षकांच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी SWAYAM/DIKSHA (स्वयं/दीक्षा) यासारखे तंत्रज्ञानाचे व्यासपीठ/प्लॅटफॉर्म वापरायला प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे, प्रमाणीकृत प्रशिक्षण कार्यक्रम कमी कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षकांपर्यंत पोचवता येतील.

15.11 राष्ट्रीय मार्गदर्शक आयोग /नॅशनल मिशन फॉर मेंटरिंगची स्थापना केली जाईल. यामध्ये विद्यापीठ/महाविद्यालयाच्या शिक्षकांना अल्प किंवा दीर्घ काळासाठी सल्ला/व्यावसायिक मदत द्यायला उत्सुक असलेल्या तसेच भारतीय भाषांमध्ये शिकवायची क्षमता असलेल्या वरिष्ठ/निवृत्त अध्यापकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असेल.

## 16. व्यावसायिक शिक्षणाची पुनर्कल्पना

16.1 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या (2012-2017) अंदाजानुसार, औपचारिक व्यवसाय शिक्षण मिळालेल्या, 19 ते 24 वयोगटातील भारतीय कामगारांचे प्रमाण अतिशय कमी होते (5% पेक्षा कमी) तर अमेरिकेमध्ये हेच प्रमाण 52% होते, जर्मनीमध्ये 75% आणि दक्षिण कोरियामध्ये 96% इतके जास्त होते. यावरून हेच लक्षात येते की भारतामध्ये व्यवसाय शिक्षणाचा प्रसार झपाट्याने करणे अतिशय आवश्यक झाले आहे.

16.2 व्यावसायिक (व्होकेशनल) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अल्प असण्याचे एक मुख्य कारण म्हणजे व्यावसायिक शिक्षणात यापूर्वी प्रामुख्याने इयत्ता 11-12 वी आणि इयत्ता 8 वी व त्यावरील शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित केले होते. याव्यतिरिक्त, व्यावसायिक विषयांमधून इयत्ता 11-12 वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांकडे निवडलेल्या व्यवसायामध्ये उच्च शिक्षण पुढे चालू ठेवण्यासाठी नेहमीच स्पष्ट असे मार्ग उपलब्ध नसतात. सर्वसाधारण उच्च शिक्षणासाठी प्रवेशाचे निकषदेखील व्यावसायिक शिक्षणाची पात्रता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या दृष्टीने बनवलेले नव्हते, ज्यामुळे "मुख्य प्रवाह" किंवा "शैक्षणिक" शिक्षणातील त्यांच्या समकक्ष विद्यार्थ्यांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागतो. यामुळे व्यावसायिक

शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उन्नतीचा मार्ग पूर्णपणे बंद झाला, जी समस्या नुकतीच 2013 मध्ये राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) घोषित करून सोडवण्यात आली.

16.3 व्यावसायिक शिक्षण हे मुख्य प्रवाहातील शिक्षणापेक्षा हलक्या दर्जाचे आणि मुख्यत्वेकरुन ते मुख्य प्रवाहातील शिक्षण न झेपणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे असे मानले जाते. या समजुतीचा विद्यार्थ्यांच्या निवडीवर परिणाम होतो. ही एक गंभीर समस्या असून, भविष्यात विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण कशाप्रकारे दिले जाईल, याचा संपूर्णपणे कायापालट करूनच तिचे निराकरण केले जाऊ शकते.

16.4 व्यावसायिक शिक्षणाशी संबंध जोडल्या गेलेल्या सामाजिक दर्जाच्या उतरंडीवर मात करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे आणि यासाठी टप्प्याटप्प्याने सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमांचे मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये एकात्मीकरण करणे आवश्यक आहे. लहान वयातच पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शाळेत व्यवसायांची ओळख करून देण्यास सुरुवात करून, गुणवत्तापूर्ण व्यावसायिक शिक्षणाचे उच्च शिक्षणात सहजतेने एकात्मीकरण केले जाईल. प्रत्येक मूल किमान एक व्यवसाय शिकेल आणि इतर अनेक व्यवसायांची त्याला ओळख करून दिली जाईल, हे यात सुनिश्चित केले जाईल. यामुळे श्रमप्रतिष्ठा आणि भारतीय कला व कारागिरी यांचा समावेश असलेल्या विविध व्यवसायांचे महत्त्व यांवर भर दिला जाईल.

16.5 2025 पर्यंत, किमान 50% विद्यार्थ्यांना शालेय आणि उच्चशिक्षण व्यवस्थेद्वारे व्यावसायिक शिक्षणाची ओळख झालेली असेल, ज्यासाठी लक्ष्ये आणि कालमर्यादांसह एक स्पष्ट कृती योजना विकसित केली जाईल. शाश्वत विकास लक्ष्य 4.4 याच्याशी हे सुसंगत आहे आणि भारताच्या लोकसंख्येच्या लाभांशाची (डेमोग्राफिक डिव्हिडंड) संपूर्ण क्षमता उपयोगात आणण्यास हे मदत करेल. GER साठी लक्ष्ये ठरवताना व्यावसायिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या संख्येचादेखील विचार केला जाईल. व्यावसायिक क्षमतांचा विकास 'शैक्षणिक' किंवा इतर क्षमतांच्या विकासासोबतच केला जाईल. पुढील दशकात टप्प्याटप्प्याने सर्व माध्यमिक शाळांच्या शैक्षणिक कार्यक्रमात व्यावसायिक शिक्षण समाविष्ट केले जाईल. यादृष्टीने, माध्यमिक शाळा ITI, पॉलिटेक्निक, स्थानिक उद्योग इत्यादींसोबतदेखील सहयोग करतील. शाळांमध्ये हब आणि स्पोक मॉडेलनुसार कौशल्य प्रयोगशाळांची स्थापना व निर्मिती केली जाईल, त्यामुळे इतर शाळांना ही सुविधा वापरता येईल. उच्च शिक्षण संस्था स्वतःहून किंवा उद्योग आणि स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीने व्यावसायिक शिक्षण देतील. 2013 मध्ये सुरु करण्यात आलेल्या B.Voc. पदव्या अस्तित्वात राहतीलच, पण 4 वर्षांच्या बहुशाखीय पदवी कार्यक्रमांसह इतर सर्व पदवी कार्यक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात येतील. HEI यांना सुद्धा व्यावहारिक कौशल्यांसह विविध कौशल्यांचे अल्प-मुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवण्याची देखील परवानगी दिली जाईल. 'लोक विद्या', म्हणजेच भारतात विकसित केलेले महत्त्वपूर्ण व्यावसायिक ज्ञान, विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये एकात्मिक करून उपलब्ध करून दिले जाईल. ODL पद्धतीने व्यावसायिक अभ्यासक्रम शिकवण्याची शक्यताही आजमावून पाहिली जाईल.

16.6 पुढील दशकात टप्प्याटप्प्याने सर्व शाळा आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक शिक्षण एकात्मिक केले जाईल. कौशल्य तफावत विश्लेषणाच्या आणि स्थानिक संधींच्या मॅपिंगच्या आधारे व्यावसायिक शिक्षणासाठी लक्ष केंद्रित करण्याची क्षेत्रे निवडली जातील. या प्रयत्नावर देखरेख करण्यासाठी MHRD, व्यावसायिक शिक्षणातील तज्ज्ञ आणि सर्व मंत्रालयाच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली व्यावसायिक शिक्षणाच्या एकात्मीकरणासाठी राष्ट्रीय समिती (NCIVE), उद्योग क्षेत्राच्या सहकार्याने स्थापन करेल.

16.7 सुरुवातीला याचा अवलंब केलेल्या स्वतंत्र संस्थांनी प्रभावी कार्य करणारी मॉडेल्स आणि पद्धती शोधण्यासाठी नाविन्यपूर्णता वापरली पाहिजे आणि नंतर NCIVE ने स्थापन केलेल्या यंत्रणेद्वारा ही माहिती इतर संस्थांशी शेअर केली पाहिजे, म्हणजे व्यावसायिक शिक्षणाचा आवाका वाढेल. उच्च शिक्षण संस्थादेखील व्यावसायिक शिक्षण आणि अप्रेंटिसशिपच्या विविध मॉडेल्सचे प्रयोग करून पाहतील. उच्च शिक्षण संस्थांमध्ये व्यवसाय उद्योगांचा सहभागाने अंतःपोषण (इन्क्युबेशन) केंद्रे सुरू केली जातील.

16.8 राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा प्रत्येक व्यवसाय शाखेसाठी आणि व्यवसायासाठी अधिक तपशीलवार असेल. पुढे, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने बनवलेल्या व्यवसायांच्या आंतरराष्ट्रीय मानक वर्गीकरणाशी भारतीय मानके सुसंगत केली जातील. हा आराखडा पूर्व शिक्षणास मान्यता देण्यासाठी आधार देईल. याद्वारे, औपचारिक शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांचे व्यावहारिक अनुभव आराखड्यातील संबंधित पातळीशी सुसंगत करून त्यांना पुन्हा समाविष्ट करून घेतले जाईल. क्रेडिट-आधारित आराखडा 'सामान्य' आणि व्यावसायिक शिक्षणामधून एकमेकांमध्ये प्रवेश घेणे देखील सुलभ करेल.

## 17. नवीन राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशनच्या माध्यमातून दर्जेदार शैक्षणिक संशोधनाला चालना देणे

17.1 ज्ञान निर्मिती आणि संशोधन या गोष्टी मोठ्या आणि जिवंत अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आणि ती टिकवून ठेवण्यासाठी, समाजाच्या उत्थानासाठी, आणि अधिक मोठे यश मिळवण्याकरता देशाला सातत्याने प्रेरित करण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. खरोखरच सर्वांत समृद्ध संस्कृतींपैकी काही (उदा. भारत, मेसोपोटेमिया, इजिप्त आणि ग्रीस) ते आधुनिक युगापर्यंत (उदा. अमेरिका, जर्मनी, इस्राईल, दक्षिण कोरीया आणि जपान) संस्कृती म्हणजे मजबूत ज्ञानाधारित समाज होते / आहेत. त्यांनी विज्ञान, तसेच कला, भाषा आणि संस्कृती या क्षेत्रात नवीन ज्ञानाचे मूलभूत योगदान करून आपल्या बौद्धिक आणि भौतिक संपत्तीमधील मोठा वाटा मिळवला. त्यामुळे केवळ त्यांच्याच नव्हे तर जगभरातील इतर संस्कृतींचेसुद्धा वर्धन आणि उत्थान झाले.

17.2 सध्या जगात घडणाऱ्या जलद बदलांकडे पाहता संशोधनाची एक मजबूत परिसंस्था कदाचित पूर्वी कधीही नव्हती तितकी आत्ता महत्त्वाची झालेली आहे. उदा. हवामान बदल, लोकसंख्येची गतिशीलता आणि व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, आणि विस्तारणारी जागतिक बाजारपेठ, मशीन लर्निंगचा उदय आणि कृत्रिम बुद्धिमत्ता. जर भारताला या विभिन्न क्षेत्रांमध्ये नेतृत्व करायचे असेल आणि पुढील काही वर्षात आणि दशकांत आपल्याकडील मोठ्या प्रमाणावरील प्रतिभेचा खरोखर पूर्ण वापर करून पुन्हा एक आघाडीचा ज्ञानाधारित समाज बनायचे असेल, तर आपल्या देशाला आपल्या संशोधन क्षमतांचा लक्षणीय विस्तार करावा लागेल आणि विविध क्षेत्रांमध्ये उत्पादन करावे लागेल. आज कोणत्याही देशाच्या आर्थिक, बौद्धिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि तांत्रिक आरोग्यासाठी आणि प्रगतीसाठी संशोधनाचे महत्त्व पूर्वी कधीही नव्हते इतके वाढले आहे.

17.3 संशोधन अतिशय महत्त्वाचे असूनही, भारतातील संशोधन आणि नाविन्यपूर्णतेतील सध्याची गुंतवणूक GDP च्या फक्त 0.69% आहे तर अमेरिकेच्या बाबतीत हा आकडा 2.8%, इस्राईलच्या बाबतीत 4.3% आणि दक्षिण कोरीयाच्या बाबतीत 4.2% आहे.

17.4 भारताला आज ज्या सामाजिक आव्हानांचा सामना करायचा आहे, उदा. आपल्या सर्व नागरिकांसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची उपलब्धता आणि स्वच्छता, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्यनिगा, वाहतूक सुधारणा, हवेची गुणवत्ता, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा, त्यासाठी केवळ प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित दृष्टिकोनांची आणि उपायांची गरज नाही तर सामाजिक शास्त्रे आणि मानव्यशास्त्रे आणि देशातील विविध सामाजिक-

सांस्कृतिक आणि पर्यावरणीय आयामांच्या सखोल आकलनावरसुद्धा आधारित अशा दृष्टिकोनांची आणि उपायांची गरज आहे. या आव्हानांचा सामना करणे आणि त्यांच्यावर उपाययोजना करणे यासाठी विविध क्षेत्रांमध्ये उच्च दर्जाचे बहुशाखीय संशोधन भारतात करणे अनिवार्य आहे, आपण ते केवळ आयात करू शकत नाही; स्वत:साठी संशोधन करण्याच्या क्षमतेमुळे देशाला असे परदेशातील संबंधित संशोधन आयात करणे व ते आपल्या सोईप्रमाणे रुपांतरीत करून वापरणे सोपे जाते.

17.5 याशिवाय, सामाजिक समस्यांच्या उपायांमधील त्यांच्या मूल्याबरोबरच, कोणत्याही देशाची ओळख, प्रगती, आत्मिक/बौद्धिक समाधान आणि कल्पकता या गोष्टीसुद्धा देशाचा इतिहास, कला, भाषा आणि संस्कृती इ.द्वारे मोठ्या प्रमाणात साध्य केल्या जातात. विज्ञान आणि समाज शास्त्रातील शोधांबरोबरच कला आणि मानव्यशास्त्रातील संशोधनसुद्धा देशाच्या प्रगतीसाठी आणि आत्मज्ञानासाठी अतिशय महत्त्वाचे आहे.

17.6 भारतातील शैक्षणिक संस्थांमधील, विशेषत: उच्च शिक्षणात कार्यरत असलेल्या संस्थांमधील संशोधन आणि नवीन उपक्रम अतिशय महत्त्वाचे आहेत. संपूर्ण इतिहासात, जगातील उत्तमोत्तम विद्यापीठातील पुरावे हेच दर्शवतात की संशोधन आणि ज्ञान निर्मितीची मजबूत संस्कृती असलेल्या वातावरणातच अध्यापन आणि अध्ययनाची प्रक्रिया उत्तम प्रकारे घडते; आणि त्याचाच व्यत्यास म्हणजे जगातील सर्वोत्तम संशोधनातील बरेचसे संशोधन बहुशाखीय विद्यापीठांमध्ये घडते.

17.7 भारतामध्ये विज्ञान आणि गणितापासून कला आणि साहित्यापर्यंत ते उच्चारशास्त्र आणि भाषांपासून वैद्यकशास्त्र आणि कृषीपर्यंत अनेक क्षेत्रातील संशोधन आणि ज्ञान निर्मितीची मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. 21 व्या शतकात भारताने संशोधन आणि नाविन्यपूर्णतेचे नेतृत्व करण्यासाठी, एक सामर्थ्यशाली आणि प्रबुद्ध समाज तयार करण्यासाठी आणि जगातील सर्वांत मोठ्या तीन अर्थव्यवस्थांपैकी एक बनण्यासाठी हे अधिक बळकट करणे गरजेचे आहे.

17.8. त्यामुळे, हे धोरण भारतातील संशोधनाच्या गुणवत्तेत आणि प्रमाणात परिवर्तन घडवण्यासाठी एका सर्वसमावेशक दृष्टिकोनाची परिकल्पना करते. यामध्ये वैज्ञानिक पद्धतीवर आणि तार्किक विचारांवर भर देऊन शालेय शिक्षणात अधिक खेळ व शोधावर आधारित अध्ययनशैलीच्या दिशेने निश्चित बदल करण्याचा समावेश आहे. यामध्ये विद्यार्थ्यांची आवड आणि प्रतिभा ओळखण्यासाठी शाळांमध्ये करिअर समुपदेशन, विद्यापीठांमधील संशोधनास चालना देणे, सर्व HEI बहुशाखीय स्वरूपाच्या असणे आणि सर्वांगीण शिक्षणावर भर, पदवीपूर्व अभ्यासक्रमात संशोधन आणि इंटर्नशिपचा समावेश, संशोधनास योग्य महत्त्व देणारी अध्यापक करिअर व्यवस्थापन प्रणाली, आणि संशोधन व नाविन्यपूर्णता यांसाठीच्या वातावरणास प्रोत्साहन देणारे प्रशासन आणि नियामक बदल, यांचा समावेश असेल. हे सर्व पैलू देशात संशोधनाची मानसिकता विकसित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

17.9. या विविध घटकांचा समन्वयात्मक रीतीने विकास करण्यासाठी आणि त्यायोगे देशात खरोखरच गुणवत्तापूर्ण संशोधनात वेगाने वाढ करण्यासाठी राष्ट्रीय संशोधन संस्था/नॅशनल रिसर्च फाऊंडेशन (एनआरएफ) स्थापन करणे या धोरणात संकल्पित आहे. संशोधनाची संस्कृती आपल्या विद्यापीठांमध्ये भिनवणे हे NRF चे व्यापक उद्दिष्ट असेल. विशेषतः, NRF गुणवत्ता आधारित परंतु सहाध्यायी-पुनरावलोकित न्याय्य संशोधन अर्थसहाय्याचा एक विश्वासार्ह पाया प्रदान करेल, उत्कृष्ट संशोधनास उचित प्रोत्साहन आणि सन्मान देऊन देशात संशोधनाची संस्कृती विकसित करण्यास मदत करेल आणि, सध्या मर्यादित संशोधन क्षमता असलेल्या राज्य विद्यापीठांमध्ये आणि इतर सार्वजनिक संस्थांमध्ये संशोधन क्षमता अंकुरण्यासाठी आणि वाढवण्यासाठी महत्त्वाचे उपक्रम हाती घेईल. NRF सर्व शाखांमधील संशोधनास स्पर्धात्मकपणे अर्थसहाय्य करेल. यशस्वी संशोधनाचा सन्मान केला जाईल आणि जेथे

सुसंगत असेल तेथे, शासकीय संस्था तसेच उद्योग आणि खाजगी/देणगीदार संस्थांच्या सहयोगाने संशोधन प्रत्यक्ष वापरात आणले जाईल.

17.10. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (DST), अणु ऊर्जा विभाग (DAE), जैव तंत्रज्ञान विभाग (DBT), भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR), भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR), भारतीय इतिहास संशोधन परिषद (ICHR) आणि विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) सारख्या सध्या काही पातळीवर संशोधनास अर्थसहाय्य देणाऱ्या संस्था, तसेच विविध खाजगी आणि धर्मादाय संस्था, त्यांच्या प्राधान्यक्रम आणि गरजांनुसार संशोधनास स्वतंत्रपणे अर्थसहाय्य पुरवणे सुरू ठेवतील. मात्र, अर्थसहाय्य पुरवणाऱ्या इतर संस्थांशी NRF काळजीपूर्वक समन्वय साधेल आणि हेतूचा ताळमेळ सुनिश्चित करण्यासाठी आणि प्रयत्नांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विज्ञान, अभियांत्रिकी आणि इतर संस्थांसह कार्य करेल. NRF चे प्रशासन सरकारच्या स्वतंत्रपणे, फिरत्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सद्वारे केले जाईल. यामध्ये सर्व क्षेत्रांतील सर्वोत्तम संशोधक आणि नाविन्याचा शोध घेणाऱ्या व्यक्ती असतील.

17.11. NRF ची प्राथमिक कार्ये खालीलप्रमाणे असतील:

a) स्पर्धात्मक, सर्व प्रकारच्या आणि सर्व शाखांच्या सहाध्यायी-पुनरावलोकित अनुदान प्रस्तावांसाठी निधी देणे;
b) शैक्षणिक संस्थांना, विशेषतः जिथे संशोधन सध्या नवजात अवस्थेत आहे, अशा विद्यापीठांना आणि महाविद्यालयांना मार्गदर्शन करून संशोधन प्रारंभ, विकसित आणि सुलभ करणे;
c) संशोधक आणि सरकारच्या तसेच उद्योगांच्या संबंधित शाखांमध्ये दुवा म्हणून काम करणे, जेणेकरून राष्ट्रीय संशोधनाच्या तातडीच्या मुद्द्यांविषयी संशोधकांना सातत्याने अवगत केले जाईल आणि धोरणकर्त्यांना संशोधनातील ताज्या यशाविषयी सातत्याने अवगत केले जाईल; असे केल्याने हे यश धोरणे आणि/किंवा अंमलबजावणीमध्ये सुयोग्य प्रकारे वापरता येईल; आणि
d) उत्कृष्ट संशोधन आणि प्रगतीचा सन्मान करणे

## 18. उच्च शिक्षणाच्या नियामक प्रणालीचा कायापालट करणे

18.1. अनेक दशकांपासून उच्च शिक्षणाचे नियमन खूप कठोरपणे केले गेले आहे; फारसा काही परिणाम साध्य न करता खूप जास्त गोष्टींचे नियमन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. नियामक यंत्रणेच्या यांत्रिक आणि असक्षम करणाऱ्या स्वरूपामुळे काही अतिशय मूलभूत समस्या निर्माण झाल्या आहेत जसे की, काही संस्थांच्या हातात खूप जास्त अधिकार एकवटणे, या संस्थांमधील हितसंबंधांचे संघर्ष आणि परिणामस्वरूप जबाबदारीचा अभाव. उच्च शिक्षण क्षेत्राला पुन्हा नवचैतन्य देण्यासाठी आणि ते भरभराटीसाठी सक्षम होण्यासाठी नियामक यंत्रणेच्या संपूर्ण सुधारणेची आवश्यकता आहे.

18.2 वर नमूद केलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, उच्च शिक्षणाच्या नियामक व्यवस्थेकडून हे सुनिश्चित केले जाईल की नियमन, अधिस्वीकृती, निधी, आणि शैक्षणिक मानके प्रस्थापित करणे या सारखी विभिन्न कामे, विशिष्ट, स्वतंत्र आणि अधिकार-प्राप्त संस्थांकडून केली जातील. व्यवस्थेमध्ये तपास-आणि-समतोल स्थापित करणे, हितसंबंधातील संघर्ष कमी करणे आणि अधिकाराचे केंद्रीकरण दूर करण्यासाठी हे महत्त्वाचे आहे. ही चार महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडणाऱ्या या चार संस्थात्मक व्यवस्था, स्वतंत्रपणे काम करत असतानादेखील, समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकमेकांबरोबर ताळमेळ राखत काम करत आहेत, हे सुनिश्चित करण्यासाठी भारतीय उच्च शिक्षण आयोग/हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया (HECI) या एका संस्थेअंतर्गत या चार व्यवस्थांच्या चार स्वतंत्र विभागांची (व्हर्टिकल्स) स्थापना करण्यात येईल.

18.3 HECI चा पहिला विभाग असेल राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद/नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी कौन्सिल (NHERC). या विभागाचे काम असेल उच्च शिक्षण क्षेत्रासाठी एका सामायिक आणि एकमेव नियामकाचे काम करणे. यामध्ये शिक्षकांच्या शिक्षणाचा समावेश असेल पण वैद्यकीय आणि कायद्याच्या शिक्षणाचा समावेश नसेल, जेणेकरून एकाच वेळी अस्तित्वात असलेल्या अनेक नियामक मंडळांच्या नियमनाच्या प्रयत्नांची द्विरुक्ती आणि अव्यवस्था होणार नाही. या एकमेव माध्यमातून नियमन शक्य करण्यासाठी, विद्यमान कायद्यांचे पुन:परीक्षण करून ते रद्दबातल करणे तसेच विविध नियामक मंडळांची पुनर्रचना करणे गरजेचे आहे. 'सुलभ पण परिणामकारक' व सुविधात्मक पध्दतीचे नियमन करण्याच्या दृष्टीने NHERC स्थापित केले जाईल, म्हणजेच काही महत्त्वाच्या बाबींचे प्रभावीपणे नियमन केले जाईल, या बाबींमध्ये खासकरून वित्तीय विश्वसनीयता, सुशासन आणि सर्व आर्थिक व्यवहार, ऑडीट , प्रक्रिया, पायाभूत सुविधा, अध्यापक/कर्मचारी, अभ्यासक्रम, आणि शैक्षणिक निष्पत्तीचे एकूण ऑनलाईन आणि ऑफलाईन सार्वजनिक स्व-प्रकटीकरण यांचा समावेश असेल. ही माहिती सर्व उच्च शिक्षण संस्थांकडून NHERC च्या सार्वजनिक वेबसाईटवर आणि संस्थांच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली जाईल. तसेच, त्यांच्याकडून ही माहिती अद्ययावत करण्याची आणि तिच्या अचूकतेची सुनिश्चिती केली जाईल. सार्वजनिक क्षेत्रात प्रकाशित केलेल्या माहितीमुळे हितसंबंधी आणि अन्य कोणाकडून तक्रारी किंवा गाऱ्हाणी आल्यास, NHERC कडून त्यावर निर्णय घेतला जाईल. बहुमोल अशा सूचनांसाठी प्रत्येक HEI मधील, यादृच्छिकपणे निवडलेल्या विद्यार्थ्यांकडून, दिव्यांग विद्यार्थ्यांसहित, नियमितपणे ऑनलाईन अभिप्राय घेतले जातील.

18.4 असे नियमन सक्रिय करण्याची प्रमुख यंत्रणा म्हणजे अधिस्वीकृती. म्हणूनच, HECI चा दुसरा विभाग, राष्ट्रीय अधिस्वीकृती परिषद/नॅशनल ॲक्रेडिटेशन कौन्सिल (NAC) नावाची 'अधिस्वीकृती संस्था (मेटा- ॲक्रेडिटिंग बॉडी)' असेल. संस्थांची अधिस्वीकृती प्रामुख्याने मूलभूत नियम, सार्वजनिक स्व-प्रकटीकरण, चांगले शासन, आणि निष्पत्ती या आधारांवर केली जाईल, आणि हे काम अधिस्वीकृती करणाऱ्या संस्था/मंडळांच्या स्वतंत्र परिसंस्थेद्वारे केले जाईल आणि NAC कडून त्याच्यावर देखरेख केली जाईल. मान्यताप्राप्त अधिस्वीकृती संस्था म्हणून कार्य करणाऱ्या संस्था आणि त्यांची योग्य संख्या NAC कडून निश्चित केली जाईल. थोडक्यात, सर्व HEI ना दर्जा, स्व-शासन आणि स्वायत्ततेची विशिष्ट पातळी संपादन करता यावी यासाठी, मापदंडांचे टप्पे निश्चित करणारी, श्रेणीबध्द (ग्रेडेड) अधिस्वीकृतीची एक सशक्त व्यवस्था प्रस्थापित केली जाईल. या बदल्यात, पुढच्या 15 वर्षांमध्ये आपल्या संस्थात्मक विकास योजनेच्या (इन्स्टीट्युशनल डेव्हलपमेंट प्लॅन) (IDP) माध्यमातून सर्वांत उच्च स्तराची अधिस्वीकृती मिळवून त्याद्वारे, एक स्व-प्रशासित पदवी प्रदान करणारी संस्था/क्लस्टर म्हणून कार्यरत होणे, हे HEIs समोरील उद्दिष्ट असेल. पुढे जाऊन, विद्यमान जागतिक पध्दतीनुसार, अधिस्वीकृती ही एक द्वि-पर्यायी प्रक्रिया बनेल.

18.5 HECI चा तिसरा विभाग असेल उच्च शिक्षण अनुदान परिषद/हायर एज्युकेशन ग्रँट्स कौन्सिल (HEGC). या परिषदेचे काम असेल, संस्थांनी तयार केलेले IDP आणि त्याच्या अंमलबजावणीमध्ये झालेली प्रगती तसेच इतर पारदर्शक निकष, या सर्वांच्या आधारे उच्च शिक्षणासाठी निधी आणि अर्थसहाय्य करणे. शिष्यवृत्त्यांच्या वितरणाबरोबरच, नवीन लक्षवेधी प्रांतांमध्ये काम सुरू करण्याकरता आणि HEI मध्ये उपलब्ध असलेल्या विविध शाखा आणि कार्यक्षेत्रातील कार्यक्रमांचा विस्तार करण्याकरता, विकास निधीच्या वितरणाचे काम HEGC ला देण्यात येईल.

18.6 HECI चा चौथा विभाग असेल सर्वसाधारण शिक्षण परिषद/जनरल एज्युकेशन कौन्सिल (GEC). या परिषदेचे काम असेल उच्च शिक्षणाच्या कार्यक्रमांसाठी अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साठीचा एक आराखडा तयार करणे, ज्याला 'पदवीधर गुणविशेष' (ग्रॅज्युएट ॲट्रिब्युट्स) या नावानेदेखील ओळखले जाईल. GEC कडून राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा/नॅशनल हायर एज्युकेशन क्वालिफिकेशन फ्रेमवर्क (NHEQF) तयार केला जाईल आणि, उच्च

शिक्षणामध्ये व्यवसाय शिक्षणाचे एकात्मीकरण करण्याच्यादृष्टीने हा आराखडा (NHEQF), राष्ट्रीय कौशल्ये पात्रता आराखड्याशी (नॅशनल स्किल्स क्वालिफिकेशन फ्रेमवर्क) सुसंगत असेल. अशा प्रकारच्या अध्ययन निष्पत्तीच्या माध्यमातून NHEQF द्वारा उच्च शिक्षणाच्या पात्रतेचे वर्णन केले जाईल, जे पदवी/डिप्लोमा/सर्टिफिकेटच्या रूपात असेल. याव्यतिरिक्त, NHEQF च्या माध्यमातून GEC कडून, क्रेडिट हस्तांतर, समतुल्यता यासारख्या समस्यांसाठी सुलभ नियम प्रस्थापित केले जातील. 21 व्या शतकाची कौशल्ये असलेले परिपूर्ण विद्वान तयार करण्याच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक कार्यक्रमादरम्यान संपादन करावीत अशी विशिष्ट कौशल्ये GEC ने निश्चित करणे बंधनकारक असेल.

18.7 भारतीय कृषी संशोधन परिषद / इंडियन कौन्सिल फॉर ॲग्रीकल्चरल रीसर्च (ICAR), भारतीय पशु चिकित्सा परिषद / वेटरनरी कौन्सिल ऑफ इंडिया (VCI), राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद / नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (NCTE), वास्तुकला परिषद / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर (CoA), व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण राष्ट्रीय परिषद / नॅशनल कौन्सिल फॉर वोकेशनल एज्युकेशन ॲन्ड ट्रेनिंग (NCVET) इ. सारख्या व्यावसायिक परिषदा, व्यावसायिक मानक स्थापना मंडळे / प्रोफेशनल स्टॅंडर्ड सेटिंग बॉडीज (PSSB) या नात्याने काम करतील. उच्च शिक्षण व्यवस्थेत त्या महत्त्वाची भूमिका बजावतील आणि त्यांना GEC चे सदस्य होण्यासाठी आमंत्रित केले जाईल. PSSB ची पुनर्रचना झाल्यावर ही मंडळे GEC चा सदस्य म्हणून अभ्यासक्रम तयार करणे, शैक्षणिक मानके निश्चित करणे, आणि अध्यापन, संशोधन आणि त्यांच्या क्षेत्राचा/विभागाचा विस्तार करणे सुरू ठेवतील. GEC चे सदस्य म्हणून ते अभ्यासक्रमाचा आराखडा ठरवण्यास मदत करतील आणि त्यानुसार HEIs त्यांचे स्वत:चे अभ्यासक्रम निश्चित करतील. अशाप्रकारे, PSSB अध्ययनाच्या आणि अंमलबजावणीच्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये मानके किंवा अपेक्षा निश्चित करतील आणि ते कोणतीही नियामक भूमिका बजावणार नाहीत. इतर अनेक गोष्टींबरोबरच आपापले शैक्षणिक कार्यक्रम या मानकानुसार कसे असतील, हे सर्व HEIs ठरवतील आणि आवश्यकता असेल तर ही मानके निश्चित करणाऱ्या संस्थांकडे किंवा PSSB कडे ते मदतसुद्धा मागू शकतील.

18.8 व्यवस्थेच्या या रचनेमुळे विविध भूमिकांमधील हितसंघर्ष टाळला जाऊन मूलभूत विलगीकरणाच्या तत्त्वाचे पालन होणे सुनिश्चित होईल. महत्त्वाच्या काही आवश्यक गोष्टींकडे लक्ष दिले जाईल हे सुनिश्चित करून HEIs ना सक्षम करण्याचेसुद्धा या रचनेचे ध्येय असेल. जबाबदाऱ्या आणि दायित्वे HEIsकडे एकत्रितपणे सुपूर्त केल्या जातील. अशा अपेक्षांमध्ये सार्वजनिक आणि खाजगी HEIs असा भेदभाव केला जाणार नाही.

18.9 या बदलांसाठी सध्याच्या रचना आणि संस्था यांच्यात बदल व्हावे लागतील आणि त्यांच्यामध्ये एक प्रकारची उत्क्रांती व्हावी लागेल. कामांचे विलगीकरण झाल्यामुळे HECI मधील प्रत्येक विभाग नवीन नियामक योजनेत सुसंगत, अर्थपूर्ण आणि महत्त्वाची अशी नवीन आणि एकच भूमिका पार पाडेल.

18.10 संस्थांच्या कामात कार्यक्षमता आणि पारदर्शकता असेल हे सुनिश्चित करण्यासाठी, नियमन (NHERC), अधिस्वीकृती (NAC), निधी पुरवठा (HEGC) आणि शैक्षणिक मानके स्थापित करणे (GEC) या सर्व स्वतंत्र विभागांचे काम आणि त्यांच्यावरील स्वायत्त शिखर संस्थेचे (HECT) काम पारदर्शक सार्वजनिक प्रकटीकरण आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर यावर आधारित असेल. त्यामागचे तत्त्व तंत्रज्ञानाचा वापर करून मानवी हस्तक्षेप टाळणे आणि कार्यक्षमता व पारदर्शकता सुरक्षित करणे हे असेल उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी किमान मूलभूत नियम आणि मानके यांचे पालन करावे म्हणून कठोर कारवाईसह अनुपालनाच्या काटेकोर उपाययोजना, तसेच अनिवार्य माहितीच्या खोट्या प्रकटीकरणासाठी दंड सुनिश्चित केले जातील. चार विभागांमधील विवाद HECI स्वत: सोडवेल. HECI मधील प्रत्येक विभाग म्हणजे एक स्वतंत्र संस्था असेल. त्यामध्ये संबंधित क्षेत्राचा भरपूर

अनुभव असलेल्या आणि त्याबरोबरच सचोटी, बांधिलकी, आणि सामाजिक सेवेत कामगिरी केलेल्या व्यक्ती असतील. HECI स्वत: उच्च शिक्षणातील सार्वजनिक कामाचा उत्साह असलेल्या प्रसिद्ध व्यक्तींचे मंडळ असेल आणि ते HECI च्या सचोटीवर आणि कामाच्या परिणामकारकतेवर देखरेख करेल आणि लक्ष ठेवेल. न्यायनिवाड्याच्या कामाबरोबरच आपली कामे करण्यासाठी HECI मध्येच सुयोग्य प्रणाली तयार केली जाईल.

18.11 नवीन दर्जेदार HECI स्थापन करणे ही गोष्टसुद्धा नियामक मंडळाकडून खूप सुलभ केली जाईल, या संस्था समाजसेवेच्या उद्देशाने स्थापन केल्या जात आहेत, हे अतिशय परिणामकारक पद्धतीने सुनिश्चित करतानाच दीर्घ-कालीन स्थैर्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाईल. अतिशय चांगले काम करणाऱ्या HECI ना त्यांच्या संस्थांचा विस्तार करण्यासाठी आणि त्यायोगे विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या तसेच शाखा आणि कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे मदत करतील. उच्च दर्जाच्या उच्च शिक्षणाची उपलब्धता अजून विस्तारण्याचे ध्येय ठेवून HEI साठी सरकार व देणगीदारांच्या भागीदारीची मॉडेल्ससुद्धा नमुन्यादाखल उभारली जातील.

## शिक्षणाच्या व्यापारीकरणावर अंकुश ठेवणे

18.12 संतुलित नियंत्रण असलेल्या अनेक व्यवस्था शिक्षणाच्या व्यापारीकरणाशी लढतील आणि हे व्यापारीकरण थांबवतील. हे नियामक व्यवस्थेचे महत्त्वाचे प्राधान्य असेल. सर्व शिक्षण संस्थांना ऑडीट आणि प्रकटीकरणासाठी 'विना नफा' संस्थांसाठी असलेल्या मानकांचे पालन करावे लागेल. जर काही अतिरिक्त रक्कम उरल्यास, ती पुन्हा शिक्षण क्षेत्रात गुंतवावी लागेल. या सर्व आर्थिक गोष्टींचे पारदर्शक पद्धतीने सार्वजनिक प्रकटीकरण करावे लागेल. त्यामध्ये सामान्य जनतेच्या तक्रार निवारणाचीसुद्धा सोय असेल. NAC ने विकसित केलेली अधिस्वीकृती प्रणाली या व्यवस्थेवर पूरक लक्ष ठेवेल आणि NHERC याला आपल्या नियामक उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट मानेल.

18.13 या नियामक पद्धतीमध्ये सर्व HEIs – सरकारी आणि खाजगी –एकाच स्तरावर असल्याचे मानले जाईल. नियामक प्रणाली शिक्षणात खाजगी आणि धर्मादाय प्रयत्नांना प्रोत्साहन दिले जाईल. खाजगी HEIs तयार करणाऱ्या सर्व वैधानिक कृतींसाठी समान राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे असतील. ही किमान समान राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे खाजगी HEIs स्थापन करण्यासाठी आवश्यक सर्व कृतींसाठी आधारभूत असतील, त्यामुळे खाजगी आणि सार्वजनिक HEIs साठी समान मानके असतील. या समान मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुशासन, आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षितता, शैक्षणिक निष्पत्ती, आणि प्रकटीकरणातील पारदर्शकता समाविष्ट असतील.

18.14. सेवाभाव आणि जनहिताच्या हेतूने काम करणाऱ्या खाजगी HEIना शुल्क निर्धारणाच्या प्रगतीशील पद्धतीद्वारे प्रोत्साहित केले जाईल. विविध प्रकारच्या संस्थांसाठी त्यांच्या अधिस्वीकृतीनुसार कमाल मर्यादेसह शुल्क निश्चित करण्यासाठी पारदर्शक यंत्रणा विकसित केल्या जातील, जेणेकरून वैयक्तिक संस्थांवर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही. यामुळे खासगी HEI त्यांच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे शुल्क निश्चित करण्यास सक्षम बनतील, मात्र निर्धारित निकषांनुसार आणि व्यापकपणे लागू असलेल्या नियामक यंत्रणेत राहून. खासगी HEI ना त्यांच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर शुल्कमाफी आणि शिष्यवृत्ती देण्यास प्रोत्साहित केले जाईल. खासगी HEI ने ठरविलेल्या सर्व फी आणि शुल्काचे पारदर्शकपणे आणि संपूर्ण प्रकटीकरण केले जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यांच्या नावनोंदणीच्या कालावधीत या फीमध्ये/शुल्कात मनमानी वाढ होणार नाही. सदर फी निर्धारण यंत्रणा HEI त्यांच्या सामाजिक जबाबदाऱ्यांचे पालन करत असल्याचे सुनिश्चित करतानाच त्यांच्या खर्चाची वाजवी वसुलीदेखील सुनिश्चित करेल.

## 19. उच्च शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रभावी व्यवस्थापन आणि नेतृत्व

19.1. प्रभावी शासन आणि नेतृत्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्णतेची संस्कृती निर्माण करण्यास मदत करते. भारतासह जागतिक स्तरावरील सर्व जागतिक दर्जाच्या संस्थांचे सामान्य वैशिष्ट्य म्हणजे खरोखर भक्कम स्वयंप्रशासन आणि संस्थेच्या नेतृत्वाची उत्कृष्ट गुणवत्तेवर आधारित नेमणूक.

19.2. श्रेणीबद्ध अधिस्वीकृती आणि श्रेणीबद्ध स्वायत्ततेच्या एका योग्य प्रणालीद्वारे आणि 15 वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने, भारतातील सर्व HEI नावीन्य आणि उत्कृष्टतेचा ध्यास घेतलेल्या स्वतंत्र स्वयंप्रशासित संस्था बनण्याचे लक्ष्य ठेवतील. उच्च गुणवत्तेचे नेतृत्व सुनिश्चित करण्यासाठी आणि संस्थेत उत्कृष्टतेच्या संस्कृतीला उत्तेजन देण्यासाठी सर्व HEI मध्ये उपाययोजना केल्या जातील. संस्था अशा प्रकारचे पाऊल उचलण्यास तयार असल्याचे मानता येईल अशी योग्य ती श्रेणीबद्ध अधिस्वीकृती प्राप्त झाल्यानंतर, एक प्रशासक मंडळ (बोर्ड ऑफ गव्हर्नर्स - BoG) स्थापन केले जाईल. या मंडळात स्वतःच्या क्षमता सिद्ध केलेल्या आणि संस्थेप्रती वचनबद्धतेची तीव्र भावना असलेल्या अशा उच्च शिक्षित, सक्षम आणि समर्पित व्यक्तींचा गट असेल. संस्थेच्या BoGला, कोणत्याही बाह्य हस्तक्षेपाशिवाय संस्था चालवण्याचे, संस्था प्रमुखासह सर्व नेमणुका करण्याचे व प्रशासनाच्या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात येईल. पूर्वीच्या कायद्यांमधील कोणत्याही विपरीत तरतुदींना निष्प्रभावित करेल असा व्यापक कायदा केला जाईल, जो घटना, नेमणूक, कार्यपद्धती, नियम व विनियम आणि BoGच्या भूमिका व जबाबदाऱ्या यांची तरतूद करेल. मंडळाने नेमलेल्या तज्ज्ञ समितीद्वारे मंडळाचे नवीन सदस्य निश्चित केले जातील; आणि नवीन सदस्यांची निवड BoG द्वारेच केली जाईल. सदस्यांची निवड करताना निःपक्षपातीपणाचीही काळजी घेतली जाईल. या प्रक्रियेदरम्यान सर्व HEIना प्रोत्साहन दिले जाईल, सहाय्य केले जाईल आणि मार्गदर्शन केले जाईल आणि 2035 पर्यंत त्या स्वायत्त होण्याचे आणि असे सक्षम BoG प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवतील, असे संकल्पित आहे.

19.3. सर्व संबंधित नोंदी हितसंबंधींकडे स्वतःहून पारदर्शकपणे प्रकट करण्यासाठी BoG जबाबदार व उत्तरदायी असेल. HECI ने राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषदेने/नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी कौन्सिल (NHERC) अनिवार्य ठरवलेल्या सर्व नियामक मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करण्यास ते जबाबदार असेल.

19.4. सर्व नेतृत्व पदे आणि संस्था प्रमुखपद उच्च शैक्षणिक पात्रता असलेल्या आणि गुंतागुंतीची परिस्थिती हाताळण्याच्या क्षमतेसह, प्रशासकीय आणि नेतृत्व क्षमता सिद्ध केलेल्या व्यक्तींना दिले जाईल. HEI चे नेतृत्व घटनात्मक मूल्यांवर आणि संस्थेच्या एकूण दूरदृष्टीवर दृढ विश्वास असलेले, तसेच मजबूत सामाजिक बांधिलकी, सांघिक कार्यावरील विश्वास, बहुत्ववाद, विविध लोकांसोबत काम करण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टिकोन असे गुण असलेले असेल. ही निवड कठोर, निःपक्षपाती, गुणवत्ता-आधारित आणि क्षमता-आधारित प्रक्रियेने, BoG ने स्थापन केलेल्या प्रख्यात तज्ज्ञ समितीच्या (एमिनेंट एक्स्पर्ट कमिटी - EEC) नेतृत्वाखाली, BoG द्वारे केली जाईल. कार्यकाळाची स्थिरता योग्य संस्कृतीचा विकास सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण असली तरी, त्याचवेळी नेतृत्वाचा उत्तराधिकारी निवडण्याचे काळजीपूर्वक नियोजन केले जाईल, जेणेकरून एखाद्या संस्थेच्या कार्याची ओळख बनलेल्या चांगल्या कार्यपद्धती नेतृत्व बदलामुळे संपुष्टात येणार नाहीत; संक्रमण सुरळीतपणे होणे सुनिश्चित करण्यासाठी नेतृत्वातील बदल पुरेसे ओव्हरलॅप केलेले असतील आणि नेतृत्वपदे रिक्त राहणार नाहीत. उत्कृष्ट नेतृत्वगुण असलेल्या व्यक्ती निश्चित करून त्यांना लवकर तयार केले जाईल, त्यामुळे त्या नेतृत्वपदांच्या शिडीवरून वर-वर जातील.

19.5. पुरेसा निधी, कायदेशीर सक्षमता आणि स्वायत्तता या बाबी टप्प्याटप्प्याने पुरवल्या जात असताना, सर्व HEI सुद्धा संस्थात्मक उत्कृष्टता, त्यांच्या स्थानिक समुदायांचा सहभाग आणि वित्तीय प्रामाणिकता व जबाबदारीची सर्वोच्च मानके याबाबत वचनबद्धता प्रदर्शित करतील. प्रत्येक संस्था एक धोरणात्मक स्वरूपाची संस्थात्मक विकास योजना (IDP) तयार करेल, ज्या आधारावर संस्था उपक्रम विकसित करतील, त्यांच्या प्रगतीचे स्वतःच मूल्यांकन करतील आणि त्यातील उद्दिष्टे गाठतील, जे पुढील सार्वजनिक निधी प्राप्त करण्याचा आधार बनू शकतील. मंडळाचे सदस्य, संस्थात्मक नेतृत्व, प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या संयुक्त सहभागाने IDP तयार केला जाईल.

# भाग III. विचार करण्याचे इतर महत्वाचे केंद्रीय मुद्दे

## 20. व्यावसायिक शिक्षण

20.1. व्यावसायिकांना तयार करण्याशी संबंधित शिक्षणामध्ये नीतिमूल्ये आणि सार्वजनिक उद्देशाचे महत्व, तसेच शाखेच्या विषयाचे शिक्षण आणि व्यावहारिक शिक्षणाचा समावेश असणे आवश्यक आहे. तार्किक आणि बहुशाखीय विचार, चर्चा, वाद-विवाद संशोधन आणि नाविन्य यांचादेखील यात गांभीर्याने समावेश असणे आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी व्यावसायिक शिक्षण हे एखाद्या विशिष्ट शाखेपुरते, इतर विषयांपासून वेगळे दिले जाऊ नये.

20.2. व्यावसायिक शिक्षण हे त्यामुळे एकूणच उच्च शिक्षण व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग बनते. स्वतंत्र शेती विद्यापीठे, कायदा विद्यापीठे, आरोग्यशास्त्र विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे आणि इतर क्षेत्रातील एकट्या संस्था, सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षण देणाऱ्या बहुशाखीय संस्था बनण्याचे उद्दिष्ट ठेवतील. एकतर व्यावसायिक किंवा सामान्य शिक्षण देणाऱ्या सर्व संस्था 2030 पर्यंत एकसंधपणे आणि एकात्मिक पद्धतीने शिक्षण प्रदान करणाऱ्या संस्थांमध्ये / क्लस्टर्समध्ये नैसर्गिकरित्या विकसित होण्याचे लक्ष्य ठेवतील.

20.3. कृषी शिक्षणाचे त्याच्या संलग्न शाखांसह पुनरुज्जीवन केले जाईल. कृषी विद्यापीठांचे प्रमाण देशातील सर्व विद्यापीठांपैकी अंदाजे 9% असले तरीही, उच्च शिक्षणातील सर्व नावनोंदणीपैकी कृषी आणि संलग्न शास्त्रांच्या शाखेत नावनोंदणी 1% पेक्षा कमी आहे. उत्तम कौशल्य असलेले पदवीधर व तंत्रज्ञ, नाविन्यपूर्ण संशोधन, आणि तंत्रज्ञान आणि कार्यपद्धतींशी जोडलेले बाजार-आधारित विस्तार यांच्याद्वारे कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी कृषी आणि संलग्न शाखांची क्षमता आणि गुणवत्ता सुधारणे आवश्यक आहे. सामान्य शिक्षणासोबत एकात्मिक केलेल्या कार्यक्रमांच्या माध्यमातून कृषी आणि पशुवैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिकांची तयारी अत्यंत वेगाने करण्यात येईल. कृषी शिक्षणाची रचना असे व्यावसायिक विकसित करण्याच्या दिशेने होईल, ज्यांच्यामध्ये जमिनीची घटती उत्पादकता, हवामान बदल, आपल्या वाढत्या लोकसंख्येची अन्नसुरक्षा यांसारख्या गंभीर समस्यांची जाणीव असण्यासोबत स्थानिक ज्ञान, पारंपारिक ज्ञान आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान समजून घेण्याची आणि वापरण्याची क्षमता असेल. कृषी शिक्षण देणाऱ्या संस्थांचा स्थानिक समुदायाला थेट फायदा झाला पाहिजे; यासाठी तंत्रज्ञान अंतःपोषण (इन्क्युबेशन) आणि प्रसार आणि शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी कृषी तंत्रज्ञान उद्याने स्थापन करणे हा एक दृष्टिकोन असू शकतो.

20.4. कायद्याचे शिक्षण जागतिकदृष्ट्या स्पर्धात्मक, व्यापक उपलब्धता आणि वेळेवर न्यायदान करण्यासाठी सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करणारे आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारणारे असणे आवश्यक आहे. त्याच वेळी ते सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाच्या घटनात्मक मूल्यांची माहिती असणारे आणि त्यावर प्रकाश टाकणारे असणे आवश्यक आहे आणि लोकशाही, कायद्याचे राज्य आणि मानवी हक्क या साधनांच्या माध्यमातून राष्ट्रीय

पुनर्बांधणीच्या दिशेने नेणारे असणे आवश्यक आहे. कायदेशीर शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी, त्यासोबतच पुराव्यांवर आधारित पद्धतीने कायदेशीर विचारांचा इतिहास, न्यायाची तत्त्वे, न्यायशास्त्राचा अवलंब आणि इतर संबंधित गोष्टी योग्य आणि पर्याप्तपणे प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. कायद्याचे शिक्षण देणाऱ्या शासकीय संस्थांनी, भविष्यातील वकील आणि न्यायाधीशांना इंग्रजीमध्ये आणि ज्या राज्यात संस्था स्थित आहे तेथील भाषेत असे द्विभाषिक शिक्षण देण्याचा विचार केला पाहिजे.

20.5. आरोग्यसेवेच्या शिक्षणाची पुनर्कल्पना करण्याची आवश्यकता आहे जेणेकरून शैक्षणिक कार्यक्रमांचा कालावधी, व्यवस्था आणि रचना या बाबी पदवीधरांनी पार पाडणे अपेक्षित असलेल्या भूमिकांशी जुळतील. प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि माध्यमिक रुग्णालयांमध्ये काम करण्यासाठी प्रामुख्याने आवश्यक असलेल्या स्पष्ट निकषांच्या आधारे, नियमित अंतराने विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले जाईल. लोक आरोग्यसेवेच्या बाबतीत एकाहून अधिक पर्यायांचा अवलंब करतात हे लक्षात घेता, आपली वैद्यकशास्त्र शिक्षण व्यवस्था एकात्मिक असणे आवश्यक आहे म्हणजे ज्यायोगे ॲलोपॅथीक वैद्यकशास्त्राच्या सर्व विद्यार्थ्यांना आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्धा आणि होमिओपॅथी (आयुष) यांचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे आणि याउलट देखील. सर्व प्रकारच्या आरोग्यशिक्षणामध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि सामुदायिक औषधांवरही अधिक भर दिला जाईल.

20.6 तांत्रिक शिक्षणात भारताच्या एकंदर विकासासाठी महत्त्वाचे असलेले अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, स्थापत्यकला, नगर रचना, औषधनिर्माण, हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग तंत्रज्ञान इ. विषयांमधले पदवी आणि पदविका कार्यक्रम समाविष्ट आहेत. या क्षेत्रांमध्ये उच्च-पात्रता असलेल्या मनुष्यबळाची खूप मागणी असेल एवढेच नव्हे तर या क्षेत्रांमधील नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संशोधनाला चालना देण्यासाठी उद्योगधंदे आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये अधिक चांगल्या सहकार्याचीसुद्धा आवश्यकता निर्माण होईल. त्याशिवाय, मानवी प्रयत्नांवरच्या तंत्रज्ञानाच्या परिणामामुळे तांत्रिक शिक्षण आणि इतर क्षेत्रांमधील कप्पेबंदपणासुद्धा कमी व्हायची अपेक्षा आहे. तांत्रिक शिक्षण बहुशाखीय शिक्षण संस्था आणि कार्यक्रमांमध्येसुद्धा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवले जाईल आणि इतर शाखांमध्ये अधिक सहभागी होण्यासाठीच्या संधींवर नव्याने लक्ष केंद्रित केले जाईल. कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टीफिशीयल इंटेलिजन्स – एआय), 3-D मशिनिंग, बिग डेटा विश्लेषण, आणि मशीन लर्निंग इ. सारख्या सध्या वेगाने प्रगती करणाऱ्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये व्यावसायिक तयार करण्यात भारताने आघाडी घेतली पाहिजे. याशिवाय आरोग्य, पर्यावरण, आणि शाश्वत जगणे यातील ॲप्लिकेशन्ससह जीनोमिक स्टडीज, नॅनो तंत्रज्ञान, न्युरोसायन्स हे विषय तरुणांची रोजगार क्षमता वाढवण्यासाठी पदवीपूर्व शिक्षणात समाविष्ट केले जाईल.

## 21. प्रौढ शिक्षण आणि निरंतर अध्ययन

21.1 मूलभूत साक्षरता प्राप्त करण्याची संधी, शिक्षण मिळणे, आणि उपजीविका प्राप्त करणे याकडे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत हक्क म्हणून पाहिले पाहिजे. साक्षरता आणि मूलभूत शिक्षण या गोष्टी व्यक्तींसाठी वैयक्तिक, नागरी, आर्थिक, आणि निरंतर अध्ययनाच्या संधींचे नवे जग खुले करतात. त्यामुळे त्यांची वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रगती होऊ शकते. समाज आणि देशाच्या पातळीवर, साक्षरता आणि मूलभूत शिक्षण हे ताकदवान घटक असून ते विकासाच्या इतर सर्व प्रयत्नांच्या यशात वाढ करतात. जगभरातील देशांच्या डेटावरून हे दिसून येते की साक्षरतेचे प्रमाण आणि दरडोई GDP मध्ये अतिशय घनिष्ठ संबंध आहे.

21.2 तसेच, समाजाचा एक अशिक्षित सदस्य असण्याचे असंख्य तोटे आहेत. यामध्ये मूलभूत आर्थिक व्यवहार करणे; दिलेल्या किमतीसाठी वस्तूचा दर्जा/ संख्या यांची तुलना करणे; नोकऱ्या, कर्ज, सेवा इ.साठी अर्ज भरणे; सार्वजनिक परिपत्रके आणि बातम्यांमधील लेखांचा अर्थ समजणे; संवाद साधण्यासाठी आणि व्यवसाय करण्यासाठी पारंपरिक

टपाल आणि इलेक्ट्रॉनिक मेलचा वापर करता येणे; आपल्या जीवनात आणि व्यवसायात सुधारणा करण्यासाठी इंटरनेट आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर करणे; दिशा समजणे आणि रस्त्यावरील सुरक्षिततेच्या सूचना, औषधांवरील सूचनांचे आकलन होणे; मुलांना त्यांच्या शिक्षणात मदत करणे; भारताचा नागरिक म्हणून आपले मूलभूत हक्क आणि जबाबदाऱ्या यांची जाणीव असणे; साहित्याचा आस्वाद घेता येणे; आणि साक्षरता आवश्यक असलेल्या मध्यम किंवा उच्च-उत्पन्न क्षेत्रांमध्ये रोजगार मिळवणे इ. गोष्टी करणे शक्य नसण्याचा या तोट्यांमध्ये समावेश आहे. येथे यादी केलेल्या या क्षमता म्हणजे प्रौढांच्या शिक्षणासाठी नाविन्यपूर्ण मार्गांचा अवलंब करून जी निष्पत्ती साध्य केली जाऊ शकते, त्याचीच एक सर्वसमावेशक यादी आहे.

21.3 भारतातील आणि जगभरातील व्यापक क्षेत्र अभ्यास आणि विश्लेषणे स्पष्टपणे दर्शवतात की स्वयंसेवी वृत्ती आणि समाजाचा सहभाग आणि गतिशीलता हे प्रौढ साक्षरता कार्यक्रमाच्या यशासाठी महत्त्वाचे घटक आहेत. त्याशिवाय, राजकीय इच्छाशक्ती, संघटनात्मक रचना, योग्य नियोजन, पुरेसे आर्थिक पाठबळ आणि शिक्षक तसेच स्वयंसेवकांचे उच्च-दर्जाचे क्षमता संवर्धन या गोष्टीसुद्धा आवश्यक आहेत. यशस्वी साक्षरता कार्यक्रमांमुळे केवळ प्रौढांमधील साक्षरतेचे प्रमाणच वाढत नाही तर परिणामी समुदायातील सर्व मुलांसाठी शिक्षणाची मागणीसुद्धा वाढते, तसेच सकारात्मक सामाजिक बदलासाठी समाजाचे योगदानसुद्धा वाढते. 1988 मध्ये स्थापन करण्यात आलेले राष्ट्रीय साक्षरता मिशन मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवी सहभाग आणि लोकांच्या पाठिंब्यावर अवलंबून होते. या मिशनचा परिणाम म्हणून 1991-2011 या काळात स्त्रियांमधील साक्षरतेच्या प्रमाणासह राष्ट्रीय साक्षरतेच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आणि त्यामुळे त्या काळातील सामाजिक समस्यांवरसुद्धा मोठ्या प्रमाणात संवाद आणि चर्चा सुरू झाल्या.

21.4 100% साक्षरता साध्य करण्याचे हे अतिशय महत्त्वाचे ध्येय वेगाने गाठण्यासाठी शक्य तितक्या लवकर प्रौढ शिक्षणासाठी मजबूत आणि नाविन्यपूर्ण सरकारी पुढाकार- विशेषत: समुदायाचा सहभाग सुलभ करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा सुरळीत आणि लाभदायक समावेश करण्यासाठी – सुरू केला जाईल.

21.5 पहिली गोष्ट म्हणजे, प्रौढ शिक्षणासाठी समर्पित असलेली NCERT ची नवीन आणि चांगला पाठिंबा असलेली घटक संस्था प्रौढ शिक्षणाचा एक उत्कृष्ट अभ्यासक्रम आराखडा विकसित करेल. ही संस्था NCERT च्या साक्षरता, संख्याज्ञान, मूलभूत शिक्षण, व्यावसायिक कौशल्ये, आणि इतर विषयातील उत्कृष्ट अभ्यासक्रम तयार करण्याच्या सध्याच्या तज्ञतेनुसार त्याच्याशी सुसंगत असा अभ्यासक्रम विकसित करेल. प्रौढ शिक्षणाच्या अभ्यासक्रमाच्या आराखडयात किमान पाच प्रकारच्या कार्यक्रमांचा समावेश असेल, आणि प्रत्येक कार्यक्रमाची निष्पत्ती स्पष्टपणे निश्चित केलेली असेल: (a) मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान; (b) महत्त्वाची जीवन कौशल्ये (आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता, व्यावसायिक कौशल्ये, आरोग्य निगा आणि जागृती, बाल संगोपन आणि शिक्षण, आणि कुटुंब कल्याण यासह); (c) व्यावसायिक कौशल्यांचा विकास (स्थानिक रोजगार मिळवण्याच्या दृष्टिकोनातून); (d) मूलभूत शिक्षण (पूर्वाध्ययन (प्रिपरेटरी), पूर्वमाध्यमिक आणि माध्यमिक शाळा स्तराशी समकक्ष); आणि (e) शिक्षण सुरू ठेवणे (कला, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, खेळ आणि करमणूक यातील सर्वांगीण प्रौढ शिक्षण अभ्यासक्रम तसेच स्थानिक लोकांच्या स्वारस्याचे किंवा त्यांना उपयुक्त असे इतर अनेक विषय उदा. आयुष्यातील महत्त्वाच्या कौशल्यांबद्दलची प्रगत सामग्री यासहीत). हा आराखडा हे लक्षात ठेवेल की अनेकदा मुलांसाठी वापरल्या जाणाऱ्या अध्ययन-अध्यापनाच्या पद्धतींपेक्षा आणि सामग्रीपेक्षा वेगळया गोष्टींची प्रौढ व्यक्तींना आवश्यकता असते.

21.6 दुसरी गोष्ट म्हणजे, स्वारस्य असलेल्या सर्व प्रौढांना प्रौढ शिक्षण आणि निरंतर अध्ययनाची सोय उपलब्ध असेल यासाठी सुयोग्य पायाभूत सुविधा असल्याचे सुनिश्चित केले जाईल. या दिशेतील एका महत्त्वाचा पुढाकार म्हणजे प्रौढ शिक्षण अभ्यासक्रमांसाठी आणि इतर सामाजिक सहभाग असलेल्या तसेच समृद्धी उपक्रमांसाठी शाळेच्या तासानंतर

आणि शनिवारी-रविवारी शक्यतो ICT ने सुसज्ज असलेली शाळा/ शाळा संकुले आणि सार्वजनिक वाचनालये वापरणे. शाळा, उच्च शिक्षण, प्रौढ आणि व्यावसायिक शिक्षण आणि इतर सामाजिक तसेच व्यावसायिक उपक्रमांसाठी मूलभूत सुविधा शेअर करणे भौतिक आणि मनुष्यबळ संसाधनांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी तसेच पाच प्रकारचे शिक्षण आणि त्या पलीकडील गोष्टींमध्ये समन्वय तयार करण्यासाठी महत्त्वाचे आहे. या कारणांसाठी प्रौढ शिक्षण केंद्रेसुद्धा (अ‍ॅडल्ट एज्युकेशन सेन्टर्स – AECs) HEI, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे इ. सारख्या इतर सार्वजनिक संस्थांमध्ये समाविष्ट करता येतील.

21.7 तिसरे म्हणजे, प्रौढ शिक्षणाच्या अभ्यासक्रम आराखडयात वर्णन केल्यानुसार सर्व पाच प्रकारच्या प्रौढ शिक्षणासाठी शिकणाऱ्यांना परिपक्व करण्यासाठी अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी प्रशिक्षक / शिक्षकांची आवश्यकता असेल. या प्रशिक्षकांना राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावरील स्रोत संस्था प्रौढ शिक्षण केंद्रांमध्ये शिक्षण उपक्रम आयोजित करण्यासाठी आणि त्यांचे नेतृत्व करण्यासाठी तसेच स्वयंसेवी प्रशिक्षकांशी समन्वय साधण्यासाठी प्रशिक्षण देतील. प्रत्येक HEI च्या स्थानिक समुदयात सहभागी होण्याच्या ध्येयाचा भाग म्हणून HEIमधील सदस्यांसह इतर पात्र समुदाय सदस्यांना एका छोटा प्रशिक्षण अभ्यासक्रम करण्यास आणि प्रौढ साक्षरता प्रशिक्षक म्हणून स्वयंसेवी वृत्तीने काम करण्यास किंवा एकासाठी एक स्वयंसेवी शिक्षक म्हणून काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल आणि त्यांचे स्वागत केले जाईल. तसेच त्यांनी देशाच्या केलेल्या या महत्त्वाच्या सेवेची दाखल घेतली जाईल. राज्येसुद्धा साक्षरता आणि प्रौढ शिक्षणासाठीचे प्रयत्न वाढवण्यासाठी NGO तसेच इतर सामाजिक संस्थांबरोबर काम करतील.

21.8 चौथे म्हणजे, प्रौढ शिक्षणात समाजातील सदस्यांच्या सहभाग निश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. नोंदणी न झालेल्या विद्यार्थ्यांवर आणि शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी समाजात फिरणाऱ्या समाजसेवक/समुपदेशकांना त्यांच्या प्रवासाच्या दरम्यान प्रौढ शिक्षणात विद्यार्थी आणि शिक्षक/प्रशिक्षक म्हणून स्वारस्य असलेले पालक, किशोरवयीन मुले, आणि इतरांचा डेटा संकलित करण्याची विनंती केली जाईल. मग समाजसेवक/ समुपदेशक त्यांना प्रौढ शिक्षण केंद्रांशी जोडतील. प्रौढ शिक्षणाच्या संधींचासुद्धा जाहिराती आणि घोषणा तसेच NGOs आणि इतर स्थानिक संस्थांचे कार्यक्रम आणि पुढाकार याद्वारे मोठ्या प्रमाणात प्रचार केला जाईल.

21.9 पाचवे म्हणजे, आपले समुदाय आणि शैक्षणिक संस्थांमधून वाचनाची सवय रुजवण्यासाठी पुस्तकांची उपलब्धता आणि पुस्तके सर्वांपर्यंत पोचण्याची स्थिती सुधारणे आवश्यक आहे. दिव्यांग आणि वेगळ्या क्षमता असलेल्या व्यक्तींसहित इतर सर्व विद्यार्थ्यांच्या गरजा भागवण्यासाठी आणि आवडी पूर्ण करण्यासाठी पुस्तकांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करण्यासाठी सर्व समुदाय आणि शैक्षणिक संस्था – शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि सार्वजनिक वाचनालये - मजबूत करण्याची आणि त्यांचे आधुनिकीकरण करण्याची हे धोरण शिफारस करत आहे. देशभरातील सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित भागांसह, ग्रामीण आणि दुर्गम भागात राहणाऱ्यांनासुद्धा पुस्तके उपलब्ध होण्यासाठी आणि परवडण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे पावले उचलतील. सर्व भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांचा दर्जा आणि आकर्षकता सुधारण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातील एजन्सीज/ संस्था धोरणे आखतील. वाचनालयातील पुस्तकांची ऑनलाईन उपलब्धता वाढवण्यासाठी आणि डिजिटल वाचनालयांचा विस्तार करण्यासाठी पावले उचलली जातील. समुदायांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये चैतन्यदायी वाचनालये असतील हे सुनिश्चित करण्यासाठी, वाचनालयांमध्ये पुरेसे कर्मचारी असणे आणि त्यांच्यासाठी योग्य करीअर मार्ग आणि CPD आखणे, महत्त्वाचे आहे. इतर उपायांमध्ये, सध्या अस्तित्वात असलेली सर्व वाचनालये मजबूत करणे, वंचित भागांमध्ये ग्रामीण वाचनालये आणि वाचन कक्ष स्थापन करणे, भारतीय भाषांमध्ये

वाचण्यासाठी सामग्री मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करणे, मुलांसाठी वाचनालये आणि मोबाईल वाचनालये स्थापन करणे, भारतभरात वेगवेगळया विषयांवरचे सामाजिक बुक क्लब्ज स्थापन करणे, आणि शैक्षणिक संस्था आणि वाचनालये यांच्यामध्ये अधिक सहयोग वाढवणे इ.चा समावेश आहे.

21.10 शेवटी, वरील सर्व पुढाकार मजबूत करण्यासाठी आणि अगदी त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून घेतला जाईल. सरकारी आणि धर्मादाय पुढाकारांद्वारे तसेच क्राऊडसोर्सिंग आणि स्पर्धांच्या माध्यमातून प्रौढ शिक्षणासाठी तंत्रज्ञानावर आधारित उच्च दर्जाचे पर्याय उदा. ॲप्स, ऑनलाईन अभ्यासक्रम/ मोड्युल्स, उपग्रहावर आधारित TV चॅनेल्स, ऑनलाईन पुस्तके, आणि ICTने सुसज्ज वाचनालये आणि प्रौढ शिक्षण केंद्रे इ. विकसित केली जातील. त्यामुळे, अनेक वेळा उच्च दर्जाचे प्रौढ शिक्षण ऑनलाईन किंवा मिश्र पद्धतीने देता येईल.

## 22. भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन

22.1. भारत हा हजारो वर्षांच्या कालावधीत विकसित झालेल्या आणि कला, साहित्य, रूढी, परंपरा, भाषिक अभिव्यक्ती, प्राचीन वस्तू, वारसा स्थळे आणि इतर अनेक स्वरूपांत व्यक्त झालेल्या संस्कृतीचा खजिना आहे. जगभरातील कोट्यवधी लोक, पर्यटनासाठी भारताला भेट देणे, भारतीय पाहुणचाराचा अनुभव घेणे, भारतीय हस्तकलेच्या वस्तू व हस्तनिर्मित वस्त्रे खरेदी करणे, अभिजात भारतीय साहित्य वाचणे, योग व ध्यान करणे, भारतीय तत्त्वज्ञानाने प्रेरित होणे, आगळया-वेगळया अशा भारतीय सणांमध्ये सहभागी होणे, भारतातील विविध संगीत आणि कलांचा आनंद लुटणे आणि भारतीय चित्रपट पाहणे अशा इतर अनेक प्रकारे या सांस्कृतिक खजिन्याचा दररोज आस्वाद घेत असतात आणि यापासून लाभ करून घेतात. ही सांस्कृतिक आणि नैसर्गिक संपत्तीच भारताला त्याच्या पर्यटन घोषणेनुसार खरोखर “अतुल्य भारत!” बनवते. भारताच्या सांस्कृतिक संपत्तीचे जतन आणि प्रचार करणे ही देशाची उच्च प्राथमिकता असणे आवश्यक आहे, कारण देशाची ओळख तसेच अर्थव्यवस्थेसाठी हे खऱ्या अर्थाने महत्वाचे आहे.

22.2. भारतीय कला व संस्कृतीचा प्रचार केवळ देशासाठीच नाही तर प्रत्येक व्यक्तीसाठीही महत्त्वाचा आहे. मुलांमध्ये ओळखीची, आपलेपणाची, तसेच इतर संस्कृती आणि ओळखींचे कौतुक करण्याची भावना निर्माण करण्यासाठी, त्यांच्यामध्ये सांस्कृतिक जागरूकता आणि अभिव्यक्ती यासारख्या प्रमुख क्षमता विकसित करणे महत्त्वाचे आहे. स्वतःचा सांस्कृतिक इतिहास, कला, भाषा आणि परंपरांविषयी दृढ भावना आणि ज्ञान यांच्या विकासामुळेच मुलांमध्ये सकारात्मक सांस्कृतिक ओळख आणि आत्मसन्मान वाढू शकतो. अशा प्रकारे, वैयक्तिक तसेच सामाजिक कल्याण या दोहोंसाठी सांस्कृतिक जागरूकता आणि अभिव्यक्ती यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

22.3. कला हे संस्कृतीची शिकवण देण्याचे एक प्रमुख माध्यम आहे. सांस्कृतिक अस्मिता, जागरूकता बळकट करणे आणि सामाजिक उन्नती साधण्याव्यतिरिक्त, कला व्यक्तींमध्ये आकलनात्मक आणि सर्जनशील क्षमता वाढवण्यासाठी आणि वैयक्तिक आनंद वृद्धिंगत करण्यासाठी ओळखल्या जातात. आनंद/हित, आकलनात्मक विकास आणि व्यक्तींची सांस्कृतिक अस्मिता या महत्त्वाच्या कारणांमुळे सर्व प्रकारच्या भारतीय कला विद्यार्थ्यांना, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणापासून सुरूवात करून शिक्षणाच्या सर्व स्तरांवर शिकवल्या गेल्या पाहिजेत.

22.4. भाषा ही अर्थातच कला आणि संस्कृतीशी अतूटपणे जोडलेली आहे. वेगवेगळया भाषा जगाकडे वेगवेगळया पद्धतीने ‘पाहतात’ आणि म्हणूनच एखाद्या भाषेच्या रचनेवरून ती भाषा बोलणाऱ्याच्या अनुभवाची समज ठरते. विशेषतः भाषा, दिलेल्या संस्कृतीचे लोक कुटुंबातील सदस्य, अधिकाराच्या व्यक्ती, सहाध्यायी आणि अनोळखी

व्यक्तींसह इतरांशी कशा प्रकारे बोलतात यावर आणि संभाषणाचा स्वर (टोन) यावर परिणाम करतात. समान भाषा बोलणाऱ्यांच्या संभाषणांचे स्वाभाविक घटक असलेल्या स्वर (टोन), अनुभवाची समज आणि परिचय/'आपलेपण' या गोष्टी म्हणजे त्या संस्कृतीचे प्रतिबिंब आणि नोंदी असतात. अशा प्रकारे, संस्कृती ही आपल्या भाषांमध्ये गुंफलेली असते. साहित्य, नाटक, संगीत, चित्रपट इत्यादी स्वरुपातील कलेचा पूर्ण आस्वाद भाषेशिवाय घेतला जाऊ शकत नाही. एखादी संस्कृती टिकवण्यासाठी आणि तिच्या प्रसारासाठी त्या संस्कृतीच्या भाषेचे जतन आणि तिचा प्रसार केला पाहिजे.

22.5. दुर्दैवाने, भारतीय भाषांकडे आवश्यक तितके लक्ष दिले गेलेले नाही आणि काळजी घेतली गेली नाही, आणि गेल्या 50 वर्षांत देशाने 220 पेक्षा जास्त भाषा गमावल्या आहेत. युनेस्कोने 197 भारतीय भाषा 'संकटग्रस्त' म्हणून घोषित केल्या आहेत. विशेषत:, लिपी नसलेल्या विविध भाषा नामशेष होण्याचा धोका आहे. जेव्हा अशा भाषा बोलणाऱ्या एखाद्या जमातीच्या किंवा समुदायाच्या ज्येष्ठ सदस्यांचा मृत्यू होतो तेव्हा बहुतेकदा या भाषा त्यांच्याबरोबर नामशेष होतात; बऱ्याचदा, या समृद्ध भाषांचे/संस्कृतीच्या अभिव्यक्तींचे जतन करण्यासाठी किंवा त्या रेकॉर्ड करण्यासाठी कोणत्याही ठोस कृती किंवा उपाययोजना केल्या जात नाहीत.

22.6. शिवाय, अधिकृतपणे अशा संकटग्रस्त यादीत नसलेल्या भाषासुद्धा, जसे की भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीतील 22 भाषा बऱ्याच आघाड्यांवर गंभीर अडचणींना तोंड देत आहेत. भारतीय भाषांचे अध्यापन आणि अध्ययन प्रत्येक स्तरावर शाळा आणि उच्च शिक्षणाशी एकात्मिक करणे आवश्यक आहे. भाषा उपयुक्त आणि चैतन्यमय राहण्यासाठी पाठ्यपुस्तके, कार्यपुस्तिका, व्हिडिओ, नाटके, कविता, कादंबऱ्या, मासिके इत्यादींसह या भाषांमध्ये उच्च-गुणवत्तेच्या अध्ययन आणि मुद्रित साहित्याची सातत्याने निर्मिती होणे आवश्यक आहे. भाषांचे शब्दसंग्रह आणि शब्दकोष नियमितपणे अधिकृतरित्या अद्ययावत करणे, व्यापकपणे प्रसारित करणे आवश्यक आहे, जेणेकरुन या भाषांमध्ये सर्वात वर्तमान मुद्द्यांवर आणि संकल्पनांवर प्रभावीपणे चर्चा करता येऊ शकेल. जगभरातील देशांद्वारे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, हिब्रू, कोरियन आणि जपानी यासारख्या भाषांमध्ये असे अध्ययन साहित्य, मुद्रण साहित्य व जगातील भाषांमधून महत्त्वपूर्ण साहित्याचे अनुवाद निर्माण करण्याचे आणि शब्दसंग्रह सतत अद्ययावत करण्याचे कार्य केले जाते. तथापि, आपल्या भाषा चांगल्या प्रकारे जिवंत आणि प्रवाही राहण्यास प्रामाणिकपणे मदत करण्यासाठी असे अध्ययन व मुद्रित साहित्य आणि शब्दकोष तयार करण्यात भारताची वाटचाल बऱ्यापैकी मंदगतीने झाली आहे.

22.7. याव्यतिरिक्त, विविध उपाययोजना केल्या जात असून देखील भारतात कुशल भाषा शिक्षकांची तीव्र टंचाई आहे. भाषा-शिक्षण अधिक अनुभवात्मक होण्यासाठी आणि केवळ भाषेचे साहित्य, शब्दसंग्रह व व्याकरणावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी भाषेमध्ये बोलण्याच्या व संवाद साधण्याच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी, त्यातही सुधारणा करणे आवश्यक आहे. संभाषणासाठी आणि अध्यापन-अध्ययनासाठी भाषा अधिक व्यापकपणे वापरणे आवश्यक आहे.

22.8. शालेय मुलांमध्ये भाषा, कला आणि संस्कृती यांना उत्तेजन देण्यासाठीच्या बऱ्याच उपायांची चर्चा प्रकरण 4 मध्ये केली आहे, ज्यात शाळेच्या सर्व स्तरांमध्ये संगीत, कला आणि हस्तकला यावर अधिक भर देणे; बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी त्रिभाषा सूत्राची लवकर अंमलबजावणी; शक्य असेल तिथे मातृभाषेत/स्थानिक भाषेत शिक्षण देणे; भाषा-शिक्षण अधिक अनुभवात्मक बनवणे; स्थानिक तज्ज्ञतेच्या विविध विषयांतील मास्टर प्रशिक्षक म्हणून उत्कृष्ट स्थानिक कलाकार, लेखक, कारागीर आणि इतर तज्ज्ञांना नियुक्त करणे; आदिवासींच्या आणि इतर स्थानिक ज्ञानासह पारंपारिक भारतीय ज्ञानाचा मानव्यशास्त्रे, विज्ञान, कला, हस्तकला आणि क्रीडा अशा संपूर्ण अभ्यासक्रमात

जिथे संबंधित असेल तिथे अचूकपणे समावेश करणे; आणि विशेषतः माध्यमिक शाळांमध्ये आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात बरीच अधिक लवचिकता, यांचा समावेश आहे, जेणेकरून विद्यार्थी त्यांचे स्वतःचे कल्पक, कलात्मक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक मार्ग विकसित करण्यासाठी स्वतःच्या अभ्यासक्रमांमध्ये आदर्श संतुलन निवडू शकतील.

22.9. नंतरचे महत्त्वाचे पुढाकार शक्य करण्यासाठी, उच्च शिक्षण पातळीवर आणि त्यानंतरही पुढील अनेक पावले शिक्षणासोबतच उचलली जातील. पहिले, वर नमूद केलेले अनेक प्रकारचे अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी आणि शिकवण्यासाठी शिक्षक आणि प्राध्यापकांची एक उत्कृष्ट टीम विकसित करावी लागेल. भारतीय भाषा, तुलनात्मक साहित्य, सृजनात्मक लेखन, कला, संगीत, तत्त्वज्ञान इत्यादींचे सशक्त विभाग आणि कार्यक्रम देशभरात सुरू आणि विकसित केले जातील आणि या विषयांमध्ये 4 वर्षांच्या दुहेरी B.Ed. पदवीसह इतर पदवी कार्यक्रम विकसित केले जातील. हे विभाग आणि कार्यक्रम विशेषतः उच्च-गुणवत्तेचे भाषा शिक्षक, तसेच कला, संगीत, तत्त्वज्ञान आणि लेखनाचे शिक्षक विकसित करण्यासाठी मदत करतील, ज्यांची हे धोरण पार पाडण्यासाठी देशभरात आवश्यकता असेल. NRF या सर्व क्षेत्रांमधील दर्जेदार संशोधनासाठी निधीपुरवठा करेल. स्थानिक संगीत, कला, भाषा आणि हस्तकलांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि विद्यार्थी जेथे शिकतात तेथील संस्कृती आणि स्थानिक ज्ञानाची त्यांना जाणीव असेल हे सुनिश्चित करण्यासाठी उत्कृष्ट स्थानिक कलाकार आणि कारागिरांना अतिथी शिक्षक म्हणून नियुक्त केले जाईल. प्रत्येक उच्च शिक्षण संस्था आणि अगदी प्रत्येक शाळा किंवा शाळा संकुले देखील, विद्यार्थ्यांना कला, कल्पकता आणि प्रदेशाच्या/देशाच्या समृद्ध खजिन्याची ओळख करून देण्यासाठी त्यांच्याकडे रहिवासी-कलाकार असतील हे उद्दिष्ट बाळगतील.

22.10. शिक्षणाची उपलब्धता आणि GER वाढवण्यासाठी आणि सर्व भारतीय भाषांची शक्ती, वापर आणि चैतन्य वाढवण्यासाठी उच्च शिक्षण क्षेत्रातील अधिक HEI आणि अधिक कार्यक्रम मातृभाषा/स्थानिक भाषा शिकवण्याचे माध्यम म्हणून वापरतील आणि/किंवा द्विभाषिक कार्यक्रम देतील. खासगी उच्च शिक्षण संस्थांनादेखील भारतीय भाषा शिकवण्याचे माध्यम म्हणून वापरण्यासाठी आणि/किंवा द्विभाषिक कार्यक्रम देण्यासाठी उत्तेजन आणि प्रोत्साहन दिले जाईल. द्विभाषिक प्रकारच्या चार वर्षांच्या B.Ed. दुहेरी पदवी कार्यक्रमांची देखील मदत होईल, उदा. विज्ञान आणि गणिताच्या शिक्षकांच्या संवर्गाला देशभरातील शाळांमध्ये द्विभाषिक प्रकारे विज्ञान शिकवण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी.

22.11. अनुवाद आणि दुभाषी काम, कला आणि संग्रहालय प्रशासन, पुरातत्त्वशास्त्र, पुरातन वस्तू संरक्षण, ग्राफिक डिझाईन आणि वेब डिझाइनमधील उच्च-गुणवत्तेचे कार्यक्रम आणि पदव्या उच्च शिक्षण प्रणालीमध्ये तयार केल्या जातील. आपली कला आणि संस्कृतीचे जतन आणि प्रसार करण्यासाठी, विविध भारतीय भाषांमध्ये उच्च-गुणवत्तेचे साहित्य विकसित करण्यासाठी, पुरातन वस्तू जतन करण्यासाठी, संग्रहालये आणि वारसास्थळांचे किंवा पर्यटन स्थळांचे अभिरक्षण (क्युरेट) करण्यासाठी आणि ती चालवण्यासाठी उच्च पात्रतेच्या व्यक्ती विकसित करणे, ज्यायोगे पर्यटन उद्योग देखील मोठ्या प्रमाणात बळकट होईल.

22.12. धोरणात हे मान्य केले आहे की भारतातील समृद्ध विविधतेचे ज्ञान विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहून आत्मसात केले पाहिजे. याचा अर्थ, देशाच्या विविध भागांत विद्यार्थ्यांच्या दौऱ्यांसारखे साधे उपक्रम समाविष्ट करणे, ज्यामुळे केवळ पर्यटनालाच चालना मिळणार नाही तर भारताच्या वेगवेगळया भागांमधील विविधता, संस्कृती, परंपरा आणि ज्ञान यांचे आकलन होईल व महत्त्व समजेल. या दिशेने ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ अंतर्गत, देशातील 100 पर्यटनस्थळे निश्चित केली जातील, जिथे शैक्षणिक संस्था त्यांच्या विद्यार्थ्यांना, या भागांविषयीचे त्यांचे ज्ञान वाढवण्याचा एक भाग

म्हणून, या ठिकाणांचा आणि त्यांचा इतिहास, वैज्ञानिक योगदान, परंपरा, स्थानिक साहित्य आणि ज्ञान, इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी पाठवतील.

22.13. कला, भाषा आणि मानव्यशास्त्राशी संबंधित उच्च शिक्षणामध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम आणि पदव्या विकसित केल्याने, या पात्रतेचा वापर करणाऱ्या उच्च-दर्जाच्या रोजगारांच्या संधींमध्येदेखील विस्तार व्हायला मदत होईल. परिणामकारक पध्दतीने काम करण्यासाठी पात्र व्यक्तींची तातडीने गरज असलेल्या शेकडो अकादमी, वस्तुसंग्रहालये, कला दालने आणि जागतिक वारसा स्थाने अजूनही आहेत. योग्य पात्रता असलेल्या उमेदवारांची भरती केल्याने आणि नवीन कलाकृती मिळवून त्यांचे जतन केल्याने, अतिरिक्त संग्रहालये (व्हर्च्युअल आणि इ-संग्रहालये यासहित), कला दालने, जागतिक वारसास्थळांचा योगदानाद्वारे, आपला वारसा आणि भारताचा पर्यटन उद्योग सुरक्षित राहायला मदत होईल.

22.14. उच्च दर्जाचे अध्ययन साहित्य आणि इतर महत्त्वाचे लिखित व मौखिक साहित्य, सामान्य जनतेला विविध भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी, भारताला आपल्या भाषांतर आणि दुभाषी कामाच्या प्रयत्नांमध्ये विस्तार करावा लागेल. यासाठी, भाषांतर आणि दुभाषी कामाच्या भारतीय संस्थेची (इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ट्रान्सलेशन ॲन्ड इंटरप्रिटेशन - IITI) स्थापना केली जाईल. अशा संस्थेच्या माध्यमातून देशासाठी एक खूप मोठी सेवा उपलब्ध करून दिली जाईल तसेच अनेक बहु-भाषीय भाषा आणि विषय तज्ज्ञ आणि भाषांतर व दुभाषी कामातील तज्ज्ञांची नियुक्ती केली जाईल. यामुळे सर्व भारतीय भाषांचा प्रसार व्हायला मदत होईल. भाषांतर आणि दुभाषी कामाच्या प्रयत्नांना बळकटी देण्याच्या दृष्टीने, IITI मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर करेल. कालांतराने नैसर्गिकरित्या IITI चा विस्तार होईल आणि जशी जशी पात्र उमेदवारांची मागणी आणि संख्या वाढेल तसे तसे HEI सहित अनेक ठिकाणी IITI ची स्थापना केली जाईल, जेणेकरून इतर संशोधन विभागांबरोबर सहयोगाने काम करणे सुलभ होईल.

22.15. विविध भाषासाहित्य आणि विषयांमध्ये असलेले संस्कृतचे अफाट आणि लक्षणीय योगदान आणि साहित्य, त्याचे सांस्कृतिक महत्त्व आणि वैज्ञानिक स्वरूप लक्षात घेता, संस्कृतला फक्त एक-शाखीय पाठशाळा आणि विद्यापीठांपुरते मर्यादित न ठेवता, मोठ्या प्रमाणात शाळांमध्ये - त्रि-भाषा सूत्रांमधील एका पर्यायाच्या रूपाने - तसेच उच्च शिक्षणामध्ये संस्कृतची उपलब्धता वाढवून, संस्कृतला मुख्य प्रवाहात आणण्यात येईल. संस्कृतला बाकी विषयांपासून वेगळे करून शिकवले जाणार नाही तर, मनोरंजक आणि नाविन्यपूर्ण पध्दतीने आणि गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, नाटक, योग यासारख्या समकालीन आणि प्रसंगोचित विषयांशी संबंध जोडून शिकवले जाईल. या धोरणातील बाकीच्या भागाबरोबर मेळ राखत, संस्कृत विद्यापीठेदेखील उच्च शिक्षणाच्या बहुशाखीय संस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करतील. संस्कृत अध्यापन आणि संस्कृत व संस्कृत ज्ञान व्यवस्थेमध्ये असामान्य आंतरशाखीय संशोधन करण्यात गुंतलेल्या विभागांची स्थापना/मजबूतीकरण, नवीन बहुशाखीय उच्च शिक्षण व्यवस्थेंतर्गत केले जाईल. विद्यार्थ्यांची इच्छा असल्यास, संस्कृत एका सर्वांगीण बहुशाखीय उच्च शिक्षणाचा नैसर्गिक भाग बनू शकेल. शिक्षण आणि संस्कृतमधील 4 वर्षांच्या एकात्मिक बहुशाखीय B.Ed. च्या दुहेरी पदवीची सुरुवात करून देशभरातील संस्कृतच्या शिक्षकांचे मोठ्या प्रमाणात मिशन मोडमध्ये व्यावसायिकरण करण्यात येईल.

22.16. सर्व अभिजात भाषा आणि साहित्याचे अध्ययन करणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांचा विस्तार भारताकडून केला जाईल. असे करण्याचे मुख्य उद्दिष्ट असेल, दुर्लक्षित अशा हजारो-लाखो हस्तलिखितांना एकत्रित करणे आणि त्यांचे जतन, भाषांतर आणि अभ्यास करण्याच्या दिशेने ठोस प्रयत्न करणे. संस्कृत आणि सर्व भारतीय भाषा शिकवणाऱ्या देशभरातील संस्था आणि विभागांना बळकटी दिली जाईल तसेच, मोठ्या संख्येने अस्तित्वात असलेली

हस्तलिखिते आणि इतर विषयांशी त्यांचा संबंध, याविषयी अभ्यास करण्याकरता विद्यार्थ्यांच्या अनेक नवीन तुकड्यांना/बॅचेसना पुरेसे प्रशिक्षण दिले जाईल. आपली स्वायत्तता अबाधित राखत, विद्यापीठांबरोबर विलीन होण्याचे उद्दिष्ट अभिजात भाषा संस्थांसमोर असेल, जेणेकरून सशक्त आणि सखोल बहुशाखीय कार्यक्रमांतर्गत अध्यापकांना काम करता येईल आणि विद्यार्थ्यांनादेखील प्रशिक्षण देता येईल. भाषेला समर्पित विद्यापीठे बहुशाखीय होतील आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, जिथे शक्य असेल तिथे, शिक्षण आणि एखाद्या भाषेत B.Ed. ची दुहेरी पदवी या विदयापीठांकडून उपलब्ध करून दिली जाईल, जेणेकरून त्या भाषेतील असामान्य शिक्षक तयार होतील. पुढे जाऊन, भाषांसाठी नवीन संस्थेची स्थापना करायचा देखील प्रस्ताव आहे. एखाद्या विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये पाली, पर्शियन आणि प्राकृत या भाषांच्या राष्ट्रीय संस्थेचीदेखील (किंवा संस्थांची) स्थापना केली जाईल. भारतीय कला, कलेचा इतिहास आणि भारतीय विद्या यांचे अध्ययन करणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांसाठीदेखील अशा प्रकारचे उपक्रम हाती घेतले जातील. या सर्व क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्याकरिता संशोधनासाठी NRF कडून मदत केली जाईल.

22.17. अभिजात भाषा, आदिवासी भाषा आणि नामशेष होत चाललेल्या भाषांसहित, सर्व भारतीय भाषांचे जतन आणि त्यांचा प्रचार करण्याचे प्रयत्न नव्या जोमाने केले जातील. लोकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग याबरोबरच, तंत्रज्ञान आणि क्राऊडसोर्सिंगची या प्रयत्नांमध्ये महत्त्वाची भूमिका असेल.

22.18. भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक भाषेसाठी अकादमींची स्थापना केली जाईल. आधुनिक संकल्पनांसाठी सोपा पण अचूक शब्दसंग्रह निश्चित करण्यासाठी आणि नियमितपणे अद्ययावत शब्दकोश प्रकाशित करण्यासाठी यामध्ये महान विद्वान व्यक्ती आणि स्थानिक भाषिकांचा समावेश केला जाईल (जगभरातील इतर अनेक भाषांसाठी होणाऱ्या यशस्वी प्रयत्नांच्या सदृश). या शब्दकोशांची निर्मिती करण्याकरता, अकादमी एकमेकांचा सल्ला घेतील, आणि काही प्रकरणांमध्ये सामान्य जनतेकडून मिळालेल्या सल्ल्यांमधून सर्वोत्तम सल्ला निवडला जाईल. जिथे शक्य असेल तिथे सामान्यत: वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा स्वीकार करण्याचा प्रयत्न केला जाईल. शिक्षण, पत्रकारिता, लेखन, वक्तृत्व इत्यादीमध्ये वापर करण्यासाठी, हे शब्दकोश मोठ्या प्रमाणात प्रसारित केले जातील, तसेच ते वेब वर आणि पुस्तक रूपातदेखील उपलब्ध असतील. आठव्या अनुसूचीमध्ये असलेल्या भाषांसाठी अकादमी स्थापित करण्याचे काम केंद्र सरकारकडून, राज्य सरकारबरोबर सल्लामसलत करून किंवा त्यांच्या सहयोगाने केले जाईल. याच प्रमाणे, व्यापक प्रमाणात बोलल्या जाणाऱ्या इतर भारतीय भाषांसाठी अकादमीची स्थापना केंद्र/राज्य सरकारद्वारे केली जाईल.

22.19 नामशेष होत चाललेल्या भाषांसहित सर्व भारतीय भाषा आणि त्यांच्याशी संबंधित समृद्ध स्थानिक कला आणि संस्कृतीचे जतन करण्याच्यादृष्टीने, वेब-आधारित प्लॅटफॉर्म/पोर्टल/विकी या माध्यमातून, सर्व भारतीय भाषा आणि त्याच्याशी संबंधित स्थानिक कला आणि संस्कृतीला लेखी स्वरूप दिले जाईल. भाषा बोलणे, गोष्टी सांगणे, कविता वाचन करणे तसेच नाटक, लोकसंगीत आणि नृत्य सादर करणे आणि यासारख्या इतर कार्यात गुंतलेल्या लोकांचे (खासकरून ज्येष्ठ नागरिकांचे) व्हिडिओ, ध्वनीमुद्रणे तसेच शब्दकोश इ. या प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध असतील. या प्लॅटफॉर्म्सवर/पोर्टल्स/विकीजवर प्रसंगोचित साहित्याचा समावेश करून या प्रयत्नांना हातभार लावायचे आवाहन देशभरातील सर्व लोकांना केले जाईल. असे प्लॅटफॉर्म्स समृद्ध करण्यासाठी विद्यापीठे आणि त्यांचे संशोधन गट एकमेकांबरोबर आणि देशभरातील समुदायांबरोबर काम करतील. जतन करण्याचे प्रयत्न आणि त्याच्याशी संबंधित प्रकल्पांसाठी (उदा. इतिहास, पुरातत्वशास्त्र, भाषाशास्त्र इ.) NRF कडून अर्थसहाय्य केले जाईल.

22.20 स्थानिक तज्ज्ञांकडे आणि/किंवा उच्च शिक्षण व्यवस्थेंतर्गत भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी, सर्व वयोगटातील लोकांसाठी शिष्यवृत्त्यांची स्थापना केली जाईल. भारतीय भाषांचा प्रसार तेव्हाच शक्य आहे जेव्हा त्यांचा नियमितपणे वापर केला जाईल, आणि अध्यापन व अध्ययनासाठी त्यांचा उपयोग होईल. भारतीय भाषांमध्ये जोमदार काव्य, कादंबऱ्या, अकाल्पनिक पुस्तके, पाठ्यपुस्तके, पत्रकारिता आणि इतर साहित्याच्या निर्मितीची सुनिश्चितता करण्यासाठी, प्रोत्साहन देणाऱ्या योजनांची स्थापना केली जाईल उदा. भारतीय भाषांमधील विविध प्रकारातील असामान्य काव्य आणि गद्यासाठी पुरस्कार. रोजगाराच्या संधी मिळण्याकरता लागणाऱ्या पात्रतेच्या मापदंडांमध्ये, भारतीय भाषांवर प्रभुत्व या मापदंडाचा समावेश करण्यात येईल.

## 23. तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मीकरण

23.1 माहिती व संचार तंत्रज्ञान आणि इतर अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये (उदा. अंतराळ) भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करत आहे. डिजिटल भारत मोहिमेमुळे संपूर्ण राष्ट्रांचे एका डिजिटलदृष्ट्या सक्षम आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतर व्हायला मदत होत आहे. या रूपांतरामध्ये शिक्षण एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल पण, शैक्षणिक प्रक्रिया आणि निष्पत्ती यामध्ये सुधारणा करण्यामागे तंत्रज्ञानाचा मोठा हात असेल; अशा प्रकारे, तंत्रज्ञान आणि शिक्षणामधील संबंध सर्व स्तरांवर दोन्ही बाजूंनी काम करतील.

23.2 तांत्रिक विकासाच्या तीव्र वेगाला, तंत्रज्ञानाचे जाणकार शिक्षक आणि उद्योजकांसहित विद्यार्थी उद्योजकांच्या कल्पकतेची जोड मिळाल्यावर, तंत्रज्ञानाचा शिक्षणावर अनेक प्रकारे परिणाम होईल हे निश्चित; सध्या यातील फक्त काही परिणामांचा अंदाज लावता येईल. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ब्लॉक चेन्स, स्मार्ट बोर्ड्स, हस्त-चलित (हँडहेल्ड) कंप्युटिंग डिवायसेस, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अडॅप्टीव कंप्युटर टेस्टिंग आणि इतर स्वरूपातील सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यासाख्या नवीन तंत्रज्ञानांमुळे, विद्यार्थी वर्गात काय शिकतात फक्त यामध्ये बदल होणार नाही तर, ते कसे शिकतात यातदेखील बदल होईल. आणि म्हणूनच, तांत्रिक आणि शैक्षणिक आघाडीवर, या आणि इतर क्षेत्रांमध्ये विस्तृत संशोधन होणे गरजेचे आहे.

23.3 शिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्यासाठी, तंत्रज्ञानाच्या वापराला आणि एकात्मीकरणाला पाठिंबा देऊन त्याचा अवलंब केला जाईल, पण अशा प्रकारचे तांत्रिक हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढण्यापूर्वी, योग्य संदर्भानुसार त्यांचे काटेकोर आणि पारदर्शक मूल्यांकन केल्यानंतरच असे केले जाईल. तंत्रज्ञानाचा वापर करून शाळा आणि उच्च शिक्षण या दोन्हीतील अध्ययन, मूल्यांकन, नियोजन आणि प्रशासन इत्यादीची गुणवत्ता वाढवण्याच्यादृष्टीने, मुक्तपणे विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध असावे, या विचाराने राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजिकल फोरम - NETF) या स्वायत्त संस्थेची स्थापना केली जाईल. तंत्रज्ञानाचा स्वीकार, त्याचे उपयोजन (डिप्लॉयमेंट) आणि वापर याविषयी निर्णय घेण्याची प्रक्रिया सोपी करणे, हे NETF चे उद्दिष्ट असेल. शैक्षणिक संस्था, राज्य आणि केंद्र सरकारातील नेते तसेच इतर हितसंबंधींना, आधुनिक ज्ञान आणि संशोधनाविषयी माहिती देऊन तसेच सल्लामसलत करण्याची आणि सर्वोत्तम प्रथांविषयी माहिती देण्याची संधी देऊन, हे उद्दिष्ट साध्य केले जाईल. NETF चे कार्य खालीलप्रमाणे असेल:

a) केंद्र आणि राज्य सरकारच्या संस्थांना तंत्रज्ञानावर आधारित हस्तक्षेपांबद्दल पुराव्यांसह स्वतंत्र सल्ला प्रदान करणे;
b) शैक्षणिक तंत्रज्ञानामध्ये बौद्धिक आणि संस्थात्मक क्षमता विकसित करणे;

c) या क्षेत्रातील धोरणात्मक भर देण्याच्या विभागांची परिकल्पना करणे; आणि
d) संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी नवीन दिशा स्पष्ट करणे.

23.4. शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलत्या क्षेत्रात सुसंबद्ध राहण्यासाठी, NETF शैक्षणिक तंत्रज्ञानाचे नवप्रवर्तक आणि अभ्यासकांसह एकाहून अधिक स्रोतांकडून नियमितपणे अधिकृत डेटा मिळवत राहील आणि डेटाचे विश्लेषण करण्यासाठी संशोधकांच्या विविध गटांसोबत काम करेल. ज्ञानविषयक आणि त्याचा उपयोग करणारी एक उत्साही संस्था निर्माण करण्यास मदत म्हणून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संशोधक, उद्योजक आणि व्यावसायिकांकडून सूचना मिळवण्यासाठी, NETF अनेक प्रादेशिक आणि राष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा इत्यादींचे आयोजन करेल.

23.5. तंत्रज्ञानाच्या वापराचा भर प्रामुख्याने अध्यापन-अध्ययन आणि मूल्यांकन प्रक्रिया सुधारणे, शिक्षकांच्या तयारीस आणि व्यावसायिकांच्या विकासास सहाय्य करणे, शिक्षणाची उपलब्धता वाढवणे आणि प्रवेश, उपस्थिती, मूल्यांकन इत्यादींशी संबंधित प्रक्रियांसह शैक्षणिक नियोजन, व्यवस्थापन व प्रशासन सुलभ करणे यांवर असेल.

23.6. वरील सर्व उद्देशांसाठी अनेक प्रकारची शैक्षणिक सॉफ्टवेअर्स विकसित केली जातील आणि सर्व स्तरांवरील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी उपलब्ध करुन दिली जातील. अशी सर्व सॉफ्टवेअर्स सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असतील आणि दुर्गम भागातील विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थ्यांसह बऱ्याच प्रकारच्या वापरकर्त्यांसाठी सहज वापरता येण्याजोगी असतील. सर्व राज्ये तसेच NCERT, CIET, CBSE, NIOS, आणि इतर संघटना/संस्था ई-मजकुराचे अध्यापन-अध्ययन सर्व प्रादेशिक भाषांमध्ये विकसित करणे सुरू ठेवतील, आणि ते DIKSHA प्लॅटफॉर्मवर अपलोड केले जाईल. या प्लॅटफॉर्मचा उपयोग ई-मजकुराद्वारे शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी केला जाऊ शकतो. DIKSHA तसेच इतर शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या पुढाकारांचा प्रचार आणि विस्तार करण्यासाठी CIET अधिक बळकट केले जाईल. शाळांमध्ये शिक्षकांना योग्य उपकरणे उपलब्ध करुन दिली जातील जेणेकरुन शिक्षक अध्यापन-अध्ययन पद्धतींमध्ये ई-मजकूर योग्यरित्या समाविष्ट करू शकतील. DIKSHA/SWAYAM सारखे तंत्रज्ञान-आधारित शैक्षणिक प्लॅटफॉर्म शाळा आणि उच्च शिक्षणामध्ये अधिक चांगल्या प्रकारे समाविष्ट केले जातील आणि त्यात वापरकर्त्यांद्वारे रेटिंग नोंदवण्याचा समावेश असेल जेणेकरुन मजकूर विकसक (कंटेंट डेव्हलपर्स) वापरण्यास सोपे आणि दर्जेदार मजकूर तयार करू शकतील.

23.7. शिक्षण व्यवस्थेत अनिवार्यपणे परिवर्तन घडवणाऱ्या उदयोन्मुख क्रांतिकारी तंत्रज्ञानांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असेल. 1986/1992 मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार केले गेले तेव्हा इंटरनेटमुळे घडू शकणाऱ्या क्रांतिकारी बदलांच्या परिणामांचा अंदाज बांधणे कठीण होते. या जलद आणि क्रांतिकारी बदलांना तोंड देण्याची आपल्या सध्याच्या शिक्षण व्यवस्थेची असमर्थता, वाढत्या स्पर्धात्मक जगात, वैयक्तिकरित्या आणि राष्ट्रीय पातळीवर आपल्यासाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण करते. उदाहरणार्थ, संगणकांनी वास्तविक आणि प्रक्रियात्मक ज्ञानाचा फायदा करून घेण्याबाबत मानवाला मोठ्या प्रमाणात मागे टाकले आहे, मात्र आपले शिक्षण सर्व स्तरांवर, विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची क्षमता विकसित करण्याकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर अशा ज्ञानाचा अतिरिक्त भार टाकते.

23.8. हे धोरण अशा वेळी तयार केले गेले आहे जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) 3D/7D आभासी वास्तविकता (व्हर्च्युअल रिॲलिटी) हे एक निर्विवादपणे क्रांतिकारी तंत्रज्ञान म्हणून उदयास आले आहे. AI-आधारित अंदाज वर्तवण्याचा खर्च जसजसा कमी होईल, तसे AI तुल्यबळ किंवा अधिक चांगली कामगिरी करण्यास सक्षम असेल आणि म्हणूनच, काही विशिष्ट अंदाज वर्तवण्याच्या कामात डॉक्टरांसारख्या कुशल व्यावसायिकांसाठीसुद्धा ते एक

मौल्यवान सहाय्यक ठरेल. कामाच्या ठिकाणी देखील AI ची क्रांतिकारी बदल घडवण्याची क्षमता स्पष्ट आहे आणि शिक्षण व्यवस्था याला त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सज्ज असणे आवश्यक आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञानांचे, त्यांच्या क्षमता आणि उलथापालथ घडण्याचा अंदाजित कालावधी यानुसार वर्गीकरण करणे आणि हे विश्लेषण वेळोवेळी MHRD कडे सादर करणे हे NETFचे कायमस्वरूपी काम असेल. या माहितीच्या आधारे, ज्या तंत्रज्ञानांच्या आगमनास शिक्षण व्यवस्थेकडून प्रतिसाद देण्याची गरज आहे ते MHRD औपचारिकपणे निश्चित करेल.

23.9. नवीन नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाला MHRD ने औपचारिक मान्यता दिल्याच्या परिणामस्वरूप, राष्ट्रीय संशोधन संस्था (नॅशनल रिसर्च फाऊंडेशन) तंत्रज्ञानात संशोधन करण्याच्या प्रयत्नांना सुरूवात किंवा त्यांचा विस्तार करेल. AI च्या संदर्भात, NRF त्रिसूत्री दृष्टिकोनाचा विचार करू शकेल: (अ) कोअर AI संशोधनाला चालना देणे, (ब) अनुप्रयोग-आधारित संशोधन विकसित करणे आणि उपयोजन करणे आणि (क) AI वापरुन आरोग्यसेवा, शेती आणि हवामान बदल यासारख्या क्षेत्रातील जागतिक आव्हानांचा सामना करवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संशोधन प्रयत्नांना चालना देणे.

23.10. फक्त नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानामधील (डिसरप्टीव टेक्नॉलॉजी) संशोधन करण्यातच नाही तर अत्याधुनिक कार्यक्षेत्रातील सूचनात्मक साहित्य आणि अभ्यासक्रम (ऑनलाईन अभ्यासक्रमासहित) यांच्या पहिल्या आवृत्त्या तयार करणे आणि, त्यांचा व्यावसायिक शिक्षण यासारख्या विशिष्ट क्षेत्रांवर होणारा परिणाम याचे मूल्यमापन करणे, यामध्येदेखील HEIs ची सक्रिय भूमिका असेल. तंत्रज्ञानाने परिपक्वतेची विशिष्ट पातळी गाठल्यावर, हजारो विद्यार्थी असलेल्या HEIs साठी अध्यापन आणि कौशल्ये निर्मितीचे प्रयत्न वाढवण्याच्यादृष्टीने परिस्थिती अनुकूल असेल, आणि यामध्ये नोकरीच्या सज्जतेसाठी विशिष्ट प्रशिक्षणाचादेखील समावेश असेल. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानामुळे काही नोकऱ्या निरर्थक ठरतील, आणि म्हणूनच रोजगार तयार करणे आणि टिकवून ठेवण्याच्यादृष्टीने, कौशल्ये निर्माण करायच्या आणि कौशल्ये कमी करायच्या (स्किलिंग आणि डीस्किलिंग) पध्दती कार्यक्षम आणि गुणवत्तापूर्ण असणे अधिकच महत्त्वाचे असेल. अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्याकरता संस्थात्मक आणि गैर-संस्थात्मक भागीदारांना मान्यता देण्याची स्वायत्तता संस्थांकडे असेल; कौशल्ये आणि उच्च शिक्षण आराखड्याबरोबर या प्रशिक्षणांचे एकात्मीकरण करण्यात येईल.

23.11 मशीन लर्निंगसारख्या मूलभूत क्षेत्रांमध्ये तसेच बहुशाखीय क्षेत्रे “AI + X” आणि आरोग्य सेवा, कृषी आणि कायदा यासारख्या व्यावसायिक क्षेत्रांमध्ये Ph.D. आणि मास्टर्स कार्यक्रम उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट विद्यापीठांसमोर असेल. विद्यापीठे SWAYAM सारख्या प्लॅटफॉर्म्सवर हे अभ्यासक्रम तयार करू शकतील आणि त्यांचा प्रसार करू शकतील. याचा अवलंब जलद गतीने होण्याकरता HEIs कडून पदवीपूर्व आणि व्यवसाय शिक्षण कार्यक्रमांच्या ऑनलाईन अभ्यासक्रमाची सांगड पारंपरिक अध्यापनाबरोबर घातली जाईल. AI ला सहाय्य करण्याकरता, डेटा अनोटेशन, इमेज क्लासिफिकेशन आणि स्पीच ट्रान्सक्रिप्शन यासारख्या कमी कौशल्यांच्या कामांसाठी HEI द्वारा विशिष्ट प्रशिक्षणसुध्दा दिले जाईल. शालेय विद्यार्थ्यांना भाषा शिकवण्याचे प्रयत्न आणि भारताच्या विविध भाषांकरता नैसर्गिक भाषा प्रक्रियेला (नॅचरल लॅंग्वेज प्रोसेसिंग) प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न, या दोन्हीची योग्य सांगड घातली जाईल.

23.12 नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या उदयाबरोबर, त्याच्या संभाव्य परिणामांविषयी सर्वसाधारण जनतेमधील जागरूकता वाढवण्याकरता आणि त्याच्याशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्याकरता, शालेय शिक्षण आणि निरंतर शिक्षणाची मदत होईल. या तंत्रज्ञानांशी संबंधित बाबींवर माहितीपूर्वक सार्वजनिक संमती मिळवण्याच्यादृष्टीने ही जागरूकता महत्त्वाची आहे. शाळेमध्ये चालू घडामोडी आणि नैतिक समस्यांचा अभ्यास

करताना, क्रांतिकारी तंत्रज्ञानावरील चर्चेचा त्यामध्ये समावेश केला जाईल, उदा. NETF/MHRD ने निश्चित केलेले क्रांतिकारी तंत्रज्ञान. निरंतर शिक्षणासाठी योग्य सूचनात्मक आणि चर्चात्मक साहित्य तयार केले जाईल.

23.13 AI-आधारित तंत्रज्ञानासाठी डेटा हे प्रमुख इंधन आहे आणि, डेटा हाताळणे (हँडलिंग), डेटा संरक्षण (प्रोटेक्शन) इत्यादीशी संबंधित गोपनीयता, कायदे आणि मानके यांच्याशी जोडलेल्या समस्यांविषयी जागरूकता निर्माण करणे अतिशय महत्त्वाचे आहे. AI-आधारित तंत्रज्ञानाचा विकास आणि उपयोजन (डिप्लॉयमेंट) यांच्याशी संबंधित नैतिक समस्यांवर प्रकाश टाकणे गरजेचे आहे. या जागरूकता निर्माण करण्याच्या प्रयत्नांमध्ये शिक्षण एक मोठी भूमिका बजावेल. स्वच्छ आणि अक्षय ऊर्जा, पाणी संरक्षण, शाश्वत शेती, पर्यावरणाचे संरक्षण आणि इतर हरित उपक्रम यासारख्या क्रांतिकारी तंत्रज्ञानामुळे जीवन जगण्याच्या पद्धतीत आणि विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या पद्धतीत बदल होणे अपेक्षित आहे; शिक्षणामध्ये अशा क्रांतिकारी तंत्रज्ञानाकडेदेखील प्राधान्याने लक्ष दिले जाईल.

## 24. ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षण: तंत्रज्ञानाचा समान वापर सुनिश्चित करणे

24.1 नवीन परिस्थिती आणि वास्तविकता यासाठी नवीन उपक्रमांची गरज असते. सध्या वाढत असलेले साथीचे रोग आणि महामारीची परिस्थिती लक्षात घेता, जेव्हा कधी आणि जिथे कुठे पारंपरिक आणि प्रत्यक्ष शिकवण्याच्या माध्यमांचा वापर शक्य नसेल, तेव्हा दर्जेदार शिक्षणाची पर्यायी माध्यमे तयार ठेवणे गरजेचे झाले आहे. या संदर्भात, तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या फायद्यांचा लाभ घेण्याचे महत्त्व राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ने मान्य करत, तंत्रज्ञानाशी संबंधित जोखमा आणि धोक्यांचीसुध्दा दखल घेतली आहे. ऑनलाईन शिक्षणातील तोटे दूर करत किंवा त्यांचे निराकरण करत, ऑनलाईन शिक्षणाचे फायदे कशा प्रकारे मिळवता येतील हे निश्चित करण्यासाठी, काळजीपूर्वकपणे तयार केलेल्या आणि योग्यरितीने प्रमाणबद्ध केलेल्या पथदर्शी अभ्यासाची (पायलट स्टडी) गरज आहे. या दरम्यान, सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यातील वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करण्याकरता, विद्यमान डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि ICT-आधारित शैक्षणिक उपक्रमांचा दर्जा वाढवावा लागेल आणि त्यांचा विस्तार करावा लागेल.

24.2 तथापि, जोपर्यंत डिजिटल भारत मोहीम आणि परवडणारी कंप्युटिंग उपकरणांची उपलब्धता यासारख्या एकत्रित प्रयत्नांमधून डिजिटल दरी भरून काढली जात नाही, तोपर्यंत ऑनलाईन/डिजिटल शिक्षणाच्या फायद्यांचा लाभ घेणे शक्य नाही. ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करत असताना समानतेविषयक शंका/समस्यांची योग्य दखल घेतली जाणे महत्त्वाचे आहे.

24.3 प्रभावी ऑनलाईन प्रशिक्षक होण्यासाठी शिक्षकांना योग्य प्रशिक्षण आणि विकासाची गरज आहे. पारंपरिक वर्गातील एक चांगला शिक्षक ऑनलाईन वर्गातदेखील तेवढीच चांगली कामगिरी करेल असे गृहित धरता येणार नाही. अध्यापनशास्त्रातील आवश्यक बदलांव्यतिरिक्त, ऑनलाईन मूल्यांकनासाठीदेखील वेगळ्या दृष्टिकोनाची गरज आहे. मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा आयोजित करण्यात अनेक आव्हाने आहेत जसे की, ऑनलाईन पद्धतीने विचारता येऊ शकणाऱ्या प्रश्नांच्या प्रकारांवर मर्यादा, नेटवर्क आणि वीजपुरवठा खंडित होणे, आणि परीक्षेतील अनैतिक प्रकार रोखणे. ऑनलाईन/डिजिटल शिक्षणाच्या अवकाशात, ललित कला आणि विज्ञान प्रात्यक्षिके अशा काही विशिष्ट प्रकारच्या अभ्यासक्रम/विषयांना मर्यादा आहेत, ज्यांवर नाविन्यपूर्ण उपायांनी काही प्रमाणात मात करता येऊ शकेल. याशिवाय, ऑनलाईन शिक्षणाचा अनुभवात्मक आणि उपक्रम-आधारित शिक्षणाशी मेळ घातला जात नाही तोपर्यंत, ते केवळ स्क्रीन-आधारित शिक्षण बनण्याची शक्यता आहे ज्यात अध्ययनाच्या सामाजिक, भावात्मक आणि सायकोमोटर (मनोकारक) पैलूंकडे मर्यादित लक्ष असेल.

24.4. डिजिटल तंत्रज्ञानाचा उदय आणि शाळेपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवर अध्यापन-अध्ययनासाठी तंत्रज्ञानाचा फायदा करून घेण्याचे महत्त्व लक्षात घेता हे धोरण खालील प्रमुख उपक्रमांची शिफारस करते:

(a) **ऑनलाईन शिक्षणासाठी पथदर्शी अभ्यास:** सामान्य शिक्षणाचे ऑनलाईन शिक्षणाशी एकात्मीकरण करण्याच्या फायद्यांचे मूल्यांकन करण्यासाठी व दोष कमी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उपकरणांची सवय लागणे, ई-मजकुरासाठी सर्वाधिक पसंतीचा फॉरमॅट अशा इतर संबंधित बाबींचा अभ्यासदेखील करण्यासाठी, समांतरपणे काही पथदर्शी अभ्यासांची मालिका आयोजित करण्यासाठी योग्य संस्था जसे की, NETF, CIET, NIOS, IGNOU, IITs, NITs इ. निश्चित केल्या जातील. या पथदर्शी अभ्यासांचे निकाल सार्वजनिकरित्या जाहीर केले जातील आणि सतत सुधारणा करण्यासाठी वापरले जातील.

(b) **डिजिटल पायाभूत सुविधा:** भारताचा मोठा आकार, विविधता, गुंतागुंती आणि उपकरणांची उपलब्धता यावर उपाय म्हणून एकाहून अधिक प्लॅटफॉर्मद्वारा आणि विशिष्ट उपायांद्वारे वापरता येईल अशा, मुक्त, आंतरकार्यक्षम (इंटरऑपरेबल), विकसनक्षम, सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षण क्षेत्रात निर्माण करण्यासाठी गुंतवणूक करण्याची गरज आहे. यामुळे हे सुनिश्चित होईल की तंत्रज्ञानावर आधारित उपाय तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे कालबाह्य होणार नाहीत.

(c) **ऑनलाईन अध्यापन प्लॅटफॉर्म आणि साधने:** शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर नजर ठेवण्यासाठी, संरचित, वापरण्यास सोप्या, समृद्ध सहाय्यक साधनांचा संच प्रदान करण्यासाठी SWAYAM, DIKSHA अशा समर्पक विद्यमान ई-अध्ययन प्लॅटफॉर्म्सचा विस्तार केला जाईल. ऑनलाईन वर्ग घेण्यासाठी टू-वे-व्हिडिओ आणि टू-वे-ऑडिओ इंटरफेस यांसारखी साधने ही काळाची गरज आहे हे सध्याच्या महासाथीने दाखवून दिले आहे.

(d) **मजकूर निर्मिती, डिजिटल भांडार आणि प्रसार:** कोर्स वर्क, गेम्स आणि सिम्युलेशन शिकणे, ऑगमेंटेड वास्तव आणि व्हर्च्युअल वास्तव यासह मजकुराचे एक डिजिटल भांडार विकसित केले जाईल, ज्यामध्ये परिणामकारकता आणि गुणवत्तेबाबत वापरकर्त्यांद्वारे रेटिंग देण्याची एक स्पष्ट सार्वजनिक प्रणाली असेल. मजा घेऊन शिकण्यासाठी, ॲप्स, भारतीय कला व संस्कृती यांवर आधारित गेम्स अशी विद्यार्थ्यांना साजेशी साधने देखील, एकाहून अधिक भाषांमध्ये, वापरण्याच्या स्पष्ट सूचनांसह, तयार केली जातील. विद्यार्थ्यांपर्यंत ई-सामग्रीचा प्रसार करण्यासाठी एक विश्वासार्ह बॅकअप यंत्रणा प्रदान केली जाईल.

(e) **डिजिटल दरी कमी करणे:** अत्यंत मर्यादित डिजिटल सुविधा उपलब्ध असलेला लोकसंख्येचा एक मोठा वर्ग अजूनही अस्तित्वात आहे हे वास्तव लक्षात घेता, दूरदर्शन, रेडिओ आणि कम्युनिटी रेडिओ अशा विद्यमान प्रसारमाध्यमांचा चित्रप्रक्षेपण आणि प्रसारणासाठी व्यापकपणे वापर केला जाईल. असे शैक्षणिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांच्या विविध गरजा भागवण्यासाठी वेगवेगळया भाषांमध्ये 24/7 उपलब्ध करुन देण्यात येतील. सर्व भारतीय भाषांमध्ये मजकूर निर्मितीला महत्त्व दिले जाईल आणि ते आवश्यक असेल; डिजिटल मजकूर शिक्षक आणि विद्यार्थ्यांपर्यंत शक्यतो त्यांच्या शिक्षणाचे माध्यम असलेल्या भाषेतून पोहोचणे आवश्यक आहे.

(f) **व्हर्च्युअल प्रयोगशाळा:** व्हर्च्युअल प्रयोगशाळा तयार करण्यासाठी DIKSHA, SWAYAM आणि SWAYAMPRABHA यासारख्या विद्यमान ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्सचा उपयोग केला जाईल, जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष प्रयोग-आधारित अध्ययन उपलब्ध होईल. आधीच मजकूर लोड केलेल्या टॅबलेट्ससारख्या योग्य डिजिटल उपकरणांद्वारे SEDG विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याची शक्यता विचारात घेऊन ती विकसित केली जाईल.

(g) **शिक्षकांना प्रशिक्षण आणि प्रोत्साहन:** विद्यार्थी-केंद्रीत अध्यापनशास्त्राचे आणि ऑनलाईन शिक्षण प्लॅटफॉर्म आणि साधने वापरुन स्वतःच उच्च-गुणवत्तेचे ऑनलाईन मजकूर निर्माते कसे बनावे याचे शिक्षकांना काटेकोर प्रशिक्षण दिले जाईल. मजकुरासोबत आणि एकमेकांसोबत विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुलभ करण्यातील शिक्षकांच्या भूमिकेवर भर दिला जाईल.

(h) **ऑनलाईन मूल्यांकन आणि परीक्षा:** राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र किंवा परखसारख्या प्रस्तावित संस्था, शालेय बोर्ड्स, NTA किंवा इतर मान्यताप्राप्त संस्था क्षमता, पोर्टफोलिओ, रुब्रिक्स, मानक मूल्यांकने, आणि मूल्यांकनाचे विश्लेषण यांच्या रचनेसह मूल्यांकनाच्या आराखड्याची रचना आणि अंमलबजावणी तयार करतील. 21 व्या शतकातील कौशल्यांवर लक्ष केंद्रित करून शैक्षणिक तंत्रज्ञाने वापरून मूल्यांकनाचे नवीन मार्ग निश्चित करण्यासाठी अभ्यास हाती घेतले जातील.

(i) **अध्ययनाची मिश्र मॉडेल्स:** डिजिटल अध्ययन आणि शिक्षणाला प्रोत्साहन देताना, समोरासमोर प्रत्यक्ष अध्ययनाचे महत्त्वसुद्धा पूर्णपणे लक्षात घेण्यात आले आहे. त्यानुसार, वेगवेगळया विषयांच्या योग्य पुनरावृत्तीसाठी मिश्र अध्यापनाची विविध परिणामकारक मॉडेल्स शोधली जातील.

(j) **मानके निश्चित करणे:** ऑनलाईन आणि डिजिटल शिक्षणाबद्दलचे संशोधन होईल तसे NETF आणि इतर योग्य संस्था ऑनलाईन/ डिजिटल अध्यापन-अध्ययनासाठी आशय, तंत्रज्ञान, आणि अध्यापनशास्त्र यांची मानके निश्चित करतील. ही मानके राज्ये, बोर्ड्स, शाळा आणि शाळा संकुले, HEIs इ.साठी ई-शिक्षणाची मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी मदत करतील.

### 24.5 जागतिक दर्जाच्या डिजिटल पायाभूत सुविधा, शैक्षणिक डिजिटल सामग्री आणि क्षमता निर्माण करण्यासाठी एक समर्पित युनिट तयार करणे

शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर हे केवळ साध्य नाही तर एक प्रवास आहे आणि या धोरणातील उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध परिसंस्था एकत्र येण्याची क्षमता आवश्यक आहे. डिजिटल पायाभूत सुविधा, शैक्षणिक डिजिटल सामग्री आणि क्षमता निर्माण करण्यासाठी समन्वय साधण्यासाठी शालेय आणि उच्च शिक्षण, दोन्हींच्या इ-शिक्षणाच्या गरजा भागवण्यासाठी मंत्रालयात एक समर्पित युनिट तयार केले जाईल. तंत्रज्ञान वेगाने बदलत असल्यामुळे आणि उच्च दर्जाचे ई-शिक्षण देण्यासाठी तज्ज्ञांची गरज असल्यामुळे एक चैतन्यमय परिसंस्थेला फक्त भारतापुढील संख्या, विविधता, समानता यांच्या आव्हानावर उपाय योजण्यासाठीच नाही तर दरवर्षी अर्ध-आयुष्य कमी होणाऱ्या तंत्रज्ञानातील जलदगतीने होणाऱ्या बदलांबरोबर राहण्यासाठी उत्क्रांत होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे, या केंद्रात प्रशासन, शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान, डिजिटल अध्यापनशास्त्र आणि मूल्यांकन, ई-शासन अशा सर्व क्षेत्रातील तज्ज्ञ समाविष्ट असतील.

# विभाग IV. अंमलबजावणी

## 25. केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळाचे सक्षमीकरण

25.1 या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी साध्य करण्यासाठी एक दीर्घकालीन दृष्टिकोन आवश्यक आहे, तसेच सातत्यपूर्ण पद्धतीने तज्ज्ञतेची उपलब्धता आणि राष्ट्रीय, राज्य, संस्थात्मक आणि व्यक्तिगत अशा सर्वच पातळयांवर सर्व संबंधितांकडून एकत्रितपणे केलेल्या कृतीची आवश्यकता आहे. या संदर्भात, केंद्रिय शिक्षण सल्लागार मंडळ (सेन्ट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन – CABE) मजबूत करण्याची आणि सक्षम करण्याची शिफारस हे धोरण

करते. CABE ला खूप अधिक अधिकार असतील आणि ते केवळ शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासाशी संबंधित समस्यांसाठी एक व्यापक सल्लामसलतीचा आणि तपासणीचा मंच म्हणूनच कार्यरत नसेल. पुनरर्चना आणि पुनरुज्जीवन करण्यात आलेले CABE MHRD आणि राज्यांच्या संबंधित शिखर संस्थांच्या सहयोगाने देशातील शिक्षणाचा दृष्टिकोन सातत्याने विकसित करण्यासाठी, मांडण्यासाठी, त्याचे मूल्यांकन करण्यासाठी आणि परीक्षण करण्यासाठीसुद्धा जबाबदार असेल.

25.2 शिक्षण आणि अध्ययनावर पुन्हा लक्ष केंद्रित करण्यासाठी, मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे (MHRD) शिक्षण मंत्रालयात रूपांतर करणे, आवश्यक आहे.

## 26. अर्थ पुरवठा: सर्वांसाठी परवडण्याजोगे आणि दर्जेदार शिक्षण

26.1 समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपल्या युवकांना उच्च-दर्जाचे शिक्षण देण्याइतकी चांगली गुंतवणूक इतर कुठलीही नसल्यामुळे, हे धोरण शिक्षणातील गुंतवणूक वाढवण्यासाठी बांधील आहे. दुर्दैवाने, 1968 च्या धोरणात परिकल्पित केल्यानुसार, आणि 1986 च्या धोरणात पुन्हा नमूद केल्यानुसार आणि 1992 मधील धोरण परीक्षणात पुन्हा ठामपणे नमूद केल्यानुसार भारतात शिक्षणावरील सरकारी खर्च GDP च्या 6% या शिफारस केलेल्या पातळीच्या जवळ आलेला नाही. भारतात शिक्षणावरील सध्याचा सरकारी (केंद्र आणि राज्य सरकारे) खर्च GDP च्या सुमारे 4.43% (2017-18 च्या अंदाजित खर्चाच्या विश्लेषणानुसार) आणि शिक्षणावरील सरकारच्या एकूण खर्चाच्या सुमारे फक्त 10% आहे (आर्थिक सर्वेक्षण 2017-18). हे आकडे बहुतांश विकसित आणि विकसनशील देशांपेक्षा खूपच कमी आहेत.

26.2. उत्कृष्टतेसह शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि त्यासंबंधित अनेक फायदे या राष्ट्राला आणि त्याच्या अर्थव्यवस्थेला मिळवून देण्यासाठी, हे धोरण केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांनी शैक्षणिक क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणुकीत लक्षणीय वाढ करण्याला निःसंदिग्धपणे समर्थन देत आहे आणि तशी कल्पना करत आहे. शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढवून लवकरात लवकर जीडीपीच्या 6% पर्यंत पोहोचण्यासाठी केंद्र आणि राज्ये एकत्र काम करतील. भारताच्या भविष्यातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी आणि विकासासाठी खरोखर आवश्यक असलेल्या उच्च-गुणवत्तेच्या आणि न्याय्य सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेसाठी असे करणे अत्यंत महत्वपूर्ण मानले जात आहे.

26.3. विशेषतः, शिक्षणाच्या विविध महत्त्वाच्या भागांना आणि घटकांना आर्थिक सहाय्य प्रदान केले जाईल जसे की, सार्वत्रिक उपलब्धता, शैक्षणिक संसाधने, पोषणविषयक सहाय्य, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या आणि हिताच्या बाबी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची पुरेशी संख्या, शिक्षकांचा विकास आणि वंचित व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास गटांसाठी न्याय्य व उच्च-गुणवत्तेसाठीच्या शिक्षणाकरता सर्व महत्त्वपूर्ण उपक्रमांना पाठबळ, या गोष्टी सुनिश्चित करणे.

26.4. प्रामुख्याने पायाभूत सुविधा आणि संसाधनांशी संबंधित एकदाच केल्या जाणाऱ्या खर्चाव्यतिरिक्त, हे धोरण शिक्षण व्यवस्थेचा विकास साधण्याच्या हेतूने वित्तपुरवठा करण्यासाठी खालीलप्रमाणे दीर्घावधीत भर देण्याची प्रमुख क्षेत्रे म्हणून निश्चित करते: (a) दर्जेदार प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणाची सार्वत्रिक तरतूद; (b) पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान सुनिश्चित करणे; (c) शाळा संकुल/क्लस्टर्सना पुरेशी आणि योग्य संसाधने प्रदान करणे; (d) अन्न आणि पोषण प्रदान करणे (नाष्टा आणि माध्यान्ह भोजन); (e) अध्यापकांच्या शिक्षणामध्ये आणि शिक्षकांचा सतत व्यावसायिक विकास यात गुंतवणूक करणे; (f) उत्कृष्टतेस उत्तेजन देण्यासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये सुधारणा करणे; (g) संशोधन जोपासणे; आणि (h) तंत्रज्ञान आणि ऑनलाईन शिक्षणाचा व्यापक वापर करणे.

26.5. भारतातील शिक्षणावर खर्च केला जाणारा अल्प निधीदेखील जिल्हा/संस्था पातळीवर वेळेवर खर्च केला जात नाही, ज्यामुळे त्या निधीची उद्दिष्टे साध्य करण्यात अडथळे येत आहेत. म्हणूनच, धोरणात योग्य बदल करून उपलब्ध निधीच्या वापराची कार्यक्षमता वाढवणे आवश्यक आहे. निधी सुरळीतपणे, वेळेवर आणि योग्यप्रकारे प्रवाही राहील आणि त्याचा प्रामाणिकपणे वापर यावर आर्थिक प्रशासन आणि व्यवस्थापन लक्ष केंद्रित करेल; प्रशासकीय प्रक्रिया योग्य रीतीने सुधारित आणि सुरळीत केल्या जातील जेणेकरून वितरण व्यवस्थेमुळे खर्च न केलेला निधी साचून राहणार नाही. GFR, PFMS आणि अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना 'अगदी शेवटच्या क्षणी' निधी सोडण्याच्या तरतुदींचे पालन, सरकारी संसाधनांच्या कार्यक्षम वापरासाठी आणि निधी न वापरता पडून राहणे टाळण्यासाठी केले जाईल. राज्ये / HEI ना कामगिरीवर आधारित निधी देण्याची यंत्रणा तयार केली जाऊ शकेल. त्याचप्रमाणे SEDG साठी राखीव निधीच्या इष्टतम वाटपासाठी आणि उपयोगासाठी कार्यक्षम यंत्रणा सुनिश्चित केली जाईल. प्रस्तावित नवीन नियामक व्यवस्थेमुळे निधीच्या सुरळीत, वेगवान आणि अधिक पारदर्शक प्रवाहास मदत मिळेल. या व्यवस्थेत भूमिकांचे स्पष्टपणे विभाजन आणि पारदर्शक स्वयं-प्रकटीकरण, संस्थांचे सशक्तीकरण आणि स्वायत्तता, आणि नेतृत्व पदांवर उत्कृष्ट व पात्र तज्ज्ञांची नेमणूक, या बाबी समाविष्ट आहेत.

26.6. हे धोरण शिक्षण क्षेत्रातील खासगी धर्मादाय कार्याचे पुनरुज्जीवन, सक्रिय प्रसार आणि सहाय्य याचेही समर्थन करते. विशेषतः जे सार्वजनिक अर्थसंकल्पीय सहाय्य त्यांना अन्यथादेखील मिळाले असते, त्याव्यतिरिक्त शैक्षणिक अनुभव सुधारण्याच्या हेतूने, कोणतीही सार्वजनिक संस्था खासगी धर्मादाय निधी उभारण्यासाठी पावले उचलू शकते.

26.7. शिक्षणाच्या व्यापारीकरणाची समस्या या धोरणात अनेक समर्पक आघाड्यांवर हाताळली आहे, ज्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे: आर्थिक व्यवहार, कार्यपद्धती, प्रदान केलेले अभ्यासक्रम व कार्यक्रम आणि शैक्षणिक निकालांचे संपूर्ण सार्वजनिक स्वयं-प्रकटीकरण अनिवार्य करणारा 'सुलभ पण परिणामकारक' नियामक दृष्टिकोन; सार्वजनिक शिक्षणात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक; आणि सार्वजनिक व खाजगी सर्व संस्थांच्या चांगल्या प्रशासनासाठी यंत्रणा. त्याचप्रमाणे, गरजू किंवा पात्र घटकांवर परिणाम न होऊ देता अधिकाधिक खर्चावर पुनर्लाभ मिळवण्याच्या संधीदेखील शोधल्या जातील.

## 27. अंमलबजावणी

27.1. कोणत्याही धोरणाचा प्रभावीपणा त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून असतो. अशा अंमलबजावणीसाठी अनेक उपक्रम आणि कृती आवश्यक असतात, ज्या अनेक संस्थांनी लयबद्धपणे आणि पद्धतशीरपणे राबवल्या पाहिजेत. म्हणूनच, धोरणाचे तत्त्व आणि हेतू लक्षात घेऊन त्याच्या अंमलबजावणीची खात्री करण्यासाठी, MHRD, CABE, केंद्र आणि राज्य शासन, शिक्षणाशी संबंधित मंत्रालये, राज्य शिक्षण विभाग, बोर्ड, NTA, शाळा आणि उच्च शिक्षणाची नियामक मंडळे, NCERT, SCERTs, शाळा, आणि HEIs यांच्यासारख्या विविध संस्थांकडून, निश्चित वेळापत्रकानुसार आणि परीक्षणाच्या योजनेसह, सुसंगत नियोजनाद्वारे आणि शिक्षणाशी संबंधित वरील सर्व संस्थांमध्ये ताळमेळ राखत, या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल.

27.2. पुढील तत्त्वांच्या आधारे धोरणाची अंमलबजावणी केली जाईल. पहिले, धोरणाच्या तत्त्वाची आणि हेतूची अंमलबजावणी होणे अतिशय महत्त्वाची बाब आहे. दुसरे, टप्प्याटप्प्याने धोरणाच्या उपक्रमांची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे, कारण धोरणाच्या प्रत्येक मुद्द्यामध्ये अनेक कृती समाविष्ट आहेत आणि प्रत्येक कृतीसाठी आधीच्या कृतीची यशस्वी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तिसरे, धोरणातील मुद्दे योग्य क्रमावरीने लावले जातील तसेच पहिल्यांदा अतिशय महत्त्वाची आणि तातडीची कामे हाती घेतली जातील, याची सुनिश्चिती करण्यासाठी

प्राधान्यक्रम लावणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून एक मजबूत पाया तयार केला जाईल. चौथे, अंमलबजावणीमध्ये व्यापकता ही गुरुकिल्ली असेल; हे एक सर्वांगीण धोरण असून त्याचे भाग एकेमकांशी जोडले असल्यामुळे, तुकड्या तुकड्यांनी त्याची अंमलबजावणी न करता पूर्णपणे अंमलबजावणी केल्यावरच इच्छित उद्दिष्टे साध्य करता येतील. पाचवे, शिक्षण एक समवर्ती विषय असल्याने, शिक्षणासाठी केंद्र आणि राज्यांमध्ये आपआपसातील काळजीपूर्वक नियोजन, एकत्रित देखरेख आणि सहयोगाने केलेली अंमलबजावणी आवश्यक आहे. सहावे, धोरणाची समाधानपूर्वक अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने, केंद्र आणि राज्य स्तरावर आवश्यक साधनांचा – मानवीय, पायाभूत सुविधा आणि, आर्थिक – वेळेत केलेला समावेश महत्त्वपूर्ण ठरेल. शेवटी, सर्व उपक्रमांची परिणामकारक पध्दतीने सांगड घालण्यासाठी, अंमलबजावणीच्या अनेक समांतर कृतींमधील संबंधांचे विश्लेषण आणि परीक्षण करणे गरजेचे आहे. यामध्ये, मजबूत पाया आणि भावी काळातील सर्व कार्यक्रम व कामांच्या निर्विघ्न प्रगतीची सुनिश्चितता करण्यासाठी, अत्यावश्यक अशा विशिष्ट कृतींमध्ये (उदा. प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणाच्या पायाभूत सुविधांची स्थापना) लवकर गुंतवणूक करणे, याचादेखील समावेश आहे.

27.3. धोरणाची उद्दिष्टे सुस्पष्टतेने आणि टप्प्याटप्प्याने साध्य करण्याकरता, धोरणाच्या प्रत्येक पैलूची अंमलबजावणी, वरील तत्त्वांनुसार करण्याकरता तपशीलवार योजना तयार करण्याच्या दृष्टीने, केंद्र आणि राज्य अशा दोन्ही स्तरांवर, इतर संबंधित मंत्रालयांच्या सहयोगाने आणि त्यांच्याशी सल्लामसलत करून, वेगवेगळ्या विषयांसाठी तज्ज्ञांच्या अंमलबजावणी समित्यांची स्थापना केली जाईल. MHRD आणि राज्यांकडून नियुक्त केलेल्या गटाद्वारे, प्रत्येक कृतीसाठी निश्चित केलेल्या लक्ष्यांनुसार, योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचे एकत्रितपणे वार्षिक परीक्षण केले जाईल, आणि CABE ला परीक्षणाची माहिती कळवली जाईल. 2030-40 च्या दशकामध्ये संपूर्ण धोरण कार्यान्वित झाले असेल, आणि त्यानंतर अजून एक व्यापक परीक्षण केले जाईल.

# संक्षेपाक्षरांची यादी

| | |
|---|---|
| ABC | अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट |
| AI | आर्टिफिशियल इंटेलिजन्स |
| AC | ऑटोनॉमस डिग्री-ग्रँटिंग कॉलेज |
| AEC | ॲडल्ट एज्युकेशन सेंटर |
| API | ॲप्लिकेशन प्रोग्रॅमिंग इंटरफेस |
| AYUSH | आयुर्वेदा, योगा अँड नॅच्युरोपॅथी, युनानी, सिद्धा अँड होमिओपॅथी |
| B.Ed. | बॅचलर ऑफ एज्युकेशन |
| BEO | ब्लॉक एज्युकेशन ऑफिसर |
| BITE | ब्लॉक इन्स्टिट्यूट ऑफ टीचर एज्युकेशन |
| BoA | बोर्ड ऑफ असेसमेंट |
| BoG | बोर्ड ऑफ गव्हर्नर्स |
| BRC | ब्लॉक रिसोर्स सेंटर |
| B.Voc | बॅचलर ऑफ व्होकेशनल एज्युकेशन |
| CABE | सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन |
| CBCS | चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टीम |
| CBSE | सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन |
| CIET | सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल टेक्नॉलॉजी |
| CMP | करिअर मॅनेजमेंट अँड प्रोग्रेशन |
| CoA | कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर |
| CPD | कंटिन्युअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट |
| CRC | क्लस्टर रिसोर्स सेंटर |
| CWSN | चिल्ड्रेन विथ स्पेशल नीड्स |
| DAE | डिपार्टमेंट ऑफ ॲटॉमिक एनर्जी |
| DBT | डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी |

| | |
|---|---|
| DEO | डिस्ट्रिक्ट एज्युकेशन ऑफिसर |
| DIET | डिस्ट्रिक्ट इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन अँड ट्रेनिंग |
| DIKSHA | डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर नॉलेज शेअरिंग |
| DSE | डिरेक्टरेट ऑफ स्कूल एज्युकेशन |
| DST | डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी |
| ECCE | अर्ली चाईल्डहूड केअर अँड एज्युकेशन |
| EEC | एमिनंट एक्सपर्ट कमिटी |
| GCED | ग्लोबल सिटीझनशिप एज्युकेशन |
| GDP | ग्रॉस डॉमेस्टिक प्रॉडक्ट |
| GEC | जनरल एज्युकेशन कौन्सिल |
| GER | ग्रॉस एनरोलमेंट रेशो |
| GFR | जनरल फिनान्शियल रुल |
| HECI | हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया |
| HEGC | हायर एज्युकेशन ग्रँट्स कौन्सिल |
| HEI | हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूशन्स |
| ICAR | इंडियन कौन्सिल ऑफ अॅग्रीकल्चरल रिसर्च |
| ICHR | इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च |
| ICMR | इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च |
| ICT | इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी |
| IDP | इन्स्टिट्यूशनल डेव्हलपमेंट प्लॅन |
| IGNOU | इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी |
| IIM | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट |
| IIT | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी |
| IITI | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशन अँड इंटरप्रिटेशन |
| ISL | इंडियन साईन लँग्वेज |
| ITI | इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट |
| M.Ed. | मास्टर ऑफ एज्युकेशन |

| | |
|---|---|
| MBBS | बॅचलर ऑफ मेडिसिन अँड बॅचलर ऑफ सर्जरी |
| MERU | मल्टीडिसिप्लिनरी एज्युकेशन अँड रिसर्च युनिव्हर्सिटीज |
| MHFW | मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर |
| MHRD | मिनिस्ट्री ऑफ ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट |
| MoE | मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन |
| MOOC | मॅसिव ओपन ऑनलाईन कोर्स |
| MOU | मेमोरॅन्डम ऑफ अंडरस्टॅंडिंग |
| M. Phil | मास्टर ऑफ फिलॉसॉफी |
| MWCD | मिनिस्ट्री ऑफ वुमेन अॅन्ड चाईल्ड डेव्हलपमेंट |
| NAC | नॅशनल अॅक्रेडिटेशन कौन्सिल |
| NAS | नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे |
| NCC | नॅशनल कॅडेट कोअर |
| NCERT | नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग |
| NCF | नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क |
| NCFSE | नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क फॉर स्कूल एज्युकेशन |
| NCFTE | नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क फॉर टीचर एज्युकेशन |
| NCIVE | नॅशनल कमिटी फॉर द इंटिग्रेशन ऑफ वोकेशनल एज्युकेशन |
| NCPFECCE | नॅशनल करिक्युलर आणि पेडॅगॉगीकल फ्रेमवर्क फॉर अर्ली चाईल्डहूड केअर अँड एज्युकेशन |
| NCTE | नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन |
| NCVET | नॅशनल कौन्सिल फॉर वोकेशनल एज्युकेशन अॅन्ड ट्रेनिंग |
| NETF | नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम |
| NGO | नॉन-गव्हर्नमेंटल ऑर्गनायझेशन |
| NHEQF | नॅशनल हायर एज्युकेशन क्वालिफिकेशन फ्रेमवर्क |
| NHERC | नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी कौन्सिल |
| NIOS | नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग |
| NIT | नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी |

| | |
|---|---|
| NITI | नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया |
| NPE | नॅशनल पॉलिसी ऑन एज्युकेशन |
| NPST | नॅशनल प्रोफेशनल स्टँडर्ड फॉर टीचर्स |
| NRF | नॅशनल रिसर्च फाउंडेशन |
| NSQF | नॅशनल स्किल्स क्वालिफिकेशन फ्रेमवर्क |
| NSSO | नॅशनल सँपल सर्व्हे ऑफिस |
| NTA | नॅशनल टेस्टिंग एजन्सी |
| OBC | अदर बॅकवर्ड क्लासेस |
| ODL | ओपन अॅन्ड डिस्टन्स लर्निंग |
| PARAKH | परफॉर्मन्स असेसमेंट, रिव्ह्यू अँड अॅनालिसिस ऑफ नॉलेज फॉर होलिस्टिक डेव्हलपमेंट |
| PCI | फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया |
| PFMS | पब्लिक फायनॅन्शियल मॅनेजमेंट सिस्टिम |
| Ph.D. | डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी |
| PSSB | प्रोफेशनल स्टँडर्ड सेटिंग बॉडी |
| PTR | प्युपिल टीचर रेशो |
| R&I | रिसर्च अॅन्ड इनोवेशन |
| RCI | रिहॅबिलिटेशन कौन्सिल ऑफ इंडिया |
| RPWD | राईट ऑफ पर्सन्स विथ डिसॅबिलिटी |
| SAS | स्टेट अचिव्हमेंट सर्व्हे |
| SC | शेड्युल्ड कास्ट(स) |
| SCDP | स्कूल कॉम्प्लेक्स/क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅन |
| SCERT | स्कूल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग |
| SCF | स्टेट करिक्युलर फ्रेमवर्क |
| SCMC | स्कूल कॉम्प्लेक्स मॅनेजमेंट कमिटी |
| SDG | सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल |
| SDP | स्कूल डेव्हलपमेंट प्लॅन |

| | |
|---|---|
| SEDG | सोशियो-इकोनॉमिकल डिसअँडवांटेज्ड ग्रुप |
| SEZ | स्पेशल एज्युकेशन झोन |
| SIOS | स्टेट इन्स्टिट्यूट्स ऑफ ओपन स्कूलिंग |
| SMC | स्कूल मॅनेजमेंट कमिटी |
| SQAAF | स्कूल क्वालिटी असेसमेंट अॅन्ड अॅक्रेडिटेशन फ्रेमवर्क |
| SSA | सर्व शिक्षा अभियान |
| SSS | सिंपल स्टँडर्ड संस्कृत |
| SSSA | स्टेट स्कूल स्टँडर्ड अॅथॉरीटी |
| ST | शेड्युल्ड ट्राईब(ब्स) |
| STEM | सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनीअरींग अँड मॅथ्स |
| STS | संस्कृत थ्रू संस्कृत |
| SWAYAM | स्टडी वेब्ज ऑफ अॅक्टीव्ह लर्निंग फॉर यंग अस्पायरींग माइंड्स |
| TEI | टीचर एज्युकेशन इन्स्टीट्यूशन |
| TET | टीचर इलिजीबिलीटी टेस्ट |
| U-DISE | युनिफाईड डीस्ट्रीक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन |
| UGC | युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन |
| UNESCO | युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, साइंटीफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन |
| UT | युनियन टेरीटरी |
| VCI | व्हेटरनरी कौन्सिल ऑफ इंडिया |

*****